# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण केंद्र

सत्र–५ अभ्यासपत्रिका क्रमांक ८ DSE-E2
सत्र–६ अभ्यासपत्रिका क्रमांक १३ DSE- E127

# मराठी भाषा व भाषाविज्ञान

बी. ए. भाग–३ : मराठी

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. (मराठी भाषा व भाषाविज्ञान) भाग- ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ३००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-92887-58-1

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ **अभ्यासमंडळ : मराठी** ■

अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **प्रा. (डॉ.) रणधीर शिंदे**
  मराठी विभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
  सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभूषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगाव,
  जि. सांगली
- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा
- **प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा
- **प्रा. (डॉ.) दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
  विद्यापीठ, औरंगाबाद
- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्रा. (डॉ.) गोपाळ ओमाणा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **श्री. के. एस. अतकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद

## प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो;

'**मराठी भाषा व भाषाविज्ञान**' या अभ्यासपत्रिकेची स्वयंअध्ययन पुस्तिका आपल्या हाती देताना आनंद होतो आहे. भाषाविज्ञान हे अभ्यासक्षेत्र अलीकडे एक स्वतंत्र व व्यापक अभ्यासक्षेत्र म्हणून ओळखले जात आहे. काही वर्षांपूर्वी भाषेचा अभ्यास हा वाङ्मयीन अभ्यासाच्या जोडीलाच केला जात होता. बरेचदा हा भाषिक अभ्यास केवळ आस्वादाच्या पातळीवर राहतो. भाषेचा अभ्यास म्हणजे कथानक, आशय, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती, शब्दयोजना असे काहीतरी आपल्या मनात असते. तेच आपल्या अभ्यासात येते. याकरिताच या अभ्यासपत्रिकेचे नामाभिधान 'मराठी भाषा व भाषाविज्ञान' असे केले आहे. अर्थात या अभ्यासपत्रिकेमुळे मराठी भाषेचा भाषाविज्ञानाच्या संदर्भात परिपूर्ण अभ्यास होईल असा दावा करता येत नाही. भाषाविज्ञान हे क्षेत्र इतके व्यापक आहे की, एका छोट्या अभ्यासपत्रिकेत त्याची केवळ सुरुवातही होऊ शकत नाही; मात्र मराठी भाषेच्या संदर्भात भाषा म्हणजे काय, तिची उत्पत्ती कशी झाली, भाषेची लक्षणे वा वैशिष्ट्ये, तिचे स्वरूप, तिचे कार्य कसे चालते यांची तोंडओळख करून घेता येते. त्याचबरोबर स्वनिम व रुपिम विचार, वाक्यविचार हे घटक सत्र पाचमधील अभ्यासपत्रिका क्र. ८ मध्ये समजावून घेता येतील.

भाषेचा वापर करीत असताना जे ध्वनी आपण आपल्या मुखाद्वारे भाषेत वापरात आणतो त्यांना मूलध्वनी म्हणतात. माणसाच्या मुखामध्ये अशी एक यंत्रणा असते की, त्याद्वारे आपण या मूलध्वनींचा उच्चार करू शकतो. या यंत्रणेलाच आपण मुखयंत्र अथवा वागिंद्रिय म्हणतो. त्याची आकृती या पुस्तिकेत दिलेली आहेच; त्याचबरोबर मराठी वर्णमालेचा विचारही केलेला आहे. स्वर, व्यंजन आणि अनुनासिक यांचा उच्चार कसा होतो, मुखयंत्रातील त्यांची उच्चारस्थाने कोणती याचा अभ्यास या घटकाद्वारे होईल. या मूलध्वनींची ओळख आपणास व्हावयास हवीच. ज्याची मातृभाषा मराठी आहे आणि ज्याला भाषाविज्ञान या मातृभाषेच्या साहाय्याने व सोबतीने आत्मसात करावयाचे आहे; त्यांनी मूलध्वनी, वर्णमाला, मुखयंत्र, भाषेची उत्पत्ती, भाषेची लक्षणे वा वैशिष्ट्ये, भाषेचे कार्य, ध्वनिपरिवर्तन, अर्थपरिवर्तन या घटकांची माहिती करून घ्यावयास हवीच. हा अभ्यास अधिक व्यापक करीत असताना प्रमाण मराठी भाषा आणि तिच्या अहिराणी, वऱ्हाडी, चंदगडी, मालवणी या बोलींचा अभ्यास करणे गरजेचे आहे. या बोली भाषांच्या अभ्यासामुळे प्रमाण भाषेच्या शब्दसंग्रहात वाढ होणार आहे. त्यामुळे बोलींचे जतन, संवर्धन करणे या गोष्टींना चालना मिळेल.

आपणास ही पुस्तिका निश्चितच उपयुक्त मार्गदर्शन करेल याचा विश्वास वाटतो.

**■ संपादक ■**

**डॉ. डी. जे. दमामे**
श्रीमती कुसूमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

**डॉ. अशोक तवर**
लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅण्ड कॉमर्स सातारा, जि. सातारा

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**मराठी भाषा व भाषाविज्ञान**
बी. ए. भाग–३ मराठी अभ्यासपत्रिका क्र. ८ व १३

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. डॉ. विठ्ठल नामदेव रोटे**<br>मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव, ता. वाळवा | १ | – |
| **श्री. अमोल चांदेकर**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा | २ | – |
| **डॉ. डी. जे. दमामे**<br>श्रीमती कुसूमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली | ३ | – |
| **डॉ. युवराज देवाळे**<br>कर्मवीर हिरे आर्टस, कॉमर्स, सायन्स अॅण्ड एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर | ४ | – |
| **डॉ. विनायक राऊत**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. पाटण, जि. सातारा | – | १ |
| **डॉ. निलेश शेळके**<br>डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | – | २ |
| **डॉ. संजय साळुंखे**<br>शंकरराव जगताप आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली | – | ३ |
| **डॉ. प्रकाश दुकळे**<br>देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस अॅण्ड सायन्स कॉलेज, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली | – | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. डी. जे. दमामे**
श्रीमती कुसूमताई राजारामबापू पाटील कन्या
महाविद्यालय,इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

**डॉ. अशोक तवर**
लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस,
सायन्स अॅण्ड कॉमर्स सातारा, जि. सातारा

# अनुक्रमणिका

## मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक ८

## सत्र पाचवे


| | | |
|---|---|---|
| घटक १ | भाषोत्पत्ती विचार | १ |
| घटक २ | भाषेचे स्वरूप, व्याख्या आणि वैशिष्ट्ये | ११ |
| घटक ३ | स्वनिम व रुपिम विचार (स्थूल परिचय) | २६ |
| घटक ४ | वाक्यविचार | ४३ |


## मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक १३

## सत्र सहावे


| | | |
|---|---|---|
| घटक १ | मराठीची वर्णमाला | ५७ |
| घटक २ | मराठीचे ध्वनिपरिवर्तन | ७७ |
| घटक ३ | मराठीचे अर्थपरिवर्तन | ८६ |
| घटक ४ | प्रमाण मराठी भाषा आणि तिच्या बोली | १०२ |

## विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्यास साहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# भाषोत्पत्ती विचार

## १.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

- भाषेची उत्पत्ती केव्हा कशी आणि कोणी केली याची माहिती घेता येईल.
- भाषेच्या उत्पत्ती संबंधी विविध कारणांचा, मतांचा ऊहापोह करता येईल.
- भाषेच्या उत्पत्तीविषयीच्या निरनिराळ्या उपपत्तींची माहिती घेता येईल.
- भाषेच्या उत्पत्तीसंबंधी नेमक्या मतांवर किंवा उपपत्तीवर चर्चा करता येईल.

## १.२ प्रस्तावना

भाषा हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. इतर प्राण्यांपेक्षा मानव प्राणी वेगळा ठरतो व त्याचा विकास होण्यापाठीमागे त्याला मिळालेली बोलण्याची शक्ती व त्याच्याकडे असणारे 'भाषा' हे महत्त्वाचे साधन. इतर प्राण्यापेक्षा मानवाने जी प्रगती केली आहे. त्यापाठीमागे भाषा हे महत्त्वाचे कारण आहे. मनुष्याकडे जन्मतःच काही वृत्ती असतात. त्यामध्ये ध्वनी उत्पन्न करणे ही एक वृत्ती आहे. इतर प्राणीही ध्वनी काढतात, पण मानव प्राणी व इतर प्राण्यांच्या ध्वनीमध्ये बराच फरक आहे. ध्वनींना अर्थ देणे, ध्वनी व वस्तू किंवा क्रिया यांचे साहचर्य निर्माण करणे, ध्वनींना संकेत उत्पन्न करणे हे फक्त मानव प्राण्यांच्यातच घडून येते. इतर प्राण्यांच्या बाबतीत या क्रिया होत नाहीत. इतर प्राण्यांच्या ध्वनींना थोड्या फार प्रमाणात अर्थ असतो. परंतु मानवी प्राणी आपल्या बोलण्याच्या व बुद्धीच्या जोरावर निर्माण केलेल्या ध्वनींना योग्य अर्थ देऊन आपले दैनंदिन व्यवहार सुखकर केले. व्यवहारासाठी हात, डोळे, तोंड, शारीरिक हालचाली, चिन्हे, चित्रे वगैरे जरी असली तरी त्या सर्वांपैकी अत्यंत सोयीस्कर असे साधन म्हणजे भाषा होय व ती भाषा मानवाश्रित आहे.

## १.३ विषय विवेचन

भाषेने मानवी जीवन सुकर व सुलभ झाले आहे. व्यवहारसौंदर्य व व्यवहारपूर्तीचे मुख्य साधन म्हणजे 'भाषा' होय. पण ही भाषा केव्हा व कशी उत्पन्न झाली ? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. भाषेच्या शास्त्रशुद्ध व वस्तुनिष्ठ अभ्यासाला सुरुवात झाल्यावर भाषेच्या उत्पत्तीसबंधी अनेक प्रश्न अभ्यासकांच्या मनात निर्माण

झाले. तसेच भाषेची उत्पत्ती हा विषय भाषाशास्त्रात येतो का ? हाही मुलभूत प्रश्न आहे. भाषाशास्त्रात उपलब्ध सामग्रीच्या वस्तुनिष्ठ अभ्यासास महत्त्व दिले जात असल्याने भाषेच्या उत्पत्ती यासारख्या तर्क, कल्पना, अंदाज अशा आधारावर उभारलेल्या उपपत्तींना नव्या भाषाशास्त्रात स्थान नाही. मनुष्याची निर्मिती झाल्यापासून भाषेच्या वापरास सुरुवात झाली असावी. मानवाचा जसजसा विकास झाला तसा भाषेचाही विकास झाला असावा. या विकासाच्या टप्प्यांचे परीक्षण करता येणे शक्य नसल्याने आधुनिक भाषाअभ्यासक भाषेच्या उत्पत्ती या विषयास भाषाशास्त्रात स्थान देण्यास संमती दर्शवित नाहीत. मानवविज्ञान, समाजविज्ञान, मानसशास्त्र अथवा तत्त्वज्ञान या विषयावर अभ्यास व्हावा असे त्यांचे मत आहे. सन १८६६ मध्ये पॅरिस येथे एक भाषाशास्त्र परिषद (L Societe de Linguistique) स्थापन झाली होती. तिच्या नियमावलीतच 'भाषेची उत्पत्ती' हा विषय भाषाशास्त्रात येऊ शकत नाही असे म्हटले आहे. परंतु भाषा हीच मुळी एक सामाजिक वस्तू असल्यामुळे तिच्या विकासाच्या ऐतिहासिक अवस्था पाहताना भाषेच्या उत्पत्तीसंबंधी विचार करणे महत्त्वाचे ठरते.

प्राचीन काळापासून भाषेच्या उत्पत्तीसंबंधी वेगवेगळे सिद्धांत मांडले आहेत. आपले वेद, बायबलचा जुना करार, इतर देशातील धर्मविषयक लेखन यांतून भाषेच्या उत्पत्तीचा विचार थोड्याफार प्रमाणात झालेला दिसतो. १८ व्या शतकापूर्वी भाषा ही ईश्वरनिर्मित असल्याची बहुतेक अभ्यासकांची खात्री होती. नंतरच्या काळात भाषेच्या उत्पत्तीसंबंधी भाषाशास्त्रज्ञांनी आपले विचार मांडायला सुरुवात केली. त्यामध्ये ब्रासेस, कँडिलॅक, रूसो, हर्डर, ग्रिम, राये, डार्विन, हम्बोल्ट, रेनन, जेस्पर्सन, मॅक्समूलर, गायगार, स्वीट स्पेन्सर, इ. भाषाशास्त्रज्ञांनी भाषेच्या उत्पत्तीसंबंधी चर्चा केलेली आहे.

## १.४ भाषेची उत्पत्ती

भाषेच्या उत्पत्तीसंबंधी प्रारंभिक स्वरूपात पुढील तीन उत्पत्ती सांगितल्या जातात.

**१. भाषा : ईश्वरनिर्मित** : या उपपत्तीलाच **'दैवी सिद्धांत'** म्हणून संबोधले जाते. काही धर्मग्रंथात भाषा ही ईश्वरनिर्मित असल्याची वर्णने आहेत. धर्मांच्या बहुतेक ग्रंथांत उत्पत्तीकांडात विश्वातील यच्चयावत वस्तू उत्पन्न करताना ईश्वराला अनेकत्वाची 'स ऐच्छत बहुस्याय' इच्छा झाली व त्याने प्रत्येक वस्तूत आपला अंश घातला व सर्व सृष्टीची उभारणी केली' असे म्हटले आहे. (ऋग्वेद १०-७१-१) 'बृहस्पते प्रथमं वाचो अग्रं यत् प्रैरत नामधेयं दधानाः' या वचनाप्रमाणे ईश्वराने सर्व वस्तू प्रथम निर्माण केल्या व त्यांना नावे दिली. तसेच वाणीस देवांनी निर्माण केले आणि सर्व प्राणी तीच वाणी बोलतात. त्यामुळे भाषेचे मूळ ध्वनी ईश्वरानेच निर्माण केला अशी धारणा आहे. संस्कृत भाषेच्या व्याकरणकाराची-पाणिनीची चौदा सूत्रे शंकराच्या डमरूमधून निघाल्याचे सांगितले जाते. ऐतरेय आरण्यकात वाणीच्या उत्पत्तीचे वर्णन दिसते. ख्रिस्ती मताप्रमाणे आदिमानव जो ॲडम, ईश्वराचा पुत्र असून ईश्वराने सर्वांगपरिपूर्ण भाषा त्यांच्यासाठी निर्माण केली. पृथ्वीवरील धुळीच्या कणांपासून त्याचे शरीर तयार करून त्यात जीवितसार ओतले. म्हणजेच ईश्वराच्या इच्छेनेच विश्व निर्माण झाले असे बायबलच्या उत्पत्तीकांडात लिहिले आहे. कॅथॉलिक ख्रिस्ती मतानुसार हिब्रू हीच सर्व भाषांची जननी असून ती ईश्वरनिर्मित आहे. बौद्ध लोकांच्या म्हणण्यानुसार पाली ही ईश्वरनिर्मित

आहे व तिच्यापासून इतर भाषा निर्माण झाल्या. जैन मतानुसार अर्धमागधी ही सर्व जीवांची भाषा असून महावीराने तिला देववाणीचे सामर्थ्य दिले.

भाषाशास्त्रीय दृष्टिकोणातून 'भाषा ईश्वरनिर्मित आहे' ही उपपत्ती पटण्यसारखी नाही. कारण अजूनही ईश्वराचे अस्तित्व सिद्ध झालेले नाही. जर भाषा ईश्वरानेच भाषा निर्माण केली असेल तर ती सर्व मानवाकरिता एकच असायला हवी होती. अन्य प्राण्यांची भाषा जशी एकरूप आहे तशी मानवाचीही असायला हवी होती. श्रद्धा व अनुमानावर आधारलेली ही उपपत्ती शास्त्रीय बैठकीवर टिकू शकत नाही. ध्वनिनिर्मितीचे साधन ईश्वराने निर्माण केले असे म्हणता येईल. पण संपूर्ण भाषाच ईश्वराने निर्माण केली हे मान्य होणार नाही.

**२. भाषा : राजनिर्मित :** 'भाषा ईश्वरनिर्मित असावी' हे मत मागे पडल्यानंतर भाषेच्या उत्पत्तीसंदर्भात दुसरी उपपत्ती मांडण्यात आली. 'सृष्टी उत्पन्न झाल्याबरोबर मानवांचा जो आद्य समाज तयार झाला, त्या समाजाने सभा भरवून त्यांच्या नेत्याने म्हणजे राजाने व्यवहाराच्या सोयीकरिता काही शब्दांचा समूह तयार करून काहीतरी नियमाने ते समूह बांधून भाषेसंबंधी आरंभ केला असावा' असे मत मांडण्यात आले. परंतु भाषेच्या बाबतीत राजाला कोणत्याही रूढी निर्माण करता येत नाहीत. शब्दाचा संकेत निर्माण करणे ही एक प्रकारची रूढीच आहे आणि अशा प्रकारच्या रूढी राजा निर्माण करू शकत नाही. धर्माच्या किंवा राजकीय रूढी निर्माण करता येतील. पण भाषेच्या बाबतीत धार्मिक व राजकीय सत्ता लंगड्या पडतात. भाषा ही स्वैर असल्याने भाषेच्या वापराबाबतीत नियम करणे कठीण आहे. 'मी म्हणजे राज्य' अशी फ्रान्सचा राजा १४व्या लुईची धारणा होती. भारतातही अनेक राजे होऊन गेले. पण कोणत्याच राजाने भाषेबाबत रूढी किंवा नियम तयार केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे 'भाषा राजानिर्मित' असावी ही उपपत्ती खरेपणाच्या कसोटीला कमी पडते.

**३. भाषा : समाजनिर्मित :** भाषेच्या उत्पत्तीबाबत तिसरे मत म्हणजे भाषा समाजनिर्मित असावी असे आहे. मानवाने काही ध्वनी निर्माण केल्यानंतर त्या ध्वनींना काही अर्थ देण्याचे काम समाज करू शकतो. कारण ध्वनी उत्पन्न झाल्यावर त्या ध्वनींना संकेत दिले जातात व त्या संकेतांना समाजमान्यता असते व त्यानंतर समाज व्यवहार होत असतो. म्हणजेच ध्वनी संकेतांना मान्यता देणे ही भाषा उत्पत्तीच्या मुळाशी असलेले कार्य समाज पार पाडीत असतो. भाषा समाजनिर्मित असल्याचे मत विचारवंत रूसो यांनी मांडलेले आहे.

समाजातील घटकांची परस्परसंमती ही जशी सामाजिक व्यवस्थेच्या किंवा समाजधारणेच्या प्रत्येक बाबतीत आवश्यक आहे. तशी भाषेच्या बाबतीतही आवश्यक आहे. पण भाषा मुळात अस्तित्वात नसताना आद्य मानव समाजाला भाषेची जरूरी का लागावी हे समजत नाही. तसेच समाजाने भाषेबाबत नियमावली करून लोकांनी तसेच बोलावे अशी सक्ती होऊ शकत नाही. भाषेवरून नियमावली होऊ शकते म्हणून समाजाने एकत्र येऊन अथवा त्यांच्या प्रमुखाने नियम तयार करून भाषा निर्माण केली हे मतही बरोबर नाही. भाषा नेहमी स्वतःच वाढते. इतरांच्या नियंत्रणात तिचा विकास होत नाही.

भाषा कोणी निर्माण केली याविषयीच्या मतांचा अभ्यास केल्यानंतर भाषेच्या उत्पत्ती संदर्भात अनेक भाषाशास्त्रज्ञांनी मांडलेल्या मतांचा, सिद्धांतांचा आढावा घेऊ.

************************** ३ **************************

## १.५ भाषेच्या उपपत्तीच्या उपपत्ती/सिद्धांत

### १.५.१ इंगित सिद्धांत (Gesture Theory)

पॉलिनेशियन भाषातज्ज्ञ डॉ. राये यांनी या सिद्धांताची मांडणी केली आहे. डार्विन याने सहा असंबंद्ध भाषांच्या तुलनात्मक अध्ययनावरून या सिद्धांताचा पुरस्कार केला. रिचर्ड याने सन १९३० मध्ये 'ह्युमन स्पीच' या आपल्या ग्रंथात इंगित सिद्धांतांचा पाठपुरावा केलेला आहे. आईसलंडच्या अलेक्झांडर जोहान्सन यानेही या सिद्धांताला पाठिंबा दिला आहे.

या सिद्धांतात भाषेच्या विकासाच्या चार अवस्था मानल्या आहेत. पहिल्या अवस्थे भय, क्रोध, दुःख, आनंद, तहान, भूक, विषयवासना इ. ची अभिव्यक्ती प्रारंभीचा मनुष्य विशिष्ट ध्वनींचा संकेत करून साधीत असे. दुसऱ्या अवस्थेत माणसाने सृष्टीतील अचेतन वस्तूंच्या ध्वनींचे अनुकरण केले. तिसऱ्या अवस्थेत मानवाने आपल्या अंगच्या हावभावांच्या संकेतांनी कार्य साधले. चौथ्या अवस्थेत माणसाने आपल्या मानसिक विकासाच्या संदर्भात अनेक सूक्ष्म भावदर्शक शब्दांची निर्मिती केली. या अवस्थेत स्वर व्यंजने व त्यांची विविध सार्थ जुळवाजुळव करून संकेतांना अर्थ प्राप्त झाला असे मानले आहे. उदा. 'र'च्या उच्चारणात चपळाई असल्याने 'र' ने सुरू होणारे शब्द गतिमान तर 'म' ने सूचित करणारे शब्द बंद करणे, चूप होणे क्रिया दर्शवितात. मुखावरचे हावभाव, हातवारे व यांना प्राप्त होणारे अर्थ यावरच हा सिद्धांत आधारित आहे. तसेच मुखावाटे उच्चारली जाणारी ध्वनिपरंपरा हीच भाषेच्या मूलस्थानी असल्याचे या सिद्धांतातून जाणवते.

### १.५.२ मुखाभिनय सिद्धांत (Oral Gesture)

हावभाव - भाषेचा अपुरेपणा लक्षात आल्यानंतर माणसाचे हात व डोळे हत्यारे व इतर साधने तयार करण्यात गुंतले तेव्हा जीभ, तोंड, ओठ यांचा उपयोग मानवाने अभिव्यक्तीसाठी केलेला असावा. नाका-तोंडातून कोंडलेली हवा बाहेर सोडताना ज्या हालचाली होतात त्यातून ध्वनी बाहेर पडतात. त्या ध्वनींचा उपयोग करून मानवाने भाषा निर्माण केली असावी असा सिद्धांत सर रिचर्ड पॅगेट यांनी मांडला. याच सिद्धांताला मुखाभिनय सिद्धांत म्हणतात.

मौखिक अभिनयाने ओरडून आपले मनोगत अधिक चांगले व्यक्त करता येते. हे मानवाला कळताच त्याला आपले हात-पाय इतर कामासाठी वापरता येऊ लागले. ध्वनींचा वापर वाढत गेल्याने हावभावांची जागा ध्वनींनी घेतली. मानवी मुखावाटे बाहेर पडलेल्या वेगवेगळ्या ध्वनींच्या माध्यमातून भाषा निर्माण झाली असा या सिद्धांताचा अर्थ होतो.

### १.५.३ अनुकरण सिद्धांत (Bow-Bow Theory)

अनुकरण प्रवृत्तीतून भाषेची उत्पत्ती झाली असा सिद्धांत डॉ. गायगर यांनी मांडला. मनुष्याचा स्वभावच अनुकरणप्रिय असून ती त्याची सहजप्रवृत्ती आहे. हे अनुकरण त्याने आपल्या आसपासच्या ध्वनींचे केले. कुत्रा, मांजर, कावळा इ. प्राण्याचे ध्वनींचे अनुकरण करूनच त्यांना नावे देण्याची प्रवृत्ती आपण लहान मुलांच्यामध्ये

पाहतो. उदा. काव काव करणारा कावळा, चिव चिव करणारी चिमणी, भो-भो भुंकणारा कुत्रा, म्याव म्याव करणारी मांजर, म्हणजेच या प्राण्यांच्या मुखातून बाहेर पडणारे ध्वनीच त्यांची नावे ठरतात. टर्रकन फाडणे, मुसमुसणे, रिमझिम पाऊस पडणे, ताडकन मारणे इ. क्रियावाचक शब्दांचे अनुकरण ही महत्त्वाचे आहे. सर्प, फटफटी, धबधबा, किलकिलाट, कचकच इ. भाववाचक शब्दांतील ध्वनींचे अनुकरण लक्षात येण्यासारखे आहे. भोवतालच्या सृष्टीत जड-चेतन वस्तूंचे जे नाना प्रकारचे आवाज होतात त्यांच्या अनुकरणातून भाषेची निर्मिती झाली असा या सिद्धांताचा मुख्य अर्थ आहे. कुत्र्याचे भो-भो (Bow-Bow) असे ओरडणे पाहून मॅक्समूलरने या सिद्धांताची चेष्टा Bow-Bow Theory अशी केली आहे.

यास्काचार्यांनेही पक्षिनामे ध्वनींच्या अनुकरणातून पडलेली असल्याचे म्हटले आहे. उदा. कोकिळ पक्ष्याचे नाव 'कुकू' ध्वनीवरून पडले असावे. परंतु अनुकरण सिद्धांत 'वरकरणी' बरोबर वाटला तरी तो काही अभ्यासकांना पटण्यासारखा नाही. काही थोड्या-फार प्राण्यांची नावे त्यांच्या ध्वनीनुसार पडलेली असतील पण कित्येक प्राण्यांची नावे त्यांच्या ध्वनीनुसार नाहीत. मराठीत बेडूक, हिंदीत मेंढक, इंग्रजीत फ्रॉग, जर्मनमध्ये फ्रॉश, संस्कृतात दर्दुर अशी वेगवेगळी नावे का ? याचे उत्तर सापडत नाही. शिवाय अनेक प्राणीही अर्थहीन ध्वनी काढतात.

**१.५.४ रणन सिद्धांत** (Ding-dong Theory)

रणन सिद्धांताचा निर्देश प्रथम प्लेटोने केलेला असला तर या सिद्धांताची विस्ताराने मांडणी मॅक्समूलरने केली आहे. अनुकरण सिद्धांताची चेष्टा करताना मॅक्समूलर म्हणतो की, 'जगातील प्रत्येक वस्तूला एक स्वतंत्र असा ध्वनी असतो. त्या वस्तूवाचक शब्दालाही एक प्रकारचा नाद प्राप्त होतो. वस्तुवाचक शब्द व त्याचा नाद यात एक प्रकारचा नैसर्गिक असा रहस्यात्मक संबंध असतो.' असे म्हणून त्याने या विशिष्ट ध्वनींच्या संबंधावर या सिद्धांताची उभारणी केली आहे. या सिद्धांतालाच 'वस्तुदानानुकरण' सिद्धांत असे म्हणतात. एखाद्या हातोड्याने लाकडावर, भांड्यावर, विटेवर, दगडावर प्रहार केल्यावर त्यातून येणाऱ्या ध्वनीवरून ती वस्तू कोणती आहे ते समजते किंवा एखादी वस्तू हातातून जमिनीवर पडल्यानंतरही ती वस्तू कोणती ते समजते.

अनुकरण सिद्धांत व रणन सिद्धांत Ding-dong Theory या दोहोंमध्ये फारसा फरक नाही. एक सजीव सचेतन प्राण्याचा प्रतिध्वनी तर दुसरा निर्जीव अचेतन पदार्थांचा प्रतिध्वनी आहे. दोहोंतही प्रतिध्वनींचा संबंध आहे. परंतु मॅक्समूलरचा हा सिद्धांत अनेकांना मान्य नाही. अनेक ध्वनींचा व अर्थाचा संबंध जाणण्याची प्रारंभिक माणसाची शक्ती शास्त्रज्ञांना मान्य नाही. वस्तूदर्शक शब्द व त्याचा नाद यातील संबंध शास्त्रीय दृष्टिकोणातून सिद्ध होत नाही. मॅक्समूलरने स्वतः हा सिद्धांत सोडून दिला होता.

**१.५.५ भावनाभिव्यक्ती सिद्धांत** (Pooh-pooh Theory)

प्रारंभकाळात मनुष्य हा भावनाप्रधान होता. त्यामुळे मानवामध्ये निर्माण होणारे दुःख, सुख, आशा, निराशा, तिरस्कार, पसंती, विस्मय, घृणा इ. विकार भावनांच्या प्रकटीकरणासाठी मानवाने जे भावनावाचक

उद्गार काढले असतील त्यातून भाषा निर्माण झाली असे कँडिलॅक या भाषाशास्त्रज्ञाने म्हटले आहे. उदा. हाय! अहाहा ! अगं आई गं ! ओह ! छट् ! अबब ! अरेरे ! छी ! यू ! हुश् ! या उद्गारातून नाना प्रकारच्या भावना व्यक्त होतात. याच उद्गारातून भाषा उदयास आली. यालाच 'Pooh Pooh Theory' असे म्हणतात.

परंतु हाही सिद्धांत न पटणारा आहे. कारण भाववाचक उद्गारातून भाषा जन्माला आली असेल तर प्रत्येक भाषेत असे शब्द समान असले पाहिजेत. प्रत्येक भाषेत असे शब्द वेगवेगळे दिसतात. तसेच भावनातिरेकात कोणताही शब्द बाहेर पडत नाही. तेव्हा अशा अवस्थेत भाषेची निर्मिती कशी होणार हा प्रश्न उरतोच. फक्त भाववाचक शब्दांची भर भाषेत पडली.

### १.५.६ श्रमपरिहार सिद्धांत (Yo-he-yo)

प्रारंभकाळात मनुष्य श्रमाची कामे करीत होता. कोणतेही श्रमाचे किंवा कष्टाचे काम करताना श्वासाची गती वाढून स्वरयंत्राचे आकुंचन-प्रसरण जलद होऊन कंपन वाढते. अशा वेळी मानवाच्या मुखातून काही ध्वनी आपोआप बाहेर पडतात. उदा. स्त्रिया कपडे धुताना हुश्श हुश्श असा आवाज काढतात. मोठा दगड उचलताना, गुऱ्हाळातील चरक हाताने फिरवताना, शेतातील धान्य काढताना, दळण दळताना मानवाच्या मुखातून वेगवेगळे ध्वनी बाहेर पडल्यास श्रम जाणवत नाही. प्रारंभीच्या काळात माणसाने अशा कष्टमय वातावरणात सामूहिक रीतीने काम करताना परिश्रम जाणवू नये म्हणून गाणी गायिली असावीत व त्यातून भाषा निर्माण झाली, असा सिद्धांत लुडविग्नार' या भाषाशास्त्रज्ञाने मांडला.

शेतात काम करताना शेतकरी भल्लरी गीत गातात. डोक्यावर भाज्यांचे ओझे घेऊन चालणाऱ्या स्त्रिया 'रामाच्या गं बागेमंदी बागेमंदी' सारखे गाणे गातात. प्राथमिक अवस्थेतील मनुष्य समुहाने राहत होता, त्या समुहाबरोबरच श्रमपरिहारार्थ त्याने गाणी गायिली व त्यातून भाषा जन्माला आली, Heave-yo-heave या शब्दांचे yo-he-yo यो-हे-यो असा ध्वनी काढतात. यावरून या सिद्धांतास यो-ही-यो हे नाव पडले.

भावनाभिव्यक्ती सिद्धांतावर जे आक्षेप झाले तेच आक्षेप या सिद्धांताला लागू पडतात. श्रमपरिहार करताना जे शब्द बाहेर पडतात त्यातून भाषा जन्माला आली असे म्हणता येणार नाही. गाण्याने श्रमपरिहार होत असला तरी भाषा जन्माला येणे एवढे सामर्थ्य यात नाही. काही वेळा असे शब्द निरर्थकही असू शकतात.

### १.५.७ प्रेमगानमूलक सिद्धांत (Sing-song Theory)

'भाषेची उत्पत्ती प्रेममूलक आहे' हा सिद्धांत जेस्परसन याने मांडला. त्याच्या मते, ''स्त्री-पुरुषांत एकमेकांवर प्रेम करणे ही सहजप्रवृत्ती आहे. प्रेम करीत असताना स्त्री-पुरुष एकमेकांभोवती फेर धरतात, नाचतात, बागडतात. एकमेकांना खुश करण्यालाही गाणे गुणगुणतात. प्रेममूलक अशा गाण्यातून भाषेचा जन्म झाला.'' कोणत्याही समाजाच्या भाषेचे आद्यरूप पद्यमय असते. भाषेचे मूळ स्वरूप, गान, ते प्रेमामुळे झाले आणि प्रेम करणे ही मानवाची उपजत वृत्ती आहे. प्रेमयुक्त गान हे भाषेचे मूळ कारण आहे, असे जेस्परसन म्हणतो.

परंतु या सिद्धांताची सार्थकता पसरविण्यासाठी भाषेचे मूळ रूप गद्य की पद्य याचा उलगडा होणे महत्त्वाचे आहे. तसेच प्रेम व्यक्त करीत असताना अनेक रूपात होऊ शकते. त्यामुळे प्रेमाचा व ते व्यक्त करण्याचा अधिक व्यापक अर्थ घेणे शक्य आहे. गाणे गुणगुणने भाषेला कसा आकार देऊ शकतो हे स्पष्ट होत नाही. संगीताचा प्रेमाशी संबंध असल्याने sing-song, musical Theory अशीही नावे देण्यात आली आहेत.

### १.५.८ संपर्क सिद्धांत (Contact Theory)

मनुष्य हा संभाषणप्रिय असल्याने एकमेकांशी संपर्क साधून, मिळून-मिसळून राहण्याची त्याची वृत्ती आहे. त्यामुळेच मानव संघटित होऊन समाजाची निर्मिती झाली. आपल्या अनेक गरजा भागविण्यासाठी समाजातील इतर व्यक्तींच्या संपर्कात येत होता. यासाठी स्पर्श, शारीरिक हावभावांबरोबरच मौखिक ध्वनींचा वापर केला जात असे. संपर्काचे प्रमाण वाढत गेले तसेच संपर्काचे माध्यम ध्वनीही विकसित होत गेले व त्यातून भाषा निर्माण झाली. असा सिद्धांत जी. रेव्हेज यांनी मांडला. मनुष्याच्या परस्परसंबंध जोडण्याच्या भावनेतून भाषा जन्मली असावी असे रेव्हेज यांचे म्हणणे आहे.

संपर्काचा आधार भावनात्मक असला तरी त्याला पुढे बौद्धिक स्तर लाभला. ध्वनिविकासास वैचारिक अधिष्ठान मिळताच भाषेचा विकास झालेला दिसून येतो. 'आंबा' शब्द उच्चारला तरी 'मला आंबा हवा' असा वाक्यार्थ प्राप्त होतो. त्यामुळे आज्ञार्थी, नामार्थी शब्द व नंतर वाक्यरचना असा भाषेचा विकास झाला असावा. मानव व सचेतन प्राण्यांच्यामध्ये संपर्काला महत्त्व दिले आहे. पण मनुष्य ध्वनींचा उपयोग केव्हा करू लागला, भाषा कशी अस्तित्वात आली याचे स्पष्टीकरण मिळत नाही.

### १.५.९ क्रीडासक्ती सिद्धांत (Play-way Theory)

लहान मुलांच्या हालचालींकडे आपण बारकाईने लक्ष दिल्यास असे दिसून येते की त्याच्यामध्ये क्रीडासक्ती म्हणजेच अतिरिक्त शक्ती (Superfluous Energy) असते. या अतिरिक्त शक्तीमुळे लहान मूल सतत पाय हलवणे, तोंडाची बडबड करीत असते. लहान मूल शरीराच्या नानाविध हालचाली करीत असते त्यामुळे त्याची शारीरिक वाढ अधिक चांगल्या प्रकारे होते. यामध्ये मुलांना आनंद वाटतो; यावेळी मुले मुखाने ब-ब, म-म, प-प अशी बडबड चालू असते. अशा कार्यशक्तीच्या प्रकटीकरणातून स्वरांची निर्मिती मुखावाटे होऊन त्यांच्या समूहाच्या अर्थाची जाणीव त्याला होऊ लागते. स्वरोत्पादन, स्वरसंयोग, स्वरसंकेत अशा क्रिया वाढत जाऊन मुले भाषा शिकत राहतात. अतिरिक्त कार्यशक्तीच्या वापरालाही आनंदाने जी क्रीडासक्ती मुलांच्यात निर्माण होते तीच भाषेची प्राथमिक अवस्था होय.

लहान मूल भाषा शिकते, भाषा बोलणाऱ्यांच्या सान्निध्यात वेगळ्या परिस्थितीत ते भाषा निर्माण करीत नाही. त्यामुळे आदिमानवाने भाषा कशी निर्माण केली याचे उत्तर या सिद्धांतातून मिळत नाही.

### १.५.१० समन्वय सिद्धांत

वरील सिद्धांतातून भाषेच्या उत्पत्तीबाबत स्पष्ट मत तयार होत नाही. म्हणून भाषाशास्त्र स्वीट याने वरील सिद्धांताचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते, शब्दांचे तीन प्रकार असून पहिल्या प्रकारात अनुकरणात्मक शब्द, दुसऱ्या प्रकारात भावनाभिव्यक्ती करणारे तर तिसऱ्या प्रकारात प्रतिकात्मक शब्द येतात. मामा, बाबा, पापा हे बालकांच्या मुखातील शब्द प्रतिकात्मक आहेत. भाषाशास्त्र ज्यांना नर्सरी शब्द म्हणते ते सर्व याच प्रकारातील आहेत. यातील बहुतेक शब्दांचे ध्वनी ओष्ठ्य आहेत. लहान मुलांची देखभाल करणाऱ्या नातेवाईकांचा निर्देश करणारे हे शब्द आहेत.

## १.६ समारोप

वरील सर्व विवेचनावरून असे दिसते की कोणताच सिद्धांत किंवा उपपत्ती भाषेच्या उत्पत्तीबाबत समाधानकारक उत्तर देत नाही. प्रत्येक सिद्धांतात काही ना काही उणिवा आहेत. कोणत्या तरी एकाच कारणाने किंवा परिस्थितीत भाषा निर्माण झाली असे म्हणता येणार नाही. 'स्वीट' याने सर्व सिद्धांताचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला असला तरी त्यातून काही निष्कर्ष निघत नाही. तसेच स्वर व व्यंजन यांची उत्पत्ती कशी झाली याचेही उत्तर मिळत नाही.

भाषेची उत्पत्ती कशी झाली याबाबत भाषाअभ्यासक इतर पर्याय शोधतात. लहान मुले भाषा कशी शिकतात, मानवाच्या व्यक्तिगत विकासाचा अभ्यास, सामुहिक विकासाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. लहान मुलांची निरर्थक बडबड, त्यांची अनुकरणप्रवृत्ती, त्यांच्या शब्दातील-बोलण्यातील चुका, त्यांचे विशिष्ट संकेत, ध्वनिउच्चारण, शब्दसंग्रह इ. अभ्यास भाषेची उत्पत्ती समजावून घेण्यास उपयुक्त होईल. लहान मुले नवीन शब्द तयार करताना त्यामागील त्यांची मानसिकता ध्यानात घ्यावी लागेल.

लहान मुलांप्रमाणे रानटी अवस्थेतील मानवाचा भाषेच्या प्रारंभिक स्वरूपाचा शोध तपासायला हवा. आदिमानवाचे संबंधी अंदाज करण्यासाठी लिखित साधनांचा फारसा उपयोग होत नाही. कारण लिखित साधने काही वर्षे मागे घेऊन जातात. त्यामुळे भाषा उत्पत्ती संदर्भात आपणाला नेमके उत्तर सापडत नाही.

## १.७ पारिभाषिक शब्द

**१. ॲडम** : ईश्वराचा पुत्र, ख्रिश्चन धर्मग्रंथ 'बायबल' मध्ये ही संकल्पना आहे.

**२. ऑटो जेस्परसन** : डॅनिश भाषाशास्त्रज्ञ, कोपेनहेगन विद्यापीठात प्रोफेसर होते. सामान्य भाषा सिद्धांत, व्याकरण सिद्धांत, इंग्रजी व्याकरणावर अभ्यास.

**३. ऋग्वेद** : प्राचीन भारतीय धर्मग्रंथ

## १.८ स्वयं अध्ययनासाठी स्वाध्याय

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. 'स्वीट' याने कोणता सिद्धांत मांडला आहे ?

(अ) समन्वय (ब) इंगीत (क) प्रेममूलक (ड) अनुकरण

२. 'अनुकरण सिद्धांत' कोणत्या भाषाशास्त्रज्ञाने मांडला आहे ?

(अ) लुडविग्नार (ब) डॉ. गायगर (क) रेव्हेज (ड) रूसो

३. अनुकरण सिद्धांताची मॅक्समूलरने कोणत्या नावाने चेष्टा केली.

(अ) भो-भो थेअरी (ब) प्ले वे थेअरी

(क) पो-पो सिद्धांत (ड) यो ही यो थेअरी

४. श्रमपरिहार सिद्धांत कोणी मांडला आहे ?

(अ) स्वीट (ब) मॅक्समुलर (क) लुडविग्नार (ड) रूसो

५. 'भाषा समाजनिर्मित आहे' हे मत कोणी मांडले आहे ?

(अ) डॉ. गायगर (ब) मॅक्समूलर (क) जेस्परसन (ड) रूसो

६. Play Way Theory या सिद्धांताला मराठीत कोणत्या नावाने ओळखले जाते ?

(अ) समन्वय सिद्धांत (ब) क्रीडासक्ती सिद्धांत

(क) संपर्क सिद्धांत (ड) इंगित सिद्धांत

७. 'हावभावातून भाषा निर्माण झाली' हे मत कोणी मांडले आहे ?

(अ) डॉ. राये (ब) गायगर (क) स्वीट (ड) जेस्परसन

८. 'प्रेमयुक्त गान हेच भाषेचे मूळ कारण आहे' हे मत कोणी मांडले आहे ?

(अ) स्वीट (ब) गायगर (क) कॉंडिलॅक (ड) जेस्परसन

९. भाषेची उत्पत्ती व भाषेची वाढ याबाबत मॅक्समूलरने कोणता सिद्धांत मांडला आहे ?

(अ) रणन सिद्धांत (ब) श्रमपरिहार सिद्धांत (क) प्रेमगानमूलक सिद्धांत (ड) इंगित सिद्धांत

१०. प्रेममूलक सिद्धांताला कोणत्या नावाने ओळखले जाते ?

(अ) इंगित सिद्धांत (ब) संगीत सिद्धांत (क) भो-भो सिद्धांत (ड) संपर्क सिद्धांत

**उत्तरे** : १-अ, २-ब, ३-अ, ४-क, ५-ड,
६-ब, ७-अ, ८-ड, ९-अ, १०-ब.

************************* ९ *************************

**(ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. भाषेच्या उत्पत्तीसंबंधी विविध सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

२. भाषेच्या उत्पत्तीसंबंधी प्रचलित मतमतांतराची चर्चा करा.

**(क) लघुत्तरी प्रश्न**

१. भाषेच्या उत्पत्तीसंबंधी प्रारंभिक मतांचा थोडक्यात आढावा घ्या.

२. अनुकरण सिद्धांत व रणन सिद्धांत थोडक्यात स्पष्ट करा.

३. क्रीडासक्ती सिद्धांत व भावनाभिव्यक्ती सिद्धांत थोडक्यात स्पष्ट करा.

**(ड) टीपा लिहा.**

१. श्रमपरिहार सिद्धांत

२. संपर्क सिद्धांत

३. वस्तुनादानुकरण सिद्धांत

## १.९ संदर्भ ग्रंथ

१. भाषाविज्ञान परिचय : डॉ. कुबेर, डॉ. सुलक्षणा कुलकर्णी

२. भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : अनिल गवळी

३. मराठी भाषा उद्‌गम व विकास : कृ. पां. कुलकर्णी

४. सुबोध भाषाशास्त्र : प्र. र. जोशी

## घटक – २

# भाषेचे स्वरूप, व्याख्या आणि वैशिष्ट्ये

### २.० उद्दिष्टे

१. भाषा म्हणजे काय समजेल.

२. भाषेच्या व्याख्या आणि वैशिष्ट्ये समजतील.

३. भाषेचे स्वरूप समजेल.

४. भाषा समाजव्यवहाराचे साधन असल्याचे स्पष्ट होईल.

५. सी. एफ. हॉकेटने सांगितलेली भाषेची सात वैशिष्ट्ये समजतील.

६. भाषिक व भाषेतर संप्रेषणाचे स्वरूप माहिती होईल.

### २.१ प्रास्ताविक

भाषा मानवनिर्मित महत्त्वाचा सामाजिक आविष्कार आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये भाषेचा उपयोग अनिवार्य असून, भाषा मानवी संपर्काचे महत्त्वाचे साधन आहे. मानवाच्या सामाजिक प्रक्रियेमध्ये व सर्व क्षेत्रातील प्रगतीच्या केंद्रस्थानी भाषा आहे. भाषा संपर्क प्रक्रियेमध्ये भाषेबरोबर अन्य माध्यमेही आहेत. हावभाव, चित्रे, खुणा इत्यादी बाबींचा भाषा म्हणून उपयोग करता येतो. पण या स्वरूपाच्या भाषिक व्यवहाराला मर्यादा असतात. तर ध्वनिरूप भाषिक व्यवहार अत्यंत प्रभावी असतो. भाषा ध्वनिरूपातून व्यक्त होते तेव्हा ती सर्वस्पर्शी आणि सर्वव्यापी असते. भाषा संप्रेषणाचे, संवादाचे महत्त्वाचे साधन म्हणूनच कार्य करत असते. उदा. माहिती, ज्ञान, विचार, भावना यांची देवाण-घेवाण भाषेच्या माध्यमातूनच करता येते. हे भाषेचे मुलभूत कार्य आहे.

आधुनिक भाषाविज्ञानात भाषेच्या संबंधाने विविध संकल्पना मांडलेल्या आहेत. त्या समजून घेणे. भाषेच्या व्याख्या, स्वरूप आणि वैशिष्ट्ये इत्यादींचा विचार येथे जाणिवपूर्वक करावयाचा आहे.

**भाषा म्हणजे काय ?**

'भाषा' ही संकल्पना संमिश्र आहे. तोंडातून शब्दही न काढता भाषिक संप्रेषण घडते. या भाषेला मूक भाषा वा हावभावाची भाषा म्हणता येते. वाहतूक पोलिसांचे हातवारे संदेशवहन घडवत असते. संगणकाची भाषा, लाल-हिरव्या दिव्यांची भाषा इत्यादी शब्दप्रयोग भाषेबाबत योजता येतात. 'भाषा' हा

शब्द संकेताची पद्धत या अर्थाने योजिलेला आहे. संकेतानुसार व्यवस्था ठेवली जाते. त्या माध्यमातून विनिमय घडत असतो. उदाहरणार्थ, धोका : लाल रंग, ध्वज : प्राणी, पक्षी, रंग, चित्रे, कापड, वस्तू इत्यादी विविध माध्यमे संकेतासाठी योजली जातात.

भाव-भावना, आचारविचार व्यक्त करण्यासाठी हावभावाच्या भाषेचा आधार घेतला जातो. शिट्टी वाजविणे, हात दाखविणे, जांभई देणे, पाय आपटणे, टाळी वाजवणे, हसणे इत्यादी मानवी हावभावांची भाषा असते. या स्वरूपाच्या भाषांत व्यवहाराना हावभावाची भाषा म्हणतात. तर मुखावाटे ध्वनी निर्मितीच्या माध्यमातून बोलली जाणारी भाषा ध्वनिच्या अर्थपूर्ण संरचनेची भाषा असते. या स्वरूपाच्या भाषेचे मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

मानव आणि मानवेतर प्राणी या दोहोंची स्वतःची भाषा व्यवस्था आहे. पण मानवेतर प्राण्यापेक्षा मानवाची भाषा अर्थदृष्ट्या आणि व्यवहारदृष्ट्या प्रगत आहे. मानवाला अन्य प्राण्यापेक्षा हात व भाषा ही दोन महत्त्वाची साधने उपलब्ध असल्यामुळे तो अन्य प्राण्यांच्या तुलनेत श्रेष्ठ व प्रगत आहे. भाषेचा अभाव असता तर मानव अन्य प्राण्यांप्रमाणे जीवन जगताना पहावयास मिळाला असता. भाषा हे मानवाच्या प्रगतीचे महत्त्वाचे साधन असल्याचे यावरून स्पष्ट होते. एकाने व्यक्त केलेल्या भावना, गरजा आणि इच्छा दुसऱ्यापर्यंत यशस्वीपणे पोहोचविण्याचे कार्य भाषेमुळे साध्य होते. यामुळे सामाजिक जीवन सुलभ झालेले आहे. मानवी समाजातील प्रगती, श्रमविभाजन आणि परिस्थितीनुसार सामोरे जाण्याचा मानवी स्वभाव या सर्वामागील कारण भाषाव्यवस्थाच आहे.

भाषा मानवी व्यवहारामध्ये दुधारी शस्त्राप्रमाणे कार्य करते. सभ्य-असभ्य, खरे-खोटे, श्लील-अश्लील इत्यादी स्वरूप व्यक्त होत असते. भाषेमुळे चांगलेही कार्य साधते, तर भीषण हत्याकांडही भाषेच्या वापरातून घडल्याची उदाहरणे पहावयास मिळतात. भाषा मानवाला एकत्र आणते. भाषेमुळेच मानववर्ग विभागला देखील जातो. हे जरी भाषेतून घडत असले तरी भाषेची गरज महत्त्वाची आहे. भाषा मानवी संवादाचे प्रभावी माध्यम असल्यामुळे तिची अनिवार्यता महत्त्वाची आहे.

भाषेची व्याप्ती आणि विस्तार व्यमिश्र स्वरूपाचा असतो. इंग्रजी, रशियन या भाषा बोलणाऱ्यांची संख्या जगभरात विपूल आहे. तर मराठी लॅपिश यासारख्या विविध भाषा जगभरात बोलणाऱ्यांची संख्या मर्यादित पहावयास मिळते. तर भाषेचा संबंध धर्माशीही जोडलेला पहावयास मिळतो. उदाहरण म्हणून संस्कृत भाषेचा विचार करता ही भाषा धर्मविधी, कार्य इत्यादीमध्ये योजली जाते. पण व्यवहारामध्ये तिचा वापर केला जात नाही. यावरून भाषेची व्याप्ती अतिव्याप्तही दिसते आणि अतिमर्यादितही पहावयास मिळते.

भाषिक लक्षणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती भाषागणिक बदलतात. तरीही त्यांच्यात भौगोलिकदृष्ट्या साधर्म्य आढळते. हे लक्षणाचे महत्त्वाचे विशेष म्हणून पहावे लागेल. उदाहरणार्थ, भारतातील विविध भाषेमध्ये 'मूर्धन्य' ध्वनीचा विशेष उपयोग केलेला आढळतो. बाल्कन राष्ट्रामधील

भाषेमध्ये 'निश्चयार्थी' उपपद शेवटी येते. अतिपूर्व देशांमधील भाषामध्ये 'ल्' व 'ळ्' यामध्ये फरक आढळत नाही. या स्वरूपात भाषेतील भाषागणिक लक्षणाचे विवेचन श्री. न. गजेंद्रगडकर यांनी लिहिले आहे.

**भाषेच्या व्याख्या**

भाषा आणि भाषिक व्यवहार याबाबतचा अभ्यास भाषा-अभ्यासकांच्या अभ्यासाचा, चिंतनाचा विषय आहे. सामान्य माणसांना याबाबतचा विचार पडत नसतो. त्यांना या स्वरूपाचे प्रश्न पडण्यापूर्वीच भाषा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होऊन जाते. मानव जन्माबरोबर भाषा शिकण्याची प्रक्रिया सुरू होते. ही शिकण्याची क्षमता नैसर्गिक स्वरूपाची असते. आपल्या परिसरातील भाषा संस्कृती संकेतासह आत्मसात केली जाते. भाषा निर्मितीबाबत मानवाला सातत्याने प्रश्न पडत आलेले आहे. आपल्या चिंतनातून, विचारातून, निरीक्षणातून आणि अनुभवातून भाषाविषयक विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भाषा = Language (इंग्रजी भाषेत पर्यायी शब्द योजतात.)

Lingua (लॅटिन) या शब्दाचा अर्थ Speech, Tongue असा आहे.

भाषेच्या अभ्यासकांनी भाषा म्हणजे काय, तिचे स्वरूप व वैशिष्ट्ये या दृष्टीने विवेचन करणाऱ्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. या व्याख्या भाषा आणि भाषिक व्यवहार व संप्रेषण समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. त्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

१. कृ. पा. कुलकर्णी हे महत्त्वाचे भाषाभ्यासक आहेत. 'मराठी भाषेचा : उद्‌गम आणि विकास' हा ग्रंथ लिहून महत्त्वाचे संशोधन मांडलेले आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी पुढील व्याख्या नोंदविलेली आहे. ''भाषा हा शब्द भाष् (आवाज उत्पन्न करणे) या धातूपासून आला आहे. भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्वित ध्वनीचा समूह.'' व्यवहार साधन व व्यवहारपूर्तीचे मुख्य उद्दिष्ट भाषेच्या माध्यमातून पूर्ण होते. आत्मप्रकटीकरण (Self-expression) व आत्मनिवेदन (self-communication) या प्रमुख बाबी भाषेच्या केंद्रस्थानी असतात. (पृष्ठ क्र. १-२)

२. भाषा व मराठी संस्कृतीचे विचारवंत व अभ्यासक ना. गो. कालेलकर यांनी आपल्या 'भाषा व संस्कृती' या ग्रंथामध्ये भाषा आणि तिचे स्वरूप-वैशिष्ट्ये याबाबत मौलिक विवेचन केलेले आहे. त्यांनी भाषेची व्याख्या करताना म्हटले आहे, ''भाषा म्हणजे मूळ आशयाशी कार्यकारण संबंध नसलेल्या ध्वनिसंकेतांनी बनविलेली समाजव्यवहाराला साह्यभूत अशी भाषा ही एक पद्धती आहे.'' (भाषा आणि संस्कृती १९६९, पृष्ठ क्र. ८) अशा स्वरूपात भाषेच्या व्याख्येचे महत्त्वपूर्ण विवेचन केलेले आहे.

३. श्री. न. गजेंद्रगडकर यंनी आपल्या 'भाषा आणि भाषाशास्त्र' या भाषाविषयक ग्रंथामध्ये व्याख्या करताना म्हटले आहे, ''यादृच्छिक ध्वनिसंकेतावर आधारलेली, समाजव्यवहाराला साह्यभूत अशी पद्धती म्हणजे भाषा.'' (भाषा आणि भाषाशास्त्र १९९१, पृष्ठ क्र. १०८)

४. ''भाषा ही एक सहजक्रिया आहे. तिचा आपणास इतका परिचय असतो की, भाषेचा स्वतंत्र विचार करण्याचा व अभ्यास करण्याचा विषय आहे. याची जाणीव नसते. त्याचबरोबर भाषा ही अर्जित वस्तू आहे. काही ध्वनी निर्माण करता येणे ही गोष्ट सहज असली तरी आशय प्रकट करणारे विधान करता येणे म्हणजे बेलता येणे ही माणसाने मिळविलेली म्हणजे अर्जित वस्तू आहे.'' (अभिनव भाषाविज्ञान : गं. ना. जोगळेकर, पृ. क्र. २-३)

''भाषा बोलली जात नसून ती एक संभाव्य अवस्था असते. जेव्हा भाषेचे ध्वनीत रूपांतर होते तेव्हा ती भाषा राहत नाही, तर भाषण होते. भाषण ही व्यक्तिगत क्रिया असते. याउलट भाषा ही व्यक्तिनिरपेक्ष गोष्ट आहे. ती व्यक्तीनिरपेक्ष असली तरी संपूर्ण समाजाची मालमत्ता या अर्थी एक समाजसापेक्ष अशी सामाजिक संस्था असते. (भाषाविज्ञान आणि मराठी : अनिल (डॉ.) गवळी, पृष्ठ क्र. १६-१७)

भाषेच्या वरील व्याख्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यानंतर भाषेच्या स्वरूप, संकल्पना आणि वैशिष्ट्यांवर वरील सर्व अभ्यासक भाष्य करताना दिसतात. त्याचबरोबर समाजव्यवहार पार पाडण्यासाठी हे ध्वनिसंकेत आशयधारण करतात. हे त्यांनी निसंदिग्धपणे नोंदविलेले आहे. हाच आशय अधिक स्पष्ट करणाऱ्या पुढील पाश्चिमात्य भाषाभ्यासकांच्या व्याख्यांचा विचार करूया. त्या अशा,

''कल्पना, भावना आणि इच्छा दुसऱ्याला सांगण्याचे, स्वतःच्या इच्छेवर अवलंबून असणारे, मानवी साधन म्हणजे भाषा'' - एडवर्ड सपीर.

''ध्वनी व अर्थ यात सांगड घालण्याच्या चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय.''- फेर्दिनां-द-स्योस्यूर.

भाषा संकेतबद्ध असून चिन्हव्यवस्था आहे. भाषेतील चिन्हांना स्वतःचा अर्थ नसतो. हा अर्थ त्यांना समाज देत असतो. मानव ज्या वास्तूत राहतो त्या वास्तूला 'घर' म्हणतात. तर इंग्रजीमध्ये त्यास 'हाऊस' म्हटले जाते. एकाच वस्तूसाठी भिन्न भाषेत भिन्न शब्द आढळतात. याचाच अर्थ प्रत्येक भाषा समूहाने आपल्या व्यवहारासाठी वस्तूंना आपआपल्या परीने नावे दिलेली आहेत. काही वेळा एकाच भाषेत एकाच वस्तूला भिन्न-भिन्न नावे असतात उदाहरणार्थ, कोल्हापूर परिसरात पावसाळ्यात डोक्यावर घेतात त्यास 'इरलं' म्हणतात. तर चंदगड परिसरात त्यास 'गोख' म्हणतात. याचा अर्थ त्या-त्या परिसरातील समूहाने आपल्या व्यवहारासाठी स्वतःचे अर्थसंकेत दिलेले आहेत.

**भाषेचे स्वरूप**

भाषेच्या व्याख्यांचा तपशीलवार विचार केल्यानंतर भाषेचे पैलू समजण्यास मदत होईल. याच आधारे भाषेचे स्वरूप स्पष्ट करण्यास साह्य होईल. भाषा ही मानवाची सामाजिक संख्या असून, ती मानवाची अद्वितीय निर्मिती आहे. आज जगभरामध्ये सुमारे सात हजार पेक्षा जास्त भाषा व्यवहारामध्ये बोलल्या जातात. यापैकी सुमारे १६५० भाषा केवळ भारतामध्ये व्यवहारात बोलल्या जातात. मानवी जीवनाचे सर्व अंगे भाषेने व्यापलेली आहेत. भाषा मानवी भावभावना शब्दरूप करून संवाद साधणारे महत्त्वाचे साधन

आहे. मानव समाजशील प्राणी असल्यामुळे त्यास भाषेची आणि भाषेच्या अस्तित्वासाठी समाजाची गरज आहे. मानवी समाजाच्या प्रगतीसाठी व अस्तित्वासाठी भाषा महत्त्वाची वा गरजेची आहे. या बाबीचा विस्तृत विचार पुढील काही महत्त्वाच्या मुद्यांच्या आधारे करता येईल.

**१. भाषा : समाजव्यवहाराचे माध्यम**

मानव समाजशील प्राणी आहे. जीवनामध्ये असंख्य गोष्टीसाठी तो परस्परावर अवलंबून असतो. स्वतःच्या गरजा स्वतः पूर्ण करण्याचे सामर्थ्य या विश्वात एकमेव माणसामध्ये नसते. तर त्यासाठी परस्परांची गरज असते. त्याचबरोबर समूहाने राहण्यासाठी भाषा महत्त्वाची असते. कारण समूहाने राहणे ही मानवाची नैसर्गिक गरजात्मक प्रेरणा असते. यातूनच समाजसंस्थेची निर्मिती झाली.

समाजनिर्मिती, संघटनासाठी भाषा महत्त्वाची असते. समाजसंक्रमणाची प्रक्रिया भाषेमुळे शक्य असते. समाजजीवनात असंख्य गोष्टीसाठी आविष्कृत व्हावे लागते. जीवनातील मानवी सर्व संक्रमण समजून घेण्यासाठी भाषा हेच एकमेव साधन आहे. आपल्या संस्कृतीतील श्रद्धा, परंपरा, रूढी, चालीरिती यांचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे, एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात आणि विचार, भावनांची देवाण-घेवाण सतत भाषेमुळे घडत असते. आपण मिळविलेल्या माहिती, ज्ञानाचे आणि संस्कृतीचे संचित पुढील पिढीकडे संक्रमणाचे कार्य भाषा माध्यमानेच शक्य असते. यातून भाषा ही समाजव्यवहाराचे माध्यम असल्याचे स्पष्ट होते.

**२. ध्वनिमाध्यमता**

भाषा ही मानव निर्मित ध्वनीची सृजनशील व्यवस्था आहे. ध्वनी हे भाषेचे माध्यम असून या माध्यमातून आशयाची अभिव्यक्ती हेच भाषेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. ध्वनी आशयपूर्ण असतात त्याचप्रमाणे संकेतबद्ध चिन्ह व्यवस्थाही असते. भाषेला प्राप्त झालेला अर्थ समाजाने बहाल केलेला असतो. समाजाला ही संकेतचिन्ह व्यवस्था मान्य असते. म्हणजेच प्रत्येक समाजाची भाषा भिन्न असल्यास त्यांची त्यांची संकेत व्यवस्था असते. भाषेचे माध्यम ध्वनी असल्यामुळे भाषा संप्रेषणव्यवहारासाठी महत्त्वाचे साधन असते. कारण ध्वनी विविध गुणांनी संपन्न आहेत. ते सतत मानवासोबत, मानवी चिंतन-विचार यांच्या अधीन असतात. भिंत, अंधार, अंतर यासारख्या नैसर्गिक अडचणींना ध्वनी पार करतात. ध्वनी म्हणजे वायूलहरी होत. त्यामुळे संप्रेषण जलद गतीने घडत असते. कमीत-कमी श्रमामध्ये सहज उपलब्ध होणारे ध्वनी हे भाषेचे माध्यम असल्यामुळे भाषा वैविध्यपूर्ण वा वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली आहे.

**३. संकेतबद्धता**

भाषा ध्वनिमय संकेताचा आशयपूर्ण व्यवहार असतो. ती ध्वनिसंकेतावर आधारलेली पद्धती आहे. भाषेतील ध्वनिसंकेतांना समाज मान्यता असते. ध्वनीच्या विशिष्ट मांडणीतून भाषा व्यवहारामध्ये संकेत निर्मिती झाली. हे संकेत प्रत्येक समाजानुसार त्यांच्या भाषाव्यवहारामध्ये स्वतंत्रता दिसते. मराठी भाषेमध्ये ज्या प्राण्याला 'कुत्रा' म्हणतात. त्या प्राण्यास हिंदी भाषेमध्ये 'कुत्ता' म्हणतात. संस्कृत भाषा व्यवहारात


'श्वान' आणि इंग्रजी भाषा व्यवहारात 'डॉग' म्हटले जाते. या उदाहरणातील सर्व भाषेमध्ये ध्वनी भिन्न-भिन्न आहेत. परंतु प्रत्येक भाषेतील ध्वनीतून व्यक्त होणारा संकेत अर्थ एक विशिष्ट प्राणी असाच आहे. प्रत्येक भाषा व्यवहारामध्ये या विशिष्ट (कुत्रा) प्राण्याला कोणत्या ध्वनिसमुच्चयाने ओळखायचे हे ठरलेले आहे. याबाबत उत्तर देता येत नाही. ही त्या-त्या भाषेची भाषिक पद्धती आहे. असाच निष्कर्ष नोंदवावा लागेल. रस्त्यावर लावण्यात येणारे पिवळे, लाल दिवे विशिष्ट अर्थपूर्ण संकेतच देत असतात. या स्वरूपाच्या संकेताना मर्यादा असतात. मात्र भाषेतील संकेतबद्धता हे भाषाव्यवहाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अशा ध्वनिसंकेतबद्धतेस सोस्यूर या भाषाअभ्यासकाने बुद्धिबळाच्या खेळाचे उदाहरण दिले आहे.

**४. प्रतिकात्मकता**

भाषेत योजिलेल्या ध्वनिसंकेतांना त्या-त्या समाजाने ठरविलेले संकेत असतात. यादृच्छिकतेच्या तत्त्वानुसार भाषेत ध्वनिसंकेत योजले जातात. ध्वनिमुळे निर्माण होणारी प्रतिकात्मकता ही महत्त्वाची असते. ज्ञानग्रहण, समज या प्रतिकात्मकतेमुळे शक्य होते. मानव ध्वनिसंकेताबरोबरच व्यवहारासाठी इतर काही संकेत वापरतो; यातूनही प्रतिकात्मकता दिसून येते. या भाषेतर संकेतानाही मानवाची एक विशिष्ट भाषा म्हणूनच ओळखले जाते. उदाहरणार्थ दोन बोटे 'व्ही' आकारात करणे म्हणजे विजय दर्शविणे, तर अंगठा जमिनीकडे करणे म्हणजे पराजय दर्शविणे. या संकेतानाही मानवी भाषा म्हणूनच ओळखले जाते. त्याचबरोबर दात-ओठ खाणे-रागविणे, डोके खाजविणे-विचार करणे, देवापुढे हात जोडणे-शरण जाणे इत्यादी प्रतिकात्मक भाषेचा व्यवहारात विचार केला जातो.

**५. भाषा : एक प्रक्रियात्मक पद्धती**

भाषिक व्यवहारामध्ये सुटेसुटे ध्वनी योजून उपयोग होत नाही. तर ध्वनींच्या समुच्चयांना अर्थ असतो. हा समुच्चयही अर्थदृष्ट्या महत्त्वाचा असतो. ध्वनींचा समुच्चय आणि आशय यांचा संबंध यादृच्छिक असतो. भाषा व्यवहारात योजताना एक पद्धती वापरली जाते. ध्वनिसमुच्चयाचे अर्थ भाषा वापरणाऱ्या प्रत्येक भाषिकाला ज्ञात असतात. त्यातूनच भाषेतील ध्वनीचा स्वीकार श्रोत्याकडून घडत असतो. भाषाव्यवहाराची प्रक्रिया दर्शविणारी आकृती पुढीलप्रमाणे -



भाषाव्यवहाराच्या वरील उदाहरणामध्ये संदेशक आणि ग्रहणकर्ता या दोघांनाही भाषेतील अर्थसंकेत ज्ञात असतात. तेव्हाच आशयात्मक संदेशन घडून येते.

**६. भाषा : मानवी बुद्धीचा आविष्कार**

मानव अन्य प्राण्यापेक्षा अधिक बुद्धिमान आणि विचार करणारा प्राणी आहे. त्याने आपल्या या समार्थ्याने विविध शोध लावले आहेत. भाषानिर्मिती, भाषेतील संकेतव्यवस्था आणि भाषिक आशय व्यवहार ही मानवी बुद्धीचा आविष्कार आहे. मानवेतर अन्य प्राण्यामध्ये या स्वरूपाचा भाषिक व्यवहार विकसित झालेला नाही. मानवाने सातत्याने नाविन्याचा आणि सुलभतेचा ध्यास घेतलेला आहे. या ध्यासामागे नैसर्गिक प्रेरणा असल्याचे जाणवते.

मानवी जीवनामध्ये संप्रेषणासाठी भाषिक व्यवस्था अस्तित्वात आलेली असल्यामुळे, मानव हाच भाषेचा आविष्कारकर्ता आहे.

- **सी. एफ. हॉकेट यांनी सांगितलेली भाषेची सात वैशिष्ट्ये**

**१. द्विस्तरीय संरचना** (दुहेरीपणा-Duality)

मौखिक पद्धतीने उच्चारल्या जाणाऱ्या असंख्य ध्वनींपैकी काही मोजके ध्वनी भाषेत मूलध्वनी म्हणून योजले जातात. हे मूलध्वनी म्हणजेच त्या त्या भाषेची अक्षरे होय. ही वर्ण अथवा अक्षरे भाषेनुसार भिन्न-भिन्न आणि कमी-अधिक असल्याचे पहावयास मिळते. या मूळ ध्वनींची संख्या जगभरातील भाषांत साधारणतः ३० ते ७० एवढी असल्याचे दिसते. या मूळ ध्वनींची जुळवाजुळव करून अर्थघटक म्हणजेच शब्दाची निर्मिती केली जाते. हे मूलध्वनी स्वतंत्र असतात तेव्हा त्यांना कोणताही अर्थ नसतो. उदाहरणार्थ न, अ, क, आ इत्यादी मूलध्वनीची न्+आ+क्+अ अशी जुळणी केल्यास 'नाक' असा अर्थ प्राप्त होतो. हा अर्थ मानवी शरीराचा अवयव या अर्थाने येत असतो. त्यामुळे तो आशयाच्या दृष्टीने अर्थपूर्ण ठरतो.

मानवी भाषाव्यवहारातील मूळध्वनींचा मर्यादित साठा हा भाषेतील महत्त्वाचा स्तर व त्याची अर्थपूर्ण, नियमबद्ध जुळणी करून संप्रेषणासाठी यथार्थ रूप धारण करणे हा भाषिक संरचनेचा दुसरा स्तर होय. ही द्विस्तरीय संरचना हे भाषेचे मूलभूत आणि महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. तात्पर्य - भाषेतील मूलध्वनी आणि त्या मूलध्वनीची अर्थपूर्ण संरचनेतून आशयपूर्ण अर्थनिर्मिती घडते, त्या स्तरीय रचनेस द्विस्तरीय भाषा संरचना असे संबोधतात.

**२. भाषा निर्मितीक्षम असते** (Productivity) : भाषानिर्मितीक्षम आहे. भाषेतील ध्वनीने अथवा सुट्या सुट्या शब्दांनी किंवा भाषेसाठी निश्चित करण्यात आलेल्या मूलध्वनीच्या उच्चाराने भाषिक व्यवहार घडत नाही. यासाठी भाषेमध्ये ध्वनीच्या, शब्दांच्या जुळणीला अनन्यसाधारण महत्त्व असते. प्रत्येक भाषेमध्ये निवडक ध्वनींचा वापर करून हजारो शब्द, वाक्यांची निर्मिती करता येणे ही भाषेची निर्मितीक्षमता आहे. नवीन वाक्य निर्माण करण्याची भाषिक क्षमता मानवाजवळ आहे. पूर्वी केव्हाही संभाषणात वा श्रवणात न आलेलेही वाक्य समजणे यामागील कारण म्हणजे भाषेची नियमव्यवस्था, शब्दसंग्रह प्रत्येक

भाषिकाला अवगत झालेली असते. नियमव्यवस्था भाषेच्या संदर्भात निर्मितीक्षम असते. त्यामुळेच एक वाक्य समजले की भाषेच्या अनुषंगाने विविध प्रकारची वाक्ये निर्माण करता येतात. एकाच विषयावरील व्याख्यान अथवा पुस्तक हे भाषेच्या निर्मितीक्षमतेचे महत्त्वाचे उदाहरण आहे.

भाषेच्या दृष्टीने लहान मुलाने एका वाक्याच्या आधारे निर्माण केलेली विविध वाक्य भाषा निर्मितीक्षम असल्याचीच उदाहरणे आहेत. उदा. लहान मुलाला 'खाऊ दे' असे वाक्य सांगितले तर ते मूल बाहुली दे, खाऊ दे, पाणी दे, खेळणं दे या स्वरूपाची असंख्य वाक्ये बनविताना दिसते. या संदर्भात आणखी उदाहरणे पाहणे भाषेच्या निर्मितीक्षमतेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल.

१. मी खेळत आहे.

२. मी शाळेत जात आहे.

३. मी बागेत जात आहे.

४. मी गावाला जात आहे.

५. मी उद्या कोल्हापूरला फिरायला जात आहे.

६. मी कामानिमित्त गावात जात आहे.

वरील सर्व वाक्य एकाच पद्धतीने तयार झालेली आहेत. या वाक्यामधून क्रियेसंदर्भातील पहिले वाक्य येते. पुढील सर्व वाक्य क्रियेबद्दलच येताना दिसतात. या स्वरूपाची हजारो वाक्य निर्माण करण्याची क्षमता भाषेमध्ये आहे. खेळपट्टीवर खेळल्या गेलेल्या सामन्याचे वर्णन प्रत्येक खेळाडू, प्रेषक यांच्यादृष्टीने वर्णन स्वतःच्या पद्धतीने वेगवेगळे असेल. मात्र खेळाचा सामना ही घटना एकच असेल. यावरून भाषेच्या निर्मितीक्षमतेची कल्पना अधिक स्पष्ट होईल.

**३. भाषेची यादृच्छिकता** (Arbidrariness)

जगभरातील सर्व भाषामध्ये यादृच्छिकता हे तत्त्व सामावलेले असते. यामुळेच भाषेत होणारी ध्वनीपरिवर्तने भाषिकांच्या आकलनक्षमतेच्या आवाक्यात राहतात. भाषेत होणारे परिवर्तन यादृच्छिकतेमुळेच शक्य असते. ध्वनी तेच राहतात परंतु शब्दाचे अर्थ बदलतात काही वेळा ध्वनींमध्ये परिवर्तन घडून येते परंतु अर्थ किंवा सूचक आशय कायम राहतो. मानवेतर प्राण्याच्या भाषेला या स्वरूपाची यादृच्छिकता प्राप्त झालेली नसते. उदा. मधमाशा आपल्या हालचालीतून वा नृत्यातून विशिष्ट संदेशवहन करतात. या हालचालींना विशिष्ट एकमेव अर्थ असतो. मानवाच्या भाषेला मात्र ही मर्यादा नसते. त्यांची भाषा एकाच वस्तूसाठी वेगवेगळ्या भाषेत भिन्नभिन्न शब्द योजीत असते. कावकाव व नादानुकारी शब्द सारखेच असते तर 'को' आणि कावकाव यात साम्य आढळले असते. भाषा शिकताना घ-घर, ग-गवतातील अथवा म-मक्यातील, अ-अननसाचा ही केवळ शिकण्याची पद्धत आहे. परंतु भाषा हे शिकण्याच्या पूर्व पातळीवरच असते. अर्थाअर्थी 'ग', 'अ', 'म' यांचा काही संबंध नसतो. प्रत्येक भाषा ही पूर्णतः स्वतंत्रपणे विकास पावलेली असते. यामुळेच ती स्वतंत्र असते.

भाषा-लेखन व शिकण्यासाठी साचेबद्ध असते. पण आकलनासाठी स्वतंत्र असते. म्हणूनच ती स्वतंत्रपणे शिकावी लागते. शब्दाच्या माध्यमातून सूचित होणारा आशय आणि तो शब्द यांच्यामध्ये कोणताही कार्यकारणभावात्मक संबंध नसतो. म्हणजेच शब्द आणि त्या शब्दामुळे प्रतीत होणारा आशय पूर्णपणे यादृच्छिक असतो.

**४. भाषेतील अदलाबदलाची शक्यता** (Inter Changeability)

भाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील प्रत्येक वक्ता-श्रोता या भूमिकांमध्ये वावरत असतो. दोन व्यक्तीतील दीर्घ संवाद वक्ता-श्रोता या भूमिकेतून घडत असतो. गप्पांच्या ओघात दोघेही क्रमाने बोलतात. क्रमाने ऐकतात. मानवेतर प्राण्यामध्ये नर-मादीतील एकच संदेश भिन्न-भिन्न असतो. परंतु मानवी भाषांमध्ये असे पहावयास मिळत नाही. कोणताही संदेश कोणासही वापरता येतो. बऱ्याच वेळा ग्रामीण भागामध्ये स्त्रिया बोलताना 'करते' असे बोलण्याऐवजी 'करतो' असे बोलतात. त्यावेळी स्त्रीलिंगाचा विचार न करता पुरुषलिंगी शब्दप्रयोग करतात. भाषेमध्ये बोलत असताना आपण स्वतःचे बोलणे ऐकतो. बोलताना चूक झाल्यास बोलण्यातील चूक सुधारू शकतो. असे मानवेतर भाषामध्ये पहावयास मिळत नाही. यामुळे भाषा विकसित व समृद्ध होत आहे.

मानवी भाषा शिकण्याची-समजून घेण्याची प्रक्रिया भाषेतील अदलाबदल या वैशिष्ट्यामुळे सुलभ होते. भाषेच्या या वैशिष्ट्यामुळे भाषा वृद्धींगत, समृद्ध होताना दिसते. संकेतीकरणाचे व विसंकेतीकरणाचे नियम वक्ता व श्रोता यांच्या बाबतीत एकच असावयास हवेत. नियंत्रकाप्रमाणे भाषा हे कार्य करत असते. मानवेतर प्राण्यामध्ये संदेशन साधारणतः एकाच दिशेने होत असते. गायीचे वासरू ओरडले तर वात्सल्याने घोडा चाटत नाही.

**५. भाषेची विशिष्टता** (Specialization)

भाषेतील संदेशवाहक प्रणालीची विशिष्टता संदेशसूचनांची प्रक्रिया आणि सूचित केलेला संदेश यामधील संबंधाच्या स्वरूपावर अवलंबून असते. मानवी भाषिक संप्रेषण व्यवहारामध्ये शारीरिक पातळीवरील हालचालींचा उपयोग करून दिला जाणारा संदेश आणि ध्वनिसंकेताचा वापर करून दिला जाणारा संदेश यामध्ये फरक करता येतो. क्रिक्रेट खेळामध्ये हम्पायरने एक बोट वर करणे आणि खेळाडूने बाद झाल्याचा संदेश संपादन करून मैदान सोडणे या संदेशामध्ये कार्यकारण संबंधाचे नाते आहे. परंतु आपण रस्स्त्यावरून प्रवास करताना आपणास पुढे अपघात झाला असल्याने रस्ता बंद असल्याचे सांगितले, तर आपण रस्ता बदलतो (प्रत्यक्ष न पाहताही अपघात झालेला आहे असे समजतो.) येथे प्रत्यक्ष घटना न पाहता चिन्ह व्यवस्थेचा अर्थ उपयोग करून योग्य कार्य साधतो. बैल मारेल बाहेर जाऊ नको, असे लहान मुलास सांगताच लहान मूल बैल न पाहताच थांबते त्यास बैल म्हणजे काहीतरी वाईट असल्याचा संदेश भाषेतून मिळतो. या क्रियेतील संकेत विशिष्टपणे बनलेले आहेत.

### ६. **स्थलकालातीतता** (Displacement)

स्थळ, काळाची बंधने ओलांडून आशयाचे वहन करण्याचे सामर्थ्य प्रत्येक भाषेमध्ये असते. स्वतःच्या प्रदेशाचा इतिहास, घराण्याची परंपरा, राजकीय स्थित्यंतरे, वर्तमान स्थिती, भविष्यकाळासंदर्भातील अंदाज, मनोदय किंवा पुढचे नियोजन याबाबतीत आपण बोलू शकतो. एखाद्या प्रसंगाशी प्रत्यक्ष संबंध नसताना, तेथे प्रत्यक्ष उपस्थित नसताना त्या घटनेविषयी बोलतो, त्या घटनेविषयी ऐकतो. त्यापासून योग्य तो अर्थबोध घेतो. फूल प्रत्यक्ष न पाहता त्यावर काव्य करतो, त्या फुलावरील कविता समजते. एखाद्या काव्यातून, कथेतून व नाटकातून न पाहिलेल्या, न अनुभवलेल्या घटनेचे वर्णन ऐकतो. काश्मीर, कन्याकुमारी, गया इत्यादी ठिकाणे न पाहताही त्यांची वर्णने आपण वाचतो आणि ती समजूनही घेतो.

छ. शिवाजी महाराज, म. फुले हे महामानव आज हयात नाहीत, त्यांना पाहिलेलेही नाही. पण त्यांचे विचार आस्थेने, श्रद्धेने ऐकतो, सांगतो, वाचतो. त्या घटनाची कल्पितपणे अनुभूती घेतो. याचाच अर्थ आपण स्थळ, काळाची, प्रदेशाची बंधने झुगारून भाषेच्या मदतीने या गोष्टी करतो. ही भाषेची स्थलकालातीतता भाषेचे सामर्थ्यच आहे.

### ७. **सांस्कृतिक संक्रमण** (Cultural Transmission)

व्यक्तीला भाषा मागील पिढीकडून सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून मिळते. भाषा अनुवांशिकपणे प्राप्त होत नसली तरी; भाषा शिकण्याची क्षमता अनुवांशिक असतो. या क्षमतेमुळेच प्रत्येक व्यक्ती भाषा आत्मसात करू शकते. भाषा ही मागील पिढीचे संक्रमण संचित असते. सामाजिक संस्कृती, श्रद्धा, परंपरा, रूढी, चालीरीती, ज्ञान इत्यादी बाबी भाषेच्या साहाय्याने संवर्धित केल्या जातात. हा सामाजिक ठेवा पुढील पिढीजात भाषेच्या माध्यमातून प्राप्त होतो. त्या ठेव्यामध्ये व्यक्ती नव्याने भर घालते. ही सांस्कृतिक वाढ भाषेमुळेच घालता येते. समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढल्यामुळे, शिक्षण सर्व स्तरातील लोकांना मिळाल्यामुळे पारंपरिकपणे चालत आलेल्या गोष्टी कालबाह्य झाल्या आहेत. नव्या कल्पना, वैज्ञानिक दृष्टिकोण यामध्ये वाढ झालेली आहे. पुढील पिढीकडे हे संचित संक्रमित होत आहे. हे संक्रमण भाषेमुळेच शक्य आहे. सी. एफ. हॉकेट यांनी सांगितलेली भाषेची ही सात वैशिष्ट्ये सर्व भाषेमध्ये सार्वत्रिक दिसतात. भाषेच्या या महत्त्वाच्या वैशिष्ट्याबरोबरच भाषेची आणखी काही वैशिष्ट्ये दिसून येतात. या वैशिष्ट्यांचा संक्षिप्तपणे विचार करू.

### ८. **भाषा : सामाजिक संस्था**

मानवाच्या व समाजाच्या असंख्य गरजा असतात. या गरजांच्या पूर्तीसाठी सामाजिक संस्था निर्माण झाल्या. समाज टिकून राहणे, समाजाला स्थैर्य लाभणे व समाजामध्ये शिस्त येऊन एक व्यवस्था निर्माण होणे यासाठी समाजअंतर्गत सामाजिक संस्था कार्यरत असतात. कुटुंब, धर्म, विवाह याप्रमाणेच 'भाषा' ही एक सामाजिक संस्था आहे. सामाजिक संस्थेचे स्वरूप समाज सापेक्ष असते. या नियमानुसार भाषेचे स्वरूपही समाजानुसार बदलते.

**९. अर्जित भाषा**

भाषा एक सामाजिक संस्था असून ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीने आत्मसात करावी लागते. ती निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. त्यामुळे भाषा मानवाला अर्जित करावी लागते. भाषा शिकणे ही नैसर्गिक प्रेरणा आहे. मानवी मेंदूमध्ये भाषेच्या ग्रहणासंबंधी जैविक कळ असते. विशिष्ट वयामध्ये सामाजिक संदर्भानुसार ती कार्यरत होते. समाजात कार्यरत असणारी भाषा सततच्या ऐकण्यामुळे आत्मसात होते. याचाच अर्थ भाषा अर्पित नसून अर्जित आहे. समाजात राहिल्याने भाषा शिकली जाते. लहान मुलं आपल्या आई-वडिलांकडून भाषा शिकत असतात.

**१०. भाषेची परिवर्तनशीलता**

भाषा सामाजिक संस्था आहे. ती समाजात उदयास येते. विकास पावते. परावर्तित होते. समाज-जीवनातील बदलाबरोबर भाषा बदलत राहते. शिवकाळातील गद्य भाषा, पेशवेकाळातील भाषा, इंग्रजी काळातील भाषा आणि आजची मराठी भाषा यांचा विचार करता भाषेची परिवर्तनशीलता स्पष्टपणे जाणवते. पतीचे नाव न घेणारी, पतीसाठी 'तिकडून येणे झाले नाही' यासारखी भाषा वापरणारी स्त्री आज पतीचे नाव घेते. आरे-तुरेच्या भाषेत बोलते. ही भाषेची परिवर्तनशीलता आहे.

समाजातील बदलाचा भाषेच्या बदलावर परिणाम होत असतो. शिक्षण, सांस्कृतिक बदल, औद्योगिक बदल, नवे शोध, भौतिक साधने इत्यादींचा भाषिक परिवर्तनाशी संबंध असतो. प्रसार माध्यमानी नव्या स्वरूपात भाषिक परिवर्तनास गती दिल्याचे जाणवते. मोबाईलच्या निर्मितीमुळे असंख्य शब्दांची मराठी भाषेमध्ये भर पडलेली आहे. हे भाषेची परिवर्तनशीलतेचेच उदाहरण आहे.

**११. भाषेची रैखिकता**

भाषिक व्यवहार आत्मसात करणे म्हणजे भाषेतील शब्दसंग्रह आत्मसात करणे वा भाषेचे नियम आत्मसात करणे. भाषा वापरामध्ये भाषेचे नियम पाळावे लागतात. भाषा ध्वनीची संरचना असते. यामुळे ध्वनीच्या सानुक्रम रचनेला समाजामध्ये विशिष्ट असे अर्थ असतात. उदा. झ्, आ, ड्, अ या स्वतंत्र ध्वनींना अर्थ नसतो. या ध्वनीची सानुक्रम रचना केल्यास (झ्+आ+ड्+अ) 'झाड' असा अर्थ प्राप्त होतो.

**भाषेचे कार्य**

भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास हा एका अर्थाने भाषेच्या कार्याचाच अभ्यास असतो. भाषा सामाजिक संस्था असल्यामुळे संदेशवहन, विनिमय आणि संप्रेषण हे भाषेचे कार्य आहे. मानव समाजशील असल्यामुळे तो कळपाने राहात नाही, समूहाने राहतो. परस्पर संबंध, परस्पर सहकार्य, आंतरक्रिया घडणे महत्त्वाचे असते. त्यामुळे सर्व मानवजात परस्परांशी देवाणघेवाण, संपर्क आणि विचारविनिमय करताना दिसते. या संपर्काचे महत्त्वाचे साधन वा माध्यम भाषा आहे. हे भाषेचे कार्य महत्त्वाचे आहे.

रोमान याकोबसन याने भाषेच्या कार्याच्या केलेल्या विभाजनामागे एक विचार आहे. भाषिक संदेशनाच्या प्रक्रियेमध्ये किंवा चिन्ह वापरामध्ये सहा मूलघटक असतात. त्यांना मिळणाऱ्या महत्त्वानुसार भाषिक चिन्हे सहा मुलभूत कार्य करतात. असा साधार विचार आहे. भाषिक चिन्ह व्यापारातील परिसर किंवा संदर्भ, संदेश, प्रेषक, ग्रहणकर्ता, संपर्क, माध्यम असे सहा मूलभूत घटक रोमान याकोबसन याने सांगितलेले आहेत. संदेशनाच्या प्रत्येक क्रियेमध्ये हे घटक असतात. या घटकांपैकी ज्या घटकाला प्रत्यक्ष संदेशनाचे प्राधान्य मिळेल त्यानुसार विशिष्ट प्रकारचे संदेशनात्मक कार्य घडून येईल. रोमान याकोबसन याने भाषेच्या संरचनेच्या अंगाने विभाजन केलेले आहे. भाषेच्या सहा मुलभूत घटकानुसार भाषेची सहा कार्ये पुढीलप्रमाणे –

परिसर / संदर्भ (context)

संदर्भ (Message)

प्रेषक (Sender) / ग्रहणकर्ता (Receiver)

संपर्क (Contact)

माध्यम (Code)

वरील मूलघटकांनुसार भाषेच्या कार्याची विभागणी त्यांनी खालीलप्रमाणे केली आहे.

संदर्भनिष्ठ/निर्देशात्म (Referential)

काव्यात्म/सौंदर्यात्म (Poetic / Aestetic)

आविष्कारात्मक (Emotive / Expressive) परिणामनिष्ठ (Conative / Affective)

संपर्कनिष्ठ (Phentic)

भाषाविषयक/चिन्हव्यवस्थाविषयक (Metalingual)

### १. संदर्भनिष्ठ किंवा निर्देशात्मक कार्य

'संदेशन' करणारी व्यक्ती कोणत्या संदर्भाने बोलते हे या संभाषणात महत्त्वाचे आहे. दोन व्यक्तीतील संभाषण हे त्या दोघापुरते मर्यादित संभाषण नसते. त्यांच्या बोलण्यामध्ये संदर्भ कशाचा आहे हे महत्त्वाचे असते. शेतकरी संभाषण करताना; त्यांच्या बोलण्यात शेती, पीक-पाणी, हवामान, मजूर-रोजगार, अवजारे-वाहने इत्यादीचे तर दोन खेळाडू बोलतात तेव्हा त्यांच्या बोलण्यात खेळ, मैदान, मार्गदर्शक, प्रतिस्पर्धक, आहार, डावपेच इत्यादी संदर्भ येतात.

### २. काव्यात्मक वा सौंदर्यात्मक कार्य

या वैशिष्ट्यामध्ये संदेश हा घटक केंद्रस्थानी असतो. हा घटक येथे स्वयंमेव संदेशनाचे उद्दिष्ट बनतो. त्याला इतर कोणतीही उद्दिष्टे नसतात. इतर कोणत्याही प्रकारे तोच संदेश या कार्यामध्ये पाठविता

येत नाही. भाषेच्या या कार्यात आशयाला व संदेशाला वेगळे वा सुटे असे महत्त्व नसते. जो आशय तोच संदेश असतो.

**३. भाषेचे आविष्कारात्मक कार्य**

व्यक्तीचे व्यक्त होणे म्हणजे आविष्कार होय. हे व्यक्त होण्यासाठी भाषा हेच माध्यम असते. साहित्यातील आविष्कार वा काव्यात्मक सौंदर्य या अर्थाने हे वैशिष्ट्य येत नसून मानवाला बोलावे असे नैसर्गिकपणे वाटते. यासाठी याकोबसन याने ही संकल्पना मांडलेली आहे. तो म्हणतो, मानव आपल्या मनातील भाव-भावना, गुपिते, सुख-दुःखे इतरांना सांगण्याची प्रेरणा असते ती नैसर्गिक आहे. यालाच भाषेतून व्यक्त केले जाते. या क्रियेला भाषेचे आविष्कारात्मक कार्य म्हणतात.

**४. भाषेचे परिणामनिष्ठ कार्य**

श्रोत्यावर (ग्रहणकर्त्यावर) भाषेचे हे कार्य विशिष्ट परिणाम करते. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या व्याख्यानातून संस्कृत साहित्याचे येणारे संदर्भ श्रोत्यांच्या मनावर प्राचीन साहित्याचे संदर्भ, वाङ्मयीन श्रेष्ठता, काव्यात्मकता आणि मांडणीतील शैलीचा मानसिक पातळीवर त्या-त्या कालखंडाशी एकरूप होतात. त्या-त्या काळाचे एक कल्पनारम्य दृश्य श्रोत्यांच्या मनःपटलावर तयार होते. हा परिणाम भाषेचा असतो. भाषा, स्थळ, काळ, प्रदेशाच्या सीमा ओलांडते. चित्रपट, नाटक, पुस्तके इत्यादींमधून होणारे भाषेचे कार्य महत्त्वाचे असते.

**५. भाषेचे संपर्कनिष्ठ कार्य**

प्रेषक व ग्रहणकर्ता यांच्यातील संपर्क वाढविणे किंवा कमी होणे ही प्रक्रिया घडते. उदाहरणार्थ, वर्गातील नवीन मित्राबरोबर ओळख काढून संपर्क वाढविणे. कोणते गाव, नाव काय, यापूर्वी कुठे होता या वाक्यातून ओळख वाढविणे हाच उद्देश असतो. हे कार्य भाषेमुळे घडत असते, भाषा संपर्कनिष्ठ असते. फार कमी बोलून संपर्कही कमी करता येतो.

**६. भाषाविषयक वा अतिभाषात्म कार्य**

ज्ञान मिळविणे, देणे, वाढवणे, जतन करणे, ही विविध कार्ये भाषेच्या माध्यमाने चालतात भाषेमुळे शिकण्याची प्रक्रिया घडते. कोणत्याही ज्ञानशाखेतील ज्ञान भाषेच्या माध्यमानेच चालते. जतन केले जाते, वाढविले जाते, तसेच भाषेच्या संदर्भातील विचारही भाषेमुळेच मांडता येतात. व्याकरण, भाषाशास्त्र, भाषेची संरचना, भाषिक व्यवहार इत्यादी घटकांची चर्चा भाषेमुळेच शक्य असते. या कार्यास अतिभाषात्म असे म्हटले आहे.

**शब्दार्थ व टिपा**

**मूलध्वनी** : भाषेत योजले जाणारे ध्वनी, एखाद्या भाषेचे मूलध्वनी, त्या भाषेची वर्णमाला म्हणून ओळखले जातात.

**संप्रेषणक्षमता** : भाषा प्रत्यक्ष वापरण्याचे कौशल्य.

**भाषाक्षमता** : जन्माला आलेल्या मुलाला भाषाग्रहण करण्याची उपजत असलेली क्षमता.

**भाषाव्यवस्था** : नियमबद्ध अशी भाषेची रचना.

**भाषाव्यवहार** : भाषेचा प्रत्यक्ष वापर

**निर्मितीक्षमता** : नवीन निर्माण करण्याची ताकद

**संभाषक** : बोलणारा

**प्रेषक** : बोलणारा

**सी. एफ. हॉकेट** (अमेरिका) A course in Modern Linguistics हा ग्रंथ (१९५८)

## २.१ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

**प्रश्न : योग्य पर्याय निवडा.**

१. भाषेचे माध्यम कोणते आहे ?

(अ) ध्वनी (ब) आवाज (क) अक्षरे (ड) शब्द

२. मूलध्वनी म्हणजे काय ?

(अ) माकडाचे ध्वनी (ब) ऐकू न येणारे ध्वनी

(क) भाषिक ध्वनी (ड) निसर्ग ध्वनी

३. भाषेमध्ये मूलध्वनींची संख्या किती असते ?

(अ) असंख्य (ब) अमर्यादित

(क) मर्यादित (ड) अपेक्षित

४. सी. एफ. हॉकेट यांनी भाषेची किती वैशिष्ट्ये सांगितली आहेत ?

(अ) सहा (ब) सात (क) आठ (ड) नऊ

**उत्तरे** : १. ध्वनी २. भाषिक ध्वनी ३. मर्यादित ४. सात

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. भाषा म्हणजे काय ते सांगून भाषेची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

२. सी. एफ. हॉकेट यांनी सांगितलेली भाषेची वैशिष्ट्ये सांगा.

३. भाषेच्या विविध व्याख्या सांगून भाषेची कार्ये स्पष्ट करा.

**प्रश्न : लघुतरी प्रश्न**

१. भाषेची कार्ये लिहा.

२. मानवेतर संप्रेषणाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. भाषेच्या तीन व्याख्या सांगा.

४. भाषा एक सामाजिक संस्था आहे उदाहरणासह स्पष्ट करा.

**प्रश्न : टिपा लिहा.**

१. भाषेबद्दलचे दृष्टिकोण

२. भाषा : एक सामाजिक संस्था

३. भाषिक संप्रेषण

४. भाषेची परिवर्तनशीलता

५. भाषा एक प्रक्रियात्मक पद्धती

६. भाषिक प्रतिकात्मकता

**संदर्भ वाचन**


१. कालेकर ना. गो. (१९६२) भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशन, मुंबई.

२. कालेलकर ना. गो. (१९६४) भाषा इतिहास आणि भूगोल, मौज प्रकाशन, मुंबई.

३. केळकर अशोक (१९८३), वैखरी, मॅजिस्टिक प्रकाशन, मुंबई.

४. मालशे डॉ. मिलिंद (१९९८), आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह, मुंबई.

५. गवळी (डॉ.) अनिल (२००९) : भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर.

## घटक – ३

# स्वनिम व रुपिम विचार (स्थूल परिचय)

### ३.१ उद्दिष्टे

१. स्वनविचाराची ओळख होईल.

२. स्वनिमविचार समजण्यास मदत होईल.

३. रूपविचारांचा परिचय होईल.

४. रुपिमविचार समजून घेता येईल.

५. स्वनांतर विचाराची संकल्पना समजण्यास मदत होईल.

६. रुपिकांतर विचाराची संकल्पना समजण्यास मदत होईल.

### (अ) स्वनिम विचार

### ३.२ प्रास्ताविक

विसाव्या शतकात वर्णनात्मक भाषाविज्ञानाचा पाया फेर्दिना द सोस्यूर यांनी घातला. यांनी 'रूप, व्यवस्था आणि संरचना' या अमूर्त संकल्पनांना केंद्रस्थानी मानले. भाषाअभ्यासाकडे ऐतिहासिक दृष्टिकोणातून न पाहता भाषेच्या एककालिक स्थितीवर लक्ष केंद्रीत केले आणि या स्थितीत भाषेची संरचना कल्पून या संरचनेचे विश्लेषण करण्यावर भर दिला. त्याच्या या दृष्टिकोणामुळे भाषाअभ्यासाची एकूण मांडणीच बदलली.

भाषाशास्त्रात संरचनात्मक किंवा वर्णनात्मक भाषाशास्त्राला अधिक महत्त्व आहे. स्वनविज्ञान संरचनात्म भाषाशास्त्राचा एक भाग आहे. स्वविज्ञान जगातील सर्व भाषांचा अभ्यास करून स्वन ठरविते. त्यामुळे स्वनविज्ञान भाषानिरपेक्ष असते. कोणत्याही एका विशिष्ट भाषेचाच विचार न करता सर्व भाषांचा अभ्यास करून स्वनविज्ञान स्वनव्यवस्था निश्चित करते.

## ३.३ स्वनविचार

मौखिक स्वरूपातील भाषेमध्ये योजल्या जाणाऱ्या ध्वनींना 'स्वन' म्हणतात. म्हणूनच भाषा ही स्वनरूप व्यवस्था असते. असेही संबोधले जाते. मानव आपल्या मुखावाटे असंख्य ध्वनी निर्माण करीत असतो. मानवी मुखाद्वारे निर्मित झालेल्या विविध ध्वनींपैकी निवडक ध्वनींना 'स्वन' असे म्हणतात. अर्थात स्वन हे भाषेमध्ये माध्यम म्हणून असतात. परंपरेने भाषेत योजलेले स्वन कालांतराने बदलू शकतात. भाषेतील काही स्वन व्यवहार वापरातून दूर जातात; तर काही स्वने नव्याने स्वीकारले जातात. उदा. मराठी भाषेच्या व्यवहारातून (वर्णमालेतून) कालबाह्य झालेले दीर्घ 'ॠ, ॡ' हे ध्वनी आहेत तर इंग्रजी भाषासंपर्कामुळे अपरिहार्यता म्हणून स्वनविचारास अधिक स्पष्ट करणाऱ्या व्याख्या पुढीलप्रमाणे,

''स्वन म्हणजे भाषेत उपयोगात आणलेला ध्वनी'' – **श्री. न. गजेंद्रगडकर**

''मानवी मुखावाटे बाहेर पडणाऱ्या या ध्वनीना स्वन असे म्हणतात. स्वन भाषेचे माध्यम आहे, भाषा स्वनरूप असते.'' – **डॉ. द. भि. पुंडे.**

स्वनविचार हा एकाअर्थी ध्वनिविचारच आहे. पण सूक्ष्म विचार करता स्वनविचार ही ध्वनिविचाराची पुढची पायरी आहे. मौखिक स्वरूपात बोलल्या जाणाऱ्या भाषेतील ध्वनीचा विचार स्वनविचारात होत असतो. हा विचार शास्त्रीय पद्धतीने केला जातो. त्यास 'स्वनविज्ञान' असे संबोधले जाते. म्हणून 'स्वनविज्ञान' हे स्वनाचा विचार करणारे शास्त्र आहे, हे ओघानेच स्पष्ट होते. विशिष्ट स्वन निर्मिती कशी होते. त्या स्वनाची वातावरणातून ध्वनितरंगाच्या आधारे श्रवण करण्यापर्यंतची प्रक्रिया कशी घडते. त्याचबरोबर त्या ध्वनीचा मानवी मेंदू-मनावरील परिणाम इत्यादी पातळीवर स्वनाचा अभ्यास केला जातो. यावरून स्वनविज्ञानाच्या तीन शाखा कल्पिल्या आहेत. १. उच्चारकेंद्री स्वनविज्ञान, २. संचारणकेंद्री स्वनविज्ञान आणि ३. श्रवणकेंद्री स्वनविज्ञान इत्यादी आहेत. या शाखांपैकी उचारणकेंद्री स्वनविज्ञान या शाखेला भाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीमध्ये लक्षणीय महत्त्व आहे. कारण भाषेच्या वर्णनासाठी भाषेतील स्वनाचे वर्णन, वर्गीकरण आणि विश्लेषण महत्त्वाचे असते. हे उच्चारकेंद्री अभ्यासामुळेच शक्य होते. त्यामुळेच स्वनविज्ञानाची ही शाखा वर्णनात्मक भाषाविज्ञानास उपयुक्त आहे.

## ३.३ स्वनविज्ञानाच्या तीन शाखा

स्वनविज्ञानाच्या प्रमुख तीन शाखा पडतात. स्वन हा उच्चारला जातो. उच्चारलेला स्वन वातावरणात प्रसृत होतो आणि वातावरणात प्रसृत झालेला स्वन श्रोत्याकडून श्रवण केला जातो. यातील प्रक्रियांच्या आधारे स्वनविज्ञान स्वनांचा अभ्यास करते. त्याआधारे खालील तीन स्वनविज्ञानांच्या शाखा कल्पिलेल्या आहेत.

### १. उच्चारकेंद्री स्वनविज्ञान

या शाखेमध्ये स्वनाची निर्मिती कशी होते ? स्वननिर्मितीचे उगमस्थान कोणते ? उच्चारक्रिया कोणत्या स्वरूपात होते ? याचा विचार केला जातो. याबाबत डॉ. पुंडे यांनी मांडलेले मत अधिक महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात, ''वागेंद्रियाच्याद्वारे स्वन उच्चारला जात असताना जी प्रक्रिया घडते, तिच्या अभ्यासाला उच्चारणकेंद्री स्वनविज्ञान किंवा औच्चारिक स्वनविज्ञान म्हणतात.'' त्या आधारे स्वनाचे स्वरूप त्यांच्यातील साम्य-भेद व वर्गीकरण केले जाते.

### २. संचारकेंद्री स्वनविज्ञान

मुखाद्वारे उच्चारलेले ध्वनी (स्वन) वातावरणात संचारित होतात. स्वनलहरीचे कंपन होते. स्वनाचा हवेत संचार होतो. हवेत निर्मित झालेल्या ध्वनिलहरीच्या अभ्यासाला 'संचारणकेंद्री स्वनविज्ञान' असे संबोधतात. मात्र हा अभ्यास पदार्थविज्ञान, गणित यांच्या अभ्यासांतर्गत येत असल्यामुळे त्याचा विचार भाषाशास्त्रात फारसा केला जात नाही.

### ३. श्रवणकेंद्री स्वनविज्ञान

मुखावाटे बाहेर पडलेले ध्वनी वातावरणात कंपन पावतात. ते ध्वनी श्रोत्यांकडून श्रवण केले जातात. त्या प्रक्रियेचा विचार श्रवणकेंद्री स्वनविज्ञानाच्या शाखेत केला जातो. पण या स्वरूपाचा अभ्यास 'शरीरशास्त्रात केला जात असल्यामुळे भाषाशास्त्रात महत्त्वाचा ठरत नाही.

## ३.४ स्वनाचे गुणविशेष

'स्वन' भाषा निरपेक्ष असतात. कारण कोणत्याही भाषेमध्ये योजल्या जाणाऱ्या ध्वनींना 'स्वन' ही संज्ञा योजली जाते. स्वनांना मुल्यात्मकता व आकार देण्याचे कार्य भाषा करत असते. या स्वरूपाच्या स्वनांना काही गुणविशेष असतात. ते पुढीलप्रमाणे -

**१. व्यक्तिनिष्टता** : मानवी मुखाद्वारे स्वनाची निर्मिती होत असते. तरी स्वनाच्या भाषिक वापरामध्ये व्यक्तिविशिष्टता दिसून येते. व्यक्तीचे लिंग, वय, व्यवसाय, प्रदेश इत्यादीनुसार त्याची विशिष्टता परिवर्तीत होताना दिसते.

**२. विभेदकता** : भाषाव्यवहारामध्ये योजल्या जाणाऱ्या ध्वनींच्या अंगी असलेल्या गुणविशेषामध्ये अर्थभेद निर्मितीचे सामर्थ्य असते. याच प्रक्रियेला स्वनांची विभेदकता म्हणतात. भाषाव्यवहारामध्ये सुट्या, स्वतंत्र योजलेल्या स्वनांना काही स्थान नाही, परंतु विशिष्ट रचनेमध्ये वापरलेल्या स्वनाला अर्थ प्राप्त होतो. एक स्वन वेगवेगळ्या रचनेमध्ये भिन्न भिन्न अर्थ प्राप्ती करत असतात. अशा रचनेमधूनच विभेदकता सिद्ध होत असते.

**३. लवचिकता** : स्वनाच्या अंगी लवचिकतेचा गुणधर्म असतो. याच गुणधर्मामुळे स्वनाना अर्थप्राप्ती होत असते. उच्चारणातील बलाघात, चढ-उतार इत्यादीमुळे अर्थभेद निर्मिती करता येते. यामागील कारण म्हणजे स्वनांच्या अंगी असणारी लवचिकता होय.

## ३.५ स्वनिमविचार

विशिष्ट भाषेतील स्वन म्हणजे स्वनिम. क, ट, प, र यासारखे ध्वनी जगभरातील सर्व भाषांमध्ये आढळतात, ते स्वन होत. परंतु मराठी भाषेतही ते आढळत असल्यामुळ ते मराठी भाषेचे स्वनिम होत. डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी म्हटले आहे, ''स्वनविज्ञानाचे क्षेत्र भाषानिरपेक्षतेमुळे व्यापक असते तर स्वनिमविन्यासाचे भाषासापेक्षतेमुळे मर्यादित असते.'' म्हणूनच डॉ. जोगळेकरांनी म्हटले आहे, ''वस्तुतः मराठीचा स्वनिमविन्यास, तामिळचा स्वनिमविन्यास अशा भाषासापेक्ष शब्दयोजनाच करायला पाहिजे.'' प्रत्येक समाजगटाची, व्यक्तीची भाषा भिन्न भिन्न असली तरी त्या सर्वांना समानभूत उच्चार व्यवस्था असते.

विशिष्ट भाषासमूहाचा समान वर्ग गृहीत धरूनच स्वनिमविचार मांडला जातो. याचा अर्थ असा की, मराठी, हिंदी, गुजराती, कन्नड इत्यादी विशिष्ट भाषेतील स्वनाचा विचार म्हणजे स्वनिमविचार होय.

## ३.६ स्वनिमांची व्याख्या

एखाद्या विशिष्ट भाषाव्यवहारातील स्वन म्हणजे स्वनिम, दोन स्वनाचे उच्चारस्थान, उच्चारणपद्धती समान असली तरी एखादे असे लक्षण असते की ज्यामुळे त्या दोन स्वनांमध्ये खूप मोठा फरक पडतो. शब्दाचे अर्थ पूर्णतः बदलतात. उदाहरणार्थ पळ (प्+अ+ळ्+अ), बळ (ब्+अ+ळ्+अ) या शब्दामध्ये 'प' आणि 'ब' दोन्ही स्वन (ध्वनी) ओष्ठ्य आहेत. पण 'प' च्या ठिकाणी 'ब' हे स्वतंत्र व भिन्न स्वन आहेत. याबाबत श्री. न. गजेंद्रगकर यांनी स्वनिमाची व्याख्या करताना म्हटले आहे. ते असे,

**''ज्या विशेषक लक्षणामुळे दोन शब्द भाषेत अलग समजले जातात. त्यांना स्वनिम म्हणतात.''**

**''भाषेच्या स्वनिम पद्धतीतील एकमेकांशी वैधर्म्याने राहणारे घटक म्हणजे स्वनिम... विशेष लक्षणयुक्त स्वन म्हणजे स्वनिम.''**

या दोन्हीही स्वनिमविचार व्याख्यातून श्री. न. गजेंद्रगडकर यांनी समान उच्चारस्थान असलेल्या स्वनाचा अर्थ भिन्न-भिन्न असतो हेच सुचविले आहे.

याच अनुषंगाने व्याख्या करताना डॉ. द. दि. पुंडे यांनी म्हटले आहे.

**''ज्यांच्यामध्ये स्वनिम साम्य आहे, ज्यांच्यातील आजुबाजूच्या परिस्थितीमुळे होणारे फरक, होणारी परिवर्तने अंदाजक्षम आहे, अशा ध्वनीच्या समुहास स्वनिम म्हणतात आणि या समुहात समाविष्ट असणाऱ्या ध्वनींना स्वनांतरे म्हणतात.''**

एखादी विशिष्ट भाषा ज्या एका विशिष्ट ध्वनीचा भाषाभिव्यक्तीसाठी उपयोग करते तो ध्वनी म्हणजे स्वनिम होय. परंतु असा ध्वनी प्रत्येक वेळी, प्रत्येक प्रसंगी विशिष्ट प्रकारेच उच्चारला जातो असे

नसते. प्रत्यक्षात बोलणारा तो विशिष्ट ध्वनी विविध प्रकारे उच्चारला जातो. त्यामुळे एकाच ध्वनीची विविध रूपे निर्माण होतात. अशा असंख्य रूपांना स्वनांतर म्हणतात. अशा विशिष्ट ध्वनीची असंख्य रूपे होत असली तरी त्या सर्व स्वनांतराचा प्रतिनिधी म्हणूनच तो एक ध्वनी योजला जातो. त्यालाच 'स्वनिम' असे संबोधले जाते. स्वनिमविचारातून ध्वनीची निर्मिलेली ही व्यवस्था नवीन आहे. या स्वनिमाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट होईल.

**/ग/(स्वनिम)**
- बाग–ग$^{१}$ (स्फोटहीन ध्वनी)
- जागी–ग$^{२}$ (पुढच्या बाजूने उच्चार)
- गुलाम–ग$^{३}$ (मागच्या बाजूने उच्चार)
- नागपूर–ग$^{४}$ (घोष असूनही अघोष)
- गती–ग$^{५}$ (सघोष मृदूतालव्य स्पर्शव्यंजन)

वरील उदाहरणामध्ये 'ग' हा ध्वनी भिन्नभिन्न ठिकाणी आला आहे. तसाच तो वेगवेगळ्या ध्वनीच्या सहवासात आलेला आहे. त्यामुळे प्रत्येक शब्दातील 'ग' चे उच्चारण भिन्न जाणवते. प्रस्तुत ठिकाणी ग$^{१}$, ग$^{२}$, ग$^{३}$, ग$^{४}$, ग$^{५}$ ही 'ग' या ध्वनीची स्वनांतरे आहेत. तर 'ग' हा स्वनिम आहे.

स्वनिम अन्य शब्दांच्या सहवासातून स्वनांतरे निर्माण होतात. याबाबत डॉ. जोगळेकर यांनी महत्त्वाचे निरीक्षण नोंदविलेले आहे. ते म्हणतात, ''कोणताही स्वन विशिष्ट भाषेत उपयोगात येतो तेव्हा तो कोणत्या ना कोणत्या परिसरात असतो त्याचा आधीचा किंवा नंतरच्या उच्चारणाचा परिणाम त्यावर होत असतो. लेखनाच्या मर्यादेमुळे असा 'स्वन' सर्वत्र सारखा 'दिसत' असला तरी तो तंतोतंत सारखा 'असत' नाही...... लेखनदृष्ट्या प्रत्येक गटातील स्वन सारखे दिसत असले तरी वस्तुतः त्याचे उच्चारण वेगवेगळे आहे हे आपल्या कानांना जाणवते.'' डॉ. जोगळेकर यांच्या या निरीक्षणावरून स्वनिमाचे स्वनांतरात होणारे रूपांतर समजण्यास मदत होते.

वरील उदाहरणात 'ग' च्या उच्चारणाची पाच रूपे आढळली तरी सर्व प्रकारचा 'ग' ध्वनीचे उच्चारस्थान, उच्चारप्रक्रिया एकच असल्याने, त्यांच्यात स्वनिक साम्य आहे. यामुळे 'ग' हा स्वनिम समजला जातो.

## ३.७ स्वनिमांची वैशिष्ट्ये

वरील चर्चेवरून स्वनिम संकल्पना समजण्यास मदत होते. वरील चर्चेच्या आधारे स्वनिमाची वैशिष्ट्ये नोंदविता येतात. ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे,

१. स्वनिम ही कल्पना असून, स्वनांतरे ही स्वनिम कल्पनेची प्रात्यक्षिके असतात.

२. विशिष्ट भाषेमध्ये ध्वनीचा विनियोग कोणत्या स्वरूपात केला जातो यादृष्टीने स्वनिम विचारात महत्त्व असते.

३. भाषेची लिपी निर्मिती स्वनिमामुळे शक्य होते.

४. साधर्म्य-वैधर्म्याच्या आधारे स्वनिमव्यवस्था निश्चित करण्यात येते.

५. भाषेतील लघुतम अखंड घटक स्वनिम असतो. स्वनिमाचे विभाजन होत नाही. उदा. 'अमित' या शब्दात अ+म्+इ+त् स्वनिम संख्या चार आहे. पण 'अ्, म्, इ् , त् या स्वनिमाचे आणखी विभाजन करता येत नाही.

६. स्वनिम हा स्वनांतरचा लघुत्तम प्रतिनिधी असतो. भाषेत स्वनांतरे वापरली जातात. स्वनिम वापरले जात नाहीत.

७. स्वनिम भाषेत वापरल्यानंतर त्याचे रूपांतर स्वनांतरात होते. स्वनिम भाषेची आदर्श कल्पना असते, तर स्वनांतरे भाषेचे प्रात्यक्षिक आहे.

८. स्वनिम व स्वनांतर यांचा विचार भाषा सापेक्षपणे करावा लागतो. त्यांचा विचार कोणत्या तरी विशिष्ट भाषेच्या संदर्भातच करावा लागतो. उदा. मराठीतील स्वनिम, गुजरातीतील स्वनिम, तमिळीतील स्वनिम इत्यादी.

९. उच्चारदृष्ट्या साधर्म्य असलेल्या स्वनांचा गट करून स्वनिमाचा शोध घेतला जातो. तर वैधर्म्य असणाऱ्या भिन्न स्वनिमांच्या आधारे स्वनिमव्यवस्था मांडली जाते.

१०. सर्व भाषेमध्ये मोजके स्वन असतात. पण प्रत्येक भाषेची स्वनिम व्यवस्था भिन्न-भिन्न असते.

११. मौखिक भाषेच्या संदर्भातच स्वनिमविचार केला जातो. लिखित भाषेच्या संदर्भात स्वनिमविचार केला जातो.

## ३.८ स्वनिम विनियोगाचे तत्त्व

एखादा ध्वनी त्या विशिष्ट भाषेतील स्वनिम आहे किंवा नाही, आहे तर त्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये, लक्षण कोणते ? हे पाहण्यासाठी त्या ध्वनीचा त्या भाषेतील व्यवहार कसा होतो ? ध्वनी कोणते कार्य करतो ? त्याचा विनियोग कसा केला जातो ? इत्यादी बाबींचा विचार केला जातो.

भाषा व्यवहारामध्ये स्वनिमांचा विनियोग तीन प्रकारांनी होत असतो. ते प्रकार पुढीलप्रमाणे आहेत,

**१. वैधर्म्ययुक्त विनियोग** : वैधर्म्ययुक्त विनियोगाला 'व्यवच्छेदक विनियोग' असेही संबोधले जाते. स्वनिम निश्चितीचे महत्त्वाचे तत्त्व म्हणूनही त्यास ओळखले जाते. दोन स्वन नेमके एकाच स्वनिम परिघामध्ये येतात तेव्हा त्यांचा विनियोग वैधर्म्ययुक्त अथवा व्यवच्छेदक असतो. यामध्ये दोन स्वनातील सूक्ष्म साम्यापेक्षा सूक्ष्म भेदाकडे अधिक लक्ष दिले जाते. स्वनिम परिघातील एकच शब्द भिन्न असतो. या भिन्न शब्दामुळे दोन शब्द अर्थदृष्ट्या भिन्न ठरतात. या विनियोगास वैधर्म्ययुक्त विनियोग असे संबोधतात. उदा. 'क' आणि 'ग' ही दोन्ही स्पर्श व्यंजने अल्पप्राण असून उच्चारणस्थान मृदूतालू आहे. मात्र 'क' चे उच्चारण अघोष तर 'ग' चे उच्चारण घोष आहे.

घर-मर, चाल-चाळ या उदाहरणामध्ये घ/म/ल/ळ हे स्वनिम आहेत. या दोन उदाहरणांमध्ये प्रत्येकी एक स्वन भिन्न आहे. त्यामुळे दोन शब्द अर्थदृष्ट्या भिन्न आहेत.

**२. पूरक विनियोग** : या तत्त्वामध्ये उच्चारणसाम्य असणारे दोन भिन्न स्वन वेगळ्या स्वनिम परिघात योजले जातात. या तत्त्वामध्ये अर्थसाम्याला अधिक महत्त्व दिले जाते तर अर्थभेदाला गौण स्थान दिले जाते. परस्पराच्या जागी उपयोगी न येणारा परंतु परस्पर पूरक असणाऱ्या उपयोगितास 'पूरक विनियोग' असे संबोधतात. उदा. 'कर्म या शब्दातील 'क' पेक्षा 'कर्ण' या शब्दातील 'क' भिन्न आहे. दोन्ही 'क' मध्ये उच्चारणदृष्ट्या भिन्नता असल्यामुळे हे स्वनिम परस्पराची जागा घेऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात पूरक विनियोग आहे. भाषेत योजलेली स्वनांतरे या स्वरूपाची असतात.

**२. स्वच्छंद किंवा मुक्त विनियोग** : या तत्त्वाला 'वैकल्पिक विनियोग' असेही संबोधले जाते. दोन स्वन एकाच ध्वनिपरिसरात येतात आणि तरीही त्यांच्यामुळे दोन शब्द अर्थदृष्ट्या वेगळे ठरत नाहीत, या स्वरूपात स्वनांचा विनियोग होतो तेव्हा त्यास स्वच्छंद विनियोग म्हणतात.

स्वच्छंद किंवा मुक्त परिवर्तन दोन स्वनिमांमध्ये होऊ शकते. त्याप्रमाणे दोन स्वनांतरामध्ये होऊ शकते. उदा. असं-आसं, आमचे-अमचे, रहातो-राहतो या उदाहरणामध्ये उच्चारदृष्ट्या भिन्न स्वन येऊनसुद्धा अर्थदृष्ट्या भेद दिसून येत नाही. अर्थदृष्ट्या भेद नसल्यामुळे वैधर्म्ययुक्त ठरत नाही. त्यामुळे या स्वनांना स्वनिमाचा दर्जा मिळत नाही.

### ३.९ स्वनिमांचे प्रकार

स्वनिमांची निश्चिती झाल्यानंतर त्याचे विशिष्ट असे वर्गीकरण करता येते. ते दोन प्रकारे -

**१. खंडयुक्त स्वनिम** : भाषाव्यवहारात खंडाधिष्ठित अथवा पराखंडकी स्वनिमांचे साह्य घ्यावे लागते. कोणत्याही भाषेमध्ये या प्रकारचे दोन स्वनिम आढळतात. खंडयुक्त स्वनिम प्रकारामध्ये स्वर, अर्धस्वर, व्यंजन इत्यादींना खंडयुक्त स्वनिम म्हणून ओळखतात.

**२. खंडाधिष्ठित/पराखंडकीय स्वनिम** : भाषाव्यवहारात खंडाधिष्ठित अथवा पराखंडकीय स्वनिमांचे साह्य घ्यावे लागते. स्वरांचा चढउतार, एखाद्या घटकावर दिला जाणारा जोर, एखाद्या स्वन उच्चारात नाकावाटे बाहेर जाऊ दिलेली हवा या सर्व क्रियांमुळे बोलणे परिणामकारक, चैतन्यपूर्ण, कलात्मक होत असते. हे स्वनिम पराखंडीय म्हणजे परावलंबी असतात. अलिकडे हे स्वनिम विरामचिन्हे, संदर्भचिन्हे या स्वरूपात दर्शविली जातात. **खंडाधिष्ठित स्वरांचे उपप्रकार पुढीलप्रमाणे -**

**१. नासिक्यरंजन** : ङ्, ण्, म्, न् ही अनुनासिके मराठीत आहेत. याचा उच्चार करताना नासिक विवराचा उपयोग होतो. परंतु इतर व्यंजने व स्वर यांचेही स्वानुनासिक उच्चार करता येऊ शकतात. उदा. अँ ( ̆ ही नासिक्य व्यंजनाची खूण आहे.

**२. आघात** : एखाद्या शब्दातील एखाद्या अक्षरावर किंवा वाक्यातील एखाद्या शब्दावर दाब, जोर दिला जातो. भाषा व्यवहारात ही अवस्था अनेक वेळा दिसून येते. आघात हा सभिप्राय असतो. वाक्याचे ध्येय त्यातून साध्य होते.

उदाहरणार्थ, **त्याने** काम केले. - दुसऱ्या कोणी नाही त्याने

त्याने **काम** केले. - दुसरे काही नाही तर काम केले.

त्याने काम **केले**. - आश्चर्य व्यक्त होते.

**३. सुरावली** : स्वराचा चढउतार म्हणजेच सुरावली होय. पद, वाक्य, पदसमूह या सर्व संदर्भात सुरावलींचा उपयोग होतो. प्रश्न, आश्चर्य इत्यादी भाव सुरावलीद्वारे प्रकट होतात. वेगळेपणा, भिन्न अर्थ प्रकट करणे सुरावलीत शक्य होते. या योजनेत व्यक्तीनुसार विशिष्टता आढळते.

**४. विराम** : विराम यालाच सीमासंधी असेही म्हणतात. बोलताना शब्द, वाक्य विलगतेसाठी आपण अल्प विश्रांती घेतो यालाच अल्पविराम असेही म्हणतात. हे विराम लेखनात सुट्या शब्दांनी दर्शविले जातात.

उदाहरणार्थ, ते खाऊन ये - ते खाऊ नये.

सांगितलेले काम करूनच ये - सांगितलेले काम करू नये.

## ३.१० मराठीची स्वनिम व्यवस्था

वरील विवेचनाच्या आधारे स्वनिमाचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट झालेली आहेत. त्या आधारे खालील प्रकारे स्वनिम मानले आहेत.

### स्वर स्वनिम

इ, ए, अॅ, आ, ऑ, ओ, उ - आठ स्वनिम (ई, ऊ, ऋ, ऌ, ऐ, औ, ऐ) इत्यादी स्वनिम मानले नाहीत.

### व्यंजन स्वनिम

आधुनिक व्याकरणकारांनी स्वनिमविज्ञानाच्या आधारे मराठीत ५ व्यंजन स्वनिम मानले आहेत. त्यातून पारंपरिक व्यंजनव्यवस्थेतील ङ्,ञ,ष हे ध्वनी स्वनिम स्वीकारलेले नाहीत. तर ऱ्ह, ल्ह, व्ह, म्ह, न्ह, ण्ह या महाप्राणयुक्त स्वनांचा मराठीत स्वनिम म्हणून स्वीकार केला आहे. इतर व्यंजन स्वनिम खालीलप्रमाणे -

क, ख, ग, घ,

च, छ, ज, झ (तालव्य)

च, छ, ज, झ (दंत्य)

त, थ, द, ध, न,

ट, ठ, ड, ढ, ण,

प, फ, ब, भ, म

य, र, ल, व

स, श, ह, ळ

ऱ्ह, व्ह, म्ह, न्ह, व्ह

ष, ळ, ह, ङ् हे स्वनिम वादग्रस्त असल्यामुळे ४२ व्यंजनस्वनिम मानले जातात.

## ३.८ स्वनांतर

एखाद्या भाषाव्यवहारात जे ध्वनी वापरले जातात त्यास स्वनिम म्हणतात. पण प्रत्यक्ष शब्दामध्ये त्याचा उपयोग होतो तेव्हा त्यांच्यावर मागील अथवा पुढील स्वनिमाचा परिणाम झाल्याने एकाच स्वनिमाचा उच्चार वेगवेगळ्या पद्धतीने होतो. त्यामुळे एकाच स्वनिमाची जी भिन्नभिन्न रूपे असतात त्यांना स्वनांतर म्हणतात. 'ग' या स्वनाचा उपयोग करून नागपूर, बाग, गुलाम, जागी इत्यादी शब्दातील प्रत्येक 'ग' चा उच्चार भिन्न स्वरूपाचा असला तरी त्यास स्वनांतरे समजले जाते.

स्वनिमाचा भाषेत उपयोग होताच त्याचे स्वनांतरामध्ये रूपांतर होते. म्हणजे स्वनिम ही एक आदर्श कल्पना आहे. तर स्वनांतरे कोणत्यातरी एका भाषेची विशेषके असतात. त्यामुळे त्याचा विचार भाषासापेक्ष करावा लागतो. परंतु स्वनिम आणि स्वनांतरे कोणत्या तरी एका भाषेची विशेषके असतात. त्यामुळे त्याचा विचार भाषासापेक्ष करावा लागतो.

स्वनांतर हे स्वन असतात पण प्रत्येक स्वन स्वनांतर असेलच असे नाही. स्वन भाषानिरपेक्ष असतात तर स्वनांतर हे भाषासापेक्ष असतात.

**स्वनिम आणि स्वनांतरे यांचे लेखन करण्याची विशिष्ट पद्धत भाषाविज्ञानामध्ये रूढ आहे. स्वनिम दोन तिरप्या रेषेत लिहिला जातो आणि स्वनिमची स्वनांतरे चौकोन कंसात दर्शविली जातात.**

## (ब) रुपिम विचार

भाषाव्यवहारामध्ये अर्थ, आशय, अभिव्यक्ती इत्यादी घटकांना महत्त्व असते. भाषाव्यवहारामध्ये आशयाबरोबर अभिव्यक्तीचा अंश असतो. या दोहोंमधील परस्परसंबंधाचा विचार रुपिम विचारामध्ये होते. रुपिम विचारालाच पदिमविचार असेसुद्धा संबोधले जाते. भाषा ही विविध वाक्याची रचना असते. ही वाक्यरचना शब्दांनी बनलेली असतात. उदा. 'रामाने रावणाला मारले'.... यांनाही शब्दच म्हणतो. आधुनिक भाषाशास्त्राला या संज्ञा अमान्य आहेत. त्यांनी 'शब्द' आणि 'पद' यांच्या संज्ञा बदलल्या आहेत. आधुनिक भाषाशास्त्रज्ञांच्या मते 'राम' रूप आहे, तर 'रामाने' रुपिम आहे. 'राम+ने' अशा दोन रुपिमांनी 'रामाने' हा शब्द बनला आहे. या स्वरूपाचा नवा विचार भाषाविज्ञानामध्ये मांडला आहे.

### ३.१ रूप आणि रुपिका

रुपिम विचारामध्ये विशिष्ट अनुक्रमाने ध्वनिसमूह निर्माण केला जातो. त्या ध्वनिसमूहाला गर्भीत अर्थप्राप्ती करून दिली जाते. तो ध्वनिसमूह आशययुक्त किंवा सार्थ ध्वनिसमूह असतो. या रूपाला अभिव्यक्ती व आशय ही दोन रूपे असतात. अशा पदरचनेला एकत्र आणून वाक्यरचना केली जाते. या प्रक्रियेला रुपविचार वा पदविचार असे म्हणतात.

विविध भाषाशास्त्रज्ञानी रुप, रुपिम रुपिकांतर या संकल्पनेच्या अर्थपूर्ण व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या व्याख्यांच्या आधारे रुप-रुपिम-रुपिकांतर यांची वैशिष्ट्ये समजण्यास मदत होते. त्या व्याख्या पुढीलप्रमाणे -

**''भाषेतील दुसऱ्या कोणत्याही शब्दाशी अंशतः स्वनिमिक अर्थात्मक साधर्म्य नसणारा लघुत्तम घटक म्हणजे पदिम (रुपिम) होय.''** - श्री. न. गजेंद्रगडकर

श्री. न. गजेंद्रगडकर यांच्या व्याख्येचा विचार करता त्यांनी रुपालाच रुपिम असे संबोधलेले आहे असे दिसते. पण रुप आणि रुपिम यांच्यामध्ये भेद असतो. या भेदाचे विस्तृत विवेचन करताना डॉ. पुंडे यांनी नोंदविलेले मत महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात, **''भाषेमध्ये ध्वनीच्या ज्या अनेकविध रचना आढळतात, त्यापैकी काही रचनांचे आपण विघटन करू शकतो. म्हणजे त्यांचे घटक वेगळे काढू शकतो. असे विघटन करता करता एका अवस्थेला पोहोचतो की, त्यापुढे घटकाचे आणखी विघटन होऊ शकत नाही. अशी जी विघटन होऊ न शकणारी ध्वनीची सर्वात लहान अशी अर्थधारत रचना तिला पदे असे म्हणतात. पद हे व्याकरणाचा मुलभूत घटक होय. पद हे वाक्यात कधी स्वतंत्रपणे येऊ शकते, कधी इतर पदांच्या सहाय्याने येते. स्वतंत्रपणे येऊ शकणारे केवल पद अथवा इतर पदांच्या संयोगाने बनणारे पदांचे वाक्यातील प्रयोगक्षम रूप म्हणजे शब्द होय. शब्दाचे विघटन पदामध्ये होऊ शकते. पदे, त्यांचे प्रकार, त्याच्यापासून होणारी शब्दनिर्मिती इत्यादीचा विचार व्याकरणाच्या ज्या विभागात होतो त्याला आधुनिक भाषाशास्त्रामध्ये रूपविन्यास असे म्हणतात. रुप, रुपिम आणि रुपिकांतर ही पदविन्यासातील त्रयी होय. रुप म्हणजे ध्वनीची सर्वात लहान अशी अर्थवाहक रचना होय. रुपिम म्हणजे समान अर्थ असणाऱ्या व परस्परांशी पूरक विनियोगाने अथवा मुक्त पर्यायाने राहणाऱ्या व्याकरणिक समानता असणाऱ्या रुपसमूहाचा प्रतिनिधी. कोणताही रुपिम भाषिक व्यवहारात ज्या रूपात अविष्कृत होतो, त्या अविष्कृत रूपाला त्या रुपिमाचे रुपिकांतर असे म्हणतात.''** या सर्व विवेचनातून पद (रुप) पदिम (रुपिम) आणि पदान्तर (रुपिकांतर) या संकल्पनेतील सूक्ष्म छटा समजण्यास मदत होते. या संकल्पनेतील सूक्ष्म भेदही अर्थदृष्ट्या स्पष्ट होतात.

**रूपिका** : विघटन होऊ न शकणारी लहानात लहान अर्थवाहक रचना म्हणजे रूपिका होय. व्याकरणिक विश्लेषणातील तो लघुत्तम सार्थ घटक असतो. कोणत्याही रुपिकेचे तिचा अर्थ कायम ठेवून आणखी विघटन शक्य नसते. रूपिका वाक्यात कधी स्वतंत्रपणे येऊ शकते तर कधी इतर रूपिकांच्या साह्याने येते.

रुपिमांची समान अर्थाची असंख्य रूपे आढळतात. त्यांना भाषाविज्ञानामध्ये रुपिकांतर म्हणतात. ही रुपिकांतर सर्व भाषेमध्ये पहावयास मिळतात. मराठीतील उदाहरण खालीलप्रमाणे –

१. अजय<u>**नी**</u> काम केलं.

   अजय<u>**नं**</u> काम केलं.

२. मी हे काम क<u>**री**</u>न.

   मी हे काम क<u>**रे**</u>न.

प्रस्तुत वाक्यातून अजयनी, अजयनं आणि करीन, करेन याचे अर्थ समान असल्याने नी, नं किंवा री, रे ही रूपे रुपिकांतरे आहेत. रूपाचे असे जे समूह कार्याच्या दृष्टीने आपण कल्पितो त्यांना रूपिका असे संबोधतो. रुपिमामध्ये समाविष्ट होणाऱ्या रुपांना त्या रुपिमाचे रुपिकांतर असे संबोधतात. रुपाचे रुपिमामध्ये वर्गीकरण करताना खालील बाबीचा काळजीपूर्वक विचार केला जातो असे मत डॉ. पुंडे यांनी व्यक्त केले आहे.

१. ती रूपे अर्थदृष्ट्या समान असावीत.

२. ती रूपे रुपदृष्ट्या समान असलीच पाहिजेत असे नाही.

३. त्या रूपांच्यामध्ये पूरक विनिमय अथवा मुक्त परिवर्तन असायला पाहिजे.

४. ती रूपे व्याकरणीक संख्येच्या संरचनेच्या दृष्टीने समान असायला हवीत.

उच्चारण विभाजनाच्या माध्यमातून त्याचे सार्थ लघुत्तम घटक आपल्याला प्राप्त करता येतात. अशा विभाजनातून रुपिमाचे वर्गीकरण केल्यास त्यातून रुपाना त्या त्या रुपिमाची रुपिकांतरे मिळतात. रुपे आणि रुपिकांतरे यामध्ये फारसा फरक नाही. दोन्हीही उच्चारणाचे सार्थ लघुत्तम घटक आहेत. रुप हे रुपिमनिरपेक्ष असते तर रुपिकांतर रुपिमसापेक्ष असते. म्हणून रुपिकांतराबद्दल सुचविताना हे अमुक रुपिमाचे रुपिकांतर असे सांगावे लागते.

रुपिमविचार म्हणजे रुपिकांतराच्या समूहाचा प्रतिनिधी. रुपिकांतर हे भाषेतील घटना होय. तर रुपिम ही प्रत्यक्ष घटना नसून भाषेचा संरचनेचा लघुत्तम घटक असतो. रुपिकांतराचा अनुभव घेता येतो. पण रुपिमाचा अनुभव घेता येत नाही. रुपिमाची अभिव्यक्ती रुपिकांतराच्या रूपाने होते. भाषाव्यवहाराचा विचार करता एखाद्या रुपिमाला एकच रुपिकांतर असते. तर काही वेळा अनेक रुपिकांतरे असतात. उदाहरणार्थ, 'कवी' या रुपिमाला एकच रुपिकांतर आहे. तर 'सुन' या रुपिमाला सून/सुने/सूना इत्यादी रुपिकांतरे आहेत. रुपिमविचाराची श्री. न. गजेंद्रगडकर यांनी सांगितलेली लक्षणे पुढीलप्रमाणे :

१. रुपिम स्वनिमांशी संबंधित असतात. तो संबंध पुष्कळ वेळा प्रत्यक्ष असतो, सरळ असतो. काही वेळा तो वरवर दिसत नाही. शोधून काढावा लागतो.

२. रुपिमाच्या माध्यमातून आशय व्यक्त होतो.

३. रुपिमाना व्याकरणातील एकात्मता असते.

४. रुपिम लघुत्तम घटक असून त्याचे आणखी विभाजन होऊ शकत नाही.

**रुपिकांतर**

रुपिमांची अनेक रूपे रुपिकांतर होय. उदा. माणूस या रुपिमाची माणूस, माणसे, माणसं ही रुपिकांतरे होय. रुपिकांतराला अभिव्यक्ती असते तर रुपिम ही मात्र अमूर्त वर्ग कल्पनाच होय. रूपिकेलाच रुपिमांच्या संदर्भात रुपिकांतर म्हणतात. रुपिकांतर ही रुपिमसापेक्ष संकल्पना होय.

## ३.२ रुपिकांतराचे प्रकार

### १. स्वनिमाश्रयी रुपिकांतर

इंग्रजी व्याकरणामध्ये अनेक वचनासाठी 'स, ज, इज' इत्यादी रूपांतरात हा प्रकार पहावयास मिळतो. 'स' हे रूप अघोष वर्णानंतर येते. उदा. कॅट-कॅटस्, 'इज' हे पद स्पर्शसंघर्षी आणि घर्षक वर्णानंतर येते. उदा. रोज-रोजिस आणि 'ज' हे पद सघोष वर्णानंतर येते. उदा. डॉग-डॉग्ज याचा अर्थ सरळ अर्थ स, ज, इज इत्यादी रूपे अगोदरच्या पदातील शेवटच्या स्वनिमावर अवलंबून आहेत. म्हणून त्यांना स्वनिमाश्रयी रुपिकांतर असे संबोधतात.

### २. रुपिमाश्रयी रुपिकांतरे

ही रुपिकांतरे अगोदरच्या रूपाच्या शेवटी येणाऱ्या स्वनिमावर अवलंबून नसून त्या विशिष्ट रुपिमावरच अवलंबून असतात. म्हणून त्यांना रूपिकाश्रयी रुपिकांतरे असे संबोधतात. उदा. मराठीतील असत्य, अन्याय, अनोळखी, अनमान इत्यादी शब्दातील 'अ' आणि 'अन्' हे रुपिम स्वनिमावर आधारित नसून सत्य, न्याय, ओळखी, मान इत्यादी रुपिमावर आधारित आहेत. 'हो' धातूचे 'हा' हे रूप आणि 'जा' धातूचे 'जे' हे रूप रुपिमाश्रयी रुपिकांतराची उदाहरणे आहेत.

### ३. शून्य रुपिकांतर

वाक्यामध्ये काही वेळा कर्तृत्वस्थानी अथवा कर्मस्थानी येणारी रूपे प्रत्ययविरहित असतात. अशा वेळी त्या रुपिमाला रुपिकांतर मानावे काय ? असा एक प्रश्न उपस्थित होतो. विशेषतः प्रथम किंवा द्वितीय पुरुषी कर्त्याच्या बाबतीत हे पहावयास मिळते.

मी अन्याय केला.

तू भाजी आणलीस.

या उदाहरणात कर्त्याना लागणारा तृतीयेचा 'ने' प्रत्यय लागत नाही. परंतु अर्थ मात्र तसा आहे. म्हणून येथे 'शून्य' प्रत्यय आहे. अनेकवचनी 'दास' रुपिम, एकवचनी 'दास' मानावे लागेल.

**रुपिम** : वैधर्म्ययुक्त विनियोगामुळे ज्या दोन रूपिका भिन्न ठरविल्या जातात त्यांना रुपिम असे म्हणतात. माणूस, लेखक, पुस्तक, वर, खाली ही रुपिमांची उदाहरणे होत. रुपिम ही प्रत्यक्ष भाषिक घटना नसून रुपिकांतर हीच भाषिक घटना असते. कारण भाषेत उच्चारले जाते ते रुपिकांतर असते रुपिम नव्हे. रुपिकांतराच्या समूहाचा वर्ग म्हणजे रुपिम होय.

### ३.३ रुपिमाचे प्रकार

**१. आशयबोधक रुपिम** : रुपिम जेव्हा व्यवहारातील मूर्त अथवा अमूर्त वस्तूचा सूचक वा निर्देशक असतो तेव्हा रुपिमाला स्वतःचा एक अर्थ असतो. उदा. आई, भाऊ, घर, शाळा हे रुपिम कोणता ना कोणता आशय निर्देशित करतात म्हणून या रुपिमांना आशयबोधक रुपिम असे संबोधतात.

**२. कार्यकर रुपिम** : काही रुपिमांना आशयबोधक रुपिमाप्रमाणे स्वतःचा अर्थ नसतो. म्हणजे ते अर्थशून्यही नसतात. मात्र वाक्यातील रुपिमांना विशिष्ट अर्थाने जोडण्याचे कार्य करतात. त्यांच्यातील संबंध स्पष्ट करतात. अशा रुपिमांना कार्यकर रुपिम म्हणून संबोधतात.

त, ने, ला, चा हे प्रत्यय या प्रकारात येतात. या प्रत्ययांमुळे कोणताही अर्थनिर्देश होत नसला तरी मूळ शब्दांना जोडून योजले जातात. तेव्हा अर्थपूर्ण रचना होते. नाम, सर्वनाम यांना लागणारे विभक्तीप्रत्यय आणि धातूंना लागणारे आख्यात प्रत्यय (काळ, अर्थ इत्यादीचे प्रत्यय) ही सर्व कार्यकर रुपिमांची उदाहरणे होत.

**३. मुक्त रुपिम** : भाषेतील काही रुपिम स्वतंत्र असतात. त्यांना स्वतंत्र किंवा मुक्त रुपिम म्हणतात. मी, पुस्तक आणि वर इत्यादी रुपिम अर्थपूर्ण असून ते वाक्यात स्वतंत्रपणे किंवा प्रत्ययासह योजल्याने रुपिकांतराच्या स्वरूपात येतात. मुक्त रुपिमांची रुपिकांतरे होऊ शकतात.

**४. बद्ध रुपिम** : भाषेतील काही रुपिम स्वतंत्रपणे येऊ शकत नाही. त्यांचा उपयोग इतर रुपिमांच्या आश्रयाने होतो. अशा रुपिमांना पराश्रयी किंवा बद्ध रुपिम म्हणतात. उदा. ईल, णार, साठी प्रमाणे अ, अन्, यथा, प्रति हे प्रत्यय जाईल, जाणार, जाण्यासाठी, राजाप्रमाणे, अन्याय, अनोळखी, यथाशक्ती, प्रतिदिन याप्रमाणे वापरले जातात. रुपिमांना लागणारे पूर्व प्रत्यय वा उत्तर प्रत्यय विभक्ती आणि आख्यात प्रत्यय ही बद्ध रुपिमांची उदाहरणे होत.

रुपिमांचे लेखन करण्यासाठी { } अशा महिरपी कंसाचा उपयोग करतात. तर रुपिकांतराचे लेखन तिरप्या रेषांच्या // कंसात करतात.

### ३.९ समारोप

रूप, रुपिम आणि रुपिकांतर या संज्ञांसाठी काही अभ्यासकांनी पद, पदिम, पदांतर या संज्ञा वापरल्या आहेत. पदविचार आणि रुपिमविचार एकसारखाच आहे. त्यात कोणत्याही प्रकारचा फरक नाही. म्हणून संक्षेपानेच त्यांचा परामर्श घेणे योग्य ठरेल.

## ३.१० स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

**प्रश्न : (अ) योग्य पर्याय निवडा.**

१. मानवी मुखावाटे बाहेर पडणाऱ्या ध्वनींना काय म्हणतात ?

(अ) वाक्य (ब) उद्गार (क) ध्वनी (ड) भाषा

२. शास्त्रीय पद्धतीने स्वनविचार करणाऱ्या शास्त्राला काय म्हणतात ?

(अ) शास्त्र (ब) विज्ञान (क) स्वनविज्ञान (ड) ध्वनी.

३. स्वनविज्ञानाच्या एकूण किती शाखा आहेत ?

(अ) दोन (ब) तीन (क) चार (ड) पाच.

४. वातावरणात प्रसृत झालेला स्वन कोणाकडून ग्रहण केला जातो ?

(अ) वक्त्याकडून (ब) श्रोत्याकडून (क) प्राण्याकडून (ड) पक्ष्याकडून

**उत्तरे** : १-क, २-क, ३-ब, ४-ब.

**(ब) चूक की बरोबर लिहा.**

१. परंपरेने भाषेत स्वीकारण्यात आलेले स्वन कालांतराने बदलू शकतात.

२. ऌ हे ध्वनी स्वनविज्ञानाच्या दृष्टीने मराठीच्या वर्णमालेतून काढून टाकायला हवेत.

३. मराठी वर्णमालेत ॲ, ऑ हे ध्वनी नव्याने समाविष्ट करून घ्यावे लागले आहेत.

४. स्वन हे भाषानिरपेक्ष असतात.

**उत्तरे** : १-बरोबर, २-बरोबर, ३-बरोबर, ४-चूक.

**(क) गाळलेल्या जागा भरा.**

१. विद्भेदकता हे ......... चे लक्षण आहे.

२. आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया ......... त्यांनी घातला.

३. उद्देश व विधेय हे वाक्याचे ......... होत.

४. भाषेतील सर्वात मोठी रचना ......... असते.

**उत्तरे** : १-स्वनाचे, २-सोस्यूर, ३-प्रथमोपस्थित, ४-वाक्य.

**(ड) योग्य जोड्या जुळवा.**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १. डॉ. महेंद्र कदम | अ- सुलभ भाषाविज्ञान |
| २. डॉ. द. दि. पुंडे | ब-भाषाविज्ञान आणि मराठी भाषा |
| ३. डॉ. अनिल गवळी | क-भाषा आणि भाषाविज्ञान |
| ४. डॉ. रमेश धोंगडे | ड-मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान |

**(इ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दोन निरनिराळे अर्थ एकाच रुपिमाने दर्शवितात त्यांना कोणते रुपिम म्हणतात ?

२. श्री. गजेंद्रगडकर यांनी केलेली स्वनाची व्याख्या सांगा.

३. स्वनविचारास भाषाशास्त्रात कोणत्या नावाने संबोधले जाते ?

४. क, ट, प सारख्या ध्वनींना भाषाविज्ञानात कोणत्या नावाने संबोधतात ?

**उत्तरे** : १. मिलन रुपिम,

२. स्वन म्हणजे भाषेत उपयोगात आणलेला ध्वनी

३. स्वनविज्ञान,

४. स्वनिम.

**प्रश्न : दीर्घोत्तरी प्रश्न**

१. स्वन-स्वनिम-स्वनांतर या संकल्पना सविस्तर लिहा.

२. रूपिका-रुपिम-रुपिकांतर या संकल्पनांची विस्ताराने मांडणी करा.

**प्रश्न : लघुत्तरी प्रश्न**

१. स्वनिम निश्चितीची तत्त्वे

२. स्वनविचार स्पष्ट करणाऱ्या दोन व्याख्या सांगा.

३. रुपिमाचे प्रकार थोडक्यात सांगा.

४. स्वनिम विनियोगाचे प्रकार सांगा.

**प्रश्न : टिपा लिहा.**

१. रूपिका

२. स्वनिम

३. वैधर्म्ययुक्त स्वनिम विनियोग

४. पूरक स्वनिम विनियोग

५. शून्य रुपिकांतर

**मुलभूत वाचन**


| | | |
|---|---|---|
| १. | जोशी प्र. न. | सुबोध भाषाशास्त्र, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. |
| २. | गवळी, अनिल | भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर. |
| ३. | धोंगडे रमेश | भाषा आणि भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन, पुणे |
| ४. | कानडे, मु. श्री. (संपा.) | मराठीचा भाषिक अभ्यास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. |
| ५. | गजेंद्रगडकर श्री. न. | भाषा आणि भाषाशास्त्र, व्हीनस प्रकाशन, पुणे. |
| ६. | हिरेमठ राजशेखर | मराठी व्याकरण परिचय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. |
| ७. | Hocket C. F. | A course in Modern Linguistics, Oxford, New York, 1958. |


**पूरक वाचन**


| | | |
|---|---|---|
| १. | कुलकर्णी कृ. पां. | मराठी भाषा : उद्‌गम आणि विकास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. |
| २. | मालशे, मिलिंद | आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह, मुंबई. |
| ३. | कुलकर्णी सुलक्षणा व कुबेर वसंत | भाषाविज्ञान परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर. |
| ४. | दामले मो. के. | शास्त्रीय मराठी व्याकरण, दामोदर सावळाराम आणि मंडळी, पुणे. |

**संदर्भ ग्रंथ**


१. मालशे, पुंडे, सोमण (संपा.) भाषाविज्ञानपरिचय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

२. पुंडे द. दि. सुलभ भाषाविज्ञान, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

३. कदम महेंद्र मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

४. काळे, कल्याण / सोमण अंजली (संपा.) आधुनिक भाषाविज्ञान, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५. पाटील व्ही. एन. सुलभ भाषाविज्ञान व मराठी व्याकरण, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव. आ. दु. २, २०१६.


✻✻✻

# घटक – ४

# वाक्यविचार

## ४.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

- पदबंध व वाक्याचे स्वरूप समजावून घेता येतील.
- वाक्य व वाक्याचे प्रकार समजावून घेता येतील.
- वाक्याचे पृथःक्करण म्हणजे काय ते स्पष्ट करता येईल.

## ४.२ प्रस्तावना

स्वप्न-स्वनिम-स्वनांतर आणि पद-पदिम-पदांतर या संकल्पना समजावून घेतल्यानंतर त्याचा पुढचा टप्पा हा वाक्यविचाराचा येतो. कोणत्याही भाषेचा अभ्यास करताना वाक्यविचार ही तितकाच महत्त्वाचा आहे. कारण भाषिक संदेशनाचे कार्य हे वाक्यानेच चालते. त्यामुळे वाक्यविचार हा शेवटचा टप्पा म्हणून त्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे. कारण पदविन्यासात पद, त्याचे प्रकार व त्यापासून होणारी शब्दघटना पुढच्या रचनांचा म्हणजे शब्दबंध, उपवाक्ये आणि वाक्य या रचनांचा विचार होतो. पदविन्यासात शब्दांच्या आंतरिक रचनेचा विचार होतो. तर वाक्यविचारात शब्दांच्या मांडणीचा विचार होतो.

वाक्यविचारात वाक्यातील पदिमांच्या द्वारे वाक्यांची विशिष्ट क्रमाने रचना कशी केली जाते. याचे स्पष्टीकरण येते. वाक्य विचाराला 'वाक्यविन्यास' अशीही संज्ञा वापरली जाते.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ पदबंधाचे स्वरूप

वाक्यामध्ये शब्दबंध, उपवाक्य हे घटक येतात. तर शब्दबंध, उपवाक्य आणि वाक्य यांनी भाषा तयार होत असते. पण हे सारे घटक सार्थ व विघटनक्षम असतात. पद हे सर्वांत लहान भाषिक रूपातून शब्दबंध तयार होतात. शब्द हे पदिमापेक्षा मोठे असतात. त्यात कधी कधी एकापेक्षा अधिक पदे अथवा पदिम असल्याने तो रचना या प्रकारात मोडतो. शब्दांचे संघटक म्हणजे पदे अथवा पदिम हे होत. शब्द हाही वरच्या रचनेचा म्हणजे शब्दबंधाचा संघटक आहे. शब्दबंध हा उपवाक्याचा संघटक आहे. उपवाक्य हे वाक्याचा संघटक आहे, अशा तऱ्हेने पदाच्या वरच्या सर्व रचना संघटकांच्या दृष्टीने रचना असून वरच्या रचनेच्या दृष्टीने संघटक असतात.

शब्दांची पुढची रचना म्हणजे पदबंध होय. जेव्हा शब्द विशिष्ट अर्थाने आणि रचनातत्त्वाने एकमेकांशी जुळतात तेव्हा पदबंध तयार होतो. ‘व्याकरणिक आणि आशयाच्या परस्परसंबंध असलेल्या घटकांचा जो समूह त्याला पदबंध/शब्दबंध किंवा रूपबंध असे म्हणतात. पदबंधाच्या स्वरूपाबाबत आंतरिक स्थैर्य व बाह्य स्वातंत्र्य या दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात.

**१. आंतरिक स्थैर्य** : शब्दबंधामधील शब्द हे एकमेकांशी एका विशिष्ट रचनातत्त्वानुसार घट्टपणे जोडलेले असतात. ते शब्द कसेतरी मागे-पुढे करता येत नाहीत.

उदा. गर्भश्रीमंत एक खानदानी - खानदानी एक गर्भश्रीमंत.

वरील वाक्यात शब्दांच्या क्रम बदल अपेक्षित नाही. यालाच आंतरिक स्थैर्य म्हणतात.

**२. बाह्य स्वातंत्र्य** : पण वाक्यांना बाह्य स्वातंत्र्यही असते.

उदा. ‘एक खानदानी गर्भश्रीमंत’ असा बदल चालू शकतो.

‘ती घरातून रोज सकाळी सात वाजता निघते’

या वाक्यात ‘ती रोज सकाळी सात वाजता घरातून निघते’ किंवा

‘रोज सकाळी सात वाजता ती घरातून निघते’ असा बदल करता येतो.

यालाच बाह्य स्वातंत्र्य असे म्हणतात.

शब्दाप्रमाणे शब्दबंधाचेही नामशब्दबंध, विशेषण शब्दबंध, क्रियाविशेषण शब्दबंध, क्रियापद शब्दबंध’ असे प्रकार पडतात.

उदा. १. तेव्हा **आकाशस्थ लाखो देवतांनी** कर्णावर पुष्पवृष्टी केली. - नामशब्दबंध

२. **प्रचंड गतीने भोवंडणारे** विश्वचक्र कुणालाही आश्चर्यचकीत करील. - विशेषण शब्दबंध

३. ती **गप्पा मारीत होती.** - क्रियापदशब्दबंध

४. **रस्त्याच्या पलिकडच्या बाजूला** बोराचे झाड आहे. - क्रियाविशेषण शब्दबंध.

### १.२.२ वाक्य

शब्दबंधानंतरची पुढची पायरी म्हणजे वाक्य होय. काही भाषाभ्यासक त्याला उपवाक्य असेही म्हणतात. पण उपवाक्य व वाक्य यामध्ये रचनेच्या दृष्टीने कोणताच फरक नसतो. म्हणजेच उपवाक्य हे वाक्यच असते. ते कधीही स्वतंत्रपणे येऊ शकत नाही.

वाक्य म्हणजे सार्थ शब्दसमूह. वाक्यातून कोणता तरी आशय किंवा अर्थ व्यक्त होत असतो. वाक्य म्हणजे केवळ शब्दांची योग्य क्रमाने रचना नव्हे. तर त्यातून आशय, अर्थ, भावना, विचार व्यक्त करणारी रचना असते.

**वाक्यांच्या व्याख्या**

१. 'एक पूर्णविचार भाषेत व्यक्त करणाऱ्या शब्दसमुच्चयास वाक्य म्हणतात' - मो. के. दामले

२. 'उच्चारणातील दुसऱ्या कोणत्याही मोठ्या रचनेचा भाग नसलेली रचना म्हणजे वाक्य' ब्लूमफिल्ड

३. 'रचनेमध्ये दुसऱ्या कोणत्याही मोठ्या व्याकरणिक रूपाचा भाग नसलेले व्याकरणिक रूप म्हणजे वाक्य'- हॉकेट.

वरील व्याख्यांवरून सार्थ शब्दसमूह म्हणजे वाक्य अशी सर्वसमावेशक व्याख्या होते. वाक्य व्याकरणांच्या नियमांनी बांधलेले असते. कर्ता, कर्म, क्रियापद, लिंग, वचन, विभक्ती, काळ व अर्थ यानुसार वाक्याची रचना होत असते. ही रचना स्वतंत्र, स्वयंपूर्ण व अर्थपूर्ण असते. श्री. न. गजेंद्रगडकर यांनी आपल्या 'भाषा व भाषाशास्त्र' या ग्रंथात काही संज्ञा वापरल्या आहेत त्या पुढीलपमाणे :

**१. सार्थता** : वाक्यामधील शब्द सार्थ हवेत.

**२. सामर्थ्य** : वाक्यामधील शब्दांना योग्यता म्हणजे अर्थबोध असावा.

उदा. तो विस्तवाने प्रोक्षण करतो.

या वाक्यात व्याकरणिक नियम असले तरी अर्थदृष्ट्या ते अयोग्य आहे.

**३. आकांक्षा** : वाक्यातील शब्दांना आकांक्षा असायला हवी म्हणजे वाक्याचा सुसंगत अर्थ, त्यातील शब्दांवर अवलंबून असतो व त्यामुळे त्यातील काही शब्दांच्या अभावी तो प्राप्त होणार नाही.

उदा. राम गावाला जातो.

या वाक्यातील तिन्ही शब्द एकमेकांवर अवलंबून आहेत. म्हणजे वाक्यातील प्रत्येक शब्दाला दुसऱ्या सार्थ व अन्वीत शब्दाची अपेक्षा असते.

**४. अन्विती** : वाक्यामधील शब्दांची व्याकरणाच्या दृष्टीने असलेली अनुरूपता म्हणजे अन्विती. वाक्यातील प्रत्येक शब्दाचे रूप त्या वाक्याच्या लिंग, वचन, पुरूष, विभक्ती, काळ अर्थ यांच्यानुसार योग्य त्या प्रकारचे असावे लागते.

### १.२.३ वाक्यरचना

शब्दांच्या पुढच्या रचना म्हणजे शब्दबंध उपवाक्य आणि वाक्य आहेत. पदापासून वाक्यापर्यंत अनेक प्रकारची भाषिक रूपे भाषेत असतात. यापैकी पद सोडून इतर सर्व भाषिक रूपे विघटनक्षम असतात. म्हणजे ती वेगवेगळ्या सार्थ घटकांनी बनलेली असतात. ज्या ज्या भाषिक रूपाचे असे संघटक दाखविता येतील त्या त्या रूपाला रचना म्हणतात. पद म्हणजे सर्वात लहान असे भाषिक रूप होय. पद किंवा पदिमाचे विघटन होत नाही. म्हणजे पद किंवा पदिम ही रचना नसते. पदिमाला संघटक नसल्याने ती रचना होत नाही.

पदिमाच्या पुढच्या रूपाला मात्र संघटक असतात. शब्द हा पदिमाच्या पुढचे रूप आहे. शब्दात एकापेक्षा अधिक पदे असल्याने तो रचना या प्रकारात येतो. म्हणजेच शब्दांच्या संघटकांना पद किंवा पदिम म्हणतात. शब्द हाही वरच्या रचनेच्या म्हणजे शब्दबंधाचा संघटक आहे. शब्दबंध हा उपवाक्याचा अथवा वाक्याचा संघटक आहे. उपवाक्य हे वाक्याचा संघटक आहे. अशा तऱ्हेने पदाच्या वरच्या सर्व रचना खालील संघटकांच्या दृष्टीने रचना असून वरच्या रचनेच्या दृष्टीने संघटक असतात. वाक्य मात्र दुसऱ्या कोणत्याही रचनेचे संघटक नसते म्हणून 'वाक्य ही उच्चारणातील सर्वात मोठी रचना असते.'

वाक्य (संघटक नाही)
↑
उपवाक्य (संघटक)
↑
शब्द (संघटक)
↑
पद/पदि
↑
स्वन/स्वनिम

## १.२.४ प्रथमोपस्थित संघटक

प्रथमोपस्थित संघटक म्हणजे त्या रचनेला प्रत्यक्षपणे जबाबदार असलेले संघटक होत. कोणत्या रचनेचे पहिल्या टप्प्याला जे संघटक होतात ते **तिचे प्रथमोपस्थित संघटक** किंवा अव्यवहित संघटक होत. ज्या संघटकांचे पुढे विश्लेषण किंवा विघटन शक्य नसते ते त्या रचनेचे **अंतिम संघटक** असतात.

उदा. त्या घरातील सर्वात जास्त शिकलेला मुलगा हुषार आहे.

↓

त्या घरातील सर्वात जास्त

[(तो) (घर, त, ईल)

(सर्वात) (जास्त)]

शिकलेला मुलगा हुषार आहे.

[(शिक, लेल, आ) (मुलग, आ)

(हुषार) (अस, हे)]

असे संघटक दाखविताना पदबंधातील पदांचा काळजीपूर्वक विचार करावा लागतो. कोणत्या पदाचा कोणत्या पदाशी संबंध आहे हे पहावे लागते.

उदा. भांडखोरपणा


भांडखोर पण

भांड खोर

'भांडखोरपणा' यात भांड+खोर+पणा असे तीन संघटक आहेत. या व्यतिरिक्त त्याचे विघटन होऊ शकत नाही. यात 'भांड' व 'खोर' हे दोन संघटक एकत्रित आले व नंतर 'पणा' हा संघटक त्याला जोडला गेला म्हणून 'भांडखोर+पणा' अशी रचना होते.

कोणत्याही रचनेचा असा टप्प्याटप्प्याने विचार करावा लागतो.

उदा.




वरील उदाहरणावरून असे म्हणता येईल की कोणत्याही रचनेचे पहिल्या टप्प्याला जे संघटक होतात ते तिचे प्रथमोपस्थित संघटक किंवा अव्यवहित संघटक होत. प्रथमोपस्थित संघटक म्हणजे त्या रचनेला प्रत्यक्षपणे जबाबदार असलेले संघटक होत.

प्रथमोपस्थित संघटक शोधण्याच्या या पद्धतीमुळे संघटकांचे परस्परसंबंध कळतात, संघटकांचे रचनेतील स्थान अथवा महत्त्वही कळते, वाक्यातील अथवा रचनेतील संदिग्धता दूर होते. संघटक शोधताना काही पथ्ये पाळावी लागतात. ती पुढीलप्रमाणे –

१. रचनेचे आपण जे छेद करू ते सार्थ असले पाहिजेत.


   उदा. अस्वाभाविक $\longrightarrow$ अ + स्वाभाविक

२. त्या छेदाचे अर्थ मूळ रचनेशी सुसंगत असले पाहिजेत.

   उदा. सभागृहात धूम्रपान **करू नये.**

   सभागृहात धूम्रपान **करून ये.**

३. छेदाने दाखविलेल्या संघटकांच्या जागी दुसऱ्या प्रतिस्थापनक्षम अशा लहान रचना वापरता आल्या पाहिजेत. उदा. अस्वाभाविक = अ + स्वाभाविक




४. संघटकाचा जो रूपवर्ग असेल त्याच रूपवर्गातील शब्द प्रतिपादनक्षम म्हणून येईल. नामबंधाच्या ठिकाणी नामबंध क्रियापदबंधाच्या ठिकाणी क्रियापदबंधच येईल.

उदा. तांबडा सदरा घातलेला माणूस/मोठ्याने ओरडत आहे.

वेडा माणूस / ओरडत आहे.

५. प्रत्येक संघटक स्वतः पुरता स्वतंत्र कोणी एकसंघ असला पाहिजे म्हणजे एका संघटकाची जागा जर बदलायची झाली तर तो संबधच्या सबंध हलवावा लागतो.

उदा. वर्गात पहिला येणाऱ्या मुलाला हे बक्षीस मिळेल.

हे बक्षीस वर्गात पहिला येणाऱ्या मुलाला मिळेल.

काही संघटक **अतिरिक्त** असतात. त्यापैकी एक संघटक म्हणजे **शब्दांचा क्रम** होय.

उदा. स्थूल सरदाराची पत्नी.

सरदाराची स्थूल पत्नी

या वाक्यात संघटक तेच असले तरी क्रम बदलल्याने अर्थभेद होतो. तर दुसरा अतिरिक्त संघटक म्हणजे **सीमासंधी** लिखित रूपापेक्षा बोली रूपामध्ये हा महत्त्वाचा असतो.

उदा. वृद्ध पुरुष आणि स्त्रिया

या वाक्यामध्ये विशिष्ट प्रकारे उच्चार करून संदिग्धता दूर करता येते. कारण जर पुरुष आणि स्त्रिया दोन्ही वृद्ध असतील तर 'वृद्ध' शब्दानंतर थोडे थांबून मग 'पुरुष आणि स्त्रिया' उच्चारता येईल आणि फक्त पुरुषच असतील तर 'वृद्ध पुरुष' या उच्चारानंतर थोडे थांबून नंतर 'स्त्रिया' हा शब्द उच्चारावा लागेल.

### १.२.४ रचनांचे प्रकार

भाषेमध्ये आढळणाऱ्या रचनांचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. (अ) अन्तःकेंद्रिय रचना (ब) बहिःकेन्द्रीय रचना व संघटक यांच्या विनियोगाच्या आधारे ही वर्गीकरण पद्धती मानलेली आहे.

**१. अन्त:केन्द्रीय रचना** : रचना ज्या संदर्भात येऊ शकते त्याच संदर्भात तिचा एखादा संघटक येऊ शकत असेल तर ती रचना अन्त:केन्द्रीय रचना होय. याचाच अर्थ रचना आणि तिचा संघटक यांचे विनिमय सारखे असेल तर त्या रचनेला अन्तःकेन्द्रीय रचना म्हणतात.

उदा. मला **हिरवा पोपट** आवडतो.

या रचनेत हिरवा पोपट ही रचना अन्तःकेन्द्रीय आहे. कारण 'हिरवा पोपट' या रचनेच्या जागी तिचा संघटक 'पोपट' याचाही उपयोग होऊ शकतो.

**२. बहि:केन्द्रीय रचना** : जेव्हा रचनेचा विनिमय आणि तिच्या संघटकाचा विनिमय भिन्न-भिन्न असतात तेव्हा ती रचना बहिःकेन्द्रीय असते.

उदा. रमेश उठतो.

या रचनेचे प्रथमोपस्थित संघटक 'रमेश, उठतो' असे आहेत. हे दोन्ही संघटक एकत्रच येऊ शकतात. या दोन प्रकारचे भिन्न-भिन्न उपप्रकार आहेत. त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करता येतो.

### १.२.५ वाक्याचे प्रकार

वाक्याचे अर्थानुरूप व रचनेच्या दृष्टीने असे दोन प्रकार केले जातात.

**(अ) अर्थानुरोधाने प्रकार :**

१. **विधानार्थी वाक्य** : ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते.

उदा. माझे वडील आज परदेशात गेले.

२. **प्रश्नार्थी** : ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो.

उदा. तुम्ही शाळेत कधी जाणार आहात ?

३. **उद्गारार्थी** : ज्या वाक्यात भावनेचा उद्गार काढलेलं असतो.

उदा. अबब ! केवढी प्रचंड आग ही !

४. **होकारार्थी व नकारार्थी** : काही वाक्ये होकारार्थी असतात.

उदा. राम अभ्यास करतो.

तर काही वाक्यांतून नकार येतो.

उदा. शाम कधीच अभ्यास करीत नाही.

हे वाक्य नकारार्थी होते.

होकारार्थी वाक्यांना 'करुणरूपी' व नकारार्थी वाक्यांना 'अकरणरूपी' वाक्ये म्हणतात.

वाक्यातील क्रियापदांवरून काही प्रकार पडतात.

१. **स्वार्थी वाक्य** : वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून नुसताच काळाच बोध होतो.

उदा. मुले घरी गेली / जातात - जातील.

२. **आज्ञार्थी वाक्य** : वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून आज्ञा, आशीर्वाद, प्रार्थना, विनंती किंवा उपदेश या गोष्टीचा बोध होतो.

उदा. परमेश्वरा, माझं भलं कर.

३. **विध्यर्थी वाक्य** : वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा या गोष्टींचा बोध होतो.

उदा. मुलांनी शिक्षकांच्या सूचनांचे पालन करावे.

४. **संकेतार्थी** : वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून अमूक केले असते तर अमूक झाले असते अशी अट किंवा संकेत याचा अर्थ निघतो.

उदा. पाऊस पडला असता तर हवेत गारवा असता.

**(ब) रचनेनुसार वाक्याचे प्रकार**

एका वाक्यात किती विधाने असतात. त्यावरून वाक्यांचे तीन प्रकार पडतात.

**१. केवल वाक्य** : ज्या वाक्यात एकच उद्देश व एकच विधेय असते. त्यास केवल किंवा शुद्ध वाक्य म्हणतात.

उदा. **आम्ही** आमच्या गावी **जातो.**

**बाजीप्रभू** प्रयत्नांची शर्थ करून धारातीर्थी **पडले.**

वरील वाक्यात आम्ही, बाजीप्रभू हे एकच उद्देश तर जातो, पडले ही विधेये आहेत.

काही वेळेला ही केवलवाक्ये साधे, विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी, नकारार्थी अशी असू शकतात.

**२. मिश्रवाक्य किंवा संमिश्र वाक्य** : ज्या वाक्यामध्ये एक मुख्य विधेयक व एक मुख्य उद्देश असून दोन किंवा अधिक उपवाक्ये असतात. त्याला मिश्र वाक्य असे म्हणतात.

उदा. जर तुला उद्योग असता, तर तू रिकामटेकडा फिरला नसतास.

संमिश्र वाक्यात एक प्रधान उद्देश व एक प्रधान विधेय असून एक किंवा एकापेक्षा अधिक उद्देश्य व विधेय दुय्यम म्हणून आलेली असतात. प्रधान उद्देश, विध्येय असलेल्या वाक्याला **प्रधान वाक्य** व इतर वाक्यांना **दुय्यम किंवा गौण** वाक्ये म्हणतात.

गौण वाक्ये तीन प्रकारची असतात.

**(अ) नामवाक्य** : केवळ वाक्यात ज्या ठिकाणी नामपदबंध येतो, त्या त्या ठिकाणी येणारे वाक्य. ही खालीलप्रमाणे येतात.

उदा. **तुम्ही** बोलता हे योग्य आहे - कर्ता/उद्देश

**पुस्तक वाच** असे ती म्हणाली. - कर्म

**(ब) विशेषण वाक्य** : केवल वाक्यात ज्या ज्या ठिकाणी विशेषण येते त्या त्या ठिकाणी येणारे वाक्य.

उदा. **जे** विद्यार्थी अभ्यास करतात, **ते** परीक्षेत यशस्वी होतात. (कर्ता उद्देश विस्तारक)

**जो** नोकर पूर्वी आमच्याकडे होता **त्याला** मी आज ऑफिसात पाहिला. (कर्म विस्तारक)

**(ड) क्रियाविशेषण वाक्य :** केवल वाक्यात ज्या ज्या ठिकाणी क्रिया विशेषण येते त्या त्या ठिकाणी येणारे वाक्य क्रियाविशेषण वाक्य होय.

ही वाक्ये वाक्यामध्ये विधेयविस्तारक म्हणून येतात. क्रियाविशेषण वाक्ये ही स्थल, काल, रीति, संख्या, परिणाम, कार्यकारणवाचक इ. प्रकारची असू शकतात.

उदा. तुम्ही जेथे जायला सांगाल, तेथे तो येईल.

**३. संयुक्त वाक्य :** ज्या वाक्यामध्ये संमिश्र किंवा केवल वाक्यांचा संयोग झालेला असतो त्याला संयुक्त वाक्य असे म्हणतात.

संयुक्त वाक्यामध्ये एकापेक्षा अधिक प्रधान उद्देश्ये व एकापेक्षा अधिक प्रधान विधेये असतात. संयुक्त वाक्यामधील ही वाक्ये एकमेकांशी उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात.

**उभयान्वयी अव्यये :** समुच्चयवाचक (आणि, व, आणखी) विकल्पवाचक (वा, अथवा, अगर), न्यूनत्ववाचक (पण, परंतु, बाकी) परिणामवाचक (सबब, म्हणून, यास्तव)

उदा. ती आली, तिने पाहिले **आणि** तिने जिंकले.

तो येईल **किंवा** येणार नाही.

संयुक्त वाक्याचे प्रकार : (अ) केवल संयुक्त (केवल+केवल)

(ब) मिश्रसंयुक्त (मिश्र+मिश्र)

(क) केवलमिश्र संयुक्त (केवल+मिश्र)

### १.२.६ वाक्याचे पृथक्करण

पारंपरिक व्याकरणात वाक्य पृथक्करण व प्रथमोपस्थित संघटकाने केलेले पृथक्करण यात फरक दिसून येत नाही. वाक्यातील प्रथमोपस्थित संघटक हणजे वाक्यातील उद्देश आणि विधेय होय. उद्देशाचे प्रथमोपस्थित संघटक म्हणजे मूल उद्देश आणि उद्देशविस्तार. प्रथमोपस्थित संघटक म्हणजे मूळ विधेय (क्रियापद) आणि विधेयविस्तार होय.

वाक्याचेच वाक्यपृथक्करण करता येते. पण मराठी भाषेत अशी काही वाक्ये येतात की आशय वाक्याचा असतो पण रचना मात्र वाक्याची नसते.

उदा. तू गावाला जाशील का ? ''हो''

येथे ''मी गावाला जाईन'' असा आशय असला तरी रचना मात्र 'हो' या एका शब्दाची आहे. अशा वाक्याचे पृथक्करण करता येत नाही. कारण या वाक्यात उद्देश नसून फक्त विधेय आहे. याचा अर्थ असा की, अर्थपूर्ण व संदर्भरहित वाक्य म्हणजे ज्या वाक्यात उद्देश व विधेय हे घटक आहेत अशाच वाक्याचे पृथक्करण करता येते.

वाक्याचे पृथक्करण करताना उद्देश व विधेय हे महत्त्वाचे घटक आहेत. **उद्देश म्हणजे कर्ता.**

**कर्ता** – म्हणजे क्रिया करणारा.

**विधेय –** म्हणजे क्रियापद.

वाक्यामध्ये इतर जे शब्द येतात ते फक्त उद्देश व विधेयाच्या विस्तारासाठी / स्पष्टीकरणासाठी आलेले असतात म्हणून त्यांना उद्देश्यविस्तार आणि विधेयविस्तार असे म्हणतात.

वाक्यामध्ये जे शब्द येतात त्या शब्दांची अनेक रूपे वापरली जातात. ती रूपे कर्ता, कर्म, क्रियापद, विभक्ती आख्यान (काळ व अर्थ) लिंग, वचन, पुरुष, विभक्ती याआधारे वापरलेली असतात.

**(अ) उद्देश्य (कर्ता)** : कर्ता हा वाक्यातील महत्त्वाचा घटक असतो. त्याच्याशिवाय क्रियाच पूर्ण होत नाही. कर्ता दोन प्रकारचा असतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष.

**प्रत्यक्ष कर्ता** : हा वाक्यातील क्रियेत प्रत्यक्षपणे येतो.

**उदा. सीता** अभ्यास करते.

**राम** गावाला जातो.

**तो** खूप अभ्यास करतो.

वरील वाक्यात 'सीता, राम' ही नामे आहेत तर 'तो' हे सर्वनाम आहे.

**अप्रत्यक्ष कर्ता** : कर्ता क्रियेला प्रत्यक्षपणे जबाबदार नसतो. क्रिया त्याच्या ठिकाणी घडत असते. त्यावेळी त्याला अप्रत्यक्ष कर्ता म्हणतात.

उदा. **अमितला** आंबे आवडतात.<br>**त्याला** दूध पाहिजे.<br>(कर्ता क्रियेठिकाणी प्रत्यक्ष नाही)

वाक्यात उद्देश नेहमी एकेरी शब्दाच्याच रूपाने येतो असे नाही. कधी कधी उद्देश्याला जोडून एक किंवा अनेक शब्द जोडून येतात. त्यांना उद्देश्य विस्तारक म्हणतात. म्हणजे उद्देशवाचक शब्दाचे विशेषण अथवा विशेषणबंध होय.

उदा. **शहाणा** मुलगा रडत नसतो.

**(ब) विधेय (क्रियापद)**

वाक्यातला दुसरा भाग म्हणजे विधेय म्हणजेच क्रियापद किंवा क्रियाबंध होय. ते दोन प्रकारे असते.

**एकेरी क्रियापद** – रमेश **बसतो.**

**संयुक्त क्रियापद –** रमेश **बसला** आहे.

संयुक्त क्रियापदामध्ये एक क्रियापद मुख्य क्रियेचे वाचक असून दुसरे क्रियापद सहाय्यक असते. वरील उदाहरणातील 'आहे' हे सहाय्यक क्रियापद आहे.

वाक्यपृथक्करणाची प्रक्रिया फक्त उद्देश्य व विधेयाने पूर्ण होत नाही. त्यासाठी इतरही शब्द येतात. त्यातील काही शब्दांचा गट विधेय विस्तारक म्हणून येत असतो. विधेय विस्तारक म्हणजे क्रियाविशेषण किंवा क्रियाविशेषणबंध होय.

उदा. तो **मोठ्याने** ओरडतो. (विधेय विस्तारक क्रियाविशेषणबंध)

विधेय विस्तारकांच्या जोडीला इतर आणखी शब्द येतात. ते **शब्द विधेयपुरके** असतात. मराठीत तीन प्रकारची विधेयपुरके असतात. (अ) आधारपूरक (ब) कर्मपूरक (क) विधिपूरक.

**(अ) आधारपूरक** : उदा. तो **पुण्याला** गेला.

श्याम **गावात** जातो.

वरील उदाहरणातील पुण्याला, गावात हे आधारपूरके आहेत. त्यांच्याद्वारे क्रियेचा आधार स्पष्ट होतो.

**(ब) कर्मपूरक** : काही क्रियापदे ही सकर्मक व अकर्मक असतात. क्रियापदांना कर्माची आवश्यकता असते.

**कर्म –** क्रिया ज्याच्यावर घडते. ते कर्म. काय, कुणाला हे प्रश्न विचारल्यास येणारे उत्तर म्हणजे **कर्म.** कर्म दोन प्रकारचे असतात. एक प्रत्यक्ष कर्म व दुसरा अप्रत्यक्ष कर्म.


उदा. राम **आंबा** खातो. – प्रत्यक्ष कर्म

डॉक्टर **रोग्याला** तपासतात. – अप्रत्यक्ष कर्म.

**(क) विधिपूरक** : अस्तित्ववाचक (आहे, असतो) स्थित्यंतर वाचक (हो, बन) अशा क्रियापदांच्या अर्थपूर्णतेसाठी त्यांचा उपयोग होतो.

उदा. नीता **शिक्षिका** आहे. – विधिपूरक

विधिपूरक म्हणजे कर्त्याहून भिन्न अशी वस्तू किंवा व्यक्ती नसते तर कर्त्याचेच ते भिन्न रूप अथवा स्थित्यंतर असते.



### १.२.७ समारोप

वाक्याचा विचार हा शब्दांच्या विचारानंतरची पायरी आहे. एका शब्दाचा विचार रूपमविन्यासात केलेला असतो. तर एका पेक्षा अधिक शब्दांचा व त्यांच्यातील रचनांचा विचार वाक्यविचार किंवा वाक्यविन्यासात केलेला/असतो. एकापेक्षा अधिक शब्द येताच त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध व त्यांच्यातून व्यक्त होणारी रचना ही वाक्यविन्यासात महत्त्वाची ठरते. जशी वाक्यामध्ये रचना असते तशीच शब्दामध्ये रचना असते. रचनेच्या आधारे शब्दाचे विघटन रूपिमांमध्ये करता येते. पण शब्दामधील रचनेचा विचार वाक्यविन्यासाच्या कक्षेत येत नाही.

### १.२.८ स्वाध्याय

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. शब्दबंध, उपवाक्य आणि कोणत्या घटकाने भाषा तयार होते ?

(अ) वाक्य (ब) प्रयोग (क) विभक्ती (ड) समास.

२. शब्दाची पुढची रचना कोणती असते ?

(अ) वाक्य (ब) पदबंध (क) भाषा (ड) स्वन

३. 'एक पूर्ण' विचार भाषेत व्यक्त करणाऱ्या शब्दसमुच्चयास वाक्य म्हणतात. अशी वाक्याची व्याख्या कोणी केली आहे ?

(अ) हॉकेट (ब) ब्लूमफिल्ड (क) मो. के. दामले (ड) सोस्यूर

४. 'भाषा व भाषाशास्त्र' या ग्रंथाचे लेखक कोण आहेत ?

(अ) कृ. पा. कुलकर्णी (ब) मो. के. दामले

(क) श्री. न. गजेंद्रगडकर (ड) प्र. न. जोशी

५. ज्या संघटकांचे पुढे विश्लेषण किंवा विघटन शक्य नसते ते त्या रचनेचे काय असतात ?

(अ) अंतिम संघटक (ब) प्रथम संघटक

(क) अतिरिक्त संघटक (ड) प्रथमोपस्थित संघटक

६. जेव्हा रचनेचा विनिमय आणि तिच्या संघटकाचा विनिमय भिन्न भिन्न असतात तेव्हा ती रचना कशी असते ?

(अ) अन्तःकेन्द्रीय (ब) बहिःकेन्द्रीय

(क) विधानार्थी (ड) प्रश्नार्थी

७. ज्या वाक्यातून प्रश्न विचारला जातो ते वाक्य कोणत्या प्रकारचे असते ?

(अ) प्रश्नार्थी (ब) विधानार्थी (क) उद्‌गारार्थी (ड) होकारार्थी

८. ज्या वाक्यात एकच उद्देश व एकच विधेय असते. त्या वाक्यास काय म्हणतात ?

(अ) मिश्र वाक्य (ब) संयुक्त वाक्य

(क) केवल वाक्य (ड) गौण वाक्य

९. वाक्याचे पृथक्करण करताना उद्देश व कोणता घटक महत्त्वाचा असतो ?

(अ) विधेय (ब) वचन (क) आख्यान (ड) अर्थ

१०. वाक्यातील क्रिया करणाऱ्या शब्दाला काय म्हणतात ?

(अ) कर्म (ब) कर्ता (क) क्रियापद (ड) वचन.

**उत्तरे :** १-अ, २-ब, ३-क, ४-क, ५-अ,
६-ब, ७-अ, ८-क, ९-अ, १०-ब.

**(ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. पदबंध व वाक्याचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

२. वाक्याचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

**(क) लघुत्तरी प्रश्न**

१. वाक्याचे पृथक्करणाचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

२. प्रथमोपस्थित संघटक संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

३. वाक्याचे अर्थानुरोधाने पडणारे प्रकार स्पष्ट करा.

**(ड) टीपा लिहा.**

१. केवल वाक्य व मिश्र वाक्य

२. पदबंधाचे स्वरूप

३. उद्देश व विधेय

## १.९ संदर्भ ग्रंथ


१. मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान – डॉ. कदम महेंद्र

२. भाषा व भाषाशास्त्र : गजेंद्रगडकर श्री. न.

३. मराठीचा भाषिक अभ्यास : कानडे मु. श्री.

४. मराठी व्याकरण परिचय : हिरेमठ राजशेखर

५. भाषाविज्ञान परिचय : कुबेर, कुलकर्णी

६. वर्णनात्मक भाषा विज्ञान : गोविलकर लीला

७. सुगम मराठी व्याकरण लेखन – वाळंबे मो. रा.

## घटक – १

# मराठीची वर्णमाला

उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.३ ध्वनी व वर्ण

१.३.१ मराठीची वर्णमाला

१.३.२ पारंपरिक स्वर व त्यांचे वर्गीकरण

१.४ स्वरांचे ध्वनिशास्त्रदृष्ट्या विश्लेषण

१.४.१ स्वरांचे प्रकार

४.१.१.स्वरांचे उच्चारानुसार प्रकार (ऱ्हस्व, दीर्घ)

४.१.२.स्वरांचे व्युत्पत्तीनुसार प्रकार (सिद्ध, साधित)

४.१.३. स्वरांचे स्वरूपावरून प्रकार (सजातीय, विजातीय)

४.१.४. अनुस्वार व विसर्ग / स्वरादि

१.४.२ स्वरांचे उच्चारण स्थानानुसार विश्लेषण

१.४.३ मराठीची स्वर संख्या (पारंपरिक व नवीन)

१.५ मराठीतील व्यंजन विचार

१.५.१ व्यंजनांचे प्रकार

५.१.१. स्पर्श व्यंजने

५.१.२. कठोर व मृदू व्यंजने

५.१.३. अल्पप्राण व महाप्राण

५.१.४. अनुनासिके

५.१.५. तालव्य व्यंजने

५.१.६. अंत:स्थ व्यंजने

५.१.७. उष्म व्यंजने

५.१.८. संयुक्त व्यंजने

५.१.९. मूर्धन्य

१.५.२ मराठीची व्यंजन संख्या (पारंपरिक व नवीन)

१.६ मराठीची वर्ण संख्या निश्चितीकरण

१.७ समारोप

१.८ पारिभाषिक शब्द

१.९ स्वाध्याय

१.१० संदर्भ ग्रंथ

१.११ पूरक वाचन

## उदिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणास;

- मराठी वर्णव्यवस्थेची कल्पना येईल.
- ध्वनि व वर्ण यांच्यातील भेद लक्षात येईल.
- मराठीतील स्वर आणि व्यंजने यांची माहिती होईल.
- स्वर आणि व्यंजन यांचे उपप्रकार समजून घेता येतील.

## १.१ प्रस्तावना

माणूस आपल्या भावभावना अभिव्यक्त करण्यासाठी भाषेचा साधन म्हणून वापर करत असतो. ही भाषा मानवी ध्वनींची बनलेली असते. ध्वनी हे भाषेचे मूलघटक असतात. भाषेला ध्वनींचे माध्यम लाभलेले असल्याने एक वेगळेच वैशिष्ट्ये तिच्यामध्ये पहावयास मिळते. भाषाशास्त्रात ध्वनींचा स्वतंत्रपणे विचार केला जातो. परंतु

भाषाशास्त्रातील ध्वनीविचार हा फारसा तात्विक नसून प्रयोगशील आहे. यामध्ये ध्वनींचे उच्चारण, श्रवण व आकलन या तिन्ही गोष्टी अभिप्रेत आहेत. माणूस मुखावाटे असंख्य ध्वनी उत्पन्न करू शकतो परंतु त्यातील भाषेमध्ये अंतर्भूत असणाऱ्या ध्वनींची प्रतीके म्हणून विशिष्ट आकारविल्हे लेखनासाठी वापरली जातात त्यांना वर्ण संबोधले जाते.

## १.२ विषय विवेचन

मानवी भाषेतील अक्षरे ही सामान्यतः ध्वनीचिन्हे म्हणून वापरली जात असतात. आधुनिक भाषा-विज्ञानामध्ये वर्णालाच 'स्वन' असे म्हटले जाते याची कल्पना आपणास आहे. कोणत्याही भाषेची वर्णव्यवस्था हा त्या भाषेचा पहिला व मूलभूत स्तर असतो. या वर्णव्यवस्थेचा वापर करून अनेक पदिमांची (शब्दांची) व पदिमांच्या (शब्दांच्या) माध्यमातून वाक्यांची निर्मिती होऊन समाजव्यवहार पार पाडला जात असतो. स्वर आणि व्यंजनांनी मिळून भाषेची वर्णमाला तयार झालेली असते. या स्वर आणि व्यंजनांच्या प्रकारासहीत वर्णव्यवस्थेचे अध्ययन सदर प्रकरणामध्ये आपणास करावयाचे आहे. सुरुवातीला आपण ध्वनी आणि वर्ण या संकल्पना समजून घेऊ.

## १.३ ध्वनी व वर्ण

एखाद्या भाषेमध्ये किती ध्वनी आहेत ? असे विचारल्यावर सामान्यतः माणूस त्या भाषेच्या वर्णमालेतील अक्षरे मोजू लागतो. विशिष्ट भाषेतील ध्वनी व त्याच भाषेतील वर्ण याच्यात मूलभूत फरक नाही. ध्वनी हे उच्चारक्षम व श्राव्य असतात तर वर्ण ही त्याची विशिष्ट चिन्हानी दाखविलेली प्रतीके असतात. वास्तविक पाहता वर्ण हे ध्वनीचे मूर्त किंवा लिखित रूप आहे. परंतु ध्वनी हे सजीव, प्रवाही असल्याने ते परिवर्तनशील असतात, तर वर्ण हे अपरिवर्तनशील, कृत्रिम व बद्ध असतात. ध्वनी व वर्ण यांच्यामध्ये सुसंवादित्व असले पाहिजे पण व्यवहारात मात्र ते शक्य होत नाही, मुखावाटे उच्चारले जाणारे ध्वनी व त्यांचे प्रत्यक्ष लिखित रूप (वर्ण) यांच्यात तफावत असल्याचे जाणवते. वर्ण स्थिर राहतात तर ध्वनी (म्हणजे त्यांचे उच्चार) बदलत राहतात. जगातील सर्वच भाषांच्याबाबतीत हे ध्वनिपरिवर्तन दिसून येते.

एकाच ध्वनीसाठी वेगवेगळ्या भाषांमध्ये व एकाच भाषेमध्येही वेगवेगळी अक्षरे वापरली जातात. उदाहरणार्थ मराठी भाषेत 'र'ची जोडाक्षरे विचारात घेण्यासारखी आहे. क्रम, कर्ता इ. मराठी भाषेत 'र' या वर्णासाठी अशा पद्धतीने वेगवेगळी आकारविल्हे (वर्ण) वापरले जातात. तर भाषेतील काही ध्वनींना वेगळे अक्षरच उपलब्ध नाही. उदाहरणार्थ चहा, चार (४), चार (चारणे) या तिन्ही शब्दातील 'च'चा उच्चार दंततालव्य व तालव्य असा वेगवेगळा आहे, पण वर्णामध्ये बदल दिसत नाही. या भिन्न ध्वनींसाठी विशिष्ट असा एकच वर्णरूढ आहे. म्हणूनच ध्वनीचा पुनर्विचार होताना दिसतो.

'ध्वनीविचारामध्ये मानवी मुखावाटे उत्पन्न झालेल्या ध्वनींचा अभ्यास केला जातो. ध्वनींचे पृथक्करण, वर्गीकरण म्हणजे शिकलेले ध्वनी उच्चारता येणे, उच्चारलेले ध्वनी ओळखता येणे व त्यांचे वर्णन देऊन वर्गीकरण करता येणे. शिवाय ज्या दोन यंत्रणेचा उपयोग करून मनुष्य ध्वनी निर्माण करतो त्या यंत्रणेचा अभ्यास करणे

देखील गरजेचे आहे. ध्वनीविचारामध्ये कोणत्याही एका विशिष्ट भाषेतील ध्वनीचा अभ्यास अभिप्रेत नाही तर वाक्ययंत्रणेतून उत्पन्न होणाऱ्या सर्व प्रकारच्या ध्वनींचा अभ्यास अभिप्रेत आहे. (भाषा व भाषाशास्त्र श्री. न. गजेंद्रगडकर, पृष्ठ क्रमांक १६५)

मानवी मुखावाटे निर्माण होणाऱ्या मूलध्वनींना आपण वर्ण म्हणतो. मुखावाटे उत्पन्न झालेले हे मूलध्वनी हवेत विरून जातात नष्ट होतात, ते नष्ट होऊ नयेत म्हणून रंगाने म्हणजेच वर्णाने लिहून ठेवण्याची कला माणसाने विकसित केली. कोणत्यातरी विशिष्ट रंगाने हे ध्वनी लिहून ठेवले जातात म्हणून त्यास वर्ण असे म्हणतात. या वर्णाचे विभाजन होत नाही कारण ते मूलभूत ध्वनी असतात. उदाहरणार्थ अ, उ हे मराठी भाषेतील स्वर हे पूर्ण तर क्, ख् ही व्यंजने अपूर्ण आहेत. व्यंजनामध्ये स्वर मिसळल्याशिवाय त्यांना पूर्णत्व प्राप्त होत नाही म्हणून व्यंजनांचे पाय मोडून ती लिहिली जातात.

### १.३.१ मराठीची वर्णमाला

मराठी भाषेने जी वर्णमाला स्वीकारली आहे ती संस्कृत भाषेची आहे. लेखनासाठी लिपी स्वीकारतानाही मराठीने संस्कृत भाषेचीच लिपी स्वीकारली; मूळ संस्कृत भाषेतील पन्नास वर्ण मराठीने स्वीकारले व त्यात दीर्घ ऌ व ळ या दोन वर्णांची भर घालून वर्णमाला बावन्न वर्णांची केली. या वर्णांची संस्कृत भाषेच्या वर्णमालेप्रमाणे स्वर व व्यंजन या दोन गटात विभागणी केल्याचे दिसते. परंतु प्रा. अरविंद मंगरूळकर यांच्या मताप्रमाणे, 'एका भाषेची वर्णमाला जशीच्या तशी दुसऱ्या भाषेत उत्पन्न होऊ शकत नाही.' म्हणूनच संस्कृतची वर्णमाला व मराठीची ध्वनिव्यवस्था यांच्यात बरेच अंतर निर्माण झाले. त्यामुळे मराठीतील मूळ ध्वनी कोणते, त्यांची उच्चारवैशिष्ट्ये कोणती यांचा विचार करणे गरजेचे आहे. काळाच्या ओघात बदललेल्या ध्वनिउच्चारांचा विचार करून मराठीत कोणते ध्वनी मानावेत व कोणते मानू नयेत हे निश्चित करणे गरजेचे आहे. तसेच त्याची कारणमीमांसा करून आजच्या मराठीची ध्वनिसंख्या व ध्वनिव्यवस्था ठरवावी लागते. त्यासाठी सुरुवातीला पारंपरिक पद्धतीने जी ध्वनिव्यवस्था आपण मानत आलो आहोत तिचा विचार करून नवीन व्यवस्थेची मांडणी करणे योग्य होईल.

### १.३.२ पारंपरिक स्वर व त्यांचे वर्गीकरण

परंपरेने मराठी भाषेत १६ स्वर मानण्यात येतात ते पुढीलप्रमाणे -

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः

वर सांगितल्याप्रमाणे मराठी भाषेतील स्वर हे पूर्ण आहेत. याचा अर्थ स्वरांना उच्चार करण्यासाठी इतर कोणत्याही वर्णाचे सहकार्य घ्यावे लागत नाही. स्वरांचा उच्चार होताना ओठ व जिभेच्या हालचाली होतात; पण ओठांचा परस्परांशी किंवा जिभेचा ओठांसह मुखातील इतर कोणत्याही अवयवाशी स्पर्श न होता मुखातून जे ध्वनी बाहेर पडतात त्यांना 'स्वर' म्हणतात. स्वराच्या उच्चारावेळी फुफुसातून निघणाऱ्या हवेचा मार्ग मुखातील कोणत्याही अवयवाकडून अडवला जात नाही.

'हवा तोंडावाटे बाहेर पडत असताना हवेला उच्चारण-अवयवाकडून मुद्दाम काहीच अडथळा करण्यात येत नाही. मुद्दाम म्हणण्याचे कारण असे की स्वभावतःच सहजगत्या जो अडथळा होईल तो विचारात घेतला जात नाही, अशा तऱ्हेने निर्वेधपणे हवा तोंडावाटे बाहेर जाताना जे ध्वनी उच्चारले जातात त्यांना स्वर म्हणतात.' (भाषा व भाषाशास्त्र, श्री. न. गजेंद्रगडकर, पृष्ठ क्रमांक १९०, १९१) अशा या सोळा स्वरांचे ध्वनिशास्त्रदृष्ट्याही विश्लेषण केले जाते त्याचा विचार पुढीलप्रमाणे –

## १.४ स्वरांचे ध्वनिशास्त्रदृष्ट्या विश्लेषण

ध्वनींचे 'उच्चारण' हे फ्ल्यूट किंवा बाजाची पेटी वाजविण्यासारखे आहे. म्हणजेच फुप्फुसांतून हवा बाहेर जात असताना ज्या प्रमाणात हवेला अडथळा उत्पन्न होतो त्या प्रमाणात निरनिराळे ध्वनी निर्माण होतात. ज्या पद्धतीने हवा बाहेर जाते किंवा प्रसंगी बाहेरून आत येते त्यावर देखील ध्वनीचे स्वरूप अवलंबून असते. अडथळा तोंडामध्ये किंवा मोर्गान्याच्या पोकळीमध्ये (उपालिजिव्हेमध्ये) होऊ शकतो. उचारणामध्ये हवेचा रोध करणे किंवा अन्यप्रकारे थोड्या बहुत प्रमाणात हवेची अडवणूक करणे याला प्रयत्न म्हणतात. प्रत्येक ध्वनीसाठी काही ना काही तरी प्रयत्न व्हावा लागतो. शिक्षा, प्रातिशाख्ये, व्याकरण इत्यादी आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये याचा बराच विचार केला होता. हा प्रयत्न दोन प्रकारचा मानला गेला आहे. आभ्यन्तर व बाह्य. तोंडाच्या आतील प्रयत्न आभ्यन्तर, म्हणून आपल्या प्राचीन ग्रंथामध्ये त्याला आस्य प्रयत्न असे नाव आहे. (पाणिनीय शिक्षा १.१९) बाहेरील, बाह्य. आभ्यन्तर प्रयत्नाचे क्षेत्र निश्चित नाही, त्यात मतभेदाला वाव आहे. पातंजल महाभाष्यामध्ये ओठापासून स्वरपेटिकेपर्यंत (ओष्ठात् प्रभृती प्राक् काकलकात्) अशी आभ्यन्तर प्रयत्नाची मर्यादा सांगितली आहे. याचा अर्थ मात्र असा होईल की, नासिकाप्रदेशातील उच्चारण आभ्यन्तर प्रयत्नामध्ये सामील होईल. पुष्कळ लोकांना हे मान्य नाही. त्यांच्या मते मृदुतालू (कोमलतालू) व ओष्ठ यांच्यामधील प्रयत्न आभ्यन्तर प्रयत्न होय. साधारणतः बाह्य प्रयत्न स्वरतंत्राशी जोडलेला आहे. श्वास, नाद, घोष, महाप्राण, उदात्तानुदात्त स्वरित उत्यादी बाह्य प्रयत्नांचे भेद प्राचीन ग्रंथांत दिले आहेत. सघोष व अघोष ध्वनी हा भेद बाह्य प्रयत्नामुळे होतो. बाह्य प्रयत्न तीन प्रकारचा मानला जातो. कंठद्वारीय (घोषसंबंधी), फुप्फुसीय (अल्पप्राण महाप्राण) नासिस्य. आधुनिक भाषाशास्त्रामध्ये बाह्य व आभ्यंतर प्रयत्न हा भेद फारसा केला जात नाही. एकंदर किती प्रकारचे प्रयत्न ध्वनियंत्रणेमध्ये होऊ शकतात हे फक्त बघितले जाते. जितके प्रयत्नाचे प्रकार तितके ध्वनीचे. (संदर्भ – श्री. न. गजेंद्रगडकर : भाषा व भाषाशास्त्र, पृष्ठ क्रमांक १८७, १८८)

मराठी भाषेत परंपरेने रुढ असलेल्या स्वरांचे ध्वनिशास्त्रदृष्टया विश्लेषण केले असता आजच्या मराठीत रूढ असणारे अनेक स्वर मानावेत का ? हा प्रश्न निर्माण होतो व मानावयाचे असल्यास कोणते स्वर मानावेत व तेच का मानावेत हे स्पष्ट होते; शिवाय मराठीतील स्वरांचे स्वरूपही स्पष्ट होते; म्हणून प्रत्येक स्वराचे विश्लेषण करणे योग्य ठरते. ते पुढीलप्रमाणे :

**'अः कंठ्य व ऱ्हस्व स्वर** : 'अ' हा स्वर शब्दात येताना त्याचे ऱ्हस्व व दीर्घ असे दोन प्रकारचे उच्चार आढळतात. उदाहरणार्थ 'गवत', 'चटकन' या शब्दांतील प्रत्येक व्यंजनात जो स्वर आहे. त्याची उच्चारमात्रा

कमी-अधिक आहे म्हणून 'अ' या स्वराची ऱ्हस्व व दीर्घ अशी दोन रूपे मानावीत असे म्हटले जाते. 'अ' या स्वराला ऱ्हस्वत्व व दीर्घत्व आहे. त्यासाठी दोन स्वतंत्र ध्वनी मानण्याची गरज नाही.

**आ** : हा कंठ्य ऱ्हस्व स्वर परंपरेने 'अ'चा दीर्घ स्वर मानला जातो; परंतु ध्वनिशास्त्रदृष्टया ते चुकीचे आहे. 'अ'चा दीर्घ किंवा बराच वेळ उच्चार केल्याने 'आ' चा उच्चार येत नाही. शिवाय 'अ' पेक्षा 'आ'ची उच्चारपद्धती व उच्चारस्थान भिन्न आहे म्हणून 'आ' हा 'अ'चा दीर्घ उच्चार मानणे चूक आहे. 'आ' हा स्वतंत्र स्वर आहे. शब्दात येताना त्याचेही ऱ्हस्व व दीर्घ असे दोन प्रकारचे उच्चार आढळतात.

**इ :** हा तालव्य स्वर असून तो स्वतंत्र असा स्वर आहे.

**ई :** हाही तालव्य स्वर आहे. परंपरेने तो 'इ' या ऱ्हस्व स्वराचा दीर्घ उच्चार मानला आहे. इ व ई या दोन्ही स्वरांची उच्चारस्थाने व उच्चारपद्धती एकच आहे. फरक आहे तो अवधीचा; पण केवळ दीर्घत्व हे ध्वनींना स्वतंत्रत्व देण्यास कारण होत नसल्याने दीर्घ 'ई' हा स्वतंत्र स्वर मानण्याचे कारण नाही.

**उ :** हा ओष्ठ्य स्वर असून तो स्वतंत्र स्वर आहे.

**ऊ :** हा ओष्ठ्य स्वर ऱ्हस्व 'उ' चा दीर्घ उच्चार आहे. ऱ्हस्व 'उ' आणि दीर्घ 'ऊ' यांची उच्चारस्थाने व उच्चारपद्धती एकच असल्याने 'ऊ' हा स्वतंत्र स्वर मानण्याचे कारण नाही.

**ऋ** : हा मूर्धन्य स्वर एक स्वतंत्र स्वर आहे; परंतु स्वरासारखा त्याचा प्रवाही उच्चार होत नाही. बराच वेळ उच्चार केल्यावर शेवटी 'उ' हा उच्चार जाणवतो. 'र' आणि 'उ' या ध्वनींची त्याच्या उच्चारात छटा आहे; त्यामुळे या ध्वनीत काही प्रमाणात व्यंजनाचा गुणधर्म आढळतो. हा वर्ण मराठीतील संस्कृत तत्सम शब्दांतच अधिक प्रमाणात आढळतो. मराठीत तो स्वतंत्र येण्यापेक्षा रूप बदलून येतो. उदा. ऋण/रीण म्हणून मराठीत 'ऋ' हा मानावा काय आणि मानल्यास त्यास स्वरमालिकेत स्थान द्यावे काय असे प्रश्न उपस्थित होतात. प्रा. अरविंद मंगरुळकरांनी, '' 'ऋ'च्या उच्चारणात प्रतिबंध येतो आणि त्याचे उच्चारण प्रवाही स्वरूपाचे राहू शकत नाही, ही स्थिती ऋ-लृ यांना स्वरसंज्ञा देण्यास अनुकूल नाही; त्यामुळे ऋ-लृ हे स्वर न ठरता व्यंजने ठरू लागतात.'' हा घेतलेला आक्षेप मान्य करावा लागतो. म्हणून 'ऋ' हा स्वर नसून मूर्धन्य व्यंजन आहे असे म्हणून व्यंजनगटात त्याचा समावेश करणे योग्य ठरते. परंतु परंपरेमुळे तो स्वरमालेत ठेवायला हरकत नाही.

**ॠ** :  हा मूर्धन्य स्वर ऱ्हस्व 'ऋ'चा दीर्घ उच्चार आहे. तो संस्कृतात आढळतो तसा मराठीत आढळत नाही. जो आढळतो तो संस्कृत सामासिक शब्दात उदा.' पितृण', परंतु श्री. मो. के. दामले यानी म्हटल्याप्रमाणे संस्कृतातही हा संधी वैकल्पिक आहे. म्हणजे तो शब्द 'पितृ-ऋण'. असा संधिविरहीत ही लिहिला जातो. म्हणून मराठीत हा स्वर मानण्याची गरज नाही.

**लृ** : लृ हा दंत्य स्वर मराठीपेक्षा संस्कृतात अधिक आढळतो. ऱ्हस्व 'लृ' दीर्घत्व नाही, पण मराठीने मात्र त्याचे दीर्घ रूप मानले आहे. मराठीत या ध्वनींचा वापरच होत नसल्याने व हे दोन्ही स्वर मराठीत मानण्याची आवश्यकता नाही.

**ए, ऐ :** हे कंठतालव्य स्वर असून संस्कृतप्रमाणे मराठीतही संयुक्त स्वर मानले जातात. ए हा स्वर अ + उ आणि ऐ हा स्वर आ + ई या स्वरांनी बनले आहेत असे मानले जाते आणि अ, आ, इ, ई या मूळध्वनींना स्थान दिलेले असल्याने ए आणि ऐ हे त्यापासून बनलेले संयुक्त स्वरध्वनी मानू नयेत असे आधुनिक व्याकरणकारांचे म्हणणे आहे. हे मत ध्वनिशास्त्रदृष्ट्या बरोबर असले तरी ए या स्वराबाबत ते लागू होत नाही कारण ऐ या स्वरात आ+ इ  हे दोन स्वर जाणवतात त्याप्रमाणे ए मध्ये दोन स्वर जाणवत नाहीत. त्याचा स्वतंत्र उच्चार होत असल्याने तो मूलध्वनी आहे म्हणून ए हा मूळ स्वर मानावा आणि ऐ हा संयुक्त स्वर असल्याने तो मानू नये हे ध्वनिशास्त्रदृष्ट्या योग्य आहे.

**ओ, औ** : हे कंठौष्ठ्य स्वरही संयुक्त स्वर मानले जातात.ओ हा स्वर अ+उ या स्वरांपासून तर औ हा स्वर आ+ऊ, या स्वरांपासून निर्माण झाले आहेत असे मानले जाते परंतु औ स्वरात आ+ ऊ या दोन स्वरांचा बोध होतो त्याप्रमाणे ओ मध्ये अ + उ या दोन स्वरांचा बोध होत नसल्याने औ हा संयुक्त स्वर, तर ओ हा स्वतंत्र व मूळस्वर मानावा लागतो म्हणून प्रा. अरविंद मंगरूळकरानी म्हटल्याप्रमाणे ''ए आणि ओ हे स्वतंत्र स्वर होत; परंतु ऐ आणि औ हे स्वर मानण्याची आवश्यकता नाही'', असे जे म्हटले आहे ते योग्य आहे.

**अं, अः** : बिंदू किंवा अनुनासिक असलेला अं आणि विसर्ग असलेला अः हे वर्ण स्वर नाहीत. यांना मूळवर्णात स्थान नाही. त्यांचे उच्चार अम् , अह्  असे आहेत. त्यांच्या आरंभी अ हा स्वर येत असल्याने दामले यानी त्यांना स्वरादि असे म्हटले आहे. इ, उं सारखे उच्चार होणारे वर्णही ध्वनी मानावे लागतील. म्हणून अं, अः हे स्वतंत्र ध्वनी नसल्याने ते मानण्याची गरज नाही. त्यांऐवजी ◌ं, ◌ः अशी अनुनासिक व विसर्ग यांची चिन्हे मानावीत.

**दोन नवीन स्वर – ॲ, ऑ**

प्रा. अरविंद मंगरूळकरानी पारंपरिक स्वरमालेत ॲ आणि ऑ या दोन नवीन स्वरांचा अंतर्भाव करावा असा एक विचार मांडला आहे. इंग्रजी भाषेच्या संपर्काने व प्रभावाने मराठीत बॅट, हॅट, ऑफिस, बॉल असे अनेक शब्द रूढ झाले असून त्यातील ॲ व ऑ या ध्वनींना व्यक्त करण्यासाठी प्रस्थापित स्वरमालेत वर्ण नाहीत म्हणून या ध्वनींचा मराठीत समावेश केला पाहिजे हे सांगताना त्यानी म्हटले आहे. ''या स्वरमालेत आणखी भर टाकली पाहिजे. ॲ आणि ऑ  यांची उच्चारस्थाने पृथक आहेत आणि स्वतंत्र आहेत तसेच ते स्वर आजच्या मराठीत बहुप्रयुक्त आहेत.''

प्रा मंगरूळकराचा हा नवा व महत्त्वाचा विचार आधुनिक मराठी व्याकरणकारांना मान्य झाला आहे. भाषेत आपण ज्या ध्वनींचा उच्चार करतो, वापर करतो त्यांना स्थान दिले पाहिजे व त्यांची चिन्हे किंवा प्रतीके म्हणजे वर्ण ठरविले पाहिजेत, या दृष्टीने त्यांचे मत योग्य आहे. परंतु या बाबतीत एक शंका उपस्थित करावीशी वाटते की, इंग्रजीतील या ध्वनींना मराठीत स्थान देता येईल का? मराठीतील इतर ध्वनी संस्कृतमधून आणि 'ळ' सारखा ध्वनी द्रविडी भाषेतून आला असला तरी मराठीने त्या ध्वनींना आत्मसात केले असून त्या ध्वनींच्या आधारे आपला भाषिक व्यवहार रूढ केला आहे. इंग्रजीतील ॲ व ऑ हे ध्वनी फक्त इंग्रजी शब्दांतच येतात.

त्यापासून मराठीने स्वतःचे शब्द तयार केलेले नाहीत; म्हणून त्या स्वरध्वनींचा मराठीत अंतर्भाव करणे कितपत योग्य ठरेल ? अशी एक शंका आहे. (संदर्भ : प्रा. डॉ. राजशेखर हिरेमठ, मराठी व्याकरण परिचय, पृष्ठ क्रमांक ८,९,१०)

**१.४.१ स्वरांचे प्रकार**

मराठी भाषेत परंपरेने अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः असे १६ स्वर मानण्यात येतात. वर आपण स्वरांच्या ध्वनिशास्त्रदृष्ट्या विश्लेषणाचा विचार केला याशिवाय स्वरांचे उच्चारानुसार, व्युत्पत्तीनुसार आणि स्वरूपावरूनही वर्गीकरण केले जाते ते पुढीलप्रमाणे –

**१.४.१.१ स्वरांचे उच्चारानुसार प्रकार**

**१. ऱ्हस्व स्वर :** ज्या स्वरांचा उच्चार आखूड होतो म्हणजे उच्चार करण्यास एक मात्रा (कालमान) लागते त्या स्वरांना ऱ्हस्व स्वर म्हणतात. ते स्वर पाच आहेत – अ, इ, उ, ऋ, ऌ.

**२. दीर्घ स्वर :** ज्या स्वरांचा उच्चार करण्यासाठी अधिक वेळ लागतो म्हणजे दोन किंवा त्यापेक्षा अधिक मात्रा (कालमान) लागतात त्या स्वरांना दीर्घ स्वर म्हणतात. ते स्वर नऊ आहेत – आ, ई, ऊ, ॠ, ऌ, ए, ऐ, ओ, औ.

**१.४.१.२ स्वरांचे व्युत्पत्तीनुसार प्रकार**

**१. सिद्धस्वर :** ज्या स्वरांची उत्पत्ती इतर स्वरांपासून झालेली नाही ते मूळ स्वर आहेत म्हणजे ते स्वतंत्र, स्वयंभू आहेत त्या स्वरांना सिद्ध स्वर म्हणतात. ते पाच आहेत. – अ, इ, उ, ऋ, ऌ.

**२. साधित स्वर :** ज्या स्वरांची उत्पत्ती मूळ किंवा सिद्ध स्वरांपासून झालेली आहे त्या स्वरांना साधित स्वर म्हणतात. ते पाच आहेत – आ, ई, ऊ, ॠ, ऌ.

**३. संयुक्त स्वर :** दोन भिन्न ऱ्हस्व किंवा सिद्ध स्वरांच्या संयोगातून जे स्वर निर्माण होतात त्यांना संयुक्त स्वर असे म्हणतात. मराठीमध्ये ए, ऐ, ओ, औ. हे स्वर 'संयुक्त स्वर' आहेत. यांचाही समावेश साधित स्वरांमध्ये करणे योग्य ठरेल कारण त्यांची उत्पत्ती इतर स्वरांपासून झालेली आहे. मो. के. दामले यांनी या संयुक्तस्वरांची व्युत्पत्ती पुढीलप्रमाणे सांगितली आहे :

ए = अ+ इ, ई      ऐ = आ+ इ, ई

ओ = अ+ उ, ऊ      ओ= आ+ उ, ऊ

**१.४.१.३ स्वरांचे स्वरूपावरून प्रकार**

**१. सजातीय स्वर :** एकाच उच्चारस्थानावरून समान प्रयत्नाने जे स्वर उत्पन्न होतात त्यांना सजातीय स्वर म्हणतात. ते स्वर पुढीलप्रमाणे : अ–आ, इ–ई, उ–ऊ, ऋ–ॠ, ऌ–ॡ.

**२. विजातीयस्वर :** भिन्न उच्चारस्थानावरून भिन्न प्रयत्नाने जे स्वर उत्पन्न होतात त्यांना विजातीय स्वर म्हणतात.ते स्वर पुढीलप्रमाणे : अ-इ, अ-उ, ई-ऊ, इ-ए इ.

**१.४.१.४ अनुस्वार व विसर्ग / स्वरादि**

( ं ) या चिन्हाला बिंदू म्हणावे व अनुस्वार आणि अनुनासिक असे उच्चार मानावेत हा विचार सर्वप्रथम रा. भि. गुंजीकर यांनी मांडला. त्यांच्या मते बिंदूच्या स्पष्ट उच्चाराला अनुस्वार (उदा. शंका, बिंदू, व्यंजन) तर अस्पष्ट उच्चाराला अनुनासिक म्हणावे. (उदा. कां, कोठें) परंतु मराठीत सध्या अनेक अनुनासिक्य उच्चारातील अनुस्वार लेखनातून आणि बोलण्यातूनही नाहीसा होताना दिसतो. उदा. नांव, कांहीं, मीं, तूं इ.

(:) या चिन्हाला विसर्ग म्हणतात, कारण त्याच्या उच्चारात आद्यस्थानी प्रथम 'अ' चा उच्चार होतो आणि नंतर अनुनासिकाचा किंवा विसर्गाचा उच्चार होतो. स्वरमालेतील शेवटचे दोन स्वर अं व अः या स्वरांना श्री. मो. के. दामले यानी 'स्वरादि' असे म्हटले आहे. वास्तविक पाहता स्वरादि उच्चारासाठी पूर्णपणे स्वरावरच अवलंबून असतात.

**१.४.२ स्वरांचे उच्चारस्थानानुसार वर्गीकरण**

ध्वनींचा उच्चार मुखातील (ध्वनियंत्रातील) ज्या भागाच्या (अवयवाच्या) साह्याने करतात त्या भागांना उच्चारस्थाने म्हणतात. स्वरांच्या उच्चारस्थानानुसार त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते :

**कंठ्य :** कंठस्थानापासून उच्चारले जाणारे स्वर - अ, आ, अः

**तालव्य :** तालुस्थानापासून उच्चारले जाणारे स्वर - इ, ई

**दंत्य :** दंतस्थानापासून उच्चारले जाणारे स्वर - लृ, लृ

**मूर्धन्य :** मूर्धास्थानापासून (तालुच्या मागचा खोलगट भाग) उच्चारले जाणारे स्वर - ऋ, ॠ

**ओष्ठय:** ओष्ठयस्थानापासून उच्चारले जाणारे स्वर - उ, ऊ


**कंठतालव्य :** कंठ व तालुस्थानापासून उच्चारले जाणारे स्वर - ए, ऐ

**कंठौष्ठ्य :** कंठ व ओष्ठ स्थानापासून उच्चारले जाणारे स्वर - ओ, औ

**अनुनासिक :** नासिकास्थानापासून उच्चारला जाणारा स्वर - अं.

अशा प्रकारे स्वरांचे विविध दृष्टिकोनातून वर्गीकरण करून त्यांचे प्रकार मानण्यात आले आहेत व परंपरेने हे वर्गीकरण व प्रकार रूढ झाले आहे.

**स्वरयंत्र किंवा वागिंद्रियाची आकृती**




## १.४.३ मराठीची स्वरसंख्या(पारंपरिक व नवीन)

मराठीने संस्कृतची वर्णमाला स्वीकारली असल्याने संस्कृतप्रमाणे अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः असे १६ स्वर परंपरेने मानल्याचे दिसतात. परंतु ध्वनीशास्त्रदृष्ट्या मराठी स्वरमालेचे विश्लेषण केले असता त्यामधील अनेक स्वर मानण्याची आवश्यकता नसल्याचे दिसते. त्यात ध्वनी मराठीचे व त्यांचे लेखन संस्कृतप्रमाणे हा दृष्टिकोन स्वीकारला असल्याने उच्चारले जाणारे ध्वनी आणि लेखनबद्ध झालेली वर्णमाला यांच्यात काही प्रमाणात विसंवाद निर्माण झालेला दिसून येतो. मराठीत किती व कोणते स्वर मानावेत याविषयी व्याकरणकारांनी पुनर्विचार करून पुढीलप्रमाणे मते मांडलेली दिसून येतात.

१. मो. के. दामले यांनी स्वरसंख्या १२ मानावी असे मत मांडले आहे. त्यांनी दीर्घ ॠ, दीर्घ ॡ , अं आणि अः हे चार स्वर गाळून उरलेले १२ स्वर मानावेत असे सुचवले आहे.

२. श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर, श्री. म. पां. सबनीस व श्री. ग. ह.केळकर यांनी पारंपरिक स्वरमालेतील अं व अः हे दोन स्वर गाळले आणि उरलेले १४ स्वर मानलेले आहेत.

३. प्रा. अरविंद मंगरूळकरांनी पारंपरिक स्वरमालेतील ७ व नवे २ असे एकूण ९ स्वर मानले आहेत व त्यांचा क्रमही नव्याने निश्चित केला आहे. तो पुढीलप्रमाणे अ, आ, इ, उ, ऋ, ए, अॅ, ओ, ऑ

४. डॉ. लीला गोविलकर यांनी दीर्घ ॠ, ऌ, ॡ, ऐ, औ, अं, अः हे स्वर गाळून उरलेले ९ आणि इंग्रजीतून आलेले २ स्वर मानून एकूण ११ स्वर मानले आहेत. ते पुढीलप्रमाणे : अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ए ,अॅ, ओ, ऑ

उपरोक्त व्याख्यांमध्ये वेगवेगळ्या भाषाभ्यासकांमध्ये स्वरसंख्येच्या बाबतीत मतभेद दिसून येतात. मराठी स्वरमालेतील ऋ, ॠ, ऌ, ॡ त्याच बरोबर ई, ऊ, ऐ, औ हे दीर्घ स्वर आणि अं व अः या स्वरादींच्या बाबतीत हे आक्षेप आहेत. हे आक्षेप असण्याचे मुख्य कारण मराठीवर असणारा संस्कृत वर्णमालेचा प्रभाव.

वास्तविक पाहता मराठी भाषेत दीर्घ ॠ, आणि ऌ हे वर्ण वापरात नाहीत. ऱ्हस्व ऋ हा स्वर ऋषी, ऋण, कृपा, हृदय, तृतीय अशा शब्दात आढळतो त्यामुळे परंपरेने हा स्वर मानला जातो. ऌ हा वर्ण फक्त क्लृप्ती या शब्दात आढळतो. परंतु या शब्दाचा उच्चार आणि लेखनही अलीकडे क्लुप्ती क् + ल्‌ + उ असे होत असल्याचे आढळते.

ई आणि ऊ या दीर्घ स्वरांच्या बाबतीत विचार केला असता सूत-सुत, दिन-दीन अशा शब्दातील अर्थभेद दाखवण्याचे महत्त्वाचे कार्य हे वर्ण करतात. शिवाय मराठी शुद्धलेखनाचे नियम पाहता इ आणि उ यांच्या ऱ्हस्व आणि दीर्घ लेखनावरच अधिक भर असल्याचे दिसते. या वर्णांच्या माध्यमातून उच्चारातील सूक्ष्मता आणि बारकावेही स्पष्ट होतात.

अं व अः या स्वरादींच्या बाबतीत विचार केला असता (ं) बिंदू, अनुस्वार किंवा अनुनासिक आणि विसर्ग (:) यांचा उच्चार करण्यासाठी त्यांना स्वराची मदत घ्यावी लागते. तसेच ङ्, ञ्, ण्, न्, म् ही वर्गीय अनुनासिक व्यंजने हे बिंदूचे पर्याय आहेत पण बिंदूला व्यंजनांचा पर्याय असला, तरी व्यंजनांना नेहमीच बिंदूचा पर्याय असतोच असे नाही. काही व्याकरणकारांनी स्वरादी हा वर्णमालेतील एक प्रकार मानला आहे. तर मो. के. दामले त्यांना स्वरेतर या प्रकारात मानतात.

### १.५ मराठीतील व्यंजनविचार

परंपरेने मराठी भाषेत ३६ व्यंजने मानण्यात येतात. ज्या वर्णांना स्वतःच्या उच्चारासाठी स्वरांची मदत घ्यावी लागते; अशा वर्णांना व्यंजने म्हणतात. व्यंजने अपूर्ण असल्याने व्यंजनांचे लेखन पाय मोडून केले जाते. व्यंजनाच्या बाबतीतही मराठीने संस्कृत वर्णमालेचे अनुकरण केल्याचे दिसते. या व्यंजनांना स्वरांत किंवा परवर्ण असेही संबोधतात. ही व्यंजने आणि त्यांची उच्चारस्थाने पुढीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| **कंठ्य** | - क्, ख्, ग्, घ्, ङ् | (क वर्ग) |
| **तालव्य** | - च्, छ्, ज्, झ्, ञ् | (च वर्ग) |
| **मूर्धन्य** | - ट्, ठ्, ड्, ढ्, ण् | (ट वर्ग) |
| **दंत्य** | - त्, थ्, द्, ध्, न् | (त वर्ग) |
| **ओष्ठय** | - प्, फ्, ब्, भ , म् | (प वर्ग) |
| **अंतस्थ** | - य् , र् , ल्, व्, | |
| **उष्म** | - स्, श्, ष्, ह् | |
| **संयुक्त व्यंजने** | - क्ष् , ज्ञ् | |
| **अवर्गीय** | - ळ् | (मूर्धन्य) |

व्यंजनांचे  ढोबळमानाने  वर्गीय व्यंजने, अनुनासिक व्यंजने, अवर्गीय व्यंजने आणि संयुक्त व्यंजने अशाप्रकारेही वर्गीकरण केले जाते. ते पुढीलप्रमाणे –

**वर्गीय व्यंजने :** परंपरागत व्यंजनातील  पहिल्या २५ व्यंजनांचे  पाच वर्ग पाडले असून त्यांनाच वर्गीय व्यंजने म्हणतात.

**अनुनासिक व्यंजने** : नाकातून उच्चारली जाणारी व्यंजने म्हणजे अनुनासिक व्यंजने होय. प्रत्येक वर्गातील शेवटचे व्यंजन अनुनासिक आहे. ङ्, ञ्, ण्, न्, म् ही पाच परंपरागत अनुनासिक व्यंजने आहेत.

**अवर्गीय व्यंजने** : य् , र् , ल् , व्, श्, ष् , स्, ह्, ळ्  या व्यंजनांचा समावेश कोणत्याही वर्गात होत नसल्याने ही अवर्गीय व्यंजने होत.

**संयुक्त व्यंजने** : क्ष् व ज्ञ् ही दोन व्यंजने संयुक्त व्यंजने आहेत.

२५ वर्गीय व्यंजने, ९ अवर्गीय व्यंजने व २ संयुक्त व्यंजने अशी एकूण ३६ व्यंजने पारंपरिक पद्धतीने मराठीत मानण्यात आली आहेत.

### १.५.१ व्यंजनांचे प्रकार

व्यंजनांचे वर्गीय व्यंजने, अनुनासिक व्यंजने, अवर्गीय व्यंजने आणि संयुक्त व्यंजने अशाप्रकारे वर्गीकरण केले जाते याशिवाय व्यंजनांचे स्पर्श व्यंजने, कठोर व मृदू व्यंजने, अल्पप्राण व महाप्राण, अनुनासिके, तालव्य व्यंजने, अंत:स्थ व्यंजने, उष्म व्यंजने, संयुक्त व्यंजने, मूर्धन्य असे त्यांच्या स्वरूपानुसार, उच्चारस्थानानुसार आणि उच्चारपद्धतीनुसारही वर्गीकरण केले जाते. ते पुढीलप्रमाणे

#### १.५.१.१  स्पर्श व्यंजने

ज्या व्यंजनांचा उच्चार करताना जीभ, कंठ, मूर्धा, तालू, दात किंवा ओठ यांच्याशी तिचा स्पर्श होतो व मुखावाटे बाहेर पडणारी आपल्या फुफ्फुसांतील हवा किंचित अडवून मग स्फोट केला जातो त्या ध्वनींना स्पर्श व्यंजने म्हणतात. सर्व व्यंजने स्पर्श व स्फोटक आहेत.

**स्पर्श–व्यंजनांचे वर्गीकरण**

श्वासावाटे आत घेतलेली हवा बाहेर सोडताना ती जिभेच्या सहाय्याने तोंडात कुठेतरी अडवली जाते व एकदम सोडली जाते. तोंडातील कंठ, तालू, मूर्धा, दंत, ओष्ठ या भागांशी स्पर्श करून त्यांचा उच्चार केला जातो; म्हणून व्यंजनांना स्पर्श ध्वनी म्हटले जाते आणि त्याचा एकदम उच्चार होत असल्याने त्यांना स्फोटक ध्वनी असेही म्हटले जाते.

केवळ स्पर्श करून ज्या व्यंजनांचा उच्चार केला जातो त्याना स्पर्श व्यंजने म्हणतात. कंठ, तालू, मूर्धा, दंत व ओष्ठ भागांशी स्पर्श करून त्यांचा उच्चार केला जातो. क, च, त, ट, प या गटातील व्यंजने स्पर्श व्यंजने म्हणून ओळखली जातात. ती २५ आहेत.

**१.५.१.२ कठोर व मृदू व्यंजने**

स्पर्श व्यंजनातील काही व्यंजनांच्या उच्चारात फक्त श्वासाचा उपयोग होतो म्हणून त्यांना श्वास किंवा अघोष वर्ण असे म्हणतात. या श्वास वर्णांनाच कठोर व्यंजने असेही म्हणतात. **श्वास, अघोष किंवा कठोर व्यंजने १३ आहेत.**

क, ख, च, छ, ट, ठ

त, थ, प, फ, स, श, ष

तर स्पर्श व्यंजनातील काही व्यंजनांच्या उच्चारात श्वासाऐवजी नाद असतो. त्यांना नाद किंवा घोष वर्ण असे म्हणतात. यांनाच मृदू व्यंजने असेही म्हणतात. **नाद, घोष किंवा मृदू व्यंजने १४ आहेत.**

ग, घ, ज, झ, ड, ढ, द, ध

ब, भ, य, र, ल, व

**१.५.१.३ अल्पप्राण व महाप्राण**

ज्या व्यंजनांच्या उच्चारात 'ह'कार ध्वनी विशेषत्वाने असतो त्यास महाप्राण असे म्हणतात. महाप्राण वर्ण १४ आहेत ती पुढीलप्रमाणे –

**महाप्राण** – स, घ, छ, झ, ठ, थ, ध, फ, भ, स, श, ष, ह.

ज्या व्यंजनांच्या उच्चारात 'ह'कार ध्वनी नसतो त्या व्यंजनास 'अल्पप्राण' असे म्हणतात. अल्पप्राण वर्ण २० आहेत ती पुढीलप्रमाणे –

**अल्पप्राण** – क, ग, ङ, च, ज, ञ, ट, ड, ण, त, द, न, प, ब, म, य, र, ल, व, ळ.

**१.५.१.४ अनुनासिके –**

ज्या व्यंजनांचा उच्चार नाकातून होतो त्या व्यंजनांना अनुनासिके म्हणतात. मराठी व्यंजनामध्ये ५ अनुनासिक वर्ण आहेत. स्पर्श व्यंजन गटातील शेवटचे वर्ण अनुनासिके आहेत. ती पुढीलप्रमाणे –

ङ, ञ, ण, न म

या व्यंजनांतील ङ आणि ञ या दोन अनुनासिकांचा वापर फारसा व स्वतंत्ररीत्या मराठीत होत नाही त्यामुळे ही दोन अनुनासिके मानण्याची आवश्यकता नाही. 'ङ' आणि 'ञ' हे दोन्ही वर्ण शब्दाच्या आरंभी किंवा शेवटी येत नाहीत. 'ङ' वाङमय आणि वाङनिश्चय अशा शब्दात स्वतंत्रपणे येतो. इतरवेळी अनुस्वाराऐवजी तो येतो. उदा. गंगा–गङगा. तर 'ञ' हा वर्ण स्वतंत्रपणे वापरला जात नाही. अनुस्वाराऐवजी काही शब्दात वापरला जातो. उदा. चंची–चञ्ची, चंचल–चञ्चल, पंचा–पञ्चा म्हणजे 'ङ' आणि 'ञ' ही अनुनासिक व्यंजने स्वतंत्रपणे येत नसल्याने व मराठीत त्यांचा फारसा वापरही होत नसल्याने ते मानण्याची गरज नाही.

ण, न, म ही अनुनासिके मात्र स्वतंत्रपणे आणि अनुस्वार म्हणूनही येतात त्यामुळे ती अनुनासिक व्यंजने मानावीच लागतात. उदा.- संमेलन, नमन, बाण, महान, वन्दन, दण्ड, बिम्ब. अनुनासिक व्यंजनातील 'ण' हे व्यंजन शब्दाच्या आरंभी कधीही येत नाही. न आणि म ही व्यंजने मात्र शब्दाच्या आरंभी, मध्यभागी व शेवटी कुठेही येतात. त्याशिवाय अनुस्वार म्हणूनही त्यांचा उपयोग केला जातो. म्हणून या पाच अनुनासिक वर्णांमधील 'ङ' आणि 'ञ' ही अनुनासिक व्यंजने गाळून ण, न, म ही तीन अनुनासिके मानण्यास हरकत नाही.

### १.५.१.५ तालव्य व्यंजने

दातांच्या मागील बाजूच्या भागापासून कंठापर्यंत जिभेच्या वरच्या बाजूस जो घुमटाकार भाग आहे त्याला तालू म्हणतात. जिभेचे पाते तालूला लावून ज्या वर्णांचे उच्चार होतात त्यांना तालव्य म्हणतात. मराठी वर्णमालेतील 'च' वर्ग यात मोडतो.

मराठी व्यंजनमालेतील 'च' वर्गातील व्यंजनांचे उच्चार दोन प्रकारचे आहेत. त्यांची उच्चारस्थाने दोन आहेत, त्यामुळे ही व्यंजने काही वेळा तालव्य असतात तर काही वेळा दंततालव्य. यातील तालव्य उच्चार हे संस्कृत-प्राकृतद्वारा मराठीत आले आहेत. उदाहरणार्थ- चंद्र, जन, छत्र, छाया म्हणजे यांचे उच्चार च्य, छ्य, ज्य, झ्य असे आहेत. परंतु या संस्कृत उच्चारांबरोबर मराठीत दंततालव्य उच्चारही आढळतात. हे उच्चार खास मराठीचे आहेत. त्यामुळे तद्भव व देशी शब्दात ते अधिक आढळतात. उदाहरणार्थ- चमचा, जाण, चिमणी, चाक, झाड म्हणजे 'च' गटातील व्यंजनध्वनी दोन प्रकारे उच्चारले जात असताना त्यांचा लेखाकार म्हणजे वर्ण मात्र एकाच प्रकारचा आहे. म्हणून प्रा. मंगरूळकरानी म्हटले आहे, ''मराठीच्या रूढ लेखनात दंतमूलीयांचा तालव्याहून भेद दाखविण्यास काही साधन नाही. परंतु दंतमूलीय व्यंजनाखाली (हिंदीप्रमाणे) टिंब देऊन हा भेद दाखविणे शक्य आणि संयुक्तिक आहे.'' जसे चमचा, जहाज. असाच विचार पूर्वी दादोबा पांडुरंग यांनीही मांडला होता. 'च' गटातील व्यंजनांचे दोन गट मानण्यापेक्षा उच्चारातील भेद दाखविण्यासाठी दंततालव्य व्यंजनाखाली टिंब देऊन तालव्याहून त्यांचे पृथक्त्व दाखविणे योग्य होईल. जसे -

च, छ, ज, झ, ञ (तालव्य) च, छ, ज़, झ, ञ (दंततालव्य) (संदर्भ : प्रा. डॉ. राजशेखर हिरेमठ, मराठी व्याकरण परिचय, पृष्ठ क्रमांक १४ )

### १.५.१.६ अंतस्थ व्यंजने / अर्धस्वर

मराठी वर्णमालेतील य, र, ल, व. या वर्णांना अंतस्थ वर्ण मानले जाते. या व्यंजनांचा उच्चार होताना वागिंद्रियाचे द्वार थोडेसे उघडे असते आणि ही व्यंजने स्पर्श व्यंजने व उष्म व्यंजने यांच्यामध्ये येत असल्याने त्यांना अंतस्थ असे म्हटले जाते. मो. के. दामले यांनी याच व्यंजनांना ईषत् विवृत्त असे संबोधले आहे. प्रा. र. बा. मंचरकर यांच्या मते 'य' आणि 'व' यांचा उच्चार करताना काही प्रमाणात स्वरप्रक्रिया व काही प्रमाणात व्यंजनप्रक्रियाही होते. नादयुक्त श्वास बाहेर जाताना अडथळा होतो म्हणून ते व्यंजन आहे; पण अडथळा संपूर्ण नसून नादयुक्त श्वास जाण्यास वाट आहे म्हणून ते स्वरही आहे. म्हणून 'य' हा अर्धस्वर आहे,

'व' हा ओष्ठ्य असून तोही अर्धस्वर आहे. म्हणजे 'य' आणि 'व' या व्यंजनांच्या ठायी स्वरांचा प्रवाहीपणा व व्यंजनांचा स्फोटकपणा हे दोन्ही गुण आहेत त्यामुळे त्यांना अर्धस्वर मानले जाते.

'र' आणि 'ल' या व्यंजनांच्या उच्चारात नादयुक्त श्वास हा प्रवाही स्वरूपाचा असल्याने डॉ. कालेकरांनी त्यांना द्रववर्ण संबोधले आहे. अ, इ, उ, ऋ, ऌ या स्वरांच्या उच्चारस्थानापासूनच य, र, व, ल यांचा उच्चार होत असल्याने त्यांच्यात स्वर आणि व्यंजने या दोन्हींचे गुणधर्म आहेत; त्यामुळे हे वर्ण शुद्ध व्यंजने नाहीत तसेच त्यांच्यात स्वरांचा नाद आहे. म्हणून त्यांना अंतस्थ किवा अर्धस्वर असे म्हटले जाते.

**१.५.१.७ उष्म व्यंजने**

उष्म व्यंजनांच्या उच्चारात वागिंद्रियाचे द्वार जरासे लागलेले (स्पृष्ट) असते आणि उच्चारात एक प्रकारचे घर्षण असल्याने उष्ण व प्रखर ध्वनी निर्माण होतो. स, श, ष, ह ही उष्म व्यंजने आहेत. या व्यंजनांना मो. के. दामले 'ईषत् स्पृष्ट' असे संबोधतात तर कालेकरानी सीत्कार असे संबोधले आहे. 'घर्षक व्यंजने' असाही एक शब्दप्रयोग आढळतो. हे वर्ण शब्दाच्या आरंभी, मध्यभागी वा शेवटी कुठेही येतात. उष्म व्यंजनांतील 'श' हा तालव्य, 'स' हा दंत्य आणि 'ष' हा मूर्धन्य ध्वनी आहे. क्वचितप्रसंगी 'श' ऐवजी स, ष ऐवजी स, श असाही उच्चार केला जातो. उदाहरणार्थ - केश-केस.

उष्म व्यंजनातील 'ह' हा कंठ्य ध्वनी महत्वपूर्ण आहे. प्रा. मंगरूळकर त्याची शास्त्रीय चिकित्सा करताना म्हणतात, '' 'ह' वर्ण दोन प्रकारचा आहे : अघोष (=नादहीन) आणि सघोष (=नादयुक्त ). 'दुःख' या शब्दांत ऐकू येणारा ख-पूर्वीचा विसर्ग म्हणजे अघोष 'ह' आहे. तसेच, 'क:पदार्थ' यातलाहि प-पूर्वीचा विसर्ग अघोष 'ह्' आहे. हाच अघोष 'ह' आपल्याला ख, छ, ठ, थ, फ या वर्णांमध्ये दिसतो. मात्र घ, झ, ढ, भ या वर्णांतील 'ह' वर्ण सघोष आहे. अघोष आणि सघोष असा दोन प्रकारचा 'ह' वर्ण मराठी भाषेत अस्तित्वात आहे आणि विपूल प्रयोगातही आहे. अघोष हा श्वासात्मक 'ह' आहे. सघोष 'ह' हा कंठ्य आहे. म्हणजेच एक कठोर व एक मृदू असे 'ह' ध्वनीचे दोन प्रकारचे उच्चार प्रचलित आहेत. त्यांतील भेद दाखविण्यासाठी प्रा. मंगरूळकरांनी सघोष 'ह' वर्णाखाली (पोकळ) शून्य देऊन 'ह' असा व्यक्त करता येईल असे म्हटले आहे.

**१.५.१.८ संयुक्त व्यंजने**

मराठी वर्णमालेतील क्ष आणि ज्ञ ही व्यंजने संयुक्त व्यंजने मानली जातात, कारण त्यांच्या उच्चारात दोन भिन्न वर्ण असल्याचे स्पष्ट जाणवते.

क्ष = क् + ष् उदा - शिक्षा, परिक्षा

ज्ञ = ज् + ञ किंवा द् +न् +य्

या भिन्न वर्णांच्या मिश्रणातून ही व्यंजने निर्माण झाली आहेत. यातील 'क्ष' मधील क + ष ध्वनींबद्दल अभ्यासकांत मतभेद नाहीत पण 'ज्ञ' मध्ये कोणते ध्वनी आहेत याबद्दल मात्र मतभेद आहेत. मराठीत ज्ञ = द् + न् + य म्हणजे मूळ 'ज्', 'ञ्' हरवले आणि द्, न्हे ध्वनी पाहुणे आल्याचे दिसतात. तमिळ व हिंदीमध्ये

त्यांचा उच्चार 'ग्य' होतो. उदा. ग्यान, ग्यानेश्वर. असा उच्चार प्रमाण मराठीत आढळत नसला तरी ग्रामीण मराठीत काही प्रमाणात आढळतो. ग्यानबा शब्द त्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. मात्र क्ष आणि ज्ञ ही संयुक्त व्यंजने असल्याने ती वर्णमालेतून वगळावीत असे बहुतेक व्याकरणकारांचे मत आहे. (सदर मुद्याच्या अधिक माहितीसाठी अरविंद मंगरूळकर यांचा मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार हा ग्रंथ पहावा पृ. ७७-८०)

### १.५.१.९ मूर्धन्य 'ळ'

मराठी व्यंजनमालेत 'ळ' या वर्णाचे वर्गीकरण अवर्गीय गटात करण्यात येते; कारण संस्कृतमधून घेतलेल्या वर्णमालेत 'ळ'ला स्थान नाही. 'ळ' हा वर्ण मराठीत द्रवीड भाषेतून (तेलगू किंवा कन्नड) आला आहे. संस्कृत शब्दातील 'ल'च्या ऐवजी मराठीने काही ठिकाणी 'ळ' वापरून नवीन शब्द निर्माण केले. उदा. शाला- शाळा, बाल-बाळ, काल-काळ. म्हणजे मराठीत 'ळ' संस्कृत 'ल'च्या ठिकाणी वापरला जातो. म्हणून काही व्याकरणकारांच्या मते 'ळ' हा स्वतंत्र ध्वनी मराठीत मानण्याचे कारण नाही. परंतु मराठीत 'ळ' हा स्वतंत्र ध्वनी आहे. संस्कृतमधील प्रत्येक 'ल'च्या ठिकाणी 'ळ' वापरता येतोच असे नाही. त्यामुळे भिन्न अर्थ निर्माण होतात. उदा. चाल-चाळ, गाल-गाळ, कल-कळ. या शब्दांत 'ल' आणि 'ळ' हे वर्ण स्वतंत्र आहेत. एकमेकांचे विकल्प म्हणून आले नाहीत. म्हणून 'ळ' हा स्वतंत्र ध्वनी मानणे गरजेचे आहे. द्रविडी भाषेतून आलेल्या या ध्वनीला मराठीने आत्मसात करून अनेक शब्दांची स्वतंत्र निर्मिती केली आहे; म्हणून मराठीत 'ळ' हा स्वतंत्र वर्ण मानणे योग्य आहे. त्याचा उच्चार मूर्धास्थानापासून होत असल्याने तो मूर्धन्य वर्ण मानला जातो.

| | उच्चारस्थाने | श्वास, अघोष किंवा कठोर | नाद, घोष किंवा मृदू | अनुनासिके | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| **वर्गीय व्यंजने** | **कंठ्य** | क् , ख् | ग् , घ् | ङ् | (क वर्ग) |
| | **तालव्य** | च् , छ् | ज् , झ् | ञ | (च वर्ग) |
| | **मूर्धन्य** | ट् , ठ् | ड् , ढ् | ण् | (ट वर्ग) |
| | **दंत्य** | त्, थ् | द् , ध् | न | (त वर्ग) |
| | **ओष्ठय** | प्, फ् | ब् , भ | म | (प वर्ग) |
| **अवर्गीय व्यंजने** | **अंतस्थ/अर्धस्वर** | य् , र् | ल्, व् | | |
| | **उष्म** | स्, श्,ष् | **महाप्राण** - ह् | | |
| **संयुक्त** | **संयुक्त व्यंजने** | क्ष् , ज्ञ् | | | |
| **अवर्गीय** | **अवर्गीय,मूर्धन्य** | ळ् | | | |

## १.५.२ मराठीची व्यंजनसंख्या (पारंपरिक व नवीन)

मराठीत परंपरेने एकूण ३६ व्यंजने मानण्यात आली आहेत. त्यासाठी संस्कृतच्या परंपरेचा आधार घेतला गेला आहे. परंतु मराठी भाषेने संस्कृत भाषेतील ध्वनी मानण्याऐवजी मराठी भाषेत वापरले जाणारे ध्वनी मानावेत, म्हणून संस्कृतमधून मराठीत आलेल्या व मराठीत वापरात नसलेल्या काही व्यंजनांना गाळणे योग्य आहे.

त्या दृष्टीने ङ, ञ, क्ष आणि ज्ञ ही चार व्यंजने गाळणे मराठीतील अनेक व्याकरणकारांना योग्य वाटते. त्याची कारणमीमांसा आपण वर केलेली आहेच. म्हणजे मराठीत उरलेली ३२ व्यंजने मानण्यास काही हरकत नाही.

मो. के. दामले आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर दोघांनी 'क्ष' आणि 'ज्ञ' ही दोन संयुक्त व्यंजने गाळून व्यंजनसंख्या ३४ मानली आहे. तर म. पां. सबनीस यांनी परंपरेने मराठीत रूढ झालेली ३६ व्यंजने मान्य केली आहेत.

प्रा. अरविंद मंगरूळकरानी 'ङ', 'ञ' ही २ अनुनासिके, १० महाप्राण व्यंजने आणि 'क्ष', 'ज्ञ' ही संयुक्त व्यंजने अशी १४ व्यंजने गाळून उरलेली २२ व्यंजने मानली आहेत. परंतु मंगरूळकरांच्या १० महाप्राण व्यंजने वगळण्याच्या विचाराला बहुतेक व्याकरणकारांनी मान्यता दिलेली नाही.

## १.६ मराठीतील वर्णसंख्या निश्चितीकरण

मराठीत परंपरेने १६ स्वर व ३६ व्यंजने असे एकूण ५२ वर्ण मानण्यात आले आहेत. परंतु ध्वनिशास्त्रदृष्ट्या वर्णमालेची चिकित्सा केली असता असे दिसून येते की यातील बरेचसे स्वर आणि व्यंजने मराठी भाषेत मानण्याची आवश्यकता नाही. त्यासंबंधीची कारणमीमांसा वर केली आहे. ती पाहता मराठीत ९ स्वर (पारंपरिक वर्णमालेतील ७ आणि इंग्रजीतून आलेले ॲ, ऑ हे २ ) आणि ३२ व्यंजने असे एकूण ४१ वर्ण मानण्यास हरकत नाही.

**स्वरसंख्या = ९**

अ, आ, इ, उ, ऋ, ए, ओ, ॲ, ऑ

**व्यंजनसंख्या = ३२**

| | |
|---|---|
| स्पर्श व्यंजने | क् , ख् , ग् , घ् |
| | च् , छ् , ज् , झ् |
| | ट् , ठ् , ड् , ढ् , ण् |
| | त्, थ् , द् , ध् , न् |
| | प्, फ् , ब् , भ , म् |

अंतस्थव्यंजने य् , र् , ल् , व्,

उष्म व्यंजने स्, श्, ष् , ह्

अवर्गीय ळ् ( मूर्धन्य )

अशी एकूण ४१ वर्णांची वर्णमाला मानण्यास हरकत नाही.

## १.७ समारोप

वर्णविचार हा कोणत्याही भाषेच्या व्याकरणाचा पाया असतो. मराठी भाषेच्या वर्णमालेचा विचार करत असताना मराठीने संस्कृत भाषेची वर्णमाला स्वीकारली आहे. कोणत्याही भाषेतील वर्ण हे ध्वनीचे मूर्त किंवा लिखित रूप असतात. वर्ण स्थिर तर ध्वनी (म्हणजे त्यांचे उच्चार) बदलत राहतात. त्यामुळे ध्वनी व वर्ण यांच्यामध्ये सुसंवादित्व रहात नाही. त्यामुळे कालांतराने अभ्यासकांकडून वर्णमालेचा पुनर्विचार होताना दिसतो. त्याचा अभ्यास सदर प्रकरणात आपण केला. ध्वनी आणि वर्ण या कल्पना स्पष्ट करून घेतल्या. स्वर व व्यंजने ही विभागणी लक्षात घेतली. स्वर व व्यंजनांच्या उत्पत्तीनुसार व उच्चारस्थानानुसार प्रकारांचा विचार केला. काळाच्या ओघात भाषेतील काही वर्ण उच्चारातून जातात व काही नवे वर्ण स्वीकारले जातात. यादृष्टीने वर्णमालेतील कालबाह्य झालेल्या व नव्याने स्वीकारलेल्या स्वरांचा व व्यंजनांचा विचार केला. वर्णांचे ध्वनिशास्त्रदृष्ट्या विश्लेषण करून मराठी भाषेत कोणते वर्ण मानावे यासंबंधी विवेचन केले आहे.

## १.८ पारिभाषिक शब्द

- वर्णमाला – लिपीमधील अक्षरे.
- स्वर – अंतर्मुखाच्या पोकळीला विविध आकार देऊन आणि जिभेचे स्थान बदलून निर्माण होणारा, वायूप्रवाह खंडित न करणारा ध्वनी.
- व्यंजने – उच्छ्वासावाटे बाहेर पडणाऱ्या वायूप्रवाहाला विविध प्रकारे अडथळे आणून निर्माण होणारे ध्वनी.
- अघोषध्वनी – वायूप्रवाह बाहेर पडताना कंठामध्ये असलेल्या स्वरयंत्रातील वळी विलग राहून होणारा ध्वनी. किंवा स्वरयंत्रातील वळी सैल असता नैसर्गिक कंपने होऊन निर्माण होणारा ध्वनी.
- सघोष ध्वनी – स्वरयंत्रातील वळी जवळ येऊन वायूप्रवाहाच्या रेट्याने कंप पावतात त्यामुळे निर्माण होणारा ध्वनी किंवा स्वरयंत्रातील वळी ताणल्या जाऊन स्पष्टपणे ज्यादा कंपने होणारा ध्वनी.
- स्पर्श ध्वनी – वायूप्रवाहास जीभ किंवा ओठ यांनी प्रथम अटकाव करून मग एकदम त्यास जाऊ दिल्याने निर्माण होणारा ध्वनी.
- नासिक्य ध्वनी – वायूप्रवाहास मुख्य मार्ग बंद होऊन तो नाकावाटे बाहेर पडतो, त्यावेळी निर्माण होणारा ध्वनी.

- घर्षक ध्वनी – अटकाव केलेला वायूप्रवाह फटीतून घर्षण करीत बाहेर पडताना निर्माण होणारा ध्वनी.
- दंतमूल – दातामागचा भाग.
- कठीण तालू – तोंडातील दातामागच्या भागानंतर येणारा छपरा सारखा कडक भाग .
- मृदुतालू – तोंडातील कडक भागाच्या मागील येणारा मऊ भाग.
- ओष्ठ्य – दोन ओठांचा वापर करून निर्माण होणारा ध्वनी.
- दन्त्य – दात व जीभ यांच्या संयोगाने निर्माण होणारा ध्वनी याला जीव्हादन्त्य असेही म्हणता येईल.
- तालव्य – तालु व जीभ यांच्या संयोगाने निर्माण होणारा ध्वनी.
- अर्धस्वर – वायुप्रवाहाला अडथळा न आणता पण दोन अवयव स्वरसदृश्य जवळ आणून निर्माण होणारा ध्वनी.

**स्वाध्याय**

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. स्वरांचे ध्वनिशास्त्रदृष्ट्या विश्लेषण करून प्रकार सांगा.

२. व्यंजनांचे प्रकार सांगून त्यांचे उच्चारस्थानानुसार वर्गीकरण करा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. स्वरांचे उच्चार स्थानानुसार वर्गीकरण करा.

२. स्वरांचे प्रकार सांगून आजच्या मराठीतील स्वर संख्या स्पष्ट करा.

३. स्वरांचे ध्वनिशास्त्रदृष्ट्या विश्लेषण करा.

४. व्यंजनांचे प्रकार कोणते ?

**टिपा लिहा.**

१. स्वरसंख्या.

२. स्वरांचे व्युत्पत्तीनुसार प्रकार.

३. व्यंजनसंख्या.

४. तालव्य व्यंजने.

## १.१० संदर्भ ग्रंथ


१. श्री. न. गजेंद्रगडकर : २००५, भाषा व भाषाशास्त्र, व्हीनस प्रकाशन, पुणे

२. प्रा. डॉ. राजशेखर हिरेमठ : १९८८, मराठी व्याकरण परिचय, मेहेता पब्लिशिंग हाऊस, पुणे

३. अरविंद मंगरूळकर, : १९६४, मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार, पुणे विद्यापीठ, पुणे.


## १.११ पूरक वाचन


१. (डॉ.) लीला गोविलकर, : १९८८, मराठीचे व्याकरण, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

२. मो. के. दामले : शास्त्रीय मराठी व्याकरण, दामोदर सावळाराम आणि मंडळी, पुणे

३. मो. रा. वाळिंबे : २०१५, सुगम मराठी व्याकरण व लेखन, नितीन प्रकाशन, पुणे.


**उपक्रम**

१. आजच्या मराठीतील वर्णव्यवस्थेचा तक्ता तयार करावा.

२. इतर भाषेतील वर्णव्यवस्थेचे स्वरूप कसे आहे ? याबद्दल माहिती मिळवा. उदा. हिंदी.

## घटक – २
# मराठीचे ध्वनिपरिवर्तन

### २.१ उद्दिष्टे

- ध्वनी ही संकल्पना समजून घेता येईल.
- भाषा परिवर्तन म्हणजे काय ? याचे आकलन होईल.
- ध्वनिपरिवर्तनाचे स्वरूप समजून येईल.
- ध्वनिपरिवर्तनाच्या कारणांचे आकलन होईल.
- ध्वनिपरिवर्तनाचे प्रकार समजून येतील.

### २.२ प्रास्ताविक

आपण पाहिले आहे की भाषेचे स्वरूप दुहेरी असते. भाषेची संरचना द्विस्तरीय असणे हे मानवी भाषेचे प्रमुख लक्षण आहे. दोन स्तरामधील पहिला स्तर हा मूलध्वनींचा असतो तर दुसरा स्तर त्यापासून निघणाऱ्या अर्थाचा असतो. म्हणजेच भाषेत ध्वनी आणि अर्थ महत्त्वाचा असतो. ध्वनींची रचना आणि त्यापासून अर्थ समजणे म्हणजे भाषा कळणे. या भाषेत सतत परिवर्तन होत असते. साहजिकच हे परिवर्तन दोन स्वरूपाचे असते. एक म्हणजे ध्वनींचे परिवर्तन आणि दुसरे म्हणजे अर्थपरिवर्तन. यापैकी ध्वनिपरिवर्तनाचा आपण अभ्यास करणार आहोत.

### २.३ विषय विवेचन

भाषेचा आपण वापर करतो म्हणजे केवळ लिखित भाषा एवढेच नव्हे तर भाषेचा व्यवहारात सतत वापर महत्त्वाचा असतो, त्यालाच भाषेचा जिवंतपणा म्हणत असतात. भाषा व्यवहारात वापरत असताना अनेक कारणांमुळे त्यात बदल होत जातो म्हणजे भाषेचा उच्चार बदलतो. उदाहरणार्थ संस्कृत भाषेतील दीपक या शब्दापासून दिवा असा मराठीमध्ये उच्चार होऊ लागला किंवा एके काळी 'म्हणितले' असा असणारा शब्द आज 'म्हटले' असा उच्चारला जातो. याचा अर्थ भाषेत बदल होत असताना त्याचा उच्चार बदलतो याच प्रक्रियेला भाषेची उच्चारप्रक्रिया असे म्हणतात. जुने उच्चार टाकून नवे उच्चार स्वीकारणे हा मनुष्याचा नैसर्गिक मनोधर्म आहे. इतर प्रकारच्या चालीरीतीप्रमाणे उच्चारांच्या चालीरीतीतही फरक पडत जातो. उच्चार बदलतो म्हणजेच भाषेतील ध्वनी बदलतो म्हणून यास ध्वनिपरिवर्तन असे म्हणतात.

## २.४ ध्वनिपरिवर्तन म्हणजे काय ?

परिवर्तन हा जगाचा नियम आहे. सर्व घटकांमध्ये परिवर्तन होत असते. कोणतीही गोष्ट जशी निर्माण झाली तशीच कधी राहत नाही. साहजिकच भाषा ही सुद्धा परिवर्तनशील असते. तिच्यात सतत परिवर्तन होत असते. भाषा ही जिवंत संस्था असल्यामुळे तिच्यात बदल होत असतो. भाषा जर बदलली नाही, प्रवाही राहिली नाही तर ती मृतवत होते.

मराठी भाषासुद्धा आपणास वारंवार बदललेली दिसते. तिच्या सुरुवातीच्या रूपापेक्षा नंतर मध्ययुगात ती वेगळ्या प्रकारची दिसते. लीळाचरित्रात भाषा, ज्ञानेश्वरीतील भाषा, तुकारामांच्या अभंगातील भाषा, शिवकालीन भाषा, इंग्रज काळातील भाषा आणि आजची भाषा यामध्ये भेद दिसतात ते या परिवर्तनामुळेच. हे परिवर्तन ध्वनी आणि अर्थ अशा दोन्ही पातळ्यांवरही होत असते. एकु दिनी या ऐवजी एके दिवशी असे आज आपण म्हणतो. शिवकाळात तयांनी, जाहाले, असे शब्द होते. त्याऐवजी आज त्यांनी, झाले, मला असे शब्द आपण वापरतो हे भाषेतील ध्वनींचे परिवर्तन आहे. ध्वनिपरिवर्तनाला भाषाविज्ञानाच्या संकल्पनेत स्वनपरिवर्तन असेही म्हटले जाते. हे परिवर्तन होते म्हणजे शब्दाचे उच्चार बदलले जातात. त्यामुळे त्याला उच्चारपरिवर्तन या नावानेही ओळखले जाते. एके काळी संस्कृतमध्ये पर्ण, कर्ण, हस्त, दीपक, सप्त या शब्दांचे आज जे रूपांतर झाले त्याला खूप काळ गेला आहे. पर्ण या मूळ संस्कृत शब्दाचे पुढे प्राकृतमध्ये पण्ण आणि नंतर मराठीमध्ये पान असे रूपांतर झाले.

पर्ण – पण्ण – पान हस्त – हत्त– हात

दीपक – दीवअ – दिवा सप्त – सत्त – सात

अशा प्रकारे शब्दातील वर्ण बदलतो. साहजिकच उच्चारही बदलतो.

भाषेतील ध्वनी सतत बदलत असतात. **ना. गो. कालेलकर** यांच्या मते, ''एका विशिष्ट काळी, एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या एका विशिष्ट समाजाच्या भाषेतील ध्वनी कालांतराने बदलतात, यालाच ध्वनिपरिवर्तन असे म्हणतात.'' ध्वनिपरिवर्तन निरपवाद, अमर्याद, अज्ञेय असते. त्यामुळे कोणता वर्ण, कधी, कसा बदलला हे सांगता येत नाही. पूर्वी असा एक समज होतो की ध्वनिपरिवर्तन हे कसेही, नैसर्गिकरित्या होत जाते, त्याला काही नियम नसतात, पण एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात **क्रिस्टयान रास्क** या भाषाशास्त्रज्ञाने ध्वनिपरिवर्तन हे विशिष्ट नियमांनुसार होते हे स्पष्ट केले. तर **याकोप ग्रीम** याने ध्वनिपरिवर्तनाचे नियम मांडण्याची पद्धत सुरू केली.

## २.५ ध्वनिपरिवर्तनाचे विशेष

**१. ध्वनिपरिवर्तन निरपवाद असते** : हा ध्वनिपरिवर्तनाचा पहिला टप्पा आहे. म्हणजे परिवर्तनासाठी कोणताही ध्वनी अपवाद असत नाही. कोणत्याही ध्वनीचे परिवर्तन होऊ शकते. उदा. दीपक – दिवा

**२. ध्वनिपरिवर्तन नियमित असते :** ध्वनिपरिवर्तन हे विशिष्ट पद्धतीने होत जाते. जुना वर्ण आणि नवीन वर्ण यामध्ये काही सुसंवादित्व असते. संपूर्ण वर्णमाला विशिष्ट पद्धतीने उत्क्रांत पावत असते.

**३. ध्वनिपरिवर्तन अज्ञेय असते :** आजचा ध्वनी कुठून आला एवढेच सांगता येते. भविष्यकाळात तो कसा असेल याबाबत कोणताही अंदाज बांधता येत नाही. या अर्थाने ते अज्ञेय असते. उदा. दीपक-दिवा म्हणजे प्रत्येक वेळी प चा व होईल असे सांगता येत नाही.

**४. ध्वनिपरिवर्तन नकळत घडून येते :** हे मंद व सूक्ष्म स्वरूपात घडत असते. बदल एकदम लक्षात येत नाहीत. कधी सुरू झाले याबद्दल नेमका काळ सांगता येत नाही. संस्कृत कर्म चे मराठीमध्ये काम असे रूपांतर घडलेले नाही. ते सावकाश, नकळत घडून आलेले आहे.

**५. ध्वनिपरिवर्तन आकलनक्षमतेच्या मर्यादित होते :** परिवर्तन सूक्ष्म, मंदगतीने होत असल्याने त्याचा व्यवहाराला अडथळा होत नाही. पूर्वीचा वर्ण आणि नंतरचा वर्ण यात काही ना काही कार्यकारण संबंध असतो. त्यामुळे ध्वनिरूप बदलले तरी आशय व्यक्त करण्यावर त्याचा जास्त परिणाम होत नाही. एकूण व्यवहार अशक्य व्हावा इतका प्रभाव नसतो. ते आकलनक्षमतेच्या मर्यादेत होत असते. उदा. नुसकान - नुकसान

**६. ध्वनिपरिवर्तन अव्यतिक्रमणीय असते :** म्हणजे एकदा परिवर्तन झाले की ते पुन्हा पूर्वपदावर आणता येत नाही. पुन्हा त्याचे मागे क्रमण करता येत नाही, ते पुढेच जात राहते यालाच अतिक्रमणीय असे म्हटले जाते. उदा. हस्त पासून हात असे रूपांतर झाले आहे आता आज हस्त असे कठीण व्यवस्थेकडे ते पुन्हा जाणार नाही.

## २.६ ध्वनिपरिवर्तनाची कारणे

**१. जित-जेते संबंध / उच्चस्तर सिद्धांत :** पराजितांना विजेत्यांची आणि विजेत्यांना पराजितांची म्हणजे जितांना जेत्यांची आणि जेत्यांना जितांची भाषा शिकावी लागते. यावेळी शक्यतो जेत्यांचाच जित्यांच्यावर प्रभाव पडतो यातून परिवर्तन घडते, याला उच्चतर सिद्धांत असेही म्हटले जाते.

उदा. मुंबई-बॉम्बे, पुणे-पुना, वेरुळ-एलोरा, पणजी-पंजिम

**२. भिन्न भाषिक संबंध / अधिस्तर सिद्धांत :** भिन्न भिन्न भाषिकांचा, शेजारभाषेचा संपर्क आला की परस्परांचे उच्चार बदलतात. आपल्याकडे हिंदी, उर्दू, कन्नड, पोर्तुगिज भाषांचा संपर्क आला. त्यामुळे अनेक शब्दांमध्ये परिवर्तन होऊन मराठीमध्ये आज कितीतरी शब्द रूढ झाले आहेत.

उदा. आण्णा, आप्पा, पायजमा, दुकान, किताब, तक्या

तंबाखू, शेत, साबण असे कितीतरी शब्द ध्वनिपरिवर्तन होऊन मराठीत आले.

**३. आळस** : आळस हा माणसाचा एक दुर्गुण आहे. कमी कामात, कमी त्रासात त्याला खूप काही साधायचे असते. कमीत कमी कष्ट घेऊन बोलण्याच्या प्रवृत्तीतून असे परिवर्तन घडते. पूर्ण उच्चार करण्याऐवजी लघुरूप बनविण्याची प्रक्रिया यातूनच आली. उदा. पोस्टकार्ड-कार्ड, न्यूजपेपर-पेपर, टेलिफोन-फोन किंवा LIC, NCC, NSS, CID ही सारी लघुरूपे याचेच कारण आहेत.

**४. अनुकरणाची अपूर्णता** : प्रत्येक माणसाची उच्चार करण्याची लकब भिन्न असते. दुसऱ्याचे अनुकरण करण्यामुळे, नक्कल करण्याच्या प्रवृत्तीमुळे उच्चारात बदल होतो. प्रत्येकवेळी असे अनुकरण जमतेच असे नाही. ते जमले नाही तर परिवर्तन होते. उदा. वंगन-वागीन, मास्टर-मास्तर, टिकट-तिकीट, अमंगल-वंगाळ

**५. वागेंद्रियातील दोष** : मुखातील दोषामुळे उच्चारात बऱ्याचदा बदल होतो. एखाद्याची जीभ जड असेल, दात पडले असतील, टाळू सपाट असेल तर अशा वेळी मुख्य ध्वनीमध्ये परिवर्तन होत असते. उदा. प्रभाकर-पबाकर, प्रल्हाद-परलाद, सहामाही-शहामायी, साई-शाई.

**६. श्रवणेंद्रियातील दोष** : कोणतीही व्यक्ती भाषा ऐकून शिकत असते. पण कधी-कधी ऐकण्यात दोष निर्माण झाला तर पुन्हा बोलताना चुकीचे उच्चार होण्याची शक्यता असते, त्यामुळेही परिवर्तन होताना दिसते. उदा. बायसिकल-पायसिकल, लोबो-लोगो.

**७. उच्चारशीघ्रता** : उच्चार पटकन, वेगाने करण्याच्या प्रवृत्तीमुळे परिवर्तन घडत असते. घाईगडबडीत असणारे लोक उच्चार पटपट करतात. ब्राह्मण पूजा करताना, विक्रेते, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह नेहमी घाईने बोलत असतात. त्यातूनही परिवर्तन होत असते. उदा. महाराज-म्हाराज, गुरूजी-गुर्जी, कातरी-कात्री, खातरी-खात्री ही रूपांतरणे उच्चारशीघ्रतेमुळेच झालेली आहेत

**८. अज्ञान** : उच्चार कसा करावा हे माहीत नसल्यामुळे काहीवेळा उच्चारपरिवर्तन घडते. अशिक्षित लोकांकडून इंग्रजीचे अनुकरण करताना किंवा जास्त ज्ञानी नसल्याने परिवर्तन झालेले दिसते. उदा. ऑफिस-हापिस, मास्टर-मास्तर, बुक्स-बुकं.

**९. आघात** : उच्चारात वाजवीपेक्षा जास्त आघात दिला तर किंवा वाजवीपेक्षा जास्त श्वास सोडला तर शब्दोच्चारात फरक पडतो. कधी कधी आघाताच्या स्थानात बदल केला तरी उच्चारात बदल होतो. उदा. क-ख, ग-घ, ट-ठ यांचा उच्चार नीट केला नाहीत तर असे बदल होतात. वैशिष्ट्य-वैशिष्ठ

**१०. उच्चारसौकर्य** : कठीण उच्चार करण्याची मानवी प्रवृत्ती नसल्याने बऱ्याचदा परिवर्तन घडते. उच्चार सोपा, सुलभ, सुकर करण्याची मानवाची वृत्ती असते. उदा. भक्त-भगत, रक्त-रगत, बृहस्पतिवार-बिस्तरवार.

**११. आहार** : आहारशुद्धीवर उच्चारशुद्धी अवलंबून असते. आहार हा उच्चारप्रक्रियेत महत्त्वाचा भाग आहे. सात्त्विक आहार उच्चारशुद्धतेत महत्त्वाचा असते. ज्यांचा आहार सात्त्विक असतो त्यांचे उच्चार स्पष्ट व कमी परिवर्तनशील असता. मद्यपी माणसाचे उच्चार बदलतात. भाषाविज्ञान भाषा शुद्ध व अशुद्ध हा प्रकार मानत नसले तरी परिवर्तन होते हे खरे आहे. उदा. कंदिल-खंजील/खंदिल.

**१२. भौगोलिकता** : ऑस्टॉफ या भाषाशास्त्रज्ञाने हवामान व देश स्थिती यांचा परिणाम उच्चारावर होतो असे सांगितले आहे. समुद्राजवळचे लोक नाकात बोलतात. डोंगरकपारीतील लोक कर्कश बोलतात, शीत हवामानाच्या प्रदेशातील लोकांचा उच्चार अस्पष्ट असतो. त्यामुळे परिवर्तन घडते.

**१३. लोकभ्रम** : काही वेळा लोकांच्या समजुतीमुळे, मनातील विशिष्ट भावनांमुळेही उच्चारपरिवर्तन होत असते. उदा. गोबी-कोबी. भारतीय लोकांच्या दृष्टीने गो हा गोमातादर्शक-गायदर्शक शब्द आहे. त्यामुळे गाईचे बी असा अर्थ होईल. म्हणून आपण गोबी ऐवजी कोबी असे परिवर्तन केले.

**१४. सामाजिक चालीरीती** : समाजात कही विशिष्ट चालीरीती असतात. उदा. लग्न झाल्यानंतर काही समाजात स्त्रियांच्या नाकात मोठमोठ्या नथी अडकविल्या जातात. त्या नथींचे ओठावर सतत ओझे वागवून उच्चार नीट होत नाहीत. आफ्रिकेतील याओ या आदिवासी जमातीत लग्नानंतर स्त्रियांच्या ओठाआड जाड लाकडाचा तुकडा ठेवण्याची पद्धत आहे, त्यामुळे त्यांच्या भाषेतून 'फ' हा ध्वनी नाहीसा होतो.

**१५. सादृश्यता** : कधी कधी एकसारखे उच्चार वाटल्यामुळे किंवा समोरासमोर एकसारखे ध्वनी आल्यामुळे, सादृश्यामुळे, सान्निध्य परिणामामुळे उच्चारामध्ये परिवर्तन होते. उदा. नुकसान-नुसकान, कवडसा-कडवसा, फाटक-फाकट.

**१६. वर्गसिद्धांत** : समाजात अनेक स्तर असतात. उच्च वर्गाची बोली वेगळी असते तर सामान्य वर्गाची बोली वेगळी असते तर सामान्य स्तरावरील वर्गाची बोली ही अधिक परिवर्तनशील असते. शहरी व्यक्ती यात्रा, सूत्र, शुक्रवार, पिशवी असे उच्चार करतो तर ग्रामीण भागातील व्यक्ती जत्रा, सुतर, सुक्कीरवार, पिसवी असा उच्चार करतो. याला वर्गसिद्धांत असे म्हटले जाते. वास्तविक पाहता वर्गसिद्धांताने भाषिक परिवर्तनाची फलश्रुती स्पष्ट होत असली तरी त्यामागील प्रेरणा किंवा प्रक्रिया यावर फारसा प्रकाश पडत नाही असे दिसते.

## २.७ ध्वनिपरिवर्तनाचे प्रकार

**१. आद्यस्वनलोप** : जेव्हा ध्वनिपरिवर्तन घडते तेव्हा बदल होताना सुरुवातीचा ध्वनी लोप होतो या प्रकाराला आद्यस्वनलोप असे म्हणतात. उदा. स्थाली-थाळी, स्थान-ठाण.

**२. मध्यस्वनलोप** : कधी कधी उच्चारातील आघात कमी-जास्त करताना मधल्या स्वनाचा लोप होतो या प्रकाराला मध्यस्वनलोप असे म्हणतात. उदा. दुग्ध-दूध, श्रेष्ठ-शेठ, ज्येष्ठ-जेठ.

**३. अंत्यस्वनलोप** : या प्रकारामध्ये शब्दाच्या शेवटच्या स्वनाचा उच्चार होत नाही. पूर्वी कधी काळी या स्वनांचे उच्चारण केले जात असे. पण कालांतराने शब्दांच्या उच्चाराकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले न गेल्यामुळे शेवटच्या स्वनांचा लोप झाला. उदा. मानस-मन, पायस-पाय, जगत-जग, चंद्रमा-चंद्र, मूलक-मूळ.

**४. समानस्वनलोप** : कधी कधी शब्दात एकच वर्ण दोनदा आला तर उच्चाराच्या वेळी त्या दोन वर्णांचा एकच वर्ण ठेवण्याची प्रवृत्ती दिसते. त्याला समानस्वनलोप असे म्हणतात. उदा. नाककटा-नकटा, गुरेराखी-गुराखी, नववर-नवरा, अपररात्र-अपरात्र, स्वर्गगंगा-स्वर्गंगा.

**५. आद्यस्वनागम** : कधी कधी एखाद्या वर्णाचा उच्चार करताना कठीण जाते अशा वेळी सुलभीकरणासाठी सुरुवातीला एखादा स्वन घेतला जातो, दुसऱ्या एखाद्या स्वनाचे साहाय्य घेतले जाते तेव्हा त्या प्रकाराला आद्यस्वनागम असे म्हणतात. उदा. स्क्रू-इस्क्रू, स्टोव्ह-इस्टोव्ह, स्त्री-अस्तूरी.

**६. मध्यस्वनागम** : या प्रकारामध्ये एखाद्या शब्दाचा कठीण उच्चार असेल तर मधेच एखादा ध्वनी घेतला जातो. उदा. धर्म-धरम, कर्म-करम, रक्त-रगत, भक्त-भगत, कृष्णा-किसना.

**७. अंत्यस्वनागम** : कधी कधी उच्चार सुलभ करण्यासाठी शब्दाच्या शेवटी स्वन घालून उच्चार लांबविले जातात. या प्रकाराला अंत्यस्वनागम असे म्हणतात. उदा. कमल-कमले, बाळ-बाळा.

**८. वर्णविपर्यय** : कधी कधी एका वर्णाचा उच्चार दुसऱ्या वर्णाच्या जागी व दुसऱ्या वर्णाचा उच्चार पहिल्याच्या जागी होतो, म्हणजेच वर्णोच्चारांची अदलाबदल होते. शब्दांचा उच्चार करताना ते आपापली जागा बदलतात. या प्रकाराला वर्णविपर्यय किंवा वर्णव्यत्यास असे म्हणतात. उदा. 'काळे राळे-गोरे राळे', 'काळा राम-गोरा राम', 'चटईला टाचणी टोचली' ही वाक्ये घाईने म्हणताना जशी गंमत होते तशीच गंमत या प्रकारात आहे.

**९. मात्राभेद** : काही ऱ्हस्व स्वनांचे दीर्घ स्वनांमध्ये तर काही दीर्घ स्वनांचे ऱ्हस्व स्वनांमध्ये उच्चार केले जातात. त्यामुळे एकूण मात्रा समान राहत असल्या तरी त्यांच्या क्रमात बदल होतो या प्रकाराला मात्राभेद असे म्हणतात. उदा. लज्जा-लाज, जिव्हा-जीभ, कंटक-काटा, पुत्र-पूत.

**१०. अनुस्वार** : काही वेळा शब्दातील अनुस्वार उच्चारलेच जात नाहीत. उदा. कुंकू-कुकू, चिंच-चिच, भिंत-भित.

तर कधी नको असताना नको तिथे अनुस्वार दिला जातो. उदा. ऑक्टोंबर.

**११. दुष्प्रयोग** : काही वेळा हेटाळणी करण्याच्या प्रकारातून वाईट उच्चार केले जातात. यातून दुष्प्रयोगाची निर्मिती होते. उदा. ब्राह्मण-बामन, वेडपट-येडपाट.

तर काही वेळा परभाषेतली शब्द उच्चारताना दुष्प्रयोगाची निर्मिती होते.

उदा. इलेक्शन-विलेक्शन, टाईम-टायम, पॉवर-पावर.

**१२. घोषीकरण** : या प्रकारात अघोष ध्वनी सघोष होतात.

उदा. सकल-सगळे, प्रकट-प्रगट, कंकण-कंगण.

**१३. अघोषीकरण** : अघोषीकरण हा बरोबर उलटा प्रकार आहे. येथे सघोष ध्वनी अघोष होतात.

उदा. आदद-आदत, मदद-मदत, मगर-मकर, मेघ-मेख.

**१४. अल्पप्राणीकरण** : या प्रकारात महाप्राण ध्वनी अल्पप्राण होतात.

उदा. सिंधू-हिंदू, दधी-दही, स्वादिष्ठ-स्वादिष्ट

**१५. महाप्राणीकरण** : या प्रकारात अल्पप्राण ध्वनी महाप्राण होतात. त्यामध्ये 'ह' कार ध्वनी जास्त मिसळला जातो.

उदा. बाष्प-वाफ, गृह-घर, हस्त-हात/हाथ

**१६. एकस्वनीकरण** : या प्रकारामध्ये व्यंजनयुग्माचे केवळ व्यंजनामध्ये किंवा संयुक्त स्वराचे केवल स्वरात परिवर्तन होते. यास एकस्वनीकरण असे म्हणतात. संस्कृत ऐ, औ या संयुक्त स्वरांचे पाली भाषेत ए, ओ असे परिवर्तन झाले. कैलास-केलास, गौर-गोर, मौन-मोन.

**१७. सान्निध्य परिणाम** : शब्दातील निरनिराळे वर्ण एकमेकांच्या सान्निध्यानेच उच्चारले जातात. ते उच्चारताना त्यांच्या उच्चारांचा परिणाम शेजारच्या वर्णांच्या उच्चारावर होतो. यात कधी दोन्ही वर्णांचा एक वर्ण होतो आणि त्यात पहिल्या वर्णाचा द्वित्त होतो. उदा. मुक्त-मुक्क, पक्व-पक्क; तर कधी दोन्ही वर्ण एक होऊन दुसरा वर्ण द्वित होतो. उदा. तप्त-तत्त-ताप, सप्त-सत्त-सात, दुग्ध-दुध्ध-दूध.

**१८. अतिशुद्धी** : काही लोक अतिशय शुद्ध बोलण्याचा सतत अट्टाहास धरत असतात. तसेच सतत बोलत राहतात. यातूनही काही वेगळा वेगळे उच्चार होताना दिसतात. ऑफिस-हॉपिस, स्टाफ-स्टॉफ, बस-बैस अशा अनेक शब्दांमध्ये अतिशुद्धीमुळे असे बदल झालेले दिसतील.

**२.८ ध्वनिपरिवर्तनाचा मराठी भाषेवरील परिणाम**

भाषा सतत बदलत असते. हा बदल ध्वनी आणि अर्थ या दोन पातळ्यांवर अधिक प्रमाणात होत असतो. प्रचलित आणि भूतकालीन भाषांची विविध मार्गांनी माहिती गोळा करणे, त्यांचा नीट क्रम लावणे, शब्दांच्या उच्चारात कसे बदल होत गेले याचा अभ्यास करणे, एकाच काळी उपयोगात आणल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या पण मूळ एकाच भाषेतून निघालेल्या भाषांची तुलना करणे हे भाषाशास्त्राचे काम असते. त्यामुळे भाषेत हे असे जे परिवर्तन होत असते ते कसे झाले, त्याची कारणे कोणती असतील याचा शोध घेतला जातो. जगातील सर्वच भाषांमध्ये असे परिवर्तन होत असते. हे परिवर्तन नकळत घडून येत असते. त्यामुळे भाषेवरचा परिणाम लगेच लक्षात येत नाही. दलपति-दलवई-दळवै-दळवी असे कालदृष्ट्या भेद होत गेलेले दिसतात. संस्कृत मध्ये सप्त असा असणारा उच्चार प्राकृत मध्ये सत्त आणि मराठी मध्ये सात असा परिवर्तन होऊन आला. मध्ययुगीन कालखंडामध्ये म्हणितले असा असणारा उच्चार आजच्या मराठी भाषेमध्ये म्हटले असा झालेला आहे. असे घडत आलेले हे परिवर्तन बोलणाऱ्याच्या नकळत घडून येत असते. ते इतके सूक्ष्म व मंदगतीने होत असते की खूप काळानंतर त्याच्यातील बदल लक्षात येत जातो. कधी कधी एकाच वेळी एकाच काळात बोलली जाणारी भाषा वेगवेगळ्या वयाचे लोक, किंवा वेगवेगळ्या प्रदेशातील लोक थोडा वेगळा उच्चार करत असतात. पण ऐकणारा समजून घेतो आणि भाषिक व्यवहार पूर्ण होतो. व्यवहाराला कोणताच अडथळा न येण्याचे हे धोरण

सांभाळूनच सर्व चाललेले असते. एखाद्याने केलेले उच्चार कितपत शुद्ध असावेत याबाबत कोणताही कायदा नाही परंतु समोरच्या ऐकणाऱ्याला समजावेत अशी अपेक्षा असते. त्यामुळे समोरच्याला कळले की भाषाव्यवहार पूर्ण होतो. पण कालांतराने हे बदललेले उच्चार कितपत शुद्ध असावेत याबाबत कोणताही कायदा नाही परंतु समोरच्या ऐकणाऱ्याला समजावेत अशी अपेक्षा असते. त्यामुळे समोरच्याला कळले की भाषाव्यवहार पूर्ण होतो. पण कालांतराने हे बदललेले उच्चार रूढ होत जातात आणि परिवर्तन होते. जुन्या ध्वनींच्या जागी नवीन ध्वनी येऊन काही शब्दांच्या उच्चारात क्रांती होते अशा वेळी कधी-कधी मूळ शब्दात असलेल्या भिन्न व अर्थपूर्ण घटकांचे आपणाला विस्मरण होते व त्याचे पृथक्करण करणेही अशक्य होते. उदाहरणार्थ ध्वजदंड-झअअण्ड-झेंडा ध्वनिपरिवर्तनाच्या या अशा काही प्रक्रियेमुळे भाषेत काहीवेळा थोडा गोंधळही निर्माण होतो. ध्वनिपरिवर्तनात एकच सूत्र सर्व ठिकाणी लागू होत नाही. दीपक-दीवअ-दिवा असे परिवर्तन झाले म्हणून प्रत्येकवेळी 'प'चा 'व' होईल असे नाही. सापळा या शब्दाचा सावळा असा उच्चार होत नाही. एकच ध्वनी भिन्न दिशांनी उत्क्रांत होऊ शकतो, बदलू शकतो. ध्वनिपरिवर्तनाने भाषेत बदल घडून येत असतो, कधी कधी भाषेची व्याकरणिक रचना विस्कळीत होत असते. (उदाहरणार्थ सायकल याचे अनेकवचन इंग्रजीप्रमाणे सायकल्स असे न होता मराठी भाषेत सायकली असे झाले.) परंतु यामुळे भाषा दुर्बोध व्हायला हवी होती पण ती तशी दुर्बोध होत नाही. मानवी जीवनाचा व्यवहार होत असताना व्यत्यय येईल असे काही मनुष्य होऊ देत नाही. मनुष्याचा व्यवहार भाषेवर चाललेला असतो. त्यामुळे भाषेत कोणताही अडथळा आला तरी तो दूर करून पुढे जाण्याचा प्रयत्न करतो. ना. गो. कालेलकर असे म्हणतात की, ''ध्वनिपरिवर्तनाने भाषेत घडून येणारी क्रांती नकळत झालेली असल्यामुळे तिचे परिणाम जाणवू लागतात. व्यवहार सुलभ व्हावा असे इच्छिणारी मनुष्याची बुद्धी जागृत होते आणि या क्रांतीचे दुष्परिणाम नष्ट करणारी मानसिक घडामोड एकदम सुरू होते.'' कालेलकर यांचे हे मत अगदी बरोबर आहे. मनुष्य भाषिक व्यवहारात या परिवर्तनाचा कोणताही अडथळा राहू देत नाही. व्यवहार सुलभ होत जातो. ध्वनिपरिवर्तनामुळे आपल्याला भाषेत झालेला बदल अभ्यासता येतो, त्याचे कालिक भेद करता येतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

१. भाषेत बदल होणे हे तिच्या कशाचे लक्षण आहे ?

(अ) बदलाचे (ब) संपल्याचे (क) जिवंतपणाचे (ड) मागासलेपणाचे

२. ध्वनिपरिवर्तन कसे होत असते ?

(अ) मंदगतीने (ब) जलदगतीने (क) मध्यमगतीने (ड) द्रूतगतीने

३. 'रक्त'चा 'रगत' असा उच्चार होणे या प्रवृत्तीस ध्वनिपरिवर्तनाचा कोणता प्रकार म्हणतात ?

(अ) आद्यस्वनागम (ब) मध्यमस्वनागम (क) अंत्यस्वनागम (ड) मध्यस्वनलोप

४. भौगोलिकता आणि हवामान यांचा परिणाम उच्चारावर होतो हे कोणत्या भाषाभ्यासकाने सांगितले ?

(अ) ब्लूमफिल्ड (ब) हॉकेट (ड) ऑस्टॉफ (ड) चोम्स्की

५. उच्चार सुलभ करण्यासाठी एखादा स्वन प्रथम घातला जातो त्या प्रकाराला काय म्हणतात ?

(अ) आद्यस्वनागम (ब) मध्यमस्वनागम (क) अंत्यस्वनागम (ड) मध्यमस्वनलोप

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. ध्वनिपरिवर्तन म्हणजे काय ते सांगून ध्वनिपरिवर्तनाची कारणे लिहा.

२. ध्वनिपरिवर्तनाची कारणे सांगून प्रमुख प्रकारांची चर्चा करा.

३. ध्वनिपरिवर्तन म्हणजे काय ते सांगून त्याचे विशेष लिहा आणि त्याचा भाषेवरील परिणाम थोडक्यात विशद करा.

## २.९ संदर्भ ग्रंथ

१. कालेकर ना. गो. (२००३) ति. आ., ध्वनिविचार, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

२. गजेन्द्रगडकर श्री. न. (१९९१) ति. आ., भाषा आणि भाषाशास्त्र, व्हीनस प्रकाशन, पुणे.

३. गवळी अनिल (२००९), भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर.

४. जोगळेकर गं. ना. (१९८७) अभिनव भाषाविज्ञान, सुविचार प्रकाशन, पुणे.

५. जोशी प्र. नं. (१९९८) सुबोध भाषाशास्त्र, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

**उपक्रम**

१. आपल्या परिसरातील कौटुंबिक व सामाजिक क्षेत्रातील ध्वनिपरिवर्तन झालेल्या मूळ शब्दांचा शोध घेऊन त्याचा संग्रह करा.

# घटक – ३
# मराठीचे अर्थपरिवर्तन

## ३.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो या घटकाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हाला;

- 'अर्थ' या संज्ञेबद्दलच्या विविध संकल्पनांचे आकलन करून घेता येईल.
- 'अर्थ' म्हणजे काय ? आणि त्याच्या व्याख्या समजावून घेता येतील.
- मराठीतील अर्थपरिवर्तनाचे स्वरूप समजावून घेता येईल.
- अर्थपरिवर्तनाची कारणे समजावून घेता येतील.
- अर्थपरिवर्तनाचे प्रकार समजावून घेता येतील.
- मराठी भाषेत अर्थपरिवर्तन कसे घडत आले, या प्रक्रियेची सोदाहरण माहिती मिळेल.

## ३.१ प्रास्ताविक

भाषा ही समाजाचा आरसा असते. समाज हा परिवर्तनशील असतो. साहजिकच भाषाही परिवर्तनशील आहे. भाषेतील परिवर्तन सूक्ष्म स्वरूपांत सातत्याने चालू असते. जी भाषा हे परिवर्तन स्वीकारून आपल्यात बदल घडविते तीच भाषा काळाच्या ओघात जिवंत राहते, टिकून राहते. अर्थात हे परिवर्तन अतिशय सूक्ष्म असते. ते हळूहळू, नकळतपणे होत असे. ते ठळकपणे निजभाषिकाच्याही चटकन लक्षात येत नाही. सर्वसामान्यतः हे परिवर्तन दोन पातळ्यांवर घडते. पहिली पातळी म्हणजे भाषेच्या बाह्यरूपात हे परिवर्तन दिसून आले की, त्याला **ध्वनिपरिवर्तन** म्हणतात. दुसऱ्या पातळीवर भाषेच्या अंतरंगात म्हणजे शब्दांच्या अर्थात परिवर्तन घडून आले की, त्याला **अर्थपरिवर्तन** म्हणतात. भाषेत बदल होणे, तिच्यात परिवर्तन होणे हे भाषेच्या जिवंतपणाचे, टिकून राहण्याचे लक्षण आहे. हा बदल भाषेच्या उच्चारात आणि तिचा आत्मा म्हणजे शब्दाच्या अर्थात होतो. एखादा शब्द एखाद्या विशिष्ट काळात एका विशिष्ट अर्थाने वापरला जात असला, तरी कालांतराने त्याच्या अर्थात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शब्दांच्या अर्थात होणारे बदल म्हणजेच अर्थपरिवर्तन होय. ही प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची असते. या प्रक्रियेच्या मुळाशी निजभाषिकाची मानसिकताच बऱ्याच प्रमाणात कारणीभूत असते. त्यामुळे

त्याचे आखिव-रेखीव शास्त्र तयार करणे शक्य होत नाही. भाषा ही मानवनिर्मित आहे. त्यामुळे जितक्या व्यक्ती तितक्या भाषा वापरण्याच्या पद्धती विविध असू शकतात. म्हणूनच ही प्रक्रिया समजावून घेणे अवघड आहे.

## ३.२ विषय विवेचन

### 'अर्थ' म्हणजे काय ?

भाषा निर्माण होण्यामागे आपल्या मनातील विचार प्रकट करणे हा प्रमुख हेतू दिसून येतो. **उल्मान** यांच्या मतानुसार, 'भाषिक उच्चाराची मानसिक प्रतीती म्हणजे त्याचा अर्थ होय. भाषेत ध्वनी स्वतंत्रपणे वापरले जात नाहीत, अर्थपूर्ण ध्वनिसमुच्चयाने भाषेला आकार मिळतो. शब्द हा भाषेतील लघुत्तम सार्थ घटक होय.' 'अर्थ' या शब्दाचा कोशातील अर्थ अभिप्राय, भाव, तात्पर्य, हेतू, मतलब, आशय, उद्देश, इंगित असा दिलेला आहे. या शब्दार्थावरून सारांशाने अर्थ समजला तरी काटेकोरपणे पहावयाचे झाल्यास, मानवाने निर्माण केलेल्या सर्वच ध्वनींना आपण भाषेत स्थान देत नाही. काही निरर्थक ध्वनीही मानव निर्माण करत असतो. मात्र ज्या ध्वनीसमुच्चयांतून सार्थ अर्थ निर्माण होतो. त्यालाच आपण शब्द मानतो. म्हणजेच 'अर्था'शिवाय ध्वनीसमुच्चयाला अर्थ प्राप्त होत नाही. जे ध्वनीसमुच्चय उच्चारणारा आणि ऐकणारा या दोघांच्याही दृष्टीने शब्दांच्या उच्चारणाबरोबर अशी प्रतीती येणे संप्रेषणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. **डॉ. प्र. ज. जोशी** म्हणतात, ''शब्दांच्या द्वारा जी वास्तविक अथवा काल्पनिक प्रतीती येते तीस अर्थ म्हणावयास हरकत नाही.'' अर्थात त्या त्या भाषिक समाजाने मान्य केलेले आणि ध्वनींची विशिष्ट क्रमाने केलेली रचनाच सार्थ असते. अर्थाची ही प्रतीती दोन प्रकारांनी निजभाषिकाला येत असते.

**१. आत्मप्रत्ययांद्वारा येणारी प्रतीती** : ही प्रतीती स्वानुभवातून येते. नाक, कान, डोळे, जीभ यांच्या साहाय्याने ही प्रतीती येते. ती मूर्त स्वरूपाची असते. आत्मप्रत्याद्वारा आलेली अनुभूतीही दुहेरी असते. ती बाह्य इंद्रियांना जाणवतेच, पण त्याबरोबरच ती मनाला अथवा अंतःकरणालाही जाणवते. उदा. सुंदरता, चमकदारपणा या गोष्टी बाह्य इंद्रियांना जशा जाणवतात तशाच त्या मनालाही जाणवतात. मात्र शांती, दया, प्रेम, वात्सल्य या गोष्टी फक्त मनालाच जाणवतात.

**२. परप्रत्ययांद्वारा येणारी प्रतीती** : ही प्रतीती दुसऱ्यांच्या अनुभवांवरून आलेली असते. यात स्वतः तो अनुभव घेतलेला नसला, तरी दुसऱ्याच्या अनुभवावरून त्याचे अनुमान श्रोता करू शकतो. उदा. हिमालय, नायगरा, धबधबा, मानस सरोवर इ. गोष्टी आपण प्रत्यक्ष पाहिल्या नसल्या तरी त्याबाबत बोललेले आपणाला समजते. त्याची अनुभूती येते. मात्र अशी प्रतीती अनेकदा एकेरी असते.

भाषा घटकांच्या, अर्थाच्या ज्ञानाचेही दोन प्रकार आहेत. वक्त्याचा किंवा बोलणाऱ्याचा भाषिक व्यवहार हा वस्तू → संकेत किंवा कल्पना → प्रतीक अथवा चिन्हात्मक शब्द असा असतो. तर श्रोत्यांचा किंवा ऐकणाऱ्यांचा भाषिक व्यवहार हा याच्या उलट म्हणजे प्रतीक अथवा चिन्हात्मक शब्द → संकेत

किंवा कल्पना → वस्तू अशा प्रकारे असतो. अर्थबोधाच्या या क्रियेत संकेतांना फार महत्त्व असते. हे संकेत पारंपारिक यादृच्छिक पद्धतीने आलेले असतात.

अर्थविचारास इंग्रजीमध्ये Sematology, Semantics अशी नावे आहेत. मात्र अर्थविज्ञानाचा उद्गाता **मायकेल ब्रेआल** यांनी **१८९७** मध्ये Semantics **ही** संज्ञा प्रथम वापरली. ही संज्ञा Semantique या फ्रेंच शब्दांवरून इंग्रजीत आलेली आहे. डॉ. अशोक केळकर यांनी या संज्ञेस **अर्थविन्यास** हा मराठी पर्याय सुचविला आहे. अर्थविचार, अर्थप्रक्रिया, अर्थविज्ञान, शब्दार्थशास्त्र असे पर्यायी शब्दही मराठीत वापरलेले दिसतात.

## ३.३ अर्थाच्या व्याख्या

अर्थाची एकच एक अशी व्याख्या करता येत नाही. अर्थ म्हणजे काय ? हे नेमकेपणाने सांगता येत नाही. ही प्रक्रिया फारच गुंतागुंतीची आहे. कारण शब्दांचा अर्थ हा संदर्भानुसार बदलताना दिसतो. तरीही काही भाषावैज्ञानिकांनी अर्थाच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ३.३.१ अर्थ म्हणजे निर्देश

प्रत्येक शब्द कुठल्या तरी वस्तूचा म्हणजेच अर्थाचा निर्देश करत असतो. उदा. गाय, हत्ती, घोडा या शब्दांतून विशिष्ट प्राण्यांचा निर्देश होतो. दामिनी, विद्या, रूपा, शिवाजी या विशेष नामांतून विशिष्ट व्यक्तींचा निर्देश होतो. तर झाडे, घरे, रस्ते यांच्या अनेक वचनांतून समूहाचा निर्देश होतो. उंच, मऊ, दाट यातून गुणविशेषणे लक्षात येतात. त्यामुळे ही व्याख्या आपणाला योग्य वाटते. मात्र चांगुलपणा, प्रामाणिकपणा, साहस, हुशारी अशा शब्दांचा अर्थ ऐंद्रिय अनुभूतीने येणे शक्य नाही. म्हणजेच या व्याख्येत भाषेतली सर्व शब्दांचा समावेश होऊ शकत नाही, त्यामुळे ही व्याख्या अपूरी ठरते.

### ३.३.२ अर्थ म्हणजे प्रतिमा

अर्थ म्हणजे प्रतिमा अशीही व्याख्या केली जाते. ही व्याख्या वरील व्याख्येपेक्षा अधिक व्यापक आहे. कोणताही शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या समोर एक विशिष्ट प्रतिमा उभी करतात. उदा. **झाड** हा शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर खोड, फांद्या, पाने, फळे, फुले हे सारे घटक एकत्रितपणे उभे राहतात. पण ही प्रतिमा सर्वांच्या डोळ्यांसमोर एक सारखीच उभी राहील असे नाही. झाड पण ते कोणते ? आंब्याचे, वडाचे, बाभळीचे, लिंबाचे की आणखी कोणते ? हे निश्चित सांगता येणार नाही. ऐकणाऱ्याच्या आत्मप्रत्ययात जी प्रतिमा असेल तोच अर्थ त्याच्या मनात उभा राहील. **सोस्यूर** यांच्या विवेचनानुसार शब्दांचे मिळणारे मानसिक चित्र किंवा प्रतिमा अपुरेच असतात. झाड हा शब्द उच्चारताच झाडाची प्रतिमा उभी राहते, मात्र ही प्रतिमा अपूरीच असते. त्यामुळे वरील विविध पर्याय आपल्या समोर येतात. त्यातून निश्चितच प्रतिमा डोळ्यासमोर येत नाही. त्यामुळे ही व्याख्याही परिपूर्ण नाही असेच म्हणावे लागते.

### ३.३.३ अर्थ म्हणजे संकल्पना

अर्थ म्हणजे संकल्पना अशी व्याख्या **सोस्यूर** या भाषावैज्ञानिकांच्या विवेचनाच्या आधारे केली जाते. अनेक अनुभवांचा समुच्चय या व्याख्येत गृहित धरण्यात आलेला आहे. संकल्पना ही वस्तू नसते, तशीच ती दृश्यही नसते. वस्तुस्थितीमध्ये असणारी प्रत्यक्ष परिस्थिती आपल्या मनात अनुभवाने एक मानसिक प्रतिमा, कल्पना उभी करत असते. त्यासाठी आपण शब्द हे एकक वापरत असतो. अर्थात ही प्रतिमा व्यक्तीनुरूप भिन्न असू शकते. मात्र त्यात एक समान धागा ही असतो. उदा. वाघ हा शब्द उच्चारताच पांढरा वाघ ही संकल्पना डोळ्यासमोर उभी राहिलंच असे नाही. मात्र वाघासंबंधी समान संकल्पना भाषिकाच्या मनात असते.

### ३.३.४ अर्थ म्हणजे विचार

अर्थ म्हणजे विचार अशीही एक व्याख्या केली जाते. मात्र ही व्याख्या बरीचशी संदिग्ध आहे. विचार म्हणजे काय ? याचे योग्य आणि समर्पक उत्तर आपणाला देता येत नाही. विचार हे नाम आणि विचार करणे ही क्रिया या दोन्ही वेगळ्या आहेत. त्यामुळे यातून अर्थाचे योग्य स्पष्टीकरण मिळत नाही. भाषेतील शब्द आणि त्यांचे अर्थ यांचा संबंध पूर्णपणे परंपरेने चालत आलेला, मानवाने त्या ध्वनीसमुच्चयांवर आरोपित केलेला, यादृच्छिक स्वरूपाचा असून त्यात कार्य-कारण भाव आढळत नाही. कोणीतरी आपल्या मनातील भावना, कल्पना, विचार, अभिप्राय व्यक्त करण्यासाठी म्हणून काहीतरी शब्द वापरले, ते ऐकणाऱ्यालाही कळले, पटले, त्यानेही त्याच अर्थाने त्याचा पुन्हा वापर केला. अशा प्रकारे तो शब्द व त्याला असलेला अर्थ सर्वांना मान्य होऊन तो समाजात रूढ झाला. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हे संकेत चालत आले. या संकेताबाबत, संकल्पनेबाबत समाजात एकमत झाले आणि त्यातून त्या शब्दांचे अर्थ रूढ झाले. असेच अनुमान आपणाला मान्य करावे लागते.

## ३.४ शब्दांचे प्रकार

अर्थाच्या दृष्टीने शब्दांचे तीन प्रकार मानले जातात.

**१. रूढ शब्द** : ज्या शब्दांना संकेतांनी अथवा रूढीने अर्थ प्राप्त होतो त्यांना रूढ शब्द असे म्हणतात. उदा. गाय, घोडा, बैल, पुस्तक, टेबल, कान, दगड इ,

**२. यौगिक शब्द** : काही वेळा आपल्या भोवतालचे वातावरण आणि आपल्याला येणारा अनुभव यांची जुळणी करून आपण शब्दांना अर्थ देत असतो. म्हणजेच शब्दांची प्रकृती-प्रत्यय यांची जुळणी आपण करतो. अशा शब्द प्रकारास यौगिक शब्द असे म्हणतात. या शब्दांचा अर्थ त्यांच्या मूळ धातूंमधील अर्थासारखाच असतो. उदा. पांडव, गुणी, रूपवान, विणकर इ.

**३. योगरूढ शब्द** : कित्येक वेळा एकाच शब्दाला रूढीने अथवा यौगिकदृष्ट्याही अर्थ प्राप्त होतो. अशा शब्दांना योगरूढ शब्द म्हणतात. दंती हा शब्द दंत या धातूपासून तयार झाला आहे. हा याचा

यौगिक अर्थ. पण दात असणाऱ्या सर्वच प्राण्यांना हा शब्द आपण लावत नाही. तर तो फक्त रूढीने हत्तीबाबतच वापरला जातो. म्हणून दंती म्हणजे हत्ती हा याचा योगरूढ अर्थ होय. त्याचप्रमाणे हनुमान, गजानन या शब्दांबाबत म्हणता येते.

## ३.५ शब्द अर्थनिर्मितीच्या तीन शक्ती

**१. अभिधा शक्ती** : अभि-धा म्हणजे सरळ बोलणे. एखाद्या शब्दाचा उच्चार होताच सरळ, विनाप्रतिबंध त्याचा जो अर्थ आपणास प्राप्त होतो त्याला वाच्यार्थ म्हणतात. तो त्या शब्दाचा मुख्य, मूळ अर्थ असतो. हा अर्थ निर्माण करणारी जी शक्ती शब्दांच्या ठिकाणी असते, तिला अभिधा शक्ती म्हणतात. ही स्वयंपूर्ण अशी नैसर्गिक शक्ती असते. उदा. पुस्तक, चित्रपट, टेबल, मी गावाला जातो इ.

**२. लक्षणा** : कधी-कधी वाच्यार्थ हा वाक्याच्या अर्थाच्या संदर्भात अनुचित किंवा गैरलागू ठरतो आणि त्याच्याशी संबंधित असणारा दुसराच अर्थ अभिप्रेत असलेला दिसतो. त्यालाच लक्ष्यार्थ किंवा लाक्षणिक अर्थ असे म्हणतात. लाक्षणिक अर्थ शब्दाला प्राप्त करून देणारी जी शक्ती असते तिला लक्षणा म्हणतात. उदा. एवढा एक प्याला घ्या ना. या वाक्यात प्याला असा अर्थ न घेता प्यालातील दूध असा दुसरा अर्थ लक्षणेने घ्यायचा असतो.

**३. व्यंजना** : कधी-कधी एखाद्या शब्दाच्या वाच्यार्थाशिवाय इतर अनेक अर्थ संदर्भानुसार त्या शब्दांकडून सुचविले जातात. त्या सूचित अर्थास व्यंग्यार्थ म्हणतात. व्यंग्यार्थ प्रकट करणारी शब्दाची जी शक्ती असते तिला व्यंजना म्हणतात. उदा. घंटा झाली या वाक्याचा संदर्भानुसार अर्थ घ्यावा लागतो.

**डॉ. अनिल गवळी** आपल्या 'भाषाविज्ञान आणि मराठी भाषा' या ग्रंथात म्हणतात, ''अर्थ म्हणजे ध्वनिरूप आकार आणि त्याचा आशय यामधील संबंध होय. जेव्हा आशयाला नवा ध्वनिरूप आकार किंवा अभिधान प्राप्त होते अथवा एखाद्या अभिधानाशी नवा अर्थ संबंद्ध होतो तेव्हा अर्थपरिवर्तन घडून येते असे उल्मान यांचे मत आहे.''

## ३.६ अर्थपरिवर्तनाची कारणे

भाषेत होणारे परिवर्तन दोन अर्थानी घडत असते. (१) उच्चारात फरक पडणे. (२) शब्दांच्या अर्थात बदल होणे यातील दुसऱ्या प्रकारच्या परिवर्तनात समाजाने मान्यता दिलेला अर्थसुद्धा कोणत्या कारणाने बदलतो याचा अभ्यास करावा लागतो.

आंत्वान मेये (१८६६-१९३६) या फ्रेंच भाषाशास्त्रज्ञाने अर्थपरिवर्तनाची (१) भाषिक परिस्थिती (२) ऐतिहासिक परिस्थिती (३) सामाजिक स्तरभेद अशी कारणे दिलेली आहेत.

अर्थपरिवर्तन साधारणः तीन प्रकारच्या कारणांनी घडते.

### ३.६.१ भाषिक कारणे

**१. उपसर्ग व प्रत्यय मूलक अर्थपरिवर्तन** : जेव्हा शब्दांना काही प्रत्यय किंवा उपसर्ग जोडले जातात, तेव्हा त्यांच्या अर्थात परिवर्तन होताना दिसते. यामुळे कधी-कधी अर्थविस्तार, अर्थसंकोच, अर्थभ्रंश होताना दिसतो.

उदा. **गैर** – गैरसमज, गैरवर्तणूक, गैरकारभार इ.

**आड** – आडनाव, आडरस्ता, आडरान इ.

**आर** – सुतार, लोहार, चांभार इ,

**आई** – मलाई, ढिलाई, शिलाई इ.

**२. समासमूलक अर्थपरिवर्तन** : सामासिक शब्दांचा किंवा त्या शब्दसमूहाचा अर्थ त्या दोन शब्दांच्या मूळ अर्थापेक्षा वेगळाच असतो. कधी-कधी हा अर्थ सामासिक घटनेमुळे विस्तारीत होतो, कधी उच्चत्तर होतो, तर कधी भ्रष्टही होतो. तर कधी शब्दांची द्विरूक्ती झाल्यामुळेही अर्थपरिवर्तन होते. उदा. वेणीफणी, चहापाणी, हवापाणी, दशानन, गृहस्थ, जवळजवळ, भरभरून इ.

**३. शब्दसिद्धी** : मुळात शब्दांत असलेली शक्ती, तो शब्द दुसऱ्या शब्दाच्या सान्निध्यात आला की तिचे रूप बदलते. या बदललेल्या रूपातून अर्थपरिवर्तन होते. उदा. बहुव्रीही समासात दोन्ही पदांचा अर्थाशी संबंध उरत नाही. त्यातून तिसऱ्याच अर्थाचा बोध होतो. उदा. नीलकंठ, घरकोंबडा, चटकचांदणी, हस्तीदंती इ.

**४. रूपकजन्य अर्थपरिवर्तन** : रूपक हे अर्थपरिवर्तनाचे महत्त्वाचे कारण आहे. हे परिवर्तन तात्काळ होते. अर्थविस्तार, अर्थसंकोच, अर्थभ्रंश, अर्थप्रशस्ती, अर्थच्युती या प्रक्रिया होताना दिसतात. रूपकांचा प्रवास **एका भाषेतून दुसऱ्या भाषेत** होताना अर्थपरिवर्तन होते. उदा. पांढरा हत्ती, काटेरी मुकूट, चहाच्या पेल्यातील वादळ इ. काही रूपके **विशिष्ट व्यवसायातून, खेळांतूनही** येतात. उदा. वकिली करणे - वकिल, उचलबांगडी, गळ टाकणे - कोळी, पाया घालणे - गवंडी, पारध करणे - शिकारी, फासा टाकणे - द्यूत, विकेट काढणे - क्रिकेट, फुगडी घालणे, धिंगाणा घालणे इ. काही रूपके **ऐतिहासिक, पौराणिक** असतात. उदा. अटकेपार झेंडा लावणे, पानिपत होणे, मोगलाई, बारभाईचे कारस्थान, त्रिशंकू अवस्था, भगीरथ प्रयत्न, विश्वामित्री पवित्रा इ. काही रूपके **गुण-दोषांवर** अवलंबून असतात. उदा. उथळ माणूस, उतावळा नवरा, हुरडफुक्या, अडणीवरचा शंख इ. काही रूपके **अमूर्ताला मूर्त** करण्याचा प्रयत्नातून येतात. उदा. आभाळाची बुंथी, गगनाचे पांघरुण, देहाचे झाड, पंक्चरलेली रात्र इ. काही रूपके **अतिशयोक्तीतून** निर्माण होतात. उदा. मुसळधार पाऊस, तळहातावरचा फोड, जमीन-अस्मानचे अंतर इ. काही रूपके **अचेतन वस्तूवर चेतनत्वाचा आरोप** करून केली जातात. उदा. अदमुरे चांदणे, वाहता रस्ता, आंधळा न्याय इ.

**५. लक्षणाजन्य अर्थपरिवर्तन** : शब्दांचा मूळ वाच्यार्थ बदलून त्याऐवजी त्या शब्दांतून सुचविलेला लक्षणेचा अर्थ स्वीकारला जातो, त्यावेळी लक्षणाजन्य अर्थपरिवर्तन होते. हे सर्वसाधारणतः तीन प्रकारांनी होते.

**(अ) लक्षणामूल अर्थविस्तार** : शब्दाचा मूळ अर्थ मर्यादित असताना लक्षणेने अर्थविस्तार होतो. उदा. दोन ओळीचे पत्र **गोठा** याचा मूळ अर्थ गायी बांधण्याचे ठिकाण असा होता. मात्र लक्षणेने तो कोणतीही जनावरे बांधण्याचे ठिकाण म्हणून रूढ झाला आहे.

**(ब) लक्षणामूल अथच्यूती** : लक्षणेमुळे कधी-कधी शब्दाला नसणारा वाईट अर्थ प्राप्त होतो आणि तोच अर्थ नैसर्गिक वाटतो. उदा. **चंबूगबाळे** या शब्दाचा मूळ अर्थ देवाची वस्त्रे असा होता. पण आज तो सटरफटर वस्तू अशा अर्थाने प्रचलित झालेला आहे.

**(क) लक्षणामूल अर्थप्रशस्ती** : लक्षणेमुळे जसा शब्दाला अवनत अर्थ प्राप्त होतो, तसाच उन्नत अर्थही प्राप्त होतो. उदा. **बावनकशी सोने** या शब्दाचा मूळ अर्थ उत्कृष्ट सोने असा होतो. मात्र आज तो चारित्र्यवान व्यक्तींसाठी वापरला जातो.

**६. पदलोप** : भाषेतील काही शब्द असे असतात की, त्यांच्या आरंभी लावलेली विशेषणे किंवा वर्णनात्मक शब्द कालांतराने लोप पावले तरी ते विशिष्ट शब्द पूर्वीच्याच अर्थाने रूढ होऊन जातात. या भाषिक प्रक्रियेस पदलोप असे म्हणतात. उदा. शुभमुहूर्त या शब्दात 'शुभ' या पदाचा लोप होऊन मुहूर्त या शब्दाचा अर्थ उन्नत झाला आहे. या प्रमाणेच हरिकीर्तन - कीर्तन, टेलिफोन - फोन, पोस्टकार्ड - कार्ड या शब्दांबाबत म्हणता येते.

**७. अतिशयोक्ती** : अनेकदा मनुष्य भावनावेगात, भावविवशतेने अतिशयोक्तीपूर्ण बोलत असतो. त्यातील अतिशयोक्ती शब्दाच्या मूळ अर्थास मारक बनून अर्थपरिवर्तन होते. उदा. आकाश कोसळणे, ऊर फाटणे, आरस्पानी सौंदर्य, आकंठ भोजन, गगनचुंबी इमारत इ.

**८. परभाषेचा प्रभाव** : स्वभाषा व स्वसंस्कृती यांच्या मर्यादेतून दुसऱ्या वेगळ्या वातावरणात प्रवेश करणाऱ्या शब्दांची बाह्यरूपे जशी बदलतात तसे त्यांचे अर्थही बदलतात. उदा. फार्सी भाषेतून आलेल्या 'दर्या' या शब्दाचा अर्थ नदीचा प्रवाह असा आहे. मराठीत मात्र ते समुद्र या अर्थाने रूढ झाला आहे. कधी मूळातील अर्थ उन्नतही होतो. उदा. कानडीतून आलेल्या 'अल्लडू' य शब्दाचा अर्थ उनाड किंवा दंगेखोर असा आहे. मराठीत मात्र बालिश किंवा निरागस या अर्थाने तो रूढ झालेला आहे. परभाषेच्या प्रभावाने कधी-कधी पूर्ण अर्थातही परिवर्तन झालेले दिसते. उदा. समारोह या संस्कृत शब्दाचा अर्थ 'चढणे' किंवा 'सहमत होणे' असा आहे. पण हिंदी भाषेच्या संपर्काने आज तो 'समारंभ' या अर्थाने मराठीत रूढ झाला आहे.

**९. पुनरावृत्ती** : काही वेळा शब्दांची पुनरावृत्ती झाल्यामुळेही अर्थात परिवर्तन घडून येते. उदा. विंध्यालय – येथे विंद्य म्हणजे पर्वत आणि आलय म्हणजेही पर्वतच मात्र विंध्यालय हे पर्वताचे नाव आहे असे आपण म्हणतो. त्याच प्रमाणे पिवळा पितांबर, थंडगार इ. शब्दांत हे परिवर्तन जाणवते.

### ३.६.२ सामाजिक कारणे

**१. बदलते सामाजिक जीवन** : समाजजीवन हे प्रवाही, गतीमान, बदलते असते. समाजातील चालीरीती बदलल्या की त्या दाखविणाऱ्या शब्दांचे अर्थही काळाच्या ओघात बदलतात. उदा. गोधन, चर्मधन इ. आचार–विचारात परिवर्तन होऊन अनेक शब्द भाषेत खिन्न अर्थाने वापरले जातात. उदा. मिक्सर, वॉटर प्युरीफायर, मोबाईल, बॅटरी इ. रामदासांनी 'चळवळ' हा शब्द शारीरिक हालचाली या अर्थाने वापरला, आज त्याचे परिवर्तन राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक चळवळी असे झाले आहे. त्याप्रमाणे ब्रदर, सिस्टर, भाई, साथी, लाल झेंडा, गांधी टोपी, साम्यवाद या शब्दांना नवीन अर्थ प्राप्त झाला आहे.

**२. भाषाबंदी** : कधी–कधी सनातन असा मानवी समाज अर्थपरिवर्तनास कारणीभूत असतो. अनेक गोष्टी सामाजिक श्रद्धेमुळे उघड उघड बोलता येत नाहीत. अशा वेळी समाजात वावरताना काही गोष्टींचा उल्लेख आडवळणाने किंवा सामाजिक संकेतांना अनुसरून केला जातो. उदा. पदर येणे, मुलगी शहाणी होणे या शब्दांतून मुलीचे वयात येणे सांगितले जाते.

**३. नवीन वस्तूंची निर्मिती** : समाजाच्या गरजेप्रमाणे नवीन वस्तूंची निर्मिती होत असते. त्यातून नवीन जीवनपद्धती रूढ होते. त्यातून नव्या शब्दांची निर्मिती होत असते. उदा. दूरदर्शन, आकाशवाणी, गॅस यांचा मूळ अर्थ जरी वेगळा असला, तरी नवीन जीवन पद्धतीत त्यांचे रूढ अर्थ बदललेले आहेत.

**४. वक्ता व श्रोता यांतील विसंवाद** : बोलणाऱ्याने किंवा लिहिणाऱ्याने कोणत्या अर्थाने शब्द वापरला हे ऐकणाऱ्याला किंवा वाचणाऱ्याला कळाले नाही तर त्या शब्दांच्या निश्चित अर्थाबत वाद किंवा गैरसमज निर्माण होतात. त्यातूनही अर्थपरिवर्तन होत असते.

**५. शब्दांचा अतिवापर** : शब्दांचा अतिवापर झाला की, त्याच्यातील अर्थछटा बोथट होऊन, शब्दातील मूळ अर्थ नाहीसा होऊन निव्वळ औपचारिक अर्थ मागे उरतो. उदा. राजमान्य राजश्री, आपला विश्वासू, कुमारी, सौभाग्यवती, वज्रचुडेमंडीत, श्रीयुत इ.

### ३.६.३ मानसिक कारणे

**१. ग्राम्यता परिहार** : माणसांच्या जीवनात काही गोष्टी ग्राम्य, अशिष्ट, दुःखद लज्जास्पद अशा असतात. त्या चारचौघांत बोलू नये असा प्रघात आहे. मात्र त्या मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असल्यामुळे टाळता येत नाहीत. अशा वेळी अशा गोष्टींचा उल्लेख सरळपणे न करता आडवळणाने, काही सभ्य शब्दांत केला जातो. त्यामुळे त्यातील वाच्यार्थ नष्ट होऊन लक्षार्थ, व्यंग्यार्थ स्पष्ट होतो. वाईटाला

चांगला पोशाख चढविण्याच्या या प्रकारास ग्राम्यता परिहार म्हणतात. उदा. तुळस वाळली असे न म्हणता ती द्वारकेला गेली असे म्हणतात. मंगळसूत्र तुटले तर ते वाढले असे म्हणण्याचा प्रघात आहे.

**२. मलशुद्धीचा निर्देश** : कधी-कधी समाजात काही वाईट क्रियांचा उल्लेख वेगळ्याच शब्दांनी केला जातो. अशा वेळी अर्थच्युती होऊन शब्दांच्या अर्थाचे परिवर्तन होते. उदा. आज आपण ज्याला 'परसाकडे जाणे' असे म्हणतात त्याचा मूळ अर्थ परस म्हणजे घराचे मागचे अंगण असा आहे. पण अर्थच्यूतीने त्याला हीन अर्थ प्राप्त झाला आहे. मानवी जीवनातील बिभत्सता, किळसवाणेपणा, घाणेरडेपणा, वाईट गोष्टी अशा आडवळणानेच संगितल्या जातात.

**३. अतिपरिचयांतून अश्लीलता निवारण** : भाषेमध्ये काही शब्द असे असतात की, त्यांच्या अतिपरिचयांमुळे त्यातील ग्राम्यता, अश्लीलता गुळगुळीत होते. समाजात असे शब्द सहज उच्चारले जातात. त्या शब्दांचा मूळातील घाणेरडा अर्थ सभ्य रूप धारण करतो. उदा. साला, बडवा, मादरच्योद, भाडखाऊ असे शब्द त्यातला मूळ अश्लील अर्थ माहीत नसल्यामुळे किंवा त्या शब्दांचा सतत वापर करत असल्यामुळे त्यांचे अर्थपरिवर्तन होते.

**४. साहचर्य तत्त्व** : वस्तू, विचार, कल्पना यांचे साहचर्य फार मोठ्या प्रमाणात अर्थपरिवर्तन घडवत असते.

**(अ) कल्पनाजन्य साहचर्य** : काही परस्पर भिन्न गोष्टीतही कल्पनांचे साहचर्य असू शकते. उदा. अक्कलदाढ, अक्कल जशी माणसाला उशीरा येते, तशी ही दाढ उशीरा येते म्हणून तिला अक्कलदाढ म्हणतात. या ठिकाणी उशीरा येण्याचे कल्पनाजन्य साहचर्य आहे.

**(ब) निकटत्वजन्य साहचर्य** : दोन भिन्न गोष्टी परस्परांच्या निकट सान्निध्यात येतात, तेव्हा त्यांचा मूळ अर्थ भिन्न असला तरी एकमेकांच्या सान्निध्यामुळे वेगळाच अर्थ रूढ होतो. एका वस्तूचा गुणधर्म दुसऱ्या वस्तूला लावला जातो. उदा. गोड गळा, मधूर आवाज, गळ्यातून येतो म्हणून गळ्याला गोडगळा म्हणतात.

**(क) सादृश्यजन्य साहचर्य** : दोन भिन्न गोष्टीत काही तरी साम्य शोधण्याच्या मानवी प्रवृत्तीतून हे परिवर्तन घडून येते. उदा. खाटीक प्राण्यांची चिरफाड करतो. त्याचे हे क्रौर्य लक्षात घेऊन निर्दयी मनुष्यास आपण खाटीक म्हणताते.

**(ड) शाब्दिक साहचर्य** : दोन किंवा अधिक शब्दांच्या दीर्घकाळ सामीप्यामुळे शब्दलोप किंवा अर्थपरिवर्तन होते. उदा. गावभवानी, नगरभवानी यातील भवानी या देवतावाचक शब्दांची अर्थच्युती होऊन त्यांना उठवळ स्त्री असा वाईट अर्थ प्राप्त झाला.

**५. साम्यतत्त्व** : साम्यतत्त्व आणि साहचर्य भावना परस्परांशी संबंध आहेत. देवळातील वाहणीच्या आकारावरून आपण तिला 'गायमुख' म्हणतो. त्याचप्रमाणे सुईचे नाक, टेबलाचा पाय इ. साम्यतत्त्वाचा रूपकादी अलंकाराशी दृढ संबंध आहे. उदा. सिंहकटी, चंद्रमुखी, चाफेकळी नाक इ. अभिव्यक्तीची दुष्करता कमी करून भाषिक सौंदर्य वाढविण्यासाठी जी शब्दरूपे वापरली जातात. त्यातूनही अर्थपरिवर्तन होते. उदा. घनफूट, घनफळ इ. कधी-कधी पौराणिक, ऐतिहासिक व्यक्ती, स्थळे लोकप्रिय होऊन, त्यांचे व्यक्तिगत रूप नष्ट होऊन सर्वसामान्य रूप तयार होते. उदा. कळीचा नारद, पूतनामावशी, हरिश्चंद्राचा अवतार, भीष्मप्रतिज्ञा, सुंदोपसुंदी, बाजीरावी थाट, गोकूळ, गनिमी कावा, भाऊगर्दी, अटकेपार झेंडे रोवणे इ.

वरील कारणांशिवाय बलाघात, श्वास, संस्कृतिसंक्रमण इ. विविध कारणांनी अर्थपरिवर्तन होताना दिसते. अशी विविध कारणे अर्थपरिवर्तनाची असली तरी निश्चित एकाच कारणाने अर्थपरिवर्तन घडते असे आपणास म्हणता येत नाही. कारण ही प्रक्रिया अतिशय मंद गतीने, पिढ्यान्‌पिढ्या चाललेली असते. असे अनेक बदल भाषा स्वीकारून आपला शब्दसंग्रह वाढवत असते आणि त्यामुळेच ती दीर्घकालपर्यंत टिकून राहतेच पण अधिक समृद्धही होते.

## ३.७ अर्थपरिवर्तनाचे प्रकार

सोस्यूर या भाषावैज्ञानिकाने अर्थपरिवर्तनाचे स्थलकाल सापेक्ष आणि सार्वकालिक असे दोन प्रकार सांगितले आहेत. मात्र अर्थपरिवर्तनाचे बहुतेक प्रकार हे सार्वकालिक असल्याचे आपणाला दिसून येते.

अर्थपरिवर्तन प्रामुख्याने दोन प्रकारांनी होते.

### ३.७.१ व्याप्तीस्तर परिवर्तन

भाषेत शब्द निर्माण होताना त्याची अर्थकक्षा निश्चित असते. तेव्हा शब्दाच्या अर्थात बदल होतो, तेव्हा त्याची अर्थकक्षाही बदलत असते. कधी शब्दाच्या अर्थकक्षेचा विस्तार होतो, तर कधी ही कक्षा संकुचितही होत असते. अशा प्रकारे कक्षेनुसार जे अर्थपरिवर्तन होते त्याला व्याप्तीस्तर परिवर्तन असे म्हणतात. याचे प्रकार पुढीलप्रमाणे -

**१. अर्थविस्तार** : एखाद्या शब्दाचा मूळ कोशगत अर्थ मर्यादित असतो. मात्र तो त्या क्षेत्रांपेक्षा अधिक व्यापक अथवा विस्तृत अर्थाने वापरला जाऊ लागला की, त्या शब्दाच्या अर्थाचा विस्तार होतो. म्हणजेच वाच्यार्थाची कक्षा अधिक विस्तृत होते. यालाच अर्थव्याप्ती, कक्षाविस्तार, अर्थविस्तार असे म्हणतात. अनेकदा प्रारंभी शब्द सीमित अर्थाने वापरला जातो. पण माणसाच्या सोयीनुसार शब्दांच्या अर्थाचा विस्तार होतो. अर्थविस्तारात अर्थाचे सामान्यीकरण होते. अर्थविस्तार पुढील कारणांमुळे होतो. अर्थविस्तारात अर्थाचे सामान्यीकरण होते. अर्थविस्तार पुढील कारणांमुळे होतो. **संस्कृत भाषेतील शब्दांचे मराठी भाषेत आगमन झाले की –** उदा. कादंबरी म्हणजे बाणभट्टांच्या एका दीर्घ कथेची नायिका आज मात्र कथात्मक वाङ्मय प्रकारालाच कादंबरी म्हटले जाते. त्याप्रमाणेच कुशल, गोठा, प्रवीण, निपुण इ.

शब्दांचा अर्थविस्तार झाला आहे. **मानवी ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या की,** जुन्या शब्दांचे विशिष्ट अर्थ जाऊन त्यांच्या कक्षा विस्तृत होतात. उदा. अचला या शब्दाचा मूळ अर्थ न हालणारी म्हणजे पृथ्वी असा होता. आज मात्र तो गतीसाठी वापरला जातो. त्याप्रमाणेच भुर्जपत्र, धुळाक्षरे, मुळाक्षरे इ. **परिस्थितीजन्य कारणांनीही** अर्थविस्तार होतो. उदा. व्यासपीठ म्हणजे व्यास ऋषी ज्या पीठावरून बोलत ती जागा. आज तो शब्द कोणाच्याही बोलण्याची जागा असा घेतला जातो. तसेच पेशवाई, मोगलाई, बारभाईचे कारस्थान इ. **व्यवसाय व हुद्दा यावरून** काही आडनावे पडली. पुढे त्यांच्यातील मूळ अर्थ नष्ट होऊन त्याला साधारण अर्थ प्राप्त झाल. उदा. गडकरी म्हणजे गडावरील अधिकारी. आज ते आडनाव झाले आहे. भालदार, चोपदार, सरदेशमुख, देसाई, पाटील इ. **दोन शब्द एकत्र येऊन जेव्हा सामासिक शब्द** बनतो तेव्हा मूळ अर्थ जाऊन वेगळाच अर्थ प्राप्त होतो. उदा. भाजीभाकरी, पीकपाणी, कपडालत्ता, जमवाजमव, खाडाखोड इ. कधी-कधी शब्दांचे संदर्भानुसार अर्थपरिवर्तन होते. उदा. कूळ शेतीच्या संदर्भात जमीन कसणारा, वकिलाच्या संदर्भात पक्षकार, सावकाराच्या संदर्भात ऋणको, राज्य व्यवस्थेत सरकारला सारा देणारा. **लक्षणा** हे एक महत्त्वाचे अर्थपरिवर्तक आहे. कधी-कधी शब्दातील वाच्यार्थ जाऊन व्यवहारात सामान्य अर्थ प्राप्त होतो. उदा. मी दोन शब्द बोलतो. पंचपक्वान्नांचे जेवण, दोन ओळीचे पत्र इ. **रूपकांमुळेही** अर्थपरिवर्तन होते. उदा. आंधळा न्याय, श्रवणाच्या जिभा, गळ टाकणे, इंगा दाखविणे, गुलजार इ. **शब्दसिद्धीमुळेही** अर्थविस्तार होतो. उदा. कारखाना, गुन्हेगार, धुलाई, सकस इ.

**२. अर्थसंकोच** : अनेकदा शब्दाच्या मूळ अर्थाचा संकोच होतो. सामर्थ्य अर्थाने वापरला जाणारा शब्द विशेष अर्थाने वापरला जातो. या प्रकारात अर्थाचे विशेषीकरण होते. अर्थविस्ताराच्या उलट ही क्रिया घडते. अर्थसंकोचाने शब्दाचा विस्तृत व व्यापक अर्थ मर्यादित होतो. उदा. पंकज म्हणजे चिखलात जे जे जन्मले ते ते सर्व. पण आज पंकज म्हणजे कमळ असा त्याचा अर्थसंकोच झाला आहे. **शास्त्रीय परिभाषेत** अर्थसंकोचाची अनेक उदाहरणे आढळतात. उदा. विग्रह, संधी, रस या शब्दांचा अर्थ विविध शास्त्रांत वेगवेगळा आढळतो. **व्यापक क्षेत्रांतील शब्द जेव्हा व्यावसायिक आपल्या मर्यादित क्षेत्रांत** वापरू लागतात. तेव्हा अर्थसंकोच होतो. उदा. पंखा - घिसाडी, गवंडी, पिंजारी इ. या व्यवसायानुरूप पंखा या शब्दाचे वेगवेगळे अर्थ आहेत. अर्थसंकोच **भाषेच्या आंतरिक वैशिष्ट्यातून** निर्माण होतात. त्याच्यावर सामासिक शब्द घटनेचा प्रभाव पडतो. उदा. शतपावली, पुण्यतिथी, पितांबर, महायात्रा इ. **बाह्य परिस्थिती** बदलली की शब्दाचा संकोच होतो. उदा. चळवळ म्हणजे हालचाल आज आंदोलन असा अर्थ, कार्यकर्ता म्हणजे भक्त आज कार्य करणारा असा अर्थ. **जुने शब्द, नव्या अर्थाने** वापरले की अर्थसंकोच होतो. उदा. हरिजन इ. शब्दास जोडलेल्या एखाद्या अवयवाचा लोप होऊन अर्थसंकोच होतो. उदा. जगन्नाथपुरी ऐवजी पुरी, अहमदनगर ऐवजी नगर इ. परभाषेतील शब्द स्वभाषेत आल्यास जुन्या शब्दांचा अर्थ दुर्बल होऊन ते मर्यादित अर्थाचे द्योतक बनतात. उदा. घर-बंगला, तळ-स्टँड, वैद्य-डॉक्टर इ.

**३. अर्थसार** : काही शब्दांचा वापर त्यात समाविष्ट होणाऱ्या सर्व शब्दासह केला जातो. म्हणजेच हे घटकशब्द स्वतंत्रपणे व्यक्त होणाऱ्या अर्थाहून कितीतरी व्यापक अर्थ व्यक्त करतात. अशा शब्दांतून

मुळातील विस्तृत अर्थ साररूपाने सांगितला जातो. उदा. अठरा विश्व दारिद्र्य, नरो वा कुंजरो वा, ग्यानबाची मेख इ. त्याचप्रमाणे उजाडणे, मावळणे, पचणे, वारी इ. या प्रमाणेच विविध कंपन्यांची, जाहिरातींची घोषवाक्य, ध्येयवाक्य अर्थसाराचीच उदाहरणे आहेत.

### ३.७.२ मूल्यस्तर परिवर्तन

प्रत्येक शब्दार्थाला एक मूल्य असते. काही वेळा शब्दार्थांचे हे मूल्य कमी-जास्त होते. अनेकदा शब्द तटस्थ अर्थाने वापरले जातात. परंतु अर्थपरिवर्तन होताना त्यांना चांगला किंवा वाईट अर्थ चिकटवला जातो. शब्दाचे मूल्य आणि स्तर बदलले जातात. त्याचे पुढील प्रकार पडतात.

**१. अर्थप्रशस्ती** : या प्रकारात शब्दांचा मूळ अर्थ बाजूला राहून मूळ अर्थापेक्षा उन्नत असा अर्थ शब्दाला प्राप्त होतो. शब्दाच्या मूलअर्थामधील हीनत्व नष्ट होते किंवा मुळातच चांगला असणारा अर्थ अधिक चांगला होतो. अर्थप्रशस्ती विविध कारणांनी होते. **साहचर्य –** कुंकू पुसणे, कुंकू वाढविणे इ. **शब्दसिद्धी –** पाणीदार, टोलेजंग, मायाळू, ठीकठाक, पोटतिडीक इ. **परिस्थितीत बदल –** विधवा, सुधारक इ. **शब्दांच्या अनाठायी, अतिरिक्त व अतिशयोक्त वापराने** – भयंकर या शब्दाचा मूळ अर्थ भीतीदायक पण आज त्यातील भयाची छटा निघून गेली आहे. उदा. भयंकर सुंदर, भयंकर आवडला इ. **लक्षणेनेही अर्थप्रशस्ती** होते. उदा. कुशल, गोठा, तळहातावरचा फोड इ. उत्कट प्रीती भावनेतून लहान मुलांना लबाड, लुच्चा, गुलामा, चोरा असे म्हणतात. तेव्हा अर्थप्रशस्तीच होते.

**२. अर्थच्युती** : अर्थच्युती म्हणजे मूळ शब्दाच्या अर्थाची अवनती किंवा कालांतराने हीनत्वाकडे वळणे होय. मूळ शब्दाचा अर्थ वरच्या दर्जाचा असला तरी भाषिक असे शब्द; अनिष्ट प्रकारावर पांघरुण घालण्याच्या सवयीने, काहीशा दर्जाहीन अर्थाच्या स्वरूपात वापरू लागतो. अशा परिवर्तनास त्या शब्दाच्या अर्थाची घसरण, च्युती होते. अर्थच्युती होताना काही शब्दातील मूळची हीनत्वाची छटा अधिक तीव्र होते. तर काही शब्दार्थांना ती प्राप्त होते. अर्थच्युती निरनिराळ्या कारणांनी होते. **ग्राम्यता टाळण्यासाठी** उदा. मलशुद्धीचा उल्लेख करताना शौचास, परसदारी, संडासला जाणे असा केला जातो. काही गोष्टी वास्तव रूपात बोलायच्या नसतात अशी **समाजमनाची धारणा** असते. अशा वेळी वेगवेगळे पर्याय वापरले जातात. उदा. मृत्यूचा उल्लेख कालवश होणे, देवाज्ञा झाली, कैलासवासी झाले इ. **शब्द लक्ष्यार्थाने वापरल्यास** अर्थाची च्युती होते. उदा. भवानी, चंडिका हे देवता वाचक शब्द पण आज त्याचा अर्थ कजाग, भांडकुदळ स्त्री असा घेतला जातो. **साहचर्यामुळेही** अर्थच्युती होते. उदा. शिमगा, खाटीक, बाजार इ. **परिस्थिती बदलली** की समाजाच्या कल्पना आणि त्याला अनुसरून असलेल्या शब्दांच्या अर्थात बदल होतो. उदा. महानुभाव, गुरू दक्षिणा इ. याचप्रमाणे शब्दसिद्धी, तिरस्कार, व्याजोक्ती, रूपकात्मकता, वाक्यप्रचार इ. कारणांनीही अर्थच्युती होत असते.

**३. अर्थभ्रंश** : अर्थभ्रंश म्हणजे सौम्य स्वरूपाची अर्थच्युतीच असते. मूळचा भव्योदात्त अर्थ भ्रष्ट होऊन सर्वसामान्य व्यवहारात तो शब्द किंवा शब्दबंधाचा वापर होऊ लागतो. अतिशयोक्ती, औपचारिकता

यामुळे शब्दार्थास हीनता येत नसली तर त्याची पातळी अर्थदृष्ट्या घसरते. अर्थभ्रंश विविध कारणांनी होतो. शब्दांचा अनाठाई व अतिशयोक्तीपूर्ण वापर करण्याची भाषिकाची प्रवृत्ती. उदा. आकंठ भोजन, डोक्यावर बसणे, मुसळधार पाऊस इ. समाजजीवनाची जीवनमूल्ये, श्रद्धा, संकेत बदलले की त्या व्यक्त करणाऱ्या शब्दांचा भ्रम होतो. उदा. गुरू, गुरव, वकील इ. शब्दांचे सामान्यीकरण झाले की अर्थाचे अस्तित्व नष्ट होते. उदा. राजबिंडा, बादशाही स्वागत इ. कधी-कधी शब्दांच्या मूलअर्थाशी सर्वस्वी विरुद्ध असा भ्रष्ट अर्थ रूढ होतो. उदा. इरसाल, अपरोक्ष, अचपळ, आजन्म इ. केवळ शिष्टाचार, रूढी म्हणून काही वेळा शब्दांचा वापर होतो तेव्हा अर्थभ्रंश होतो. उदा. राजमान्य राजश्री, अखंड सौभाग्यवती, आपला आज्ञाधारक इ. उपरोधाने आणि विनोदाने शब्द वापरल्यास उदा. सोवळा, गंडा घालणे इ. अवधानाने आणि निष्काळजीपणे शब्द वापरल्यास उदा. देखावा भयंकर सुंदर होता. इ.

४. **अर्थापकर्ष** : बोलण्याच्या ओघात किंवा अज्ञानामुळे काही शब्दांचा चांगला अर्थ निघून जातो. आपण त्या शब्दांचा वाईट अर्थच गृहीत धरून त्याचा वापर करत असतो. अशा वेळी होणाऱ्या अर्थपरिवर्तनाला अर्थापकर्ष म्हणतात. दारू म्हणजे औषध पण आज त्याला घाणेरडे पेय असा अर्थ प्राप्त झाला आहे. त्याप्रमाणेच कलावंती, श्यालक, अवतार, भद्रीकरण, अकलमंद, असूर या शब्दांचेही अर्थापकर्षाने अर्थपरिवर्तन झाले आहे.

५. **अर्थादेश** : जेव्हा शब्दाचा मूळ कोशात अर्थ पूर्णपणे बदलून एकदम नवीन अर्थ भाषिकांकडून स्वीकारला जातो तेव्हा होणाऱ्या अर्थपरिवर्तनास अर्थादेश असे म्हणतात. उदा. गाव या शब्दावरून गावठी म्हणजे गावात राहणारा ग्रामीण मनुष्य असा शब्द तयार झाला. परंतु गावठी म्हणजे अडाणी असा अर्थ रूढ झालेला दिसून येतो.

६. **अर्थांतर** : शब्द जेव्हा जुन्या भाषिक संदर्भाचा त्याग करून संपूर्णपणे नव्या भाषिक संदर्भात वापरला जातो तेव्हा अर्थांतर होते. अर्थादेश व अर्थांतर यात सूक्ष्म भेद आहे. अर्थादेशात जुना भाषिक संदर्भ सुटत नाही. या अर्थपरिवर्तनात प्रथम अर्थविस्तार होतो व नंतर अर्थ संकोच होताना जुना संदर्भ नाहीसा होतो. उदा. मीट या इंग्रजी शब्दाचा पूर्वी खाद्यपदार्थ व नंतर मांस असा अर्थ झाला. आज मात्र तो फक्त प्राण्यांचा मांस या अर्थीच वापरला जातो. 'सुतक' हा शब्द बालकाच्या जन्मामुळे येणारी अशुद्धी अशा अर्थाने वापरला जात होता. नंतर जन्म आणि मृत्यू या दोन्ही वेळी तो वापरला जाऊ लागला. पण आज तो मृत्युमुळे येणारी अशुद्धी या अर्थानेच वापरला जातो.

७. **अर्थभेद** : कोणत्याही भाषेत हा अर्थपरिवर्तनाचा प्रकार आढळत असतो. प्रचलित भाषेमध्ये दोन निरनिराळ्या कल्पना एकच शब्द व्यक्त करतात, तेव्हा त्या शब्दात अर्थभेद असतो. उदा. लीला म्हणजे भगवंताची आणि लीळा म्हणजे चक्रधर स्वामींची असते. निर्वाण, मोक्ष, स्वर्ग एकाच अर्थाचे असणारे हे शब्द बुद्धी, ज्ञान, सामान्यजन यांच्या संदर्भात वापरले जातात. **वस्तुस्थिती दर्शक अर्थभेद,** झोपाळा-

हिंदोळा, कांबळे-धोंगडे, लुगडे-पातळ, इ. घर-बंगला, खानावळ-हॉटेल, न्हाणीघर-बाथरूम, वैद्य-डॉक्टर या शब्दांत परभाषेच्या संपर्काने अर्थभेद आला आहे. कधी-कधी व्यावहारिक सोयीसाठी दोन शब्दांत अर्थभेद मानावा लागतो. उदा. फूलपात्र-पुष्पपात्र.

अशा विविध प्रकारांनी अर्थपरिवर्तन भाषेत होत असते. हे होणारे परिवर्तन लगेच ताबडतोब घडते असे नव्हे तर ते हळूहळू घडत असते. अर्थपरिवर्तनामुळे भाषा अधिक समृद्ध होते. त्याबरोबरच स्वभाषेत नसणारे वर्ण आपल्या भाषेत प्रवेश करतात. त्यामुळे भाषा जिवंत राहून तिची वाढ होते. संपूर्ण भाषिक समाजाची मान्यता मिळाल्याशिवाय अर्थातील कोणताही बदल त्या समाजाची भाषा स्वीकारत नाही. अर्थप्रकारानुसार काही वेळा अर्थपरिवर्तनाचे प्रकार होत असतात. अर्थ बदलला की नवा प्रकार उदयाला येतो. अर्थपरिवर्तनाचे वरील प्रकार असले तरी आणखीही काही प्रकार संभवतात. समाजाच्या भाषिक सवयीने आणि संस्कृती व भाषांच्या संपर्काने अर्थपरिवर्तन घडताना दिसते.

**३.७ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

**३.७.१ योग्य पर्याय निवडा.**

१. भाषिक उच्चाराची मानसिक प्रतीती म्हणजे त्याचा ......... होय.

(अ) अर्थ (ब) समन्वय (क) ध्वनी

२. 'अर्थ म्हणजे संकल्पना' अशी व्याख्या ......... यांनी सांगितली.

(अ) कृ. पा. कुलकर्णी (ब) नोम चॉम्स्की (क) सोस्यूर

३. 'हनुमान' या अर्थाच्या दृष्टीने शब्दाचा ......... प्रकार आहे.

(अ) रूढ शद (ब) यौगिक शब्द (क) योगरूढ शब्द.

४. रूपकजन्य अर्थपरिवर्तनाचे ......... हे उदाहरण आहे.

(अ) वेणीफेणी (ब) उचलबांगडी (क) घरकोंबडा

५. अर्थविज्ञानाचा उद्‌गाता ......... यांना म्हटले जाते.

(अ) सोस्यूर (ब) मायकेल ब्रेआल (क) उल्मान

६. डॉ. अशोक केळकर यांनी अर्थपरिवर्तनास ......... मराठी पर्याय सुचविला.

(अ) अर्थविन्यास (ब) अर्थविचार (क) अर्थविज्ञान

७. १९३३ साली प्रकाशित झालेल्या 'लँग्विज' या पुस्तकाचे लेखक ......... आहेत.

(अ) उल्मान (ब) ब्लूमफील्ड (क) गं. ना. जोगळेकर

८. 'दोन ओळीचे पत्र' हे ......... अर्थपरिवर्तनाच्या प्रकाराचे उदाहरण आहे.

(अ) अर्थविस्तार (ब) अर्थसंकोच (क) अर्थच्युती

९. ......... प्रकारात अर्थाचे विशेषीकरण होते.

(अ) अर्थसार (ब) अर्थसंकोच (क) अर्थभ्रंश

१०.आत्मप्रत्ययांद्वारा येणारी प्रचिती ......... तून येते.

(अ) स्वानुभवातून (ब) दुसऱ्याच्या अनुभवातून (क) त्रयस्थ अनुभवातून

**उत्तरे** : १-अ, २-क, ३-क, ४-ब, ५-ब,

६-अ, ७-ब, ८-अ, ९-ब, १०-अ.

**३.७.२ दीर्घोत्तरी प्रश्न**

१. 'अर्थ' म्हणजे काय ? अर्थपरिवर्तनाचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

२. अर्थपरिवर्तनाची कारणे सांगा.

**३.७.३ लघुत्तरी प्रश्न**

१. अर्थाचे स्वरूप थोडक्यात विशद करून त्याच्या व्याख्या लिहा.

२. शब्दांचे अर्थदृष्ट्या प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

३. अर्थनिर्मितीच्या तीन प्रमुख शक्तींचे सोदाहरण स्पष्टीकरण द्या.

४. शब्दांना अर्थ कसा प्राप्त होतो ? ते सांगा.

५. अर्थविस्तार आणि अर्थसंकोच कसा होतो ? सोदाहरण सांगा.

**३.७.४ टिपा लिहा.**

१. अर्थविस्तार

२. अर्थच्युती

३. साहचर्य तत्त्व

४. बदलते सामाजिक जीवन

५. अर्थभेद

### ३.८ समारोप

भाषेत होणारे परिवर्तन हे संथ गतीने सतत होत असते. कालानुरूप तिच्यात बदल होत राहतात. अर्थपरिवर्तनामुळे भाषा अधिक समृद्ध होते. स्वभाषेत नसणारे अनेक वर्ण परभाषेतून आदान-प्रदान प्रक्रियेतून भाषेत येत राहतात. हा बदल भाषा स्वीकारते. त्यामुळे भाषा जिवंत राहून तिच्यात वाढ होते. संपूर्ण समाजाची मान्यता मिळाल्याशिवाय अर्थातील कोणताही बदल त्या समाजाची भाषा स्वीकारत नाही. त्यामुळे अर्थपरिवर्तन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. या घटकाचा अभ्यास केल्यानंतर याची जाणीव आपणाला होते.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. र. रा. गोसावी : मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

२. डॉ. प्र. न. जोशी : सुबोध भाषाशास्त्र, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

३. डॉ. अनिल गवळी, भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर.

४. डॉ. वसंत कुबेर, डॉ. सुलक्षणा कुलकर्णी : भाषाविज्ञान परिचय फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. श्री. न. गजेंद्रगडकर, भाषा आणि भाषाशास्त्र, व्हीनस प्रकाशन, पुणे

६. डॉ. महेंद्र कदम : मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान, स्नेहवर्धन प्रकाशनत, पुणे.

७. संपा. स. ग. मालशे, हे. वि. इनामदार, अंजली सामेन : भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

**उपक्रम**

१. आपल्या परिसरातील मूळ शब्द व त्याचे अर्थपरिवर्तन झालेले शब्द यांचे संकलन करा.

## घटक – ४

# प्रमाण मराठी भाषा आणि तिच्या बोली

### ४.० उद्दिष्टे

- प्रमाणभाषेचे स्वरूप व विशेष अभ्यासणे.
- बोलींचे स्वरूप व विशेष समजून घेणे.
- बोली अभ्यासाचे महत्त्व समजून घेणे.
- बोली वैविध्यांचा अभ्यास करणे.
- प्रमाणभाषा आणि बोली परस्परसंबंध अभ्यासणे.
- मराठी भाषा व बोलींचे समाजातील स्थान समजून घेणे.

### ४.१ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. जगाती प्रत्येक देशामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. त्यांची संख्या प्रचंड आहे. जगातील एकूण देशांच्या संख्येत भाषांची संख्या अधिक आहे. कारण एका देशात एकच भाषा बोलली जात नसून त्याचे प्रतिक भाषाभेद मोठ्या प्रमाणात आढळून येतात. आपल्या एकट्या भारत देशात मराठी, गुजराती, तेलगू, कन्नड, मल्ल्याळम्, तमिळ, पंजाबी, सिंधी, हिंदी, ओरिया, बंगाली, आसामी यांसारख्या अनेक भाषा बोलल्या जातात. यातील प्रत्येक भाषा एकमेकींपासून वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे एकच भाषा बोलणाऱ्या व्यक्तीला दुसरी भाषा समजण्यासाठी व बोलण्यासाठी ती मुद्दाम शिकावी लागते. प्रत्येक भाषेतील उच्चारण, व्याकरण व शब्दसंग्रह यात भिन्नत्व असते. या भिन्नत्वामुळे आणि आकलनातील अडथळ्यांमुळे दोन भाषेतील भिन्नता सहज लक्षात येते.

एक भाषा दुसऱ्या भाषेपेक्षा भिन्न असते, हे आपण सहज मान्य करतो. परंतु कोणत्याही एका भाषेतील अनेक प्रकारचे भेद आपण सहजासहजी मान्य करत नाही, ही वस्तुस्थिती आहे. आपल्या मराठी भाषेचे उदाहरण घेतल्यास वस्तुस्थिती लक्षात येईल. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील काही प्रांतात मराठी भाषा बोलली जाते. ती एकाच प्रकारची बोलली जात नाही. उदा. खानदेश, वऱ्हाड, कोकण, कोल्हापूर, पुणे, ग्वाल्हेर, इंदौर, विजापूर, बेळगांव, हैद्राबाद, बडोदा अशा निरनिराळ्या ठिकाणी मराठी भाषा वेगवेगळ्या स्वरूपाची बोलली जाते. असे भाषाभेद प्रत्येक भाषेत पहावयास मिळतात.

एखाद्या विशिष्ट प्रदेशात राहणारे लोकही एकसारखी भाषा बोलत नाहीत. समाजातील माणसांच्या वय व लिंग भेदामुळे, सामाजिक प्रतिष्ठेमुळे, व्यवसाय, वर्ण-जाती, विभिन्न गट पडलेले असतात. या विभिन्न गटाचा परिणाम भाषेवर होतो. परिणामी समाजातील एका गटाची भाषा दुसऱ्या गटाच्या भाषेपेक्षा थोडीफार वेगळी होते. म्हणजेच सामाजिक आणि भौगोलिक अंतरामुळे एकाच भाषेची भिन्न-भिन्न रूपे तयार होताघ. परंतु या भाषा भिन्नतेत वावरणाऱ्यांच्या मनात मात्र आपण सर्व एकसंघ समाजाचे घटक आहोत. अशी एकत्वाची भावना ठायी-ठायी रुजलेली असते. अशा पद्धतीची भाषेची आंतरबाह्य प्रक्रिया घडत असते. याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत. प्रमाण मराठी भाषाची संकल्पना स्वरूप व विशेष याचा अभ्यास करणार आहोत. तसेच मराठी बोली कशा निर्माण होतात ? बोलींचे महत्त्व काय ? मराठी कोण-कोणत्या बोली आहेत ? त्यातील निवडक बोलींच्या स्वरूप व विशेषांचा आढावा घेणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

महाराष्ट्रात एकाच प्रकारची 'मराठी' ही भाषा सर्वत्र बोलली जात असली तरी वेगवेगळ्या भागातील लोक निरनिराळ्या भाषा बोलतात. वेगवेगळ्या समाजातील लोकांच्या भाषेत फरक दिसून येतो. त्यालाच आपण बोली म्हणतो. अशा अनेक बोलींना समाविष्ट करून घेणारी प्रमाणभाषा असते. परंतु बोली ही प्रमाणभाषेपेक्षा कितीतरी अधिक परिवर्तनशील असते. त्यामुळे समाजातील बदल ती नैसर्गिकपणे स्वीकारताना दिसते. महाराष्ट्रभर मराठीच्या सत्तरहून अधिक बोली आहेत. यापैकी काही बोलींचा अभ्यास झाला आहे, तर काही बोली अद्याप प्रकाशातही आलेल्या नाहीत. परंतु, अलीकडच्या काही वर्षांमध्ये खेडापाडी वास्तव्य असलेल्या अनेक जाती, धर्मातील, विविध धंदा-व्यवसाय करणाऱ्या लेखकांकडून आणि काही जमातीमधील सुशिक्षित लोकांच्याकडून साहित्यनिर्मितीची प्रक्रिया सुरू झालेली आहे. वेगवेगळ्या स्तरातून लिहित्या झालेल्या लेखकांकडून या अप्रकाशित बोली सर्वांसमोर येत आहेत. मराठी भाषेचे स्वरूप समजून घेण्यासाठी तिच्या सर्व बोलींचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

कोणत्याही समाजाची बोली एक सामाजिक, सांस्कृतिक संचित असते. बोलीतूनच आपल्या परंपरा, श्रद्धा, रितीरिवाज, पुढील पिढीकडे संक्रमित होतात. जागतिकीकरणानंतर समाजातील वेगवान बदल विचारात घेतले तर अनेक बोलींचे अस्तित्व धोक्यात असल्याचे दिसते. त्यामुळे आज बोली अभ्यासाला विशेष महत्त्व दिले गेले पाहिजे. महाराष्ट्राची सांस्कृतिक विविधता, चालीरिती, जीवनपद्धती, भौगोलिक विविधता इत्यादीच्या अनुषंगाने नवी माहिती उपलब्ध होईल. पर्यायाने मराठी भाषेच्या विकासाला चालना मिळेल या सर्व गोष्टींचा विचार करता प्रमाण मराठी भाषेचे स्वरूप लक्षात घेऊन बोली अभ्यासाचे महत्त्व जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

## ४.३ प्रमाण मराठी भाषा : संकल्पना

एका विस्तृत प्रदेशात बोलली जाणारी भाषा जी भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक कारणांमुळे निर्माण झालेल्या भाषा-भेदांना सामावून घेणारी आणि समाजाकडून लेखन व्यवहारासाठी स्वीकारली गेलेली भाषा म्हणजे प्रमाणभाषा म्हणता येईल.

'गाय' हा शब्द उच्चारल्यावर आपल्याला गायीची उंची, रंग, आकार आणि प्रकार (खडकी किंवा जर्सी / संकरित) असे किती तरी फरक जाणवत असले तरी हे सर्व मिळून 'गो'त्व तयार होते. त्यालाच गाय मानले जाते गाय म्हटल्यावर एक विशिष्ट गाय अपेक्षित नसून ठरावीक गुण असणारा सर्वसाधारण प्राणी म्हणजे गाय असे आपण गृहीत धरतो. भाषेचेही असेच आहे. सर्वच भाषा प्रथम बोली असतात. त्यातील जास्तीत जास्त समान धागे ज्या भाषेशी जुळतात तिला प्रमाणभाषा म्हणून संबोधले जाते. 'डॉ. दत्तात्रय पुंडे' यांनी 'मराठी भाषिक अभ्यास'मधून प्रमाणभाषा आणि बोली यातील साम्यत्व दाखविण्यासाठी वऱ्हाडी बोली आणि पुणेरी बोली यातील उच्चार, शब्दसंग्रह आणि व्याकरण या तीन घटकांच्या संदर्भात तुलना मांडलेली आहे. ती पुढीलप्रमाणे :

| | **वऱ्हाडी बोली** | **पुणेरी बोली** |
|---|---|---|
| १. उच्चार | आगुदर | अगोदर |
| | वसरी | ओसरी |
| | जुंधळा | जोंधळा |
| | तरा | तऱ्हा |
| | डोया | डोळा |
| | दुड्डी | दुरडी |
| | खिसकी | खिचडी |
| **२. शब्दसंग्रह** | गोड | मीठ |
| | दाबका | सापळा |
| | माजरी | किसनी |
| | साळी | मेहुणी |
| | हाड्या | कावळा |
| | गदादणे | उकाडा होणे |
| | भेटणे | मिळणे |

| | | |
|---|---|---|
| **३. व्याकरण** | द्वितीया-चतुर्थी प्रत्यय 'ले' | द्वितीया-चतुर्थी प्रत्यय 'ला' |
| | उदा. मले, गोविंदाले, मानसाले | उदा. मला, गोविंदाला, माणसाला |
| | 'हो' या धातूचे | 'हो' या धातूचे |
| | प्रथमपुरुषी एकवचनी रूप | प्रथमपुरुषी एकवचनी रूप |
| | मी आहो | मी आहे |
| | साहाय्यक धातू म्हणून | साहाय्यक धातू म्हणून |
| | 'राह'चा उपयोग | 'अस'चा उपयोग |
| | करून राह्यला | करीत आहे |
| | निजून राह्यला | निजला आहे |

वरील नमुनादर्शक तुलनेतून पुणेरी माणसाला वऱ्हाडी बोली अथवा वऱ्हाडी माणसाला पुणेरी बोली किंचित फरकाने निश्चित कळेल. उच्चारातील भेद सवयीने आत्मसात होतील. वऱ्हाडी आणि पुणेरीचा शब्दसंग्रह बराचसा समानच आहे. व्याकरणातील भेदही थोड्याफार प्रयत्नाने कळतील असे वाटते. त्यामुळे दोन्ही बोली आकलन कक्षेत येणाऱ्या आहेत. अशाच पद्धतीने एकाच भाषेच्या विविध बोली सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक, व्यवसाय, धर्म, जात, वर्ग, लिंग यांसारख्या विविध कारणांमुळे सर्वसामावेशक असे रूप धारण करून प्रमाणभाषा म्हणून मान्यता पावते. व्यवहाराच्या सोयीसाठी सर्वच स्थानिक बोलींना समान वाटणारी आणि सर्व बोली भाषिकांना आकलन होणारी एखादी बोली प्रमाणभाषा म्हणून मध्यवर्ती स्थान मिळविते. या संदर्भात डॉ. विजया चिटणीस, माडगूळकर म्हणतात, ''एका विशिष्ट भौगोलिक मर्यादेत आपल्या अनेक प्रकारच्या स्थानिक किंवा वर्गीय भेदांनी आणि रूपांनी आपल्या नजरेसमोर येते ती वास्तव पण अमूर्त तात्त्विक विनिमयशक्ती म्हणजे भाषा'' (आधुनिक भाषाविज्ञान, संपा. डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण, पृ. २०६) मराठीच्या बाबतीत पुणेरी बोलीला प्रमाण भाषेचे मध्यवर्ती स्थान मिळालेले आहे.

प्रमाणभाषा संकल्पनेबाबत भाषावैज्ञानिकांनी काही मते वेगवेगळ्या रीतीने स्पष्ट केलेली आहेत. त्यांचा परामर्श पुढीलप्रमाणे -

१. काही भाषावैज्ञानिक प्रमाणभाषा ही एक कल्पना आहे असे मत मांडतात. साम्यभेद दर्शविणाऱ्या काही बोलींच्या समूहाला लावली जाणारी अशी ही कल्पना आहे. एकमेकांच्या खूप जवळ असणाऱ्या बोलींची बेरीज म्हणजे प्रमाणभाषा असे भाषावैज्ञानिक मानतात. एकच ऐतिहासिक परंपरा असणाऱ्या लोकांच्या बोली ह्या वेगवेगळ्या असतात. त्यामध्ये बरेच साम्य व काही भेदही असतात. हे भेद बऱ्याचदा अतिशय नियमित वाटावेत अशा स्वरूपाचे असतात. अशा बोलींचे एकत्व निर्देशित करणारी भाषा म्हणजे प्रमाणभाषा.

२. काही भाषावैज्ञानिकांच्या मते प्रमाणभाषा ही एक आदर्श अशी बोली आहे. उच्चार, व्याकरण व शब्दसंग्रह याबाबतीत तिच्यापेक्षा थोडेफार भिन्नत्व असणाऱ्या व इतर बोली बोलणारे लोक त्या आदर्श बोलीला मान्यता देऊन तिचा प्रमाणभाषा म्हणून स्वीकार करतात.

३. तिसरे असे मत आहे की, थोडेफार भिन्नत्व असणाऱ्या एकमेकींच्या जवळ असणाऱ्या आणि एकच इतिहासपरंपरा असणाऱ्या बोलींचा समूह वाङ्मयनिर्मिती, लेखनव्यवहार, शिक्षण व सांस्कृतिक संचिताची जपणूक यासाठी ज्या भाषेचा किंवा बोलीचा वापर केला जातो त्याला प्रमाणभाषा म्हटले आहे.

४. भाषावैज्ञानिकांचे पूर्वापार चालत आलेले एक मत म्हणजे प्रमाणभाषा ही समाजाची सर्वसामान्य भाषा असते. समाजातील एखाद्या घटकाकडूनच तिचा विशिष्ट वापर केला जात असताना या सर्वसामान्य भाषेच्या रूपात आवश्यक ते बदल करून घेतले जातात. असे बदल झालेले भाषिक रूप म्हणजे बोली आणि मूळ सर्वसामान्य भाषा म्हणजे प्रमाणभाषा होय.

वरील भाषावैज्ञानिकांच्या प्रमाणभाषेविषयकतेच्या मतांवरून प्रमाणभाषा आणि तिच्या आश्रयाने वावरणाऱ्या विविध बोलींच्या वेगवेगळ्या संबंधावर भर देऊन वरील मते तयार झालेली आहेत हे लक्षात येते.

### ४.३.१ प्रमाणभाषेच्या व्याख्या

प्रमाणभाषेच्या संकल्पनेविषयकतेच्या मतांचा विचार करता प्रमाणभाषेची अशी एकच एक व्याख्या देता येणे कठीण आहे. **'डेव्हिड क्रिस्टल'** यांनी 'A dictionary of Linguistics and Phonetics' मध्ये प्रमाणभाषेचे वर्णन केलेले आहे. ते सारांश रूपाने असे सांगता येईल की, प्रमाणभाषा ही सुप्रतिष्ठित अशी एक बोली असून तिच्यावर संज्ञापन, शिक्षण, भाषाव्यवस्थापन अशा समाजाला साहाय्य करणाऱ्या विविध जबाबदाऱ्या असतात. **(मराठीचा भाषिक अभ्यास : संपा. डॉ. मु. श्री. कानडे, पृ. १९९)**

प्रमाणभाषेच्या अभ्यासकांनी काही व्याख्या केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे पाहू :

१. ''एक भाषिक समाजातील सर्व व्यक्तींना बव्हंशी समजली जाणारी, समाजातील शिष्ट लोकांनी लेखनासाठी मान्य केलेली भाषा प्रमाणभाषा म्हटली जाते ते शिष्टमान्य लेखन ज्या भाषेसाठी केले जाते ती प्रमाणभाषा होय.'' – **सुहासिनी लद्दू**

२. ''मुख्य भाषा जी मध्यवर्ती भाषा असते, ज्या भाषेत ग्रंथनिर्मिती होते आणि ती भाषा बोलणाऱ्या सर्व समाजातील घटकाने तिला मान्यता दिलेली असते. त्या भाषेला प्रमाणभाषा असे म्हणतात.'' – **श्री. दादा गोरे**

३. ''ऐतिहासिक परंपरा आणि रूढी यांना अनुसरून सामान्यतः कोणत्याही प्रदेशातील वा राज्यातील मुख्य नगरामधील सुशिक्षितांच्या बोलण्याला 'प्रमाणभाषा' हा शब्द योजला जातो.'' – **सौ. विशाखा व्यवहारे**

४. ''जी बोली सार्वजनिक व्यवहार, लिखित साहित्याची निर्मिती इत्यादी कामासाठी वापरायला इतर बोली बोलणारे लोक तयार असतात; अशी बोली म्हणजे प्रमाणभाषा होय.'' **– डॉ. जयश्री पाटणकर**

५. ''एका विस्तृत प्रदेशात बोलली जाणारी, अनेक बोली भेदांना व स्थानिक भेदांना समाविष्ट करून घेणारी राजकारण, समाजकारण, संस्कृती व शिक्षण या क्षेत्रांमध्ये वापरली जाणारी आणि समाजाकडून लेखन व्यवहारासाठी स्वीकारली गेलेली भाषा म्हणजे प्रमाणभाषा होय.'' **– डॉ. मु. श्री. कानडे. (समाजभाषाविज्ञान : बोलीचा अभ्यास – डॉ. सुधाकर चौधरी, पृ. ४४)**

वरील प्रमाणभाषेच्या व्याख्यांवरून असे म्हणता येईल की समाजातील प्रतिष्ठित किंवा सुशिक्षित लोकांनी मान्यता दिलेली भाषा समाजाची प्रमाणभाषा असते. समाजातील नेमके कोणते प्रतिष्ठित लोक ? तर ज्यांच्या मान्यतेमुळे भाषेला प्रामाण्य प्राप्त होते असे प्रतिष्ठित लोक समाजामध्ये विशिष्ट निकष धारण करतात. या प्रतिष्ठित लोकांच्या भाषेला प्रमाणभाषा म्हटले आहे.

मराठीची प्रमाणभाषा अस्तित्वात येण्यामागे काही राजकीय, सांस्कृतिक कारणे आहेत. इतिहासात वळून पाहिले तर पुणेरी बेलीला प्रमाणभाषेचा दर्जा का दिला ? याचे उत्तर मिळेल. शिवाजी महाराजांपासून पेशव्यांच्या कारकिर्दीपर्यंत मराठ्यांच्या सत्तेचे केंद्र पुणे हेच होते. त्यामुळे महाराष्ट्रातल्या सर्व भागातून लोक पुण्यात येत होते. त्यामुळे तेथील बोली भाषा कळणे सहज शक्य झाले. इंग्रजांच्या काळातही शिक्षण खाते पुण्यातच होते. प्रख्यात इंग्रज 'थॉमस कॅन्डी' यांनी शालेय शिक्षणाच्या पाठ्यपुस्तकासाठी पुण्यातील ब्राह्मणवर्गातील भाषेला प्राधान्य दिलेले आहे.

### ४.३.२ प्रमाणभाषेचे स्वरूप व वैशिष्ट्ये

प्रमाणभाषा ही संपूर्ण समाजाची असते. प्रमाणभाषेचे स्वरूप लिखित असल्यामुळे आणि मुद्रणकलेमुळे प्रमाणभाषेचे कार्यक्षेत्र अधिकच विस्तारलेले आहे. प्रमाणभाषा ही समाजात दररोज घडणाऱ्या घडामोडी, वैचारिक व भावनिक जीवनाचे दर्शन प्रसारमाध्यमातून घडवीत असतात. प्रमाणभाषेचा वापर करणे प्रतिष्ठितपणाचे लक्षण मानले जात असल्यामुळे त्याचा वापर करणाऱ्यांची संख्या समाजात सर्वाधिक आढळते. कायदे, कानून, सरकारी कार्यालये, न्यायालये, शिक्षण संस्था इतर सर्व प्रशासकीय विभागांमध्ये प्रमाणभाषेचा वापर सर्वाधिक होत असतो. वर्तमानपत्रे, नियतकालिके, मासिके याचबरोबर ललित साहित्य व शास्त्रीय पुस्तके समाजाचा आरसा दाखवत असतात. त्यासाठीही प्रमाणभाषेचा सर्वाधिक वापर केला जातो. भाषिक विनिमय संपर्क हा प्रमाणभाषेतून जलद गतीने आणि परिणामकारक घडला जातो. साहित्यलेखनासाठी लेखक, कवी प्रमाणभाषेलाच प्राधान्य देतात. कारण प्रमाणभाषेद्वारे जास्तीत जास्त वाचकांपर्यंत सहज पोहोचता येते.

भाषा ही परिवर्तनशील असते. ती काळाबरोबर सतत बदलत असते. या परिवर्तनशीलतेमुळे तिच्यात जिवंतपणा येतो. प्रमाणभाषेला स्वतःचा इतिहास असतो. ती दुसऱ्या कोणत्याही भाषेवर अवलंबून नसते. प्रमाणभाषेची स्वतंत्र अशी लिपी, शब्दसंग्रह, व्याकरण व्यवस्था व काही भाषिक नियम असतात. या

सर्वांचा अंगिकार भाषिक समाज स्वीकारत असतो. मराठी भाषेची स्वतःची अशी लिपी, शब्दसंग्रह आणि व्याकरण व्यवस्था आहे.

**डॉ. ना. गो. कालेलकर** प्रमाणभाषेला ''आदेशात्मक भाषिक रूप'' असल्याचे मानतात. या संदर्भात ते म्हणतात, ''जेव्हा आपण प्रमाणभाषा हा प्रयोग करतो, तेव्हा प्रत्यक्ष जीवनात, व्यापक सामाजिक व्यवहारात अनेक परस्परसदृश्य भाषिक परंपरा रूढ आहेत, हेच आपण मान्य करतो. प्रमाणभाषा हे सोयीसाठी मानलेले, लेखनाशी आणि त्यामार्फत शिक्षण, राज्यकारभार, वर्तमानपत्रे ह्यासारख्या माध्यमांशी संबंधित असलेले पण त्यातल्या कोणाशीही पूर्णपणे एकरूप नसलेले व्यक्तीने केलेल्या प्रयोगापेक्षा व्याकरणात्मक संहितेतल्या नियमांनी ज्यातल्या प्रयोगांची शुद्धाशुद्धता ठरवता येते असे ते एक आदेशात्मक भाषिक रूप आहे.'' (मराठीचा भाषिक अभ्यास : संपा. डॉ. मु. श्री. कानडे, पृ. २००) थोडक्यात, प्रमाणभाषा ही व्यापक सामाजिक व्यवहारात आदर्शवत मानली जाते ती एक प्रतिष्ठा प्राप्त बोलीभाषाच असते.

**प्रमाणभाषेची वैशिष्ट्ये**

१. प्रमाणभाषा एका विस्तृत भौगोलिक प्रदेशावर पसरलेली असते.

२. समाजात निरनिराळे गट असतात. हे गट आपापसात भाषिक व्यवहार करण्यासाठी प्रमाणभाषेचा वापर करतात.

३. प्रमाणभाषेत अनेक स्थानिक भेद असतात. हे भेद वैशिष्ट्यपूर्ण झाले की त्यांना नव्या बोलीचे स्वरूप प्राप्त होईल.

४. प्रमाणभाषा शिक्षणाचे, ज्ञानार्जनाचे माध्यम म्हणून वापरले जाते.

५. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक पातळ्यांवरील व्यवहारासाठी प्रमाणभाषेचा वापर केला जातो.

६. प्रमाणभाषा शिष्टमान्य असल्यामुळे या भाषेला लोकांची मान्यता मिळते.

७. प्रमाणभाषा परिवर्तनशील असते. ती काळाबरोबर बदलते. विकसनशीलता हे तिचे महत्त्वाचे लक्षण असल्यामुळे तिच्यात नेहमी प्रवाहीपणा व जिवंतपणा आढळून येतो.

८. लेखन व्यवहारासाठी समाजातील सर्व गट प्रमाणभाषेचाच आश्रय घेतात.

९. प्रमाणभाषा समाजातील ज्ञानव्यूह, इतिहास व सांस्कृतिक वारसा जतन व संवर्धन करीत असते.

१०. प्रमाणभाषा समाजाच्या स्वतंत्र अस्तित्वाची खूण असते.

११. प्रमाणभाषेमुळे समाजाचे एकसंधत्व टिकविले जाते व समाजाला स्थैर्य प्राप्त होते.

१२. प्रमाणभाषेला मुख्यभाषा, ग्रांथिक भाषा या नावाने संबोधले जाते.

१३. प्रमाणभाषा शासनमान्य व समाजमान्य असते त्यामुळे सर्व ठिकाणी प्रमाणभाषेचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

१४ प्रमाणभाषेमुळे एका समाजाचे दुसऱ्या समाजापासूनचे लक्षणीय वेगळेपण जपले जाते. ती समाजाच्या स्वतंत्र अस्तित्वाची जणू खूणच असते.

## ४.४ बोली : संकल्पना, स्वरूप, विशेष

इंग्रजी भाषेमधील 'Dialect' या इंग्रजी शब्दाला मराठीत 'बोली' हा प्रतिशब्द वापरला जातो. 'Language' या इंग्रजी शब्दाला मराठीत 'भाषा' हा शब्द वापरला जातो. खरे तर 'बोली' व 'भाषा' हे समानार्थी शब्द आहेत. 'बोली' हा शब्द ग्रीक भाषेमध्ये सर्वप्रथम वापरला गेला. ग्रीक भाषेमधून हा शब्द युरोपिअन भाषांमध्ये रूढ झाला. वास्तविक प्रत्येक भाषा ही अगोदर बोलीच असते, त्या बोलीला ग्रंथरूप प्राप्त झाले की, ती प्रमाणभाषेचे रूप धारण करते. आज महाराष्ट्राची 'मराठी' ही प्रमाणभाषा असली तरी पूर्वी कधी काळी मराठी ही बोली होती. समाजातील वेगवेगळ्या समाजगटांकडून बोलते जाणारे आणि तेथील प्रमाणभाषेशी साधर्म्य दाखवणारे जे भाषाभेद असतात किंवा भाषारूपे असतात त्यांनाच 'बोलीभाषा' असे म्हटले जाते.

'बारा कोसावर भाषा बदलते' या उक्तीनुसार बारा कोसावर भाषा बदलत असेल असा अर्थ होतो. परंतु बारा कोसावर भाषा बदलत नसून त्यातील वैशिष्ट्ये बदलतात. ही वेगवेगळी वैशिष्ट्ये विविध बोलींशी संबंधित असतात. विविध बोलीमध्ये उच्चार, शब्दसंग्रह, वाक्यरचना, अर्थ इत्यादी भेद असतात. पण अनेकदा 'भाषा' आणि 'बोली' हे शब्द पर्यायी शब्द म्हणून वापरले जातात. म्हणजे वरील विधानाचा महाराष्ट्रांतर्गत विचार करता बारा कोसावर 'भाषा' बदलत नसून 'बोली' बदलतात. याचा अर्थ असा होतो की, दैनंदिन जीवनामध्ये 'भाषा' आणि 'बोली' या शब्दांचा वापर करताना या दोन संज्ञांमधील फरक गांभीर्याने घेतला जात नाही यासाठी 'भाषा' आणि 'बोली' या शब्दांचा निश्चित अर्थ जाणून घेणे गरजेचे आहे.

'भाषा' आणि 'बोली' या शब्दांच्या वापरामध्ये बरीच संदिग्धता आहे. सामान्य लोकांना हे दोन्ही शब्द सुपरिचित असून ते वैज्ञानिकदृष्ट्या एकमेकांपासून वेगळे आहेत आणि त्यानुसार वापरले जातात असे वाटते. खरेतर भाषा, बोली यांच्यातील फरक हे अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे आहेत अशा पद्धतीचे गोंधळ टाळण्यासाठी वा दोन शब्दांचे निश्चित अर्थ माहिती करून घेणे गरजेचे आहे. याबाबत **औदुंबर सरवदे** म्हणतात की, सामान्यपणे 'बोली' म्हणजे अप्रमाणित, दुय्यम आणि साधारणतः खेडवळ लोकभाषा असा अर्थ घेतला जातो. अशा बोली शेतकरी, मजूरवर्ग किंवा तत्सम अनेकांच्या दृष्टीने कमी महत्त्वाच्या मानल्या गेलेल्या लोकसमूहाशी संबंधित असल्याची धारणा असते. काही वेळा लिखित स्वरूप प्राप्त न झालेल्या भाषेला उद्देशून देखील बोली हा शब्द वापरलेला दिसतो. तसेच एखादा समाज स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी आणि वेगळेपण सिद्ध करण्यासाठी जी भाषा वापरतो, तिलादेखील 'बोली' असे संबोधले

जाते. त्याचबरोबर 'बोली' म्हणजे प्रमाण भाषेपासूनचे वेगळे आणि चुकीचे स्वरूप या अर्थानेही हा शब्द रूढ आहे. परंतु वरील सर्व व्याख्या या गृहितकांवर आधारित आहेत. त्यांना कोणताही भाषावैज्ञानिक आधार नाही. त्यामुळे त्या मान्य करता येत नाहीत.

पुढे ते म्हणतात, 'भाषा' आणि 'बोली' या शब्दांच्या अर्थाबाबतची अनिश्चितता, पर्यायाने होणारा गोंधळ हा या शब्दांची इंग्रजी भाषेमध्ये झालेली उसनवार आहे, असे मत **ह्युजेन** हा भाषावैज्ञानिक मांडतो. इंग्रजी भाषेमध्ये भाषा आणि बोली हे दोन्ही शब्द फ्रेंच भाषेमधून स्वीकारण्यात आले आहेत. परंतु यातील 'भाषा' हा शब्द प्राचीन असून मध्ययुगीन काळात प्रचलित असलेल्या 'tongue' (वाचा) आणि 'speech' (बोली) या शब्दाऐवजी वापरला जात असे. ऑक्सफर्ड इंग्लिश शब्दकोशामध्ये 'भाषा' (Language) या शब्दाचा सर्वप्रथम वापर इ. स. १२९० ला पाहायला मिळतो. तर फ्रेंच भाषेमध्ये 'भाषा'या शब्दाची उत्पत्ती लॅटीन भाषेतील 'Lingua' या शब्दापासून झालेली आहे. याऊलट 'बोली' (dialect) हा शब्द पुनर्जीवनाच्या काळात ग्रीक भाषेतून स्वीकारला आहे यावरून 'बोली' आणि 'भाषा' हे दोन्ही शब्द ग्रीक भाषेतून घेण्यात आलेले आहेत. त्यांच्या अर्थामध्ये त्या शब्दांचा फ्रान्समध्ये झालेला वापर महत्त्वाचा आहे, हे लक्षात येते. (बोलीविज्ञान, औदुंबर, सरवदे पृ. १९, २०)

### ४.४.१ बोलीच्या व्याख्या

मराठी विश्वकोशातील व विविध भाषा अभ्यासकांनी मांडलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे -

१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (विश्वकोश खंड ११) - 'ज्या व्यक्तिसमूहाला आपण पूर्णपणे एकरूप असे भाषिक रूप वापरतो असे वाटते, त्याची भाषा म्हणजे बोली.'

२. ना. गो. कालेलकर - 'बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीची ती उपयोग करते. मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. तिची स्वाभाविकता हे तिचे वैशिष्ट्य होय.'

३. विजया चिटणीस-माडगूळकर - 'बोली म्हणजे परभाषकांना जवळ-जवळ पूर्णपणे कमी-अधिक प्रमाणात सारख्या वाटणाऱ्या तर तद्भाषकांना पूर्णपणे एकरूप वाटणाऱ्या व्यक्तीभाषकांचा समूह होय.'

४. सु. बा. कुलकर्णी - 'सामान्यतः ज्या भाषाभेदांना लेखनपरंपरा नाही व जे आपल्या अस्तित्वात केवळ मौखिक परंपरेवर अवलंबून असतात. अशा भाषाभेदांना 'बोली' (Dialect) अशी संज्ञा आहे.'

अशा प्रकारे भाषाभ्यासकांनी आपापल्या परीने बोलीच्या विविध व्याख्या केल्याचे दिसते.

### ४.४.२ बोलीची वैशिष्ट्ये

१. बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे.

२. बोली ही कोणत्या तरी भाषेची पोटभाषा असते.

३. बोली विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील किंवा लोकसमुदायातील व्यक्तींच्या अंगवळणी पडलेली असते; तेच त्यांच्या अभिव्यक्तीचे साधन आहे.

४. बोली मौखिक परंपरेने संक्रमित झालेली असल्यामुळे तिच्या अंगी लवचिकता, साधेपणा व जिवंतपणा असतो.

५. बोली साधी व परिणामकारक असते.

६. बोली पारंपरिकतेने चालत आलेली असल्याने संस्कृतीचे जतन होते.

७. स्थळ, काळपरत्वे बोलीत बदल झालेले दिसून येतात.

८. व्यवसायपरत्वे, लिंगभेदपरत्वे, वयोगटपरत्वे आणि प्रसंगपरत्वे माणसाच्या बोलीमध्ये वेगळेपण दिसून येते.

९. विविधता आणि वैचित्र्य ही बोलीची प्रकृती असते.

१०.बोली विशिष्ट समाजाच्या विशिष्ट प्रांतातील लोकसमूहाच्या स्वतंत्र अस्तित्वाची खूण असते

११. बोलींच्या परिसरात अनेक स्थानिक बोलीही असतात. त्यांना 'उपबोली' असे म्हणतात.

### ४.४.३ बोलींच्या निर्मितीची कारणे

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. गतिशीलता हा समाजसंस्थेचा एक विशेष आहे. त्याप्रमाणे परिवर्तनशीलता हा भाषेचा स्वभाव आहे. समाजामध्ये भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक कारणांनी स्थित्यंतरे घडून येतात. त्याचे परिणाम बोलीवरही होतात. भाषेची परिवर्तन प्रक्रिया अखंडपणे सुरू असते. भाषेच्या अंतर्गत आणि बाह्य स्वरूपात स्थित्यंतरे घडून येत असतात. बोली कोणत्या एका कारणांनी निर्माण होत नाहीत. बोलींच्या निर्मितीस भौगोलिक दळणवळण, शासनसंस्थांचा प्रभाव, मागासलेपण, भाषिकाची विशिष्टता, भिन्नभाषा संपर्क, मानवी स्थलांतर अशी परिस्थितीजन्य अनेक कारणे कारणीभूत ठरतात. त्यातून भाषेची नवी रूपे उदयास येतात. नंतर ती स्वतंत्र बोली म्हणून अस्तित्वात येते. बोलींच्या निर्मितीच्या कारणांचा पुढीलप्रमाणे आढावा घेऊ.

१. एका भौगोलिक प्रदेशामध्ये बोलली जाणारी बोली कालांतराने त्या-त्या प्रदेशातील वेगवेगळ्या भागात, स्वतंत्र अशा भिन्न बोली तयार होतात. ह्या बोली कालांतराने त्या-त्या प्रदेशातील वा भागातील नावावरून लोकप्रिय होतात.

२. एखाद्या प्रदेशातील समाजाच्या रचनेमधून आणि सामाजिक व्यवहारांच्या गरजेतून समाजातच वेगवेगळे गट निर्माण होतात. या प्रत्येक गटाची स्वतंत्र व वेगळी अशी बोली असते. कालांतराने त्या प्रत्येक बोलीची आणखी उपबोली तयार होते.

३. एखादा भाषिक समाज दुसऱ्या प्रदेशावर आक्रमण करून तेथे तो स्थायिक होतो. काही वेळा प्रचंड रोगराई, भीषण दुष्काळ, भूकंप यामुळेही एखादा भाषिक समाज दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहतो. दोन्ही समाज संप्रेषण साधण्यासाठी एकमेकांची भाषा अवगत करतात. त्यातून एक वेगळी बोली निर्माण होते.

४. राजकीच वर्चस्व परभाषेचा स्वीकार, काही व्यावहारिक कारणे, अस्तित्वाचा प्रश्न अशा एखाद्या कारणाने समाज आपल्या स्वतःच्या भाषेचा त्याग करतो आणि दुसरी भाषा स्वीकारतो. परंतु असा परभाषेचा स्वीकार केल्यावरही स्वभाषेतील काही सवयी, काही लकबी, काही उच्चारविशेष, व्याकरणविशेष तसेच टिकून राहतात. त्यामुळे स्वभाषा आणि परभाषेच्या संक्रमणाने बोलीचे नवे रूप तयार होते. म्हणजेच त्या परभाषेची एक नवी बोली तयार होते.

५. बोलींचे स्वरूप सांगता आले तरी बोलींच्या सीमारेषा निश्चित करता येत नाहीत. त्यामुळे सीमावर्ती भागात दोनही भागांकडील बोलींचा प्रभाव त्या लोकांच्या बोलीवर पडत असतो. त्यातून त्यांच्या बोलीचे नवीनच रूप तयार होते, त्यालाच 'सीमावर्ती बोली' असे म्हणतात.

६. भारतात धर्मसंस्था आणि जातीव्यवस्था पूर्वीपासून चालत आलेली आहे. विविध जातीनुसार वेगवेगळे समाजगट पडलेले आहेत. त्या-त्या समाजगटांच्या वेगवेगळ्या बोली आहेत. त्यांनाच 'जात बोली' म्हणतात.

७. व्यवसाय भिन्नतेमुळेही बोलींची निर्मिती होते. सम व्यावसायिक गरजेमुळे त्यांच्यापुरती त्यांची एक भाषा बनते. त्यातून बोलीची निर्मिती होते.

८. समाजामध्ये काही प्रभावक्षेत्रे असतात. प्रभाव गट आणि दुर्बल गट अशी समाजाची विभागणी होते. दोन्ही गटांच्या स्वतंत्र बोली निर्माण होतात.

९. लिंगभेदामुळे भाषाभेद निर्माण होतात. स्त्री आणि पुरुष यांची अनुभवक्षेत्रे निराळी असतात. त्यातून स्वतंत्र बोली अस्तित्वात येते.

१०. बालक, युवावर्ग आणि वृद्ध यांच्या वयाच्या अवस्थांमुळे, त्यांच्या शारीरिक आणि मानसिक प्रक्रियेमुळे बोली निर्माण होतात.

११.समाजातील विविध गटांची वर्तुळे निर्माण होतात. त्या गटांच्या वर्तुळानुसारही बोली निर्माण होतात.

**४.४.४ बोलीवरील संकटे**

**'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण-महाराष्ट्र'** या सर्वेक्षण मालिकेच्या खंडात **गणेश देवी** यांनी काही जागतिक भाषिक समस्यांची निरीक्षणे नोंदविली आहेत. त्यांच्या मते, भाषा अभ्यासकांना एखादी भाषा किती काळ टिकू शकेल, याचा अंदाज बांधणे शक्य झाले आहे. आपल्या भाषिक वारसाचा फार

मोठा हिस्सा माणूस वेगामने गमावत चालला आहे. आज अस्तित्वात असलेल्या बऱ्याच भाषा संकटात आहेत. दुसरीकडे भाषिक जागतिकीकरणाच्या पुरस्कर्त्यांना संपूर्ण जगभरात मिळून अगदी मोजक्याच भाषा असणे सोयीचे वाटते. त्यामुळे देशादेशांमधला संवाद अगदी सोपा होईल असे त्यांना वाटते. अर्थात, भाषिक वारस नष्ट होण्यामुळे मानवी संस्कृती, बौद्धिक संपदा यांच्या जागतिक ठेव्याचे नुकसान होणार आहे. ज्यांची ज्ञानव्यवस्था त्यांच्या स्वतःच्याच भाषेत आहे. त्यांचेही नुकसान होईल.

भाषेमुळेच माणूस इतर प्राण्यांपेक्षा प्रगत ठरला आहे. सांस्कृतिक भांडवलामधला भाषा हा महत्त्वाचा घटक आहे. हे भांडवल पाच लाख वर्षांपूर्वीचे आहे. आता मात्र आपण हे भांडवल गमावण्याच्या टप्प्यावर येऊन पोहोचलो आहोत. भाषातज्ज्ञांच्या अंदाजानुसार अस्तित्वात असलेल्या जवळजवळ सहा हजार भाषांपैकी २२ व्या शतकापर्यंत दोन हजार भाषादेखील टिकणार नाहीत. या भाषांचे नीट सर्व्हेक्षण केले नाही तर आज खरोखरच किती भाषा अस्तित्वात आहे हे समजणे कठीण आहे. स्थानिक भाषकांची गुंतागुंतीच्या संकल्पना त्यांच्याच भाषेतून व्यक्त करण्याची क्षमता दिवसेदिवस कमी होत चालली आहे. बहुतेक भाषांमध्ये शब्दांचे वेगवेगळे अर्थ व्यक्त करण्याची क्षमता वेगान कमी होत आहे. भारतात १९७१ च्या जनगणनेनंतर जनगणना अधिकाऱ्यांनी असं ठरवलं की जी भाषा दहा हजारांहून कमी लोकांपुरती उरली आहे तिची नोंद करण्याची गरज नाही. या निर्णयामुळे कित्येक बोली लोप पावल्या.

काळाच्या ओघात नव्या जीवनशैलीच्या प्रभावामुळे अनेक शब्द नाहीसे होण्याच्या मार्गावर असलेले दिसतात. कृषिव्यवस्थेमधील परिवर्तन, यंत्राधिष्ठितता, नव्या पिढीची आधुनिक मानसिकता, परंपरांची मोडतोड, बोलीकडे पाहण्याचा अनुदार दृष्टिकोन यामुळे अनेक शब्द उच्चारले जाण्याची क्रियाच बंद होत असलेली दिसते. शासनासहित सर्व समाजाची बोलीकडे पाहण्याची दृष्टी पारंपरिक आहे. आजवर शालेय स्तरावर बोली अभ्यासाला कोणत्याही प्रकारचे महत्त्व दिले जात नसल्याने बोलीकडे उपहासाच्या जाणिवेतून पाहिले जाते. बोलीतील उचार, अशुद्ध गावंढळ मानणाऱ्यांचे तसेच आपल्या शहरी स्वतःला शिष्ट समजणाऱ्या समाजाचे भाषिक अज्ञान बोलीच्या मुळावर आलेले दिसते. त्यामुळे ग्रामीण जीवनातील विविध क्षेत्रातील अनेक शब्द लुप्त होऊ लागले आहेत. असे निरीक्षण गोविंद काजरेकर यांनी 'मालवणी वा कुडाळी' या लेखात केले आहे. (दै. लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, मायबोली सदर, दि. २० जानेवारी, २०१३).

सदर बाबी लक्षात घेता, बोलीवर अनेक संकटे आहेत, याची जाणीव होते. बोलींचे संवर्धन करणे ही आता काळाची गरज आहे. बोलींविषयी आस्था आणि अस्मिता असणाऱ्या अभ्यासकांनी बोलींचे जतन करून ठेवणे गरजेचे आहे. बोलीतील सांस्कृतिक संचित नष्ट होण्याआधी त्यातील सामर्थ्य स्थळे शोधली पाहिजेत. बोली संवर्धनाच्या उपाययोजना आखल्या पाहिजेत. कारण बोलींची समाजाला अनन्यसाधारण अशी आवश्यकता आहे.

### ४.४.५ बोलींचे महत्त्व

अमेरिकेतील **डायनीयल एब्राम** या गणिताच्या अभ्यासकाने भविष्यात कोणत्या भाषांचे अस्तित्व टिकू शकणार नाही, याचे गणितशास्त्राच्याआधाराने एक सूत्र बनविले आहे. त्यांच्या मते, जी भाषा ती बोलणाऱ्या समाजास व्यवसाय देऊ शकत नाही, ती तो भाषक समाज सोडून देण्याच्या खटाटोपास लागतो. एब्राम यांच्या सूत्राप्रमाणे २१ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत संपूर्ण जगात सुमारे ३०० भाषा अस्तित्वात राहू शकतील. या सूत्रानुसार भारतातील आदिवासींच्या व भटक्या जमातींच्या छोट्या-छोट्या भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. पण अधिक संख्येने बोलल्या जाणाऱ्या भाषा पण स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्षरत राहतील. त्यामुळे बोलीतील शब्दसंग्रह, ज्ञानसंचय, संस्कृतीसंचय जतन करून ठेवण्यासाठी बोली, अभ्यासाची, त्याविषयी संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

जर पोटभाषाच नसतील तर एखादी मान्य भाषा केवळ अर्थविहीन व पुन्हा पुन्हा वापरून थकून गेलेले शब्द या स्वरूपात शिल्लक राहतील. कदाचित व्याकरणाच्या आत्यंतिक शिस्तीमुळे ती भाषा गणितासारखी संकल्पनात्मक प्रगल्भता कमावू शकेल. पण त्यातील शब्दचिन्हे बिना चेहऱ्याची बनतील. प्रत्येक भाषेला स्वतःला चेहरा असणे जरूरी भासते. ती भाषा वापरणाऱ्या व्यक्तींना त्या त्या भाषिक चेहऱ्याचा व प्रकृतीचा अभिमान वाटत राहतो. ती भाषा दुसऱ्या अगदी जवळच्याही भाषेत विलीन होण्यास नामंजूर असते. या सर्वांचे कारण, मानवी भाषाव्यवहारातील पोटभाषेची प्राथमिकता हे आहे. असे मत ज्येष्ठ भाषातज्ज्ञ गणेश देवी यांनी मांडले आहे.

भाषा टिकवणे, तिचे जतन करणे हे काम पुरातन अवशेषांच्या जतनापेक्षा वेगळे असते. भाषा ही एक सामाजिक संकेतव्यवस्था आहे. एवढीच व्याख्या गृहीत धरल्यास ती शब्दकोश तसेच व्याकरण या रूपात टिकवून ठेवता येऊ शकते. त्या सगळ्या लिखित गोष्टींच्या माध्यमातून भाषा प्रत्यक्ष समाजजीवना-पासून अलिप्त करून ती टिकवून ठेवता येऊ शकते. पण मानवी जाणिवांच्यापासून भाषेला वेगळं काढता येत नाही. त्यामुळे विशिष्ट भाषेचं जतन करणे म्हणजेच ती भाषा बोलणाऱ्या समाजाचे जतन करणे होय.

भाषांचा डिजिटल माध्यमांत वाढणारा वापर हा भविष्यातील आर्थिक वाढीचा मंत्र असणार आहे. याबाबत **'भाषेचा आर्थिक मंत्र'** हा **संदीप नूलकर** यांनी 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये एक लेख लिहिला आहे. या लेखात ते म्हणतात, भारतात डिजिटल क्रांती जसजशी पाझरते आहे, तशी इंटरनेटवरील प्रादेशिक भाषांमधील मजकुराची मागणी वेगाने वाढत आहे. ५० कोटी भाषा वापरकर्ते भारताला महाकाय अर्थव्यवस्थेकडे घेऊन जातील. छोट्या शहरांमधील या इंटरनेट वापरकर्त्यांचा कल हा त्यांच्या मातृभाषेतूनच तंत्रज्ञान वापरण्याकडे असेल. भारतीय भाषांमध्ये इंटरनेट वापरणारे तब्बल १८% वाढून ५३.६ कोटी होतील. यातून एक कोटी वीस लाख नवीन नोकऱ्या तयार होतील. परंतु यासाठी इंटरनेटवर प्रादेशिक भाषांमधील मजकूर पाठविणे, वाचणे सुलभ होण्यासाठी त्याला योग्य तंत्रज्ञानाची जोड हवी. या डिजिटल व्यवसायाने एक नवीन प्रगतीशील क्षेत्र निर्माण केले. त्याप्रमाणे प्रचंड आर्थिक आणि सामाजिक प्रगती घडवून आणण्याची सुप्त शक्ती प्रादेशिक भाषांमध्ये आहे.

इंटरनेट वापराने अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या दृष्टीने भारतीय प्रादेशिक भाषांचे महत्त्व ओळखून त्यांचा वापर वाढावा यासाठी वेगाने प्रयत्न होत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने २०१९ हे स्थानिक बोलीभाषांचे आंतरराष्ट्रीय वर्ष साजरे केले. त्यामुळे जागतिक पातळीवर स्थानिक बोलींकडे व्यापक दृष्टीने पाहण्याचा दृष्टिकोन प्राप्त झाला आहे.

वरील विवेचन लक्षात घेता बोलींचे समाजातील स्थान बदलत आहे. पारंपरिक दृष्टिकोनातून बोलींचा अभ्यास करण्याऐवजी आता भाषावैज्ञानिक अंगाने अभ्यास होत आहे. बोली ह्या भाषेला तारक आणि उपकारक असल्याचे भाषा अभ्यासकांनी सिद्ध केले आहे. बोलीवर अनेक संकटे आहेत. पण बोलींचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. बोलीतील सामाजिक व सांस्कृतिक संचित नष्ट होण्याअगोदर त्यातील सामर्थ्य स्थळे शोधली पाहिजेत. प्रत्येक भाषेला स्वतःचा चेहरा असतो ती भाषा वापरणाऱ्या व्यक्तींना त्या-त्या भाषिक चेहऱ्याचा व प्रकृतीचा अभिमान असतो. लिखित स्वरूपात भाषा जतन करता येते. पण तिला मानवी जाणिवांपासून वेगळं काढता येत नाही. त्यामुळे भाषेचे जतन म्हणजे ती भाषा बोलणारा समाज जतन करणे होय. इतके व्यापक महत्त्व बोलीचे आहे.

### ४.५ मराठीच्या बोली

महाराष्ट्राच्या विस्तृत भूमीवर मराठीची अनेक बोलीरूपे अस्तित्वात आहेत. मराठीच्या कोकणी, अहिराणी, वऱ्हाडी, डांगी, हळवी, नागपुरी अशा निवडक बोली सर्वपरिचित आहेत. या बोलींव्यतिरिक्त अस्तित्वात असलेल्या कितीतरी बोलींची अद्याप स्वतंत्र दखल घेतली गेलेली नाही. मराठीच्या विविध बोलींना अभ्यासकांनी अभ्यासाच्या सोयीसाठी प्रदेश जाती, धर्म, व्यवसाय, स्थळानुसार नावे दिलेली दिसतात. कोणतीही प्रमाणभाषा ही कधी काळी बोलीच असते. मराठी भाषेची 'कोकणी' ही बोली आज साहित्य अकादमीने स्वतंत्र भाषा म्हणून मान्य केली आहे. कोकणी, अहिराणी, वऱ्हाडीसारख्या मराठीच्या प्रमुख बोलींच्याही अनेक उपबोली आहेत. बोली परिवर्तनशील असतात. समाजातील बदल ती नैसर्गिकपणे स्वीकारते. मराठीच्या सर्व बोलींचा अभ्यास होणे आवश्यक आहे. 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण-महाराष्ट्र या प्रकल्पामध्ये महाराष्ट्रातील बहुतांश बोलींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये आपल्याला माहिती असलेल्या बोलींबरोबरच अनेक नव्याने उजेडात आलेल्या बोली पुढीलप्रमाणे -

**बोली -** अहिराणी, आगरी, कोहळी, खानदेशी, लेवा, चंदगडी, झाडी, तावडी, पोवारी, मालवणी, वाडवळी, वऱ्हाडी, सामदेवी, संगमेश्वरी

**आदिवासी -** कातकरी, कोकणा, कोरकू, कोलामी, गोंडी, गोंडी-थाट्या, गोंडी-माडिया, ठाकरी, ठाकूर 'क', ठाकूर 'म', ढोरकोळी, निमाडी, निहाली, परधानी, पावरी, भिल्ली/भिलोरी, मथवाडी, मल्हार कोळी, मावची, मांगेली, राठ्या (बारेला), वारली, हलबी.

**भटक्या-विमुक्तांच्या भाषा** : कुंचकोरवी, कैकाडी, कोल्हाटी, गुप्त व सांकेतिक भाषा, गोरमाटी, गोल्ला, गोसावी, घिसाडी, चितोडिया, छप्परबंद, डोंबारी, नाथपंथी, डवरी, नंदीवाले, पारोशी, पारधी, बेलदार, पारुषी, मांग, गारूडी, वडारी, वैदू.

**अन्य** : दख्खनी, नॉ लिंग.

या सर्व बोली महाराष्ट्रात विविध प्रदेशात बोलल्या जातात. बोलींचा अभ्यास प्रमाणमराठीच्या विकासाला साहाय्यभूत होण्यासाठी बोलीतील शब्दसंग्रहाची चिकित्सा बोलीविज्ञानाच्या आणि समाजभाषा विज्ञानाच्या अंगाने होणे गरजेचे आहे. त्यामुळे शब्दांचे सामर्थ्य अर्थदृष्टीने लक्षात येईल. वरील बोलीपैकी अहिराणी, वऱ्हाडी, चंदगडी आणि मालवणी बोलींचे स्वरूप व विशेष पाहूया. या चार बोलींच्या किमान परिचयातून बोली अभ्यासाचे सामर्थ्य लक्षात घेता येईल.

### ४.५.१ अहिराणी बोली

अहिराणी या नावाने ओळखली जाणारी बोली मराठीच्या बोली समूहातील वैशिष्ट्यपूर्ण बोली आहे.

अहिराणी बोली खानदेशात बोलली जाते. या भागाला 'अहिराण पट्टी' असेही म्हटले जाते. अहिराणी बोलीभाषा ही आभीर लोकांची भाषा म्हणून ओळखली जाते. अभिरांची भाषा 'अभिराणी' अभीर शब्दाचा अपभ्रंश 'अहिर' आणि अभिराणी शब्दाचा अपभ्रंश 'अहिराणी' असा आहे. अभीर लोक प्राचीन काळापासून खानदेशात राहत होते असा उल्लेख शिलालेखातून, प्राचीन ग्रंथातून सापडतो. रामायण, महाभारतासारख्या ग्रंथातून अभीर लोकांचे उल्लेख आलेले आहेत. या अभीर लोकांवर आर्य लोकांच्या जीवनपद्धतीचा प्रभाव पडलेला आहे. खानदेशात आजही अहिर शिंपी, अहिर ब्राह्मण, अहिर सोनार अशा जाती आढळून येतात. अहिरराव, अहिरे अशी आडनावे विपूल प्रमाणात दिसून येतात. प्राचीन काळी हे सर्वजण अभीर होते.

खानदेशात अभिरांचे वास्तव्य होते. कालांतराने अभीर लोकांचे नाव अहिर झाले. या अभीर लोकांची बोली भाषा अहिराणी होय. म्हणजेच अहिराणी बोलीभाषा ही विशिष्ट जाती-जमातीची बोलीभाषा नसून खानदेशात वास्तव्य करणाऱ्या सर्वसामान्य लोकांची लोकभाषा आहे. अहिराणी ही एक स्वतंत्र बोलीभाषा आहे.

भरताच्या नाट्यशास्त्रात अहिराणी विभाषा म्हणजेच बोलीभाषा असल्याचा उल्लेख आहे. तर वररूचीच्या व्याकरणात अहिराणी भाषा अपभ्रंश म्हणून उल्लेख केलेला आहे. या प्राचीन ग्रंथाच्या आधारावरून अहिराणी भाषा इसवी सनाच्या तिसऱ्या किंवा चौथ्या शतकाइतकी जुनी आहे. मराठीपेक्षाही जुनी परंपरा अहिराणी बोलीभाषेला आहे.

धुळे, जळगांव, नंदुरबार व नाशिक या जिल्ह्यात अहिराणी बोलीभाषा बोलली जात असली तरी तिच्या बोलीचे स्वरूप सर्वत्र सारखेच नाही. धुळे जिल्हा अहिराणी भाषेचा केंद्रप्रदेश आहे तर नाशिक जिल्ह्यातील अहिराणी भाषेवर मराठीचा जास्त पगडा दिसून येतो. गुजरात सीमेला लागून असलेल्या धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील अहिराणी भाषेवर इतर जाती-जमातींच्या पोटभाषांचाही प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे अहिराणी बोलीभाषा सर्वसमावेशक झालेली आहे. अहिराणी भाषेवर भिल्ली, पावरी, नेमाडी, गुजरी, बडगुजरी, लाडशिक्की, घाटोई, महाराऊ, तडवी, काटोनी, परदेशी, घाटकोकणी, डांगकोकणी,

ठाकरी, वारली, लेवा, पाटीदारी, बोली, मुसलमानी बोली, भावसारी, रंगारी बोली अशा जातीनिहाय अहिराणीच्या पोटभाषा दिसून येतात. अहिराणी बोलीभाषेचा खानदेशातील भील, मावची, कोकणा, पावरा, ठाकर यांच्या बोलीभाषेवर ठळकपणे प्रभाव पडलेला आहे. अहिराणी बोली भाषेची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

**अहिराणी बोलीभाषेची ठळक वैशिष्ट्ये**

१. जळगांव जिल्ह्यातील अहिराणी भाषेत 'ळ' बद्दल 'य' वापरला जातो तर नाशिक जिल्ह्यातील अहिराणी भाषेत 'ळ' वापरात. उदा. जळगांव-जयगाव, केळ-केय, मिळते-मियते, पिवळा-पिवया.

२. अहिराणी 'स' या अक्षराऐवजी 'छ' वापरतात. उदा. सोड-छोड, सावली-छावली.

३. प्रमाण मराठीतील 'ण' बद्दल अहिराणीत 'न' वापरला जातो. उदा. पण-पन, निमंत्रण-निवतन, जाणे-जाने

४. मराठीतील 'आहे' व गुजराथीतील 'छे' या शब्दाला अहिराणीत 'शे' हा शब्द वापरतात.

५. मराठीतल्या षष्ठीत चा, चीऊ, चे वापरतात. अहिराणीतील षष्ठीत न्ह, न्हीन, न, नी.

६. अहिराणी भाषेत गुजराथी शब्दांचे प्रमाण ठळकपणे जाणवते. उदा. आंडोर, डिक्रा, बे, ना, नी, ने, छे, चा, शे.

७. अहिराणी भाषेत जोडशब्दांचे प्रमाण जास्त आढळते. उदा. तुन्हा, मन्हा, त्यास्न, आम्ना, तुम्हना, धल्ल, धल्ली, ग्यात, सम्द, बऱ्हानी, बठ्ठ, व्हऊ, आदी.

**अहिराणी भाषेतील एक उतारा**

जीव निरमीती करीसन देवानी आक्खा पशु-पक्षी आणि बाकीना जीवस्ले आयुक्ष बहाल कयं. देवनी मानोसले चाळीस वरीसनं आयुक्ष दिघं. फगत चाळीस वरीसन आयुक्ष मानुसले कमी वाटाले लांग. मांग त्यांनी देवाकडे आयीसन आखो आयुक्ष मांग.

माले आजून आयुक्ष पाहिजे. चाळीस वरीसा हायी काय आयुक्ष शे ? देव म्हजे, आयुक्ष ते आते सरवास्ले वाटायी गयातं. तुले वाढाई देवाकर्ता मन्हापण काही उरले नाही. पन जर कोनी परत कयं ते तुले दिसू.

सृष्टीची निर्मिती करून देवाने सर्व पशू-पक्षी आणि इतर जीव यांना आयुष्ये बहाल केली. देवाने माणसाला चाळीस वर्ष आयुष्य दिले. फक्त चाळीस वर्षांचे आयुष्य माणसाला कमी वाटू लागले. त्याने देवाकडे जाऊन तक्रार केली.

मला अजून आयुष्य पाहिजे. चाळीस वर्ष आयुष्य मला खूप की वाटते. फक्त चाळीस वर्ष हे काय आयुष्य आहे ? देव म्हणाला, ''आयुष्य तर सर्वांना वाटली गेलीत. आता तुला वाढवून देण्यासाठी माझ्याकडे उरले नाहीत. पण जर कोणी आयुष्य परत केले तर ते तुला देईन.'' (भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण, मुख्य संपादक गणेश देवी पृ. क्र. ७२, ७३ वरून उद्‌धृत.)

**निवडक शब्दसंग्रह**

| **अहिराणी** | **मराठी** |
|---|---|
| त्याले | त्याला |
| आथाइन | इकडून |
| आंडोर | मुलगा |
| धैडा | बाप |
| मुराई | पाहुणा |
| पानकळा | पावसाळा |
| आयशी | ऐंशी |
| वशीट | मांसाहार |
| पावशी | विळी |
| आवते | दोर |
| हाळ | हौद |
| कसनी | नाडी |
| आगजा | बोभाटा |
| चितू भितू | घाबरणे |
| डाचं करनं | शिव्या देणे |
| गधडाले गुळनी चव | गाढवाला गुळाची चव काय कळणार |

**४.५.२ वऱ्हाडी बोली**

वऱ्हाडी बोली ज्या प्रदेशात बोलली जाते तो प्रदेश 'विदर्भ' या नावाने ओळखला जातो. वऱ्हाडी बोलीभाषेचे क्षेत्र विस्तीर्ण स्वरूपाचे आहे. यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये वऱ्हाडी बोली बोलली जाते. या भागाची भाषिकदृष्ट्या ओळख 'वऱ्हाड प्रदेश' म्हणून झालेली आहे. वऱ्हाडी बोली प्राचीन काळापासून बोलली जात असल्याचे 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभूचरित्र',

'स्मृतिस्थळ' या महानुभाव ग्रंथातील वऱ्हाडी भाषेतील शब्दांवरून स्पष्ट होते. प्राचीन काळातील राजकीय आणि सांस्कृतिक घडामोडींचा परिणाम विदर्भातील भाषेवर झालेला आहे. बहामनी राजवटीपासून शिवकाळ, पेशवेकाळापर्यंत विदर्भावर निजामशाहीचे वर्चस्व होते. त्यामुळे वऱ्हाडी बोलीभाषेवर हिंदी भाषेचा अधिक प्रभाव असल्याचे दिसून येते.

'जॉर्ज ग्रिअर्सन' यांनी केलेल्या बोलीभाषेच्या वर्गवारीमध्ये वऱ्हाडी बोलीभाषेला महत्त्वपूर्ण स्थान दिलेले आहे. वऱ्हाडी बोलीभाषा विस्तृत भूभागावर बोलली जात असल्यामुळे तिची दोन रूपे तयार झालेली आहेत. यामध्ये 'घाटावरची वऱ्हाडी बोली' आणि 'घाटाखालची वऱ्हाडी बोली' आहे. तसेच वऱ्हाडी बोलीभाषेच्या स्थानिक वैशिष्ट्यानुसार, नागपुरी, हळबी, बालघाटी असे भेद दिसून येतात. जाती, जमाती व व्यवसाय यांच्या वैशिष्ट्यानुसारही कोष्टी, धनगरी, झारपी, कुणबी, पोवारी या उपबोली आकाराला आलेल्या आहेत.

वऱ्हाडी भाषेतील साहित्य विपूल प्रमणात लिखितबद्ध झालेले आहे. १९३२ साली यवतमाळ जिल्ह्यातील पांडूरंग श्रावण गोरे यांनी 'सुगी' आणि 'बोबडे बोल' हे जानपद गीत लिहिले व वऱ्हाडी लोकगीतांचे संकलनही केलेले आहे. याच कालखंडात वामनराव चोरघडे यांनी 'अम्मा' ही कथा प्रसिद्ध केली. डॉ. वि. भि. कोलते यांचाही 'लव्हाळी' हा कवितासंग्रह १९३३ साली प्रसिद्ध झाला. १९६० नंतर शरदचंद्र सिन्हा यांनी 'वऱ्हाडमाती' या कवितासंग्रहातून वऱ्हाडी बोलीचे दर्शन घडविले. बाजीराव पाटील यांनी 'भंडारवाडी' कादंबरीतून वऱ्हाडी लोकजीवनाच्या वास्तवतेला स्पर्श केला. उद्धव शेळके यांनी 'धग' ही कादंबरी प्रमाण मराठी भाषेत लिहून त्यातील संवाद वऱ्हाडी बोलीभाषेत लिहून वऱ्हाडी भाषेकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. गो. नि. दांडेकरही वऱ्हाडी बोलीभाषेत कादंबरी लिहिणारे लेखक आहेत. तसेच दलित लेखकांनीही वऱ्हाडी भाषेतून आपल्या व्यथा, वेदना मांडलेल्या आहेत. केशव मेश्राम यांची 'हकीकत आणि जटायू' ही कादंबरी आणि इतर कथा-कादंबरी लेखनावर वऱ्हाडी भाषेचा प्रभाव पडलेला आहे.

वऱ्हाडी भाषेचा प्रभाव महानुभाव ग्रंथातील लोककथांच्या नोंदीतून दिसून येतो. प्राचीन परंपरा असलेल्या वऱ्हाडी भाषेतील लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार तसेच वैशिष्ट्यपूर्ण शब्द लोकभाषेचे अविभाज्य घटक असल्यामुळे वऱ्हाडी भाषेतून लोकवाङ्मय समृद्ध झालेले आहे.

**वऱ्हाडी बोलीभाषेची काही ठळक वैशिष्ट्ये**

१. प्रमाण मराठी भाषेतील अन्त्य दीर्घ इकार हा वऱ्हाडी बोलीत ऱ्हस्व होतो. उदा. मि, माहि

२. प्रमाण मराठी भाषेतील नपुंसकलिंग रूपातील अन्त्य 'ए' ऐवजी वऱ्हाडी बोलीत 'अ' हा स्वर येतो. उदा. सांगितले-सांगितलं, त्याने-त्यानं, पोरगें-पोरगं, माणसें-माणसं.

३. वऱ्हाडी बोली भाषेच्या काही रूपातून प्रमाण मराठीच्या 'इ' ऐवजी 'ए' आणि 'व' ऐवजी 'य' हे स्वनिम लिहिले जाते. उदा. दिले-दिल्ल, वेळ-येळ, येर.

४. प्रमाण मराठी भाषेतील 'ळ'च्या जागेवर वऱ्हाडी बोलीत 'य' हा स्वनिम येतो. उदा. डोळा-डोया.

५. प्रमाण मराठी भाषेत ज्या ठिकाणी स्वरानंतर 'ड' येतो तेथे वऱ्हाडी बोलीत 'र' येतो.

६. प्रमाण मराठी भाषेतील 'व' या स्वनिमाचा उच्चार वऱ्हाडी बोलीत 'ओ'कडे झुकताना दिसतो. उदा. जवळ-जोय, घडवला-घडोला.

७. प्रमाण मराठी भाषेतील अर्धोच्चारित अनुनासिकांचा वऱ्हाडी बोलीत पूर्णाच्चार करण्याची पद्धत दिसते - उदा. तूं-तून.

८. प्रमाण मराठी भाषेतील शब्दांतर्गत वऱ्हाडी भाषेत 'ण' ऐवजी 'न' वापरला जातो. तर शब्दारंभी 'न'च्या ऐवजी - नाणे-णाने, नाथ-णाथ असा उच्चार करण्याची पद्धत दिसते.

**वऱ्हाडी लोकगीत**

आल्या पोटी पोरी, निबांचा कडू पाला ।
पित्याला खर्च आला, एका चोळी लुगड्याला।
आल्या पोटी पोरी, बाप म्हणे परधन ।
बोले माय असो माही, काळिजाची शेजारीण।
आल्या पोरी तुझ्या पोटी, नको धाकू मनी बापा।
दूर उडून जाईल, तुझ्या चिमणीचा ताफा।।

(भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण, पृ. १८६ वरून उद्‌धृत)

**निवडक शब्दसंग्रह**

| वऱ्हाडी | मराठी |
|---|---|
| दुरगी | दुर्गा |
| तिरमख | त्र्यंबक |
| हळ्या | कावळा |
| इसमोर | पाल |
| चिडी | चिमणी |
| चऱ्हाट | दोर |
| कावळ | दरवाजा |

| | |
|---|---|
| महा | माझा |
| मले | मला |
| खोबडा | दात नसलेला |
| ईबालीस | विचित्र |
| संट्या | एकटा |
| टिंगर | ढुंगण |
| मग्गम | पोटभर |
| डिंगा मारणे | बढाया मारणे |

### ४.५.३ चंदगडी

चंदगड हा महाराष्ट्रातील एक दुर्गम आणि डोंगराळ तालुका म्हणून सर्वपरिचित आहे. अति-पावसाळी, विस्तृत वनक्षेत्र, कोकण-गोव्याशी संलग्न असलेला तालुका आहे. कोल्हापूर या जिल्ह्याच्या ठिकाणापासून १५० कि.मी. दूर, दोन भिन्न भाषा-बोलींचा शेजार आणि नित्यसंपर्क महाराष्ट्राच्या भाषावार प्रांतरचनेपासून बेळगाव महालापासून अलग होण्यापर्यंतचा राजकीय अंमल, त्यातून झालेला भाषासंपर्क अशा अनेक गोष्टींच्या पार्श्वभूमीवर येथील बोली स्वतःची वेगळी वैशिष्ट्ये घेऊन तयार झालेली आहे.

चंदगड तालुक्याला जवळपास शहाण्णव लाख हेक्टर्स एवढे विस्तृत क्षेत्रफळ लाभले आहे. या विस्तृत क्षेत्रफळावर सर्वत्र एकसारखी भौगोलिक परिस्थिती आढळत नाही. तालुक्याची पश्चिम आणि पूर्व अशा दोन विभागामध्ये सरळ-सरळ विभागणी करता येते. यापैकी पश्चिम भाग अतिपावसाळी, डोंगराळ आणि वनक्षेत्र असलेला आहे. तर पूर्वेल तुलनेत कमी-पाऊस आणि सुपीक जमीन लाभली आहे. पश्चिम भाग कोकणी भाषिक प्रदेशाशी तर पूर्व भाग कानडी (बेळगाव जिल्हा) भाषिक प्रदेशाशी संलग्न आहे. त्यामुळे दोन्ही विभागांत काही प्रमाणात सांस्कृतिक भिन्नताही दिसून येते. याचे एक उदाहरण म्हणजे तालुक्याच्या पूर्वेला कर्नाटकी बेंदूर आणि पश्चिमेला महाराष्ट्रीय बेंदूर हा सण साजरा केला जातो. भिन्न संस्कृती, भिन्न भौगोलिक परिस्थिती, दूरत्व, संपर्कक्षेत्रांची भिन्नता, भिन्न शेजार-भाषा इत्यादी कारणांमुळे चंदगडी बोलीची चंदगड तालुक्यात दोन भिन्न रूपे दिसून येतात. तालुक्याच्या पूर्वेकडून पश्चिमेला प्रवास करीत असताना, कन्नड भाषेचा प्रभाव असलेल्या बोली रूपाकडून कोकणीचा प्रभाव असलेल्या बोलीरूपाकडे सरकत जात असल्याचा अनुभव येतो. शब्दसंग्रह, उच्चाराचा विशिष्ट हेल, व्याकरणीक विशेष या सर्वच बाबतीत हे वेगळेपण दिसून येते. कोणत्याही विस्तृत प्रदेशात भाषा-बोली एकसारख्या आढळत नाहीत. त्याप्रमाणेच चंदगड तालुक्यामध्येही आढळणारे बोलीरूप सर्वत्र एकसारखे दिसत नाही. तथापि या सर्व विस्तृत प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीला मात्र 'चंदगडी बोली' अशा एकाच नावाने ओळखले जाते. (नंदकुमार मोरे, 'चंदगडी बोली' भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण-महाराष्ट्र.)

चंदगडी बोलीचा अभ्यास मराठीची बोली म्हणूनच करावा लागतो. चंदगडी ही बोली स्वतंत्रपणे अभ्यासताना लिखित, मुद्रित, पुराव्यांची वानवा जाणवते. या परिसरावर मौर्य, सातवाहन, शिलाहार, कदम्ब, राष्ट्रकूट आणि यादव अशा घराण्यांनी राज्य केल्याचे दाखले मिळतात. चंदगड परिसरातील राजकीय स्थित्यंतराचा आढावा घेताना कोकण, गोवा, कारवार, बेळगांव, म्हैसूर, बंगळूर, विजापूर यापर्यंतच्या राजवटींचा अंमल या भूमागावर होता. या राजवटी भिन्न-भिन्न भाषिकांच्या आहेत. गोवा आणि कोकणातील मालवाहतूक या तालुक्यातून होत होती. पोर्तुगीज आणि ख्रिस्ती धर्मप्रसारकांचा वावर येथे होता. हा परिसर एके काळी द्रविडी वंशाच्या लोकांचा असल्याचे पुरावे सापडतात. या परिसरातील देव-देवता द्रविडी आहेत. अभ्यासकांच्या मते, म्हसोबा, चाळोबा, चव्हाटा, मरगूबाई, पवनाई, थळ, महास्थळ, माऊली, सिमदेव अशा देवता म्हणजे द्रविडी सरदार होत. हे सर्व सरदार गावचे रक्षणकर्ते होते. आजही या परिसरात या देवतांकडे गावरक्षणाचे गाऱ्हाणे घालतात. हा तालुका काही काळ कुरुंदवाड (सिनिअर) संस्थानात होता, तर १९६० पर्यंत बेळगांव (महाल) जिल्ह्यात होता. त्यानंतर कोल्हापूर जिल्ह्यात समाविष्ट झाला आहे. या तालुक्याचा संपर्क कन्नड भाषिक प्रदेशाशी राहिल्याने तालुक्याचा पूर्व भाग कन्नड भाषेच्या प्रभावाखाली आहे, तर तर पश्चिम भाग कोकणशी संलग्न आहे. अशा अनेक गोष्टींमुळे होत राहिलेला भाषासंपर्क, संस्कृतीसंपर्क या बोलीच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरलेला आहे.

चंदगडी बोलीतील शब्दांचे उच्चार, हेल, बलाघात प्रमाणभाषेपेक्षा खूप वेगळे आहे. या बोलीमध्ये स्त्रिया 'मिय्या जेवलो', 'मिय्या बाजारास गेल्लो' असे बोलतात. या वाक्यातील क्रियापदे पुल्लिंगी आहेत. परंतु असे बोलणे या बोलीत रूढ होऊन गेले आहे. चंदगडी बोलीचा शब्दसंग्रह विपूल आहे. या शब्दसंग्रहाचे सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक संदर्भ शोधल्यास प्रमाण मराठीपेक्षा वेगळे अर्थ निघतात. उदा. 'म्हेर' हा शब्द य परिसरात बांध या अर्थी न येता 'रताळी' या पिकासाठी भरीव सरी या अर्थाने आला आहे. तर या परिसरातील धर्मांतरामुळे 'बाटका' हा शिवीसदृश्य शब्द तयार झाला आहे. तर 'वसूला' हा शब्द वसुली या शब्दाशी निगडित नसून 'वशिला' या अर्थाने चंदगडी बोलीत वापरला जातो. चंदगडी उच्चारण हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ही बोली एका विशिष्ट उच्चाराने, हेल काढून बोलली जाते. 'जाऊलेसाय....' हा एक वाटत असला तरी, हा शब्दप्रयोग 'तू जात आहेस ?' या अर्थाने वापरला जातो. या शब्दातील 'ऊ', 'सा' आणि शेवटी 'य' या तीन ध्वनींचा उच्चार सुरावटीत केला जातो. अशा प्रकारे या बोलीलाच एक सुरावट प्राप्त होते. 'तिया यल्लीस' हे वाक्य प्रश्नार्थक आहे. परंतु ही प्रश्नार्थकता या बोलीच्या सुरावटीतून निर्माण होते. 'तू आली होतीस का ?' हे प्रश्नार्थक वाक्य वरील केवळ दोन शब्दातून विशिष्ट सुरावटीमुळे बोलता येते. 'तिय्या जाऊललीसाय' या वाक्यामध्ये 'तू' हे सर्वनाम 'तिय्या' असे होते. शिवाय 'तिय्या'चा उचार पुन्हा खास सुरावटीमध्ये होतो. हे उच्चारविशेष कोकणीच्या जवळचे आहेत. अशी बोली तालुक्याच्या पश्चिम विभागात बोलली जाते.

पूर्व विभागात बोलीची सुरावट कन्नडच्या प्रभावाने तयार झालेली आहे. कव्वा (केव्हा), कास (कशाला), खट्टे (कोठे), तण्ण (तेव्हा), चकोट (चांगले), बळ्यान (खोटे), माज (मला), मिय्या (मी) असे शब्द पूर्वविभागात दिसतात. 'कासनी ते' , 'खट्टे गेल्ल्यास', 'कन्नच्यान सोदलोय, मसोटीत गेल्ल्यास काय ?' अशी वाक्ये प्रत्यक्ष ऐकणे हा एक चांगला अनुभव आहे. या विभागात तुजं, माजं, त्यास, तिण्ण, मिण्ण, त्यण्णाणी, ह्यणाणी अशी सर्वनामे वापरली जातात.

**पश्चिम विभागातील बोलीचा नमुना**

रामायणातील लक्ष्मण रेषा आखतानाचा प्रसंग चंदगडी बोलीत कसा असेल ? याचा संवादात्मक नमुना पुढीलप्रमाणे -

(लक्षीमणा ऽऽ धाव ऽऽ लक्षीमणा ऽऽ धाव ऽऽ धाव)

**सिता** : व्हई भावोजी, हेंचा आवाज ऐकल्याशी, हेनीच आरडोल्यात न्हवे ?

**लक्ष्मण** : व्हय व्हन्नी, दादाच्याच आवाज खल्लं आरडोलय

**सिता** : जावा, बघा जावा तरी. त्या हरणाच्या मागनं गेल्यात तेनी. मिय्याच जावा म्हटल्लो, खल्लेकडनं ! अवदसा सूचली म्हणतलं. जावा, बघा जावा तरी....

**लक्ष्मण** : व्हन्नी तिच्या काय काळजी करू नकोस घे. माझा दादा लई पावरीचा हाय.

**सिता** : व्हय खरं.... आरडतला आवाज येऊलाय न्हवे. कसल्या तरी एडताकात आडकल्यात असतील.

**लक्ष्मण** : दादा कसल्या बी संकटातनं बाहीर पडताय घे. तशी पावरच हाय तेची.

**सिता** : न्हाय न्हाय... आधी जावा.. बघा... माझा जीव वरखाली हुलाय.

**लक्ष्मण** : आत्तं तिया जा म्हणुलीसाय म्हणून जातो. खरं मला काय तरी इपरीत वाटोलय. ह्या खोपटाच्या भोत्यान रेषा मारूलोय बघ (रेषा मारतो). तेच्या बाहीर जातल्लं नाहाय. आणि तेच्या भुतूर कुणास बी घुनकोस.'

**सिता** : हुं... न्हाय घेणं... खरं जावा भिगीनं.

**(शब्दार्थ** : व्हई-अहो, हेंचा-ह्यांचा (पतीचा), आरडोल्यात-ओरडत आहेत, न्हवे-होय ना, व्हन्नी-वहिनी, खल्लं-कोणीतरी, तेनी-त्यांनी, मिय्याच-मी, खल्लेकडनं-कुणीकडून, तिच्या-तू, पावरीचा-शक्तीवान, थऊलाय-येत आहे, एडताकात-संकटात, हुलाय-होत आहे, म्हणुलीसाय-म्हणत आहेस, इपरीत-विचित्र, वाटोलय-वाटत आहे, खोपाट-झोपडी, भोत्यान-सभोवती, भुतूर-आत, घुनकोस-घेऊ नकोस, भिगीनं-लवकर.)

**पश्चिम विभागातील बोलीचा निवडक शब्दसंग्रह**

| **चंदगडी** | **मराठी** | **चंदगडी** | **मराठी** |
|---|---|---|---|
| भोवोस | फिरायला | लानीत | सुग्गीमध्ये |
| सांगोलेसाय | सांगतो आहेत | म्हाई | जत्रा |
| व्हलस | घाण | क्यास | केस |
| आंबरसुका | ओलकसर | यांग | बाहुपाश |
| धबला | जाडा | आरगाड | मोठा |
| मागलेंदी | मागील वर्षी | आयार | आहेर |
| पॉर | मुलगा | काचबारणे | गोंधळणे |
| हाळदुळा | पिवळा | हाऊळ | दंगा |
| यदवं | आत्ता | किरमं | सर्दी |

**पूर्व विभागातील बोलीचा नमुना**

(भाजी-पाला खरेदी करतानाचा दोन स्त्रियांमधील संवाद)

**पहिली स्त्री** : वाळकं कशी देलीस ग आऊ....

**दुसरी स्त्री** : चाळसान किलू घातलावनी...ऽऽ...

**पहिली स्त्री** : तिसान घाल की गे...ऽऽ

**दुसरी स्त्री** : तिसान काय येताय बाई... म्हागामारीचं ! काय सांगो तुज आऊऽऽ दोन पारोग झाल्यात यऊन बसलाव, निंबार केवढं लागोलाय. कसा जलम व्हईल बघ की गेऽऽ कन्नच्यान बसलाव. गिऱ्हाईकच न्हाय. माझ ल्योक बी खट्टे गेलाय कायऽऽकी. माज पाणी दुच्याधी खट्टे पासालाय. सारखं सोस लागोलाय. नक्काड पाणीबी हाणूस न्हाय बघ. सक्कळ अनुशापोटी येलाव. घे पस्तीसान घे.

**पहिली स्त्री** : दे बाई... कसं देतंलं अस्याल... तसं दे...

**दुसरी स्त्री** : तरकारी करूस लई म्हेनत हाय घे. गसली पावसान काय गावोसच न्हाय. पावसान सगळं दिक्कोमाळ हुन गेलं. खतं बी लई म्हाग होल्यात. मिय्या काय बळयान दर सांगोलाव काय ? माज बी वाळकं इकतलच हाईत घे.

**(शब्दार्थ** : वाळकं-काकडी, चाळसान-चाळीस रुपये किलो दराने, पारोग-प्रहर, बसलाव-बसले आहे, निंबार-ऊन, जलम-जन्म, कन्नच्यान-केव्हापासून, खट्टे-कुठे, दुच्याधी-देण्याअगोदर, पासालाय-आळसात पडलेला, सोस-तहान, नक्काडं-थोडे, अनुशापोटी-उपाशी पोटी, येलाव-आली आहे, अस्याल-असेल, तरकारी-भाजीपाला, म्हेनत-कष्ट, दिक्कोमाळ-प्रचंड नुकसान, मिय्या-मी, बळयान-मुद्दामहून.)

**पूर्व विभागातील निवडक शब्दसंग्रह**

| चंदगडी | मराठी | चंदगडी | मराठी |
|---|---|---|---|
| इळगी | विळती | वांगडं | भाजी/सोबत |
| उल्लस्क | थोडं | व्हगं | अडाणी |
| कसारकी | कणकण | कण्ण | केव्हा |
| इस्टन | मालमत्ता | देक शिकविणे | शहाणपण सांगणे |
| करबेव | कडीपत्ता | तण्ण | तेव्हा |
| तगाड | पत्रा | कासनी ते | कश्यासाठी |
| बडगी | सुतार | तवरस्क | तोपर्यंत |
| व्हादडणे | मारणे | त्येण्णाणी | त्यांना |

**४.५.४ मालवणी**

मालवणी ही मराठीची बोली आहे. ती सिंधूदुर्ग जिल्ह्यात बोलली जाते. सिंधूदुर्ग जिल्ह्याच्या पूर्वेस सह्याद्रीच्या रांगा, पश्चिमेस अरबी समुद्र, उत्तरेस रत्नागिरी जिल्हा आणि दक्षिणेस गोवा व कर्नाटक राज्याच्या सीमा आहेत. १९७१ च्या जनगणनेत मालवणीची 'स्वतंत्र' मातृभाषा म्हणून ४० हजार लोकांनी नोंद केली होती. पण या परिसरातील सर्व रहिवासी मालवणीला स्वतंत्र भाषा मानत नाहीत तर मराठीचे रूपच मानतात. वैभववाडी, कणकवली, देवगड, कुडाळ, मालवण, वेंगुर्ले व सावंतवाडी या सात तालुक्यांतील सुमारे चार लाख अडुसष्ट हजार लोक मालवणी भाषा बोलतात. या भागातील 'मालवण' या गावावरून या भाषेला 'मालवणी' ही ओळखल मिळाली. या बोलीला 'कुडाळी' या नावानेही ओळखले जाते. कुडाळला कुडाळदेशकर प्रभूंची सत्ता असतानाच्या काळात ही पुढे आली असावी, असे मानले जाते.

मालवणीतून लोकगीते, लोककथा रचल्या जात होत्या. गाऱ्हाणी, उखाणे, म्हणी, झोपाळगीते, तसेच फातुकले या प्रकारातही मालवणीचा वापर होतो. म्हणजे ती साहित्याची भाषा म्हणून येथे वापरली जाते. दशावतार हा लोककला प्रकार प्रसिद्ध आहे. 'वस्त्रहरण' हे मच्छिंद्र कांबळी यांचे नाटक सर्वत्र

लोकप्रिय झाले होते. मालवणी भाषा खटकेबाज संवादासाठी प्रसिद्ध आहे. तसेच गाव देवस्थानातील गाऱ्हाणी, पडस्ताळा यांत आणि पंचमंडळीत या बोलीचा वापर केला जातो. या अर्थाने ती कायद्याचीही भाषा आहे.

ही बोली किती जुनी आहे, हे नेमकेपणाने सांगता येत नाही. पण 'ज्ञानेश्वरी' आणि 'लीळाचरित्र'मध्ये मालवणीतील अनेक शब्द सापडतात. नामदेवांच्या 'गौळणी ठकविल्या' या गौळणीतही एक चरण आढळतो. यातील कोकणी गौळण म्हणते -

पावगा दातारा । पावगा दातारा ।

तू नंदाचो झिलो।

माका फडको दी । मिया हिवान मेलो।

घे माजो कोयतो । देवा पाया पडतो ।।

या चरणातील झिलो-मुलगा, माका-मला, फडको-फडका, दी-दे, मिया-मी, हिवान-थंडीने, माजो-माझा हे शब्द मालवणीतील आहेत. यातील गवळण 'पाया पडतो' असे पुल्लिंगी रूप वापरते. मालवणी मुलखातील गवळी समाजातील स्त्रिया आजही पुल्लिंगी क्रियापद वापरताना आढळतात.

'लीळाचरित्रात' गोवळू (गवळी, गुराखी), कामथु (शेत), सवास (सहवास), ओज (तारण) असे काही शब्द सापडतात. तर 'ज्ञानेश्वरी'तील कितीतरी शब्द मालवणीत आजही वापरात आहेत. अंगवसा (ढगळा), आंगुळ (बोट), अणगट (अंकुर), अडदर (धाक), अटवी (अरण्य), आभोळ (दुर्बळ), अवसात (अकस्मात), काटस (काटेरी), कानी (काढणी, दोर), किरडू (साप), चाळढाळ (हालचाल), चावदशी (चतुर्दशी), चिळस (किळस), नींद (झोप), मिया (मी), मिणधी (ओशाळी) असे ज्ञानेश्वरीतील कितीतरी शब्द मालवणीत आजही आहेत. म्हणजे मालवणी हे स्वतंत्र रूप म्हणून बाराव्या शतकापासून या भागात लोकव्यवहारात होते, असे म्हणता येईल.

किनारपट्टीचा भाग असल्याने अन्य प्रांतातील लोकांशी या लोकांचा सतत संपर्क येतो. त्यामुळे कन्नड व उडिया भाषेतील शब्द मालवणीत सापडतात. या मुलखातील सारस्वत स्वतःला मूळचे बांगलावासी मानतात. त्यामुळेही असेल, पण सुमारे दोनशे तरी बंगाली शब्द मालवणीत आहेत. 'मुरं' म्हणजे 'धुकं' हा तमिळ शब्दही मालवणीत आढळतो. मराठीतील अकारान्त शब्दांपेक्षा गुजरातीतील ओकारान्त मालवणीला जवळचा वाटतो. उदा. दांडो, राखणो, आंबो, काटो, जाणतो इत्यादी.

मालवणी या भाषेचा विचार करताना प्राधान्याने बोलली जाणारी कुडवाळी समाजाची बोली विचारात घेतली जाते. मात्र या बोलीत चित्पावनी, कऱ्हाडी, गौड सारस्वती व हरीजनी असेही जातीनिहाय भेद होतात.

मालवणी रूपाची काही वैशिष्ट्ये आहेत, ती पुढीलप्रमाणे -

१. मराठीतील आकारान्त नामे ओकारान्त होतात. उदा. मुळो, सुळो, खुळो.

२. एकारान्त नामे आकारान्त उच्चारली जातात. उदा. आळम्या (आळमे) जाता (जाते), नाणां (नाणे), पाना (पाने)

३. शब्दाच्या शेवटी 'इ' अक्षर असल्यास मालवणीत त्याचे 'य' होते. उदा. समय (समई), घाय (घाई)

४. शब्दाच्या मध्ये 'इ' असेल तर त्याऐवजी 'य', 'वि', किंवा 'वी' असे रूप येते. उदा. बायल (बाईल), सुवीण (सुईण)

५. काही वेळा महाप्राण मिसळला जातो. उदा. फाटी (पाठी), फुडे (पुढे), हडे/हकडे (इकडे)

६. आज्ञार्थ व प्रयोजक रूपांच्या वेळी 'व' ऐवजी 'य' धातूंच्या रूपात आलेला दिसतो. उदा. जेय (जेव), ठेय (ठेव), फिरयलो (फिरवला).

७. मालवणीत 'न' ऐवजी 'ण'चा वापर करतात. उदा. तेणा (तेना)

८. 'क' ऐवजी 'स' हे रूप येते. उदा. तेस (तेका), आमास (आमका). (मालवणी, संतोष शेणई, भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण, महाराष्ट्र, पृ. १६८ ते १७०)

**मालवणी बोलीचा नमुना**

आबा पाटकराची उमेदीची पंचविस वर्सा मुंबईत गेली. अठराव्या वर्सा नोकरेसाठी म्हणान मुंबैयक गेलो. पण धड नोकरी तशी तेना केल्यानच नाय. दिसाक देखणो भरडो. नाटकाची अतिशय आवड, चांगलो गोड गळो, अभिनयाची चांगली जाण, त्यामुळं हौशी रंगभूमीवर चांगलो गायक नट म्हणान नांव मिळलां. नाटकात काम करता करता गुजराथ्याच्या एका देखण्या मुली वांगडा प्रेम जुळलां. गुजराथ्याचा घराणा श्रीमंत. त्यात करून एकुलता एक चेडू. पयल्यांदा थोडोसो विरोध झालो पण पोरीच्या हट्टापायी एकदा लगीन झाला. चार वर्सात सासू-सासऱ्यांनी बॅट टाकल्यानी. मधल्या काळात दोन झील झाले. शिकले सवरले. कर्ते झाले तसा आबा पाटकरानं आपला पाटगांव गाठल्यान. घरची शेतीवाडी, बागायती जपणारो आबाचो धाकटे भाव सहदेव घरदार सगळा सांभाळून होतो. तो संतवृत्तीचो होतो. म्हणान लगनाच्या मोहात न पडता एकटो जीव सदाशिव! ऱ्हवान. 'संत येति घरा तोचि दिवाळी दसरा! अशा वृत्तीनं वागा होतो. आबा बायलेसह वर्तमान घराकडे येताच सहदेव बुवांच्या पाठसून फिराक मोकळो झालो आणि एक दिवस बेपत्ता झालो. कोण कोण म्हणतत तो हिमालयात गेलो. कोण सांगतत गाणगापूराक आसा. आबा तसो भाग्यवान. तेका सगळा कसा फारसे कष्ट न करता सगळा आयता मिळत गेला. (गाव गजाली, अरविंद म्हापणकर, वैजयंती प्रकाशन, सावंतवाडी, पृ. ३६)

**(शब्दार्थ** : वर्सा-वर्षे, तेना-त्याने, भरडो-जाडा, वांगडा-बरोबर, चेडू-मुलगी, बॅट टाकणे-जीव सोडणे, झील-मुले, गाठल्यान-गाठणे, भाव-भाऊ, ऱ्हवान-राहिला, बायल-पत्नी, पाठसून-पाठीमागून, फिराक-फिरायला.)

**मालवणी बोलीतील काही निवडक शब्दसंग्रह**

| मालवणी | मराठी | मालवणी | मराठी |
|---|---|---|---|
| माका | मला | झापाड/किडुसा | झुंजूमुंजू दिसणे |
| ह्येका | ह्याला | तिन्सान | तिन्हीसांज |
| त्येका | त्याला | सरावण | श्रावण |
| इलो | आला | हाड | घेऊन ये |
| आवस | आई | खै | कुठे |
| घोव | नवरा | फाटी | पाठी |
| सगी | सख्खी | कित्याक | का |
| तामडो | तांबडा | तवसा | मोठी काकडी |
| म्हावरा | मासेह | कुरली | खेकडा |

## ४.६ समारोप

सदर घटकामध्ये आपण प्रमाणभाषा आणि बोली यांचे स्वरूप व विशेष पाहिजे. प्रमाणभाषा आणि बोली ह्या परस्परांना पूरक अणि तारक आहेत. प्रमाणभाषा आणि बोली यांचा विचार करताना आर्थिक वर्ग, जाती, वर्ण, स्त्री-पुरुष असे भेद तपासणे गरजेचे आहे. भाषिक व्यवहाराचा सामाजिक संदर्भ अत्यंत गतिमान आणि व्यामिश्र असतो. आधुनिक जगातील जनसंपर्क माध्यमांचा अभ्यासही महत्त्वाचा ठरेल. काही भाषावैज्ञानिकांच्या मते प्रमाणभाषा एक कल्पना आहे. आपल्या साम्यभेदाच्या कल्पना आपण बोली व प्रमाणभाषेस लावतो. त्यामुळे बोली व स्थानिक भेद यांची एक बेरीज म्हणजे प्रमाणभाषा, असे मानले जाते. काहींच्या मते प्रमाणभाषा ही एक आदर्श बोलीच असते. या आदर्श बोलीत वाङ्मय, लेखन-भाषण, शिक्षण-ज्ञानार्जन, सांस्कृतिक वारसा जपण्याचे कार्य चालते. बोली प्रमाणभाषेला समृद्ध करते, पण एक सर्वमान्य प्रमाणभाषेचा वापर विविध गटांकडून, विविध ठिकाणी, विविध पातळ्यांवर होत असतो. यामुळे एक प्रमाणभाषा अनेक बोलींना जन्म देऊ शकते. अशी बदलणारी भाषिक रूपे म्हणजे बोली आणि मूळ सर्वमान्य भाषा म्हणजे प्रमाणभाषा हे एक आदेशात्मक भाषिक रूप एवढेच ते मानतात. बोलींचे महत्त्व वाढत चालले आहे. बोलीमुळे सांस्कृतिक संचित जतन होत आहे. बोली वैविध्यांच्या वापरामुळे आणि

अभ्यासामुळे प्रमाणभाषेच्या शब्दसंग्रहात वाढ होणार आहे. त्यामुळे बोलींचे जतन, संवर्धन, संशोधन करणे अपरिहार्य ठरणार आहे.

## ४.७ शब्दार्थ व टीपा

**१. डायनीएल एब्राम** : अमेरिकेतील गणिती तज्ज्ञ

**२. एलफिन्स्टन** : इंग्लंडमधील सर्वोच्च सत्तेची धोरणे भारतात राबवणारे अधिकारी. भारतात इंग्रज गव्हर्नर जनरल आणि कनिष्ठ अधिकारी यांच्यामध्ये असलेला दुवा.

**३. सर जॉर्ज अब्राहम ग्रिअर्सन** (७ जानेवारी १८५१ ते ९ मार्च १९४१) : एक आयरिश प्रशासकीय अधिकारी आणि भाषावैज्ञानिक म्हणून प्रसिद्ध. इंडियन सिव्हील सर्व्हीस अधिकारी म्हणून ते भारतात आले. बंगाल व बिहार मध्ये त्यांनी नोकरी केली. भारतीय भाषांचे सर्वेक्षण करून त्यांनी 'लिंग्विस्टिक सर्वे ऑफ इंडिया' (भारतीय भाषा सर्वेक्षण) या सर्वेक्षणाचे १९ खंड प्रकाशित केले.

## ४.८ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. भाषा ही एक ........... संस्था आहे.

(अ) सामाजिक (ब) राजकीय (क) सांस्कृतिक (ड) आर्थिक

२. एक भाषा दुसऱ्या भाषेपेक्षा ........... असते.

(अ) सारखी (ब) वेगळी (क) भिन्न (ड) निराळी

३. एका विस्तृत प्रदेशात बोलली जाणारी, अनेक बोली भेदांना व स्थानिक भेदांना समाविष्ट करून घेणारी भाषा म्हणजे ........... होय.

(अ) बोलीभाषा (ब) प्रमाणभाषा (क) पोटबोली (ड) प्रमाणबोली

४. भाषा ही ........... असते.

(अ) संकुचित (ब) परिवर्तनशील (क) प्रमाणशील (ड) प्रयोगक्षम

५. प्रमाणभाषेला ........... नावाने संबोधले जाते.

(अ) ग्रांथिक भाषा (ब) बोलीभाषा (क) पोटभाषा (ड) बालभाषा.

६. खानदेशात ........... बोली बोलली जाते.

(अ) वऱ्हाडी (ब) चंदगडी (क) अहिराणी (ड) कोकणी

७. ........... यांनी बोलीभाषेची वर्गवारी केलेली आहे.

(अ) डेव्हिड क्रिस्टल (ब) पिजिन आणि क्रिऑल

(क) जॉर्ज ग्रिअर्सन (ड) ब्लूमफिल्ड

८. बोलीत जिवंतपणा आणि स्वाभाविकता असते, असे बोलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य कोणी सांगितले आहे

(अ) सु. बा. कुलकर्णी (ब) ना. गो. कालेकर

(क) विजया चिटणीस (ड) लक्ष्मणशास्त्री जोशी

९. बोलींच्या परिसरात स्थानिक बोली सापडतात. त्यांना काय म्हणतात ?

(अ) उपबोली (ब) स्थलबोली

(क) निसर्ग बोली (ड) व्यक्ती बोली

१०.समाजाचे सांस्कृतिक संचित कशामुळे धोक्यात येते.

(अ) राजकारणामुळे (ब) कलावंतामुळे

(क) समूहाच्या वितुष्टामुळे (ड) बोली संतुष्टात आल्यामुळे

**उत्तरे** : १-अ, २-क, ३-ब, ४-ब, ५-अ,

६-क, ७-क, ८-ब, ९-अ, १०-ड.

**(ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. प्रमाणभाषा म्हणजे काय सांगून, प्रमाणभाषेचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. बोलीच्या व्याख्या सांगून, बोलीचे स्वरूप व विशेष लिहा.

**(क) लघूत्तरी प्रश्न**

१. अहिराणी बोली ३. चंदगडी बोली

२. वऱ्हाडी बोली ४. मालवणी बोली.

## ४.९ अधिक वचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. बोली विज्ञान, औदुंबर सरवदे, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर.

२. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण, महाराष्ट्र, संपा. गणेश देवी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

३. भाषा व साहित्य संशोधन (खंड पाहिला) संपा. डॉ. वसंत जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

४. भाषा : इतिहास आणि भूगोल, ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन, गृह, मुंबई.

५. भाषा आणि संस्कृती : ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन, गृह, मुंबई.

६. भाषा विज्ञान आणि मराठी भाषा, डॉ. अनिल गवळी, मेहता पब्लिकेशन, पुणे.

७. भाषा विज्ञान आणि मराठी भाषा, डॉ. अनिल गवळी मेहता पब्लिकेशन, पुणे.

८. बोलीभाषा-संशोधनाच्या नव्या दिशा, संपा. डॉ. म. सु. पगारे प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव.

९. समाजभाषा विज्ञान आणि मराठी कादंबरी, डॉ. नंदकुमार मोरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

१०. शिविम संशोधन पत्रिका (बोली विशेषांक) संपादक डॉ. शिवकुमार सोनाळकर, शिवाजी विद्यापीठ, मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर.


## ४.१० उपक्रम

१. आपण राहत असलेल्या परिसरातील किंवा तालुक्यातील बोलीचे नमुने जमा करून त्याचे विश्लेषण करा.

२. लहान मुले, युवा वर्ग, प्रौढ, वृद्ध, स्त्री-पुरुष, कामगार, व्यावसायिक इत्यादी वर्गानुसार त्यांच्या बोलीतील शब्दसंग्रह करा.